TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192142
UNIVERSAL LIBRARY

OUP—881—5-8-74—15,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M922.94 M21E Accession No. PGM2186

Author [illegible]

Title एकनाथ-तुकाराम-चरित्र

This book should be returned on or before the date last marked below.

महिपतिकृत

श्री एकनाथ—तुकाराम चरित्र

[मुंबई विश्वविद्यालयानें १९४६ च्या बी. ए. च्या पदवी परीक्षेकरितां नेमलेलीं ‘ भक्तविजयां ’ तील चरित्रें.]

संपादक
म. भा. भू. जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर

किंमत अडीच रुपये

बॉम्बे बुक डेपो, मुंबई, ४

प्रकाशक :
गंगाधर देवराव खानोलकर
बॉम्बे बुक डेपो, मुंबई, ४

DERABAD

[सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन]
प्रथमावृत्ती, मे १९४४

मुद्रक :
बाळकृष्ण गोपाळ प्रभु कोचरेकर
श्रीकृष्ण मुद्रणालय,
९ वी खेतवाडी, मुं. ४.

प्रास्ताविक दोन शब्द

१९४५ सालच्या बी. ए. च्या अभ्यासक्रमांतले हे मराठी पद्य वेंचे, टीपा वगैरे देऊन तयार करण्याचें काम प्रकाशकांनीं मजकडे सोपविलें होतें तें मी यथामति पार पाडलें आहे. ओव्यांचे पाठ शक्य तितके शुद्ध असावे याबद्दल फार दक्षता बाळगली आहे. संदर्भ देण्यांत व कठिण शब्दांचा अर्थ सुलभ करून सांगण्यांत बिलकुल कसूर केलेली नाहीं. उपमा व दृष्टांत या दोन अलंकारांशिवाय इतर कोणतेही अलंकार या वेंच्यांत नसल्यामुळें, अलंकारांची माहिती देण्याची आवश्यकता वाटली नाहीं.

दादर,
ता. १९ मे १९४४.

ज. र. आजगांवकर

प्राचीन मराठी वाङ्मय

मराठी भाषेची उत्पत्ति कशी आणि केव्हां झाली या संबंधानें विद्वान् लोकांत जरी अद्याप थोडासा मतभेद आहे तरी मराठी ग्रंथरचनेचा प्रारंभ शालिवाहन शकाच्या बाराव्या शतकाच्या आरंभींच झाला असला पाहिजे ही गोष्ट आतां बहुतेक सर्वमान्य झालेली आहे. जुन्यांतला जुना उपलब्ध ग्रंथ म्हटला म्हणजे मुकुंदराजांचा 'विवेकसिंधु' होय. खुद्द ग्रंथांतच या ग्रंथाचा रचनाकाल शके १११० हा दिलेला असून त्यानंतर बरोबर १०२ वर्षांनीं म्हणजे शके १२१२ त ज्ञानदेवांनीं आपला 'भावार्थदीपिका' किंवा 'ज्ञानेश्वरी' हा लोकप्रिय ग्रंथ लिहिला. ज्ञानेश्वरीरचनेपूर्वी कांहीं वर्षे महाराष्ट्रांत महानुभाव पंथाची स्थापना होऊन त्या पंथाच्या कांहीं कवींनीं थोडीबहुत ग्रंथरचनाही केली होती व पुढील कालांत ती सारखी वाढतच गेली. आरंभींच्या महानुभावी ग्रंथांची भाषा ज्ञानेश्वरीच्या भाषेसारखीच जुनी आहे. परंतु हे ग्रंथ एका विशिष्ट पंथाच्या लोकांसाठींच मुद्दाम सांकेतिक लिपींत लिहिण्यांत आल्यामुळें महाराष्ट्रांत त्यांचा फारसा प्रचार झाला नाहीं व त्यांना सर्वमान्यता मिळाली नाहीं. इतकेंच नव्हे तर प्रसिद्ध इतिहाससंशोधक कै. वि. का. राजवाडे यांनीं कांही वर्षांपूर्वी महानुभावांच्या सांकेतिक लिपीचा उलगडा करून महाराष्ट्र वाङ्मयमंदिराचें इतकीं वर्षे बंद पडलेलें तें एक दालन महाराष्ट्रीयांस खुलें करून दिलें त्या वेळेपर्यंत म्हणजे जवळ जवळ सहाशें वर्षे महानुभावांची ही प्रचंड ग्रंथसंपत्ति बहुतेक अज्ञातच होती. या वाङ्मयांतील कांहीं रचना खरोखरच फार सुंदर आहे व त्यांतील बऱ्याच ग्रंथांत महानुभावांचें वैशिष्ट्य असें कांहीं नाहीं; इतर जुन्या मराठी कवींच्या ग्रंथांसारखेच ते ग्रंथ आहेत. पुढें ज्ञानदेवमहाराजांनीं आपला ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला आणि तेव्हांपासून सर्वमान्य असें मराठी वाङ्मय मोठ्या प्रमाणांत निर्माण होऊं लागलें. पूर्वी सांगितल्याप्रमाणें, विवेकसिंधु ग्रंथाच्या शेवटीं त्याचा समाप्तिकाल शके १११० हा दिलेला आहे म्हणूनच तो 'मराठींतील आद्यग्रंथ' मानावा लागतो. एरवी, भाषेच्या दृष्टीनें पाहिल्यास ती रचना इतकी जुनी असेल असें मुळींच वाटत नाहीं.

पद्यात्मक संस्कृत ग्रंथरचनेचेंच अनुकरण जुन्या मराठी कवींनीं केल्यामुळें बहुतेक सर्व जुने मराठी ग्रंथ पद्यात्मकच आहेत; शंभरांत एकदेखील

गद्यग्रंथ सापडत नाहीं. ओवी आणि अभंग या दोन वृत्तांत ही बहुतेक सगळी जुनी काव्यरचना आहे. श्लोक आर्या वगैरे वृत्तांत आढळणारी कविता एकंदर कवितेच्या मानानें थोडी आहे. ज्ञानदेवांचें व्यक्तिमाहात्म्य तर त्यांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथांच्या लोकप्रियतेस कारणीभूत झालेंच, पण शिवाय उत्कृष्ट वाङ्मयास आवश्यक असलेले प्रतिभा, प्रसाद, कलाविलास, रसोत्कर्ष इत्यादि गुणही त्यांच्या ग्रंथांत प्रकर्षानें असल्यामुळें व अध्यात्मासारखा गहन विषय उपमा-दृष्टांतादि अलंकारांच्या साहाय्यानें सुलभ आणि मनोवेधक करून सांगण्याची त्यांची हातोटी अपूर्व असल्यामुळें त्यांची जी छाप महाराष्ट्रावर एकदां बसली ती कायमची! पूर्वीच्या सर्व ग्रंथांस ज्ञानेश्वरीनें निष्प्रभ करून टाकलें असें म्हटल्यास चालेल. ज्ञानेश्वरांचेच समकालीन निवृत्तिनाथ, सोपान, मुक्ताबाई, नामदेव, गोरा कुंभार, जनाबाई, चोखामेळा वगैरे निरनिराळ्या जातींत होऊन गेलेल्या अनेक संतांनीं आपल्या सुलभ व प्रेमळ अभंगवाणीनें भक्ति-मार्गाचा प्रसार महाराष्ट्रांत केला व कोरड्या कर्मठपणाची नांगी मोडून टाकली. ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या ग्रंथांच्या भाषेपेक्षां या अभंगांची भाषा सोपी व रचना हृदयास जाऊन भिडणारी असल्यामुळें सर्वसामान्य जनतेंत त्यांचा पुष्कळच प्रसार झाला व संस्कृत ग्रंथांतील अध्यात्म व भक्ति यांच्या ज्ञानाचें भांडार ती भाषा न जाणणाऱ्या लोकांस खुलें झाल्यासारखें झालें.

ज्ञानदेव समाधिस्थ झाल्यावर थोड्याच वर्षांनीं उत्तरेकडील मुसलमानी राजसत्तेची धाड महाराष्ट्रावर आली व ती राजसत्ता शिवाजी महाराजांनीं स्वराज्याची स्थापना केली त्या वेळेपर्यंत म्हणजे सुमारें ४०० वर्षें महाराष्ट्रावर चालू होती. हा येवढा काल म्हणजे महाराष्ट्राचें तमोयुग होय. ह्या तीन चारशें वर्षांत पिसा बहिरा, साळ्या रसाळ, नामा पाठक, विष्णुदास नामा, एकनाथ, दासोपंत, त्र्यंबक, शिवकल्याण, कृष्णदास मुद्गल वगैरे संतकवि होऊन गेले व त्यांनीं भारत, रामायण, भागवत इत्यादि सर्वमान्य संस्कृत ग्रंथांचीं सुंदर काव्यमय मराठी भाषांतरें करून लोकाची स्वधर्मनिष्ठा व स्वसंकृतिप्रेम हीं कायम राखलीं.. या सर्व कवींत एकनाथ महाराजांची कामगिरी फार मोठी आहे. प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड त्यांनीं चांगल्या रीतीनें घालून दाखविली, भूतदयाधिष्ठित धर्म तोच खरा धर्म होय हें स्वोदाहरणानें जनतेस पटवून दिलें व जुनाट कर्मकांडाचें

स्तोम बरेंच कमी केलें. या कालांत ज्ञानेश्वरीच्या वेळचें मराठी भाषेचें जुनें स्वरूप पुष्कळच पालटलें व जुने शब्द मागें पडून भाषेस सौलभ्य येऊं लागलें. “व्याकरण शिकल्यानें शुद्ध कसें लिहावें आणि शुद्ध कसें बोलावें हें समजतें,” हें विधान ठीक आहे, परंतु मराठी भाषेचें व्याकरण झालें नव्हतें अशा कालीं लिहिण्यांत आलेल्या या मराठी कवितेची भाषा पुष्कळच शुद्ध आहे हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

एकनाथांपासून मोरोपंतांपर्यंतची शंभरदीडशें वर्षे हा जुन्या मराठी वाङ्मयाचा उत्कर्षकाल होय. विठ्ठल, आनंदतनय, वामन, अनंत, नागेश, रघुनाथपंडित, सामराज, वीरेश्वर, वगैरे आख्यानकवि याच कालांत झाले. महाभारतकार मुक्तेश्वर हा महाकवि याच कालांत होऊन गेला. श्रीधरांनीं आपले हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप वगैरे लोकप्रिय ग्रंथ याच कालात लिहिले. शिवाय तुकाराम आणि रामदास हे दोन फार मोठे सत्पुरुष व त्यांचे समकालीन रंगनाथ, जयराम, केशवस्वामी, शिवराम, यांच्या ग्रंथांचा तर तत्कालीन महाराष्ट्रावर पुष्कळच परिणाम झाला. तुकारामबुवाच्या अभंग अभंगवाणीनें बहुजनसमाजाचें अंतःकरण काबीज केलें तर समर्थांच्या धीरगंभीर गर्जनेनें किंकर्तव्यमूढ होऊन बसलेला महाराष्ट्र खडबडून जागा झाला. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेला या संतांची प्रत्यक्ष मदत झाली असेल असें मानण्यास जरी कांहीं पुरावा नाहीं तरी त्यांनीं आपल्या आचरणानें आणि उपदेशानें, परधर्मीय राजसत्तेमुळें स्वधर्मपराङ्मुख होऊं पाहणाऱ्या जनतेची स्वधर्मनिष्ठा जागृत ठेवण्याचा जो आटोकाट प्रयत्न केला त्याचा फायदा शिवाजी महाराजांस स्वराज्यस्थापनेच्या बाबतींत झालाच असला पाहिजे यांत संदेह नाहीं.

पुढें, पेशवाई सुरू झाल्यावर संतचरित्रकार महीपति, निरंजन माधव, मध्वमुनीश्वर, अमृतराय, इत्यादि कवि झाले. यांपैकीं महीपतींची ग्रंथरचना फार सोपी असून मोरोपंतांची रचना ‘संस्कृत-प्राकृत-मिश्रित’ असल्यामुळें बरीच कठीण झाली आहे. पेशवाईच्या अंतकालीं पारमार्थिक काव्यरचनेस ओहोटी लागून लावण्या आणि फटके या जातीची रंगेल कविता निर्माण होऊं लागली. रामजोशी, अनंत फंदी, श्रीपत फंदी, होनाजी बाळा, सगनभाऊ, प्रभाकर, परशुराम इत्यादि लावणीकवि या कालांत झाले. देशस्थितींत व समाजस्थितींत जसजसा बदल होत गेला तसतसा काव्यविषयांतही बदल होत

गेला. पूर्वी वीररसप्रचुर पोवाडे झाले होते तसे या कालांतही झाले, परंतु एकंदरींत शृंगाररसावर भर फार. जुन्या पारमार्थिक काव्यरचनेची परंपरा मोरोपंतांबरोबरच नष्ट झाली असें मात्र कोणी समजूं नये. कारण पंतांनंतर तसली कविता लिहिणारे हंसराज, विठोबा अण्णा दप्तरदार, राजाराम प्रासादी वगैरे अनेक कवि होऊन गेले आहेत व अद्यापही दासगणूसारखे पारमार्थिक ग्रंथलेखक ती थोर परंपरा मनोभावेंकरून चालवीत आहेत. अर्थात् मी हें पारमार्थिक गद्यग्रंथांविषयीं लिहीत नाहीं.

संस्कृताऽनभिज्ञ महाराष्ट्रीयांस भगवद्गीतादि ग्रंथांतलें अध्यात्मज्ञान सुलभ करून देण्याची आवश्यकता उत्पन्न झाली त्या वेळीं, मुकुंदराज ज्ञानदेव, एकनाथ, दासोपंत वगैरे संतकवींनीं ज्ञानेश्वरी, भागवत, गीतार्णव वगैरे ग्रंथ लिहून ती गरज भागविली. असले ग्रंथ लिहिण्याचा ज्यांचा अधिकार नव्हता त्यांनीं भारत, भागवत, रामायण इत्यादि इतिहासपुराणांतल्या मनोरंजक व बोधप्रद कथा आपल्या प्रतिभासंपन्न वाणीनें मराठींत उतरल्या. कीर्तनादिकांतून अशा कथा गायनयुक्त मनोरंजक रीतीनें सांगतां याव्या म्हणून वामन, विठ्ठल, आनंदतनय, मोरोपंत वगैरे कवींनीं निरनिराळ्या वृत्तांत सुंदर आख्यानरचना केली. पुढें अध्यात्मासारखा गहन विषय सामान्य जनांस फारसा आकलन होत नाहीं असें दिसून येतांच "बुडती हे जन न देखवे डोळा" अशी स्थिति झालेल्या तुकारामबुवांसारख्यांनीं आपल्या प्रासादिक, स्वानुभवयुक्त व अधिकारवती अभंगवाणीनें साध्या भक्तिमार्गाची तुतारी फुंकली. प्रपंच, राजकारण आणि परमार्थ यांचा मेळ घालून लोकांस उद्योगप्रवण करण्याची जरुरी भासली त्या वेळीं समर्थांनीं प्रयत्नवादाचें महत्त्व सांगण्यासाठीं आपला ग्रंथराज 'दासबोध' लिहिला. अशा रीतीनें अनेक विषयांवर भरपूर ग्रंथरचना झाली तरी संतचरित्रें लिहिण्याचें कार्य मोठ्या आणि व्यापक प्रमाणावर त्या वेळेपर्यंत कोणी केलें नव्हतें तें शेवटीं महीपतींनी केलें. दरम्यान स्वराज्यस्थापना होऊन महाराष्ट्रांतील क्षात्रवृत्ति लोकांस आपलें शौर्य गाजविण्याची संधि सापडतांच त्यांचे गुणानुवाद गाऊन त्यांना उत्तेजन देणारे शाहीर कवि निर्माण झाले व त्यांनीं अनेक शूर आणि कर्तबगार पुरुषांवर पोवाडे रचले. पुढें रावबाजींच्या कारकीर्दीत 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें महाराष्ट्रीयांचा रंगेलपणा वाढत चालला

व त्याबरोबर टाळमृदंगवीणादि सात्त्विक वाद्यांचा मंजुळ आवाज, डफ आणि तुणतुणें यांच्या धांगडधिंग्यांत ऐकूं येईनासा झाला. कमालीच्या शृंगारिक व अश्लील लावण्यांनीं या कालीं कहर केला होता. तथापि एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं या शृंगारसरोवरांत अहोरात्र डुंबत असतांही रामजोशी, अनंत फंदी, होनाजी बाळा, परशुराम वगैरे लावणीकवींस महाराष्ट्रीयांच्या स्वाभाविक अंतर्मुखतेची व पारमार्थिक वृत्तीची पूर्ण विस्मृति कधींच पडली नाहीं. त्यांनाही मधून मधून पारमार्थिक काव्यरचना करण्याची उकळी येतच असे. " नरजन्मांधि नरा करुनि घे नरनारायण गडी, " ही रामजोशीबुवांची लावणी, ' घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला " ही होनाजी बाळाची भूपाळी व ' येउं दे वाचे नाम देवाचें अष्टौ प्रहरा शिव हर हर ' हा अनंत फंदींचा फटका यांची लज्जत त्याच्या शृंगारिक लावण्याइतकीच बहारीची नाहीं असें कोण म्हणेल ?

कवितेचे विषय बदलत गेले तसा भाषेंतही बदल होत गला. ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी आणि महीपतींचा भक्तविजय या दोन ग्रंथांच्या भाषेंत किती तरी फरक आहे व हल्लींची चालू भाषा आणि ज्ञानेश्वरकालीन भाषा यांत तर पुष्कळच फरक पडला आहे. ज्ञानेश्वरीपासून पुढील ग्रंथांची भाषा उत्तरोत्तर सोपी होत गेली व शेवटचे मोठे कवि मोरोपंत यांच्या कवितेची भाषा संस्कृतशब्दप्राचुर्या-मुळें जरी कठिण झाली आहे तरी जुन्या मराठी भाषेंतील अपरिचित कठिण शब्दांचा फारसा भरणा तींत नाहीं. कालपरत्वें जशी ग्रंथांची भाषा बदलली तद्वतच निरनिराळ्या कवींच्या अधिकाराप्रमाणें व स्थलभिन्नतेमुळेंही त्याच्या ग्रंथांच्या भाषेंत फरक पडलेला आढळतो. उदाहरणार्थ, मुक्तेश्वर आणि रामदास यांच्या कालांत पांचपंचवीस वर्षांहून अधिक अंतर नसतांही त्याच्या भाषाशैलीत फारसें साम्य नाही. तुकाराम आणि रामदास हे समकालीन कवि पण त्यांची भाषा सारखी नाहीं. तोच प्रकार मोरोपंत व महीपति या समकालीन कवींचा. महीपतींची भाषा अगदीं सोपी तर पंतांची अतिशय कठिण !

याप्रमाणें, मुकुंदराजांच्या विवेकसिंधूपासून पंतांच्या आर्याभारतापर्यंत जी जुनी कविता झाली तिची रूपरेषा येथें दिली आहे. यासंबंधानें अधिक माहिती कोणास पाहिजे असेल तर त्यांनीं पांगारकरकृत मराठी वाङ्मयाचा इतिहास, आजगांवकरकृत 'महाराष्ट्र कविचरित्र' व भावेकृत 'महाराष्ट्र सारस्वत' हे ग्रंथ पहावे.

---

*

प्रस्तुत पद्यवेच्यांविषयीं दोन शब्द

महीपतिकृत 'भक्तविजय' या अत्यंत लोकप्रिय ग्रंथाचे ४५ वा व ४६ वा हे दोन व ४८ ते ५२ हे पांच मिळून एकंदर ७ अध्याय या पुस्तकांत दिले असून त्यांत प्रसिद्ध साधुकवि एकनाथ व तुकाराम यांच्या चरित्रांतील कांहीं गोष्टी समाविष्ट झाल्या आहेत. एकंदर ओवीसंख्या १५३७ आहे. या दोन्ही संतांचीं विस्तृत चरित्रें महीपतींनीं मागाहून आपल्या 'भक्तलीलामृत' या ग्रंथांत दिलीं आहेत, तीं पुष्कळ नवीन व विश्वसनीय माहिती मिळवून लिहिलीं आहेत व त्यामुळें तीं विशेष चित्ताकर्षक उतरलीं आहेत. या वेंच्याचें वृत्त 'ओवी' हें आहे. अगदीं जुन्या काळी, म्हणजे मराठींत ग्रंथरचना झाली नव्हती त्या काळीं, लग्नकार्यादि समारंभाच्या वेळीं किंवा दळतांना वगैरे जीं गीतें बायका म्हणत असत त्यांनाच पुढें कालांतरानें ओवीचें स्वरूप प्राप्त झालें व ओवीपासून पुढें अभंग झाला. ओवींतही अनेक प्रकार आहेत. मुकुंदराज, ज्ञानदेव वगैरे जुन्या कवींच्या ओव्या अगदीं लहान. उदाहरणार्थ—

ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जयजय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥—ज्ञानेश्वरी

एकनाथांची ओवी याहून जरा मोठी व तींत बहुतकरून, चौथ्या चरणांत पुन: यमक येतें. उदाहरणार्थ—

हो कां योगियांचा आचार । करितां देखती लहानथोर ।
सविकल्पनिर्विकल्पविचार । न साचार कोणासी ॥
उद्धव अक्रूर नारद तुंबर । आणिक अपार वैष्णववीर ।
एके पंक्तीस शार्ङ्गधर । बैसवी साचार तयांसी ॥

जुन्या मराठी कवितेचा तीनचतुर्थांश भाग या ओवीवृत्तांत आहे. उरलेला एकचतुर्थांश भाग अभंग, श्लोक, आर्या, पदें, आरत्या व भूपाळ्या वगैरे यांत आहे. मुकुंदराज, ज्ञानदेव, एकनाथ, दासोपंत, एकनाथ, मुक्तेश्वर, श्रीधर, जयराम, शिवकल्याण, कृष्णदयार्णव, महीपति, वामन वगैरे बहुतेक मोठ्या कवींची बहुतेक कविता ओवीवृत्तांत आहे. वामनपंडितानीं आपल्या यथार्थ-दीपिका या ग्रंथांत ओवीवृत्ताचा उपयोग गद्यासारखा केला आहे, म्हणजे तिच्या लांबीला कांहीं धरबंध ठेवलेला नाहीं. मुक्तेश्वरांची ओवी फार डौलदार असते. उदाहरण:—

मागधराजा आपुले प्रौढी। सप्तद्वीप समुद्रथडी।
जिंकोनि राजे लक्षकोडी। कारागृहीं सूदिले॥

रामदासांच्या बहुतेक ओव्या जरा आंखूड, शेवटचा चरण तोकडा; पहा

धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार।
मागें झाले पुढें होणार। देणें ईश्वराचें॥

प्रस्तुत वेंच्यांत ज्या दोन संतांचीं चरित्रें आलीं आहेत ते दोघेही महाराष्ट्र संतमंडळांत फार प्रसिद्ध आहेत. दोघांनींही महाराष्ट्रांत भक्तिमार्गाचा फार प्रसार केला. ज्ञानदेवांच्या खालोखाल एकनाथांची योग्यता महाराष्ट्रांत मानली जाते. लोक त्यांना ज्ञानदेवांचा अवतार असेंच समजतात. तुकोबांची लोकप्रियता बहुजनसमाजांत विशेष; त्यांना नामदेवांचा अवतार मानतात. 'ज्ञान्याचा एका, नाम्याचा तुका' हें वचन प्रसिद्धच आहे. या दोघांच्याही चरित्रांवर जुन्या कालीं व हल्लीं पुष्कळ प्रबंधरचना झाली आहे. 'केशव' नामक लेखकानें ओवीबद्ध एकनाथचरित्र लिहिलें आहे त्याचे ३१ अध्याय आहेत. महीपतींनीं आपल्या भक्तलीलामृतांत जें विस्तृत नाथचरित्र दिलें आहे तें याच केशवकृत नाथचरित्राच्या आधारानें लिहिलें आहे. गेल्या ५० वर्षांत, सहस्रबुद्धे, पांगारकर व आजगांवकर यांनीं एकनाथचरित्रें लिहिलीं आहेत.

तुकोबांविषयीं, महीपतींच्यापूर्वी, फारसें लेखन कोणी केलेलें नाहीं. तुकारामबावांचे नातू गोपाळबावा, बंधु कान्होबा, पांडुरंग कवि इत्यादिकांनीं तुकोबांच्या चरित्रांतील कांहीं गोष्टी अभंग व ओवी वृत्तांत वर्णिल्या आहेत; आणि मोरोपंतादिकांनीं तुकोबांचीं स्तुतिस्तोत्रें गायिलीं आहेत. परंतु जुन्या कालीं लिहिलेलें तुकोबांचें विस्तृत चरित्र म्हणजे भक्तलीलामृतांत महीपतींनीं दिलेलें चरित्रच होय. अर्वाचीन काळीं, केळूसकर, धुरंधर, पांगारकर, हर्षे, पारखे, भिडे, आजगांवकर, केळकर इत्यादि अनेक लेखकांनीं तुकोबांचीं लहानमोठीं चरित्रें लिहिलीं आहेत. या दोन संतांची प्रस्तुत पद्यवेंच्यांत जी माहिती आली आहे त्यापेक्षां अधिक माहिती कोणा जिज्ञासु विद्यार्थ्यास पाहिजे असेल तर त्यानें उपरिनिर्दिष्ट गद्यपद्य चरित्रें पहावीं.

प्रस्तुत पद्यवेंचे ज्या 'भक्तविजय' ग्रंथांतून घेतले आहेत तो ग्रंथ लिहितांना, एकनाथ व तुकाराम यांच्याविषयींची जेवढी माहिती महिपतींस मिळाली होती तेवढीच त्यांनीं या सात अध्यायांत दिली आहे. महीपति हे बरेच अर्वाचीन

कवि असल्यामुळें त्यांची भाषा समजण्यास फारशी कठिण नाहीं. तींत जुने अपरिचित शब्द फारसे नाहींत. संस्कृत शब्दांचाही भरणा मोठासा नाहीं. दीडशें वर्षांपूर्वींच्या खेडवळ देशस्थ ब्राह्मणांच्या भाषेंतले बरेच शब्द, त्याचप्रमाणें कांहीं फारशी शब्द महीपतींच्या ग्रंथांत आढळतात. त्यांची भाषा रेखीव नाहीं व असावी तितकी व्याकरणशुद्धही नाहीं. 'निज' शब्दानें आरंभित होणारे 'निजप्रीति,' 'निजहित' 'निजच्छंदें,' 'निजशांति,' 'निजप्रेमें' इत्यादि शब्द महीपतींनीं इतके वापरले आहेत कीं कांहीं ठिकाणीं ते अगदीं अनन्वर्थक वाटतात. महीपतींच्या कवितेंत दृष्टांत पुष्कळ, परंतु दृष्टांताचा उपयोग गहन विषय सुलभ करून सांगण्यासाठीं असतो हें लक्षांत न घेतां अगदीं साधी गोष्ट सांगतांनादेखील ते दृष्टांतांची माळका लावतात व त्यामुळें विनाकारण ग्रंथविस्तार होतो. असे कांहीं दोष महीपतींच्या कवितेंत असले तरी त्यांची वाणी फार रसाळ, प्रेमळ व प्रासादिक असल्यामुळें भाविक वाचक तींत आरंभापासूनच रंगून जातो. हल्लींची चिकित्सक दृष्टि अर्थातच महीपतींस नव्हती व त्याबद्दल त्यांना दोष देतां येणार नाहीं. त्यांनीं जशा कथा ऐकल्या तशा त्या आपल्या ग्रंथात दिल्या. मात्र तत्कालीन समजुतीप्रमाणें, शक्य तितकें संशोधन करून विश्वसनीय माहिती मिळविण्याच्या बाबतींत त्यांनीं बिलकुल कसूर केलेली नाहीं हें अन्यत्र सांगितलेंच आहे.

महीपति

महिपतिच्या वाणीतें सेवुनि तरतात जेंवि गंगेतें ।
विषयांत रंगलें जें जनमानस सद्यशींच रंगे तें ॥—मोरोपंत

"महीपतींनीं लिहिलेल्या कवितेचें सेवन करून, गंगेचें सेवन केल्याप्रमाणें लोक तरतात, आणि विषयोपभोगांत रंगून गेलेलें मन साधुसंतांच्या यशोगानांत रंगून जातें," असा, महीपतींच्या काव्यसरितेविषयीं रसिकशिरोमणि कविवर्य मोरोपंत यांनीं वरील सुंदर आर्येत जो अभिप्राय व्यक्त केला आहे तो अगदीं योग्य आणि यथार्थ आहे असें कोण म्हणणार नाहीं? संतचरित्रकार या नात्यानें तर महाराष्ट्र कविमंण्डलांत महीपतींचें स्थान अगदीं स्वतंत्र आहे. जुन्या साधूंचीं चरित्रें अर्वाचीन पद्धतीनें लिहूं इच्छिणारासदेखील महीपतींच्या ग्रंथांचें साहाय्य घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं इतकें सांगितलें म्हणजे वाचकांस त्याच्या कामगिरीची कल्पना होईल. आपल्या कालापूर्वी उभ्या हिंदुस्थानांत होऊन गेलेल्या बहुतेक सर्व साधुसंतांचीं चरित्रें महीपतींनीं आपल्या संतचरित्रविषयपर चार मोठ्या ग्रंथात इतक्या रसाळ वाणीनें वर्णिलीं आहेत कीं, अर्वाचीन पद्धतीचीं संतचरित्रें यापुढें कितीही बाहेर पडलीं तरी महीपतींच्या ग्रंथांची लोकप्रियता लवलेशही कमी होण्याचा संभव नाहीं. बहुजनसमाजास जो प्रेमळपणा पाहिजे, जो रसभरितपणा पाहिजे, जो प्रसाद पाहिजे ते गुण आम्हा अर्वाचीन लेखकांच्या लिखाणांत कसे येणार? रूक्ष तर्ककर्कशता आणि वाजवीपेक्षां अधिक विचिकित्सा यांच्या भरीस श्रद्धाहीनतेची जोड मिळाल्यावर, प्रेमळपणा आणि रसोत्कर्ष यांची अपेक्षा करणें हें सहाराच्या वाळवंटात नंदनवनाची अपेक्षा करण्याइतकेंच मूर्खपणाचें आहे. जुन्या संतकवींचे ग्रंथ महाराष्ट्रांतील बहुजनसमाज अद्याप मोठ्या आवडीनें वाचतो आणि आमच्या ग्रंथांकडे पाहून नाक मुरडतो याचें कारण हेंच होय. गेल्या सातशें वर्षांत शेंकडों संतकवि महाराष्ट्रांत होऊन गेले व त्यांतले पांचदहा कवि फार लोकप्रिय आहेत, परंतु त्यांतल्यात्यांत श्रीधर आणि महीपति यांचेच ग्रंथ महाराष्ट्रात अद्याप फार वाचले जातात. किंबहुना श्रीधर आणि महीपति यांनीं महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाच्या धार्मिक आणि नैतिक शिक्षणाची कायमची जबाबदारी आपल्यावर घेतली आहे असें म्हणण्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. तर अशा या थोर सत्कवीचें संक्षिप्त चरित्र आरंभीं देऊन नंतर त्याच्या कवितेच्या गुणदोषांची यथामति चर्चा करूं.

महीपतींचे वडील दादोपंत कुळकर्णी हे मोगलांच्या पदरीं होते. तिकडून आपल्या वयाच्या ४० व्या वर्षी ते हल्लींच्या अहमदनगर जिल्ह्यांतील ताहराबाद नामक गांवीं येऊन राहिले. अहमदनगर, ताहराबाद इत्यादि नांवांवरूनच या प्रांतांत एका कालीं मुसलमानाचें किती वर्चस्व होतें याची कल्पना होण्यासारखी आहे. दादोपंत हे ताहराबाद येथें येऊन राहिल्यावर, तेथें ते स्नानसंध्या, देवदेवतार्चन इत्यादि धर्मकार्यें करून कालक्षेप करीत असत. दर महिन्यास पंढरीची वारी करण्याचा त्यांचा क्रम होता व तो त्यांनी निर्विघ्नपणें दोन तपें चालविला. पोटीं पुत्रसंतान नसल्यामुळें आपल्यामागें वारी बंद पडेल असा विचार त्यांच्या मनांत येऊन, एकदां पंढरीस असतांना, श्रीविठ्ठलाच्या चरणावर मस्तक ठेवून ते म्हणाले, "भगवंता, वारी चालू राहण्याची व्यवस्था होईल तर बरें होईल." पुढें रात्रौ ते देवळांतील एका ओरींत निजले असतां, असा चमत्कार झाला म्हणून सांगतात कीं, श्रीविठ्ठलानें स्वप्नांत त्यांच्या हातांत एक पेढा दिला व "हा आपल्या पत्नीस खावयास द्या" असें सांगितलें. दादोपंत जागे होऊन पहातात तों हातांत खरोखरच पेढा आहे ! मग ते ताहराबादेस गेले आणि तो पेढा त्यांनीं आपल्या पत्नीस खावयास दिला. लवकरच ती गर्भवती झाली. ताहराबाद येथें महीपतींचा जन्म सन १७१५ (शके १६३७) त झाला; दादोपंतांची साठी उलटल्यावर त्यांनीं हें पुत्रमुख पाहिलें. महीपति हे ऋग्वेदी वाशिष्ठ गोत्री देशस्थ ब्राह्मण; आडनांव कांबळे. महीपति रूपानें फार सुंदर होते तसे बुद्धीनेंही चलाख होते. त्यांचा बांधा सुदृढ होता. बाळपणचे खेळ म्हणजे भजन पूजन. दगडाच्या चिपळ्या घेऊन ते भजन करीत. ते पांच वर्षांचे झाले तेव्हां त्यांनीं वडिलांपाशीं पंढरपुरास जाण्याचा हट्ट घेतला. वडील अशक्त झाले होते म्हणून त्यांनीं आपल्या विश्वासाचा एक कासार व दोन ब्राह्मण बरोबर देऊन महीपतींस पंढरपुरास पाठविलें. तेथें त्यांनीं श्रीपांडुरंगाचें दर्शन घेतलें व क्षेत्रप्रदक्षिणा केली.

महीपतींचें शिक्षण बरेंच झालें होतें. त्यांनीं स्वहस्तें लिहिलेले ग्रंथ उपलब्ध आहेत त्यांतील त्यांचें हस्ताक्षर चांगलें आहे. 'कथासारामृत' हा आपला ग्रंथ त्यांनीं संस्कृत पुराणग्रंथांच्या आधारानें लिहिला आहे यावरून त्यांना संस्कृत भाषा अवगत असावी हें उघड दिसतें. मात्र, एकनाथ, मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत यांच्यासारखे ते मोठे व्युत्पन्न पंडित होते असें मानण्यास आधार नाहीं. मराठी तर त्यांची मातृभाषाच होती, पण त्याशिवाय, गुजराथी, हिंदी व

कानडी याही भाषा त्यांस अवगत होत्या. आपल्यापूर्वीं होऊन गेलेल्या ठळक मराठी कवींची कविता त्यांनीं लक्षपूर्वक वाचली होती हें त्यांच्या ग्रंथांवरून दिसतें. महीपति आपल्या वयाच्या १६ व्या वर्षापासून कुळकरणाचें काम करूं लागले. ताहराबादचें कुळकर्ण व जोशीपणा हीं त्यांच्या घराण्याकडे होतीं. ताहराबाद हा गांव एका मुसलमानाचा जहागिरीचा गांव होता. त्याच्या कचेरींत महीपतींस नित्य जावें लागत असे. एके दिवशीं ते कचेरींतून आल्यावर, स्नान करून देवपूजेस बसले असतां जहागिरदाराचा शिपाई त्यांस बोलावण्यास आला. ‘ देवपूजा आटोपतांच येतों ’ असें महीपतींनीं त्यास सांगितलें. इतक्यांत आणखी दोन बोलावणीं आलीं. तेव्हां तो यवन शिपाई त्यांस कांहीं उणेअधिक शद्ब बोलला. ते ऐकून महीपतींस फार वाईट वाटलें. पूजा आटोपल्यावर ते जहागिरदाराच्या वाड्यांत गेले व तिकडचें काम संपवून घरीं आल्यावर, कानास लेखणी होती ती देवापुढें ठेवून त्यांनीं शपथ वाहिली कीं “ आजपासून गांवकामांत लेखणी हातीं धरणार नाहीं. ” ही शपथ शेवटपर्यंत त्यांनीं पाळली व त्यांचे वंशजही ती पाळीत आले आहेत, व सात पिढ्यांपर्यंत ती तशीच पाळली जावयाची आहे.

महीपतींस विठ्ठलबोवा व नारायणबोवा असे दोन पुत्र होते. पैकीं विठ्ठलबोवा हे गवयी असून दुसऱ्या बाजीरावांचे आश्रित होते; व त्यामुळें ते पुण्यास रहात असत. महीपतींचे वंशज हल्लीं ताहराबाद येथें आहेत, त्याच्यापैकीं कांहीं कीर्तन फार चांगलें करितात. महीपतींचा वंशवृक्ष येणेंप्रमाणें:—



मोरोपंत, अमृतराय, मध्वमुनीश्वर, रामजोशी, मोरोपंत, सोहिरोबा, शिवदिन केसरी, देवनाथ हे सर्व कवि महीपतींचे समकालीन होत; मात्र यांपैकीं कोणाशीं त्यांचा परिचय होता कीं काय, यासंबंधाची माहिती उपलब्ध नाहीं. मोरोपंत महीपतींहून १४ वर्षांनीं लहान होते. महीपतींच्या पत्नीचें नांव काय होतें हें कोठेंही नमूद केलेलें आढळत नाहीं. दादोपंतांचा वृद्धापकाल झाल्यामुळें त्यांची पंढरीची वारी महीपतींनीं पुढें चालविली. पंढरपूर, पांडुरंग आणि वारकरी साधुसंत यांच्या संबंधानें तुकारामबुवांच्या पश्चात्, महीपतींनीं जितकें वाङ्मय लिहिलें तितकें दुसऱ्या कोणी लिहिलें नाहीं. महीपतींची पंढरीची वारी कधीं चुकली नाहीं. त्यांच्या वृद्धापकालीं ते एकदां पंढरपुरास जात असतां घोड्यावरून पडले तेव्हां त्यांच्या इष्टमित्रांनीं त्यांस परत घरीं आणलें, त्या वेळीं त्यांनीं पांडुरंगास एक लहानसें ओवीबद्ध पत्र पाठविलें तें याच लेखांत पुढें दिलें आहे. तुकारामबुवांनीं आपणास स्वप्नांत दृष्टांत देऊन संतचरित्रें गाण्याची आज्ञा केली असें महीपति म्हणतात.

" नमूं सद्गुरु तुकाराम। जेणें निरसिला भवभ्रम।
आपुले नामीं देऊनि प्रेम। भवबंधन निरसिलें ॥ ३॥

—भक्तविजय, अध्याय १ ला

" ज्यानें मस्तकीं ठेविला अभयकर। दुस्तर भवाब्धि केला पार।
तो तुकाराम सद्गुरु वैष्णववीर। ग्रंथारंभीं नमस्कार तयासी ॥
मृत्युलोकीं दाविली अघटित करणी। देहासमवेत गेले वैकुंठभुवनीं।
अद्यापि शुद्ध भाव देखोनी। देती स्वप्नीं उपदेश ॥

—संतलीलामृत, अ० १ ला.

या ओव्यांत स्वतः महीपतींनीं जी गोष्ट स्पष्टपणें नमूद केली आहे तिच्या सत्यत्वासंबंधानें शंका घेण्याचें कांहीं कारण आहे असें मला वाटत नाहीं. तुकोबांनीं आपल्या निर्याणानंतर बहिणाबाई, निळोबा व कचेश्वर यांनाही असेच दृष्टांत दिल्याच्या कथा ग्रंथांतरीं वर्णिल्या आहेत. तुकारामबुवांस महीपतीसारखा प्रेमळ शिष्य चांगला शोभतो यांत संशय नाहीं. महीपतींनीं शेंकडों संतांचीं चरित्रें लिहिलीं आहेत, परंतु त्यांनीं लिहिलेल्या तुकारामचरित्राइतकें सुंदर जुनें संतचरित्र मराठी भाषेंत दुसरें नाहीं. महीपतींचा पहिला

संतचरित्राविषयक ग्रंथ भक्तविजय हा शके १६८४ या वर्षी पूर्ण झाला. त्या वेळीं त्यांचें वय ३७ वर्षांचें होतें. अर्थात् त्यापूर्वी थोडे दिवस महीपतींस तुकोबांचा दृष्टांत झाला असावा. तुकारामबुवा हेच आपचे गुरु होत असें महीपतींनीं इतत्रही सांगितलें आहे:—

सद्गुरु तुकाराम समर्थ। अंतरसाक्ष चैतन्यनाथ।
तेणें होवोनि हृदयस्थ। आठव मातें दीधला॥ १०९॥

—संतलीलामृत, अ. ३५ वा.

सद्गुरु तुकाराम समर्थ। तयासि माझा प्रणिपात।
ज्यानें अवतार घेवोनि मृत्युलोकांत। दाविला भक्तिपंथ साधकां॥१४॥

* * * *

जो भक्तिज्ञानवैराग्य पुतळा। ज्याचे अंगीं अनंत कळा।
तो सद्गुरु तुकाराम आम्हांसि जोडला। स्वप्नीं दिधला उपदेश॥ २०॥
मी तरी सर्वांविषयीं हीन। ऐसें साक्ष देतसे मन।
परी कृपा केली कवण्या गुणें। त्याचें कारण तो जाणे॥ २१॥

—भक्तलीलामृत, अ० १ ला.

महात्मा येशू ख्रिस्त यास क्रुसी देण्यांत आल्यामुळें तो मृत्यु पावला व त्यानंतर तीन दिवसांनीं त्यानें आपल्या आईस व शिष्यांस दर्शन दिलें अशी कथा ख्रिस्ती पुराणांत वर्णिली आहे. आमच्या कांहीं संतांच्या बाबतींतही असाच प्रकार घडला असावा. असो.

महीपतींचा पहिला ग्रंथ भक्तविजय होय हें पूर्वी सांगितलेंच आहे. महीपतीनी लिहिलेली एकंदर कविता येणेंप्रमाणें:—

ग्रंथ		पद्यसंख्या		रचनाकाल	
१ भक्तविजय, अ. ५७		ओव्या	९९१६	शके	१६८४
२ संतलीलामृत ,,	३५	,,	५३५९	,,	१६८९
३ भक्तलीलामृत ,,	५१	,,	१०७९४	,,	१६९६
४ संतविजय ,,	२६	,,	४६२८	,,	,,
५ कथासारामृत, अ.	३६		७२००		१६८७
६ पंढरीमाहात्म्य ,,	१२				
७ अनंतव्रतकथा			१८६		

८	दत्तात्रेयजन्म	११२
९	तुलसीमाहात्म्य अ० ५	७६३
१०	गणेशपुराणाचा कांहीं भाग, अ. ४	३०४
११	पांडुरंगस्तोत्र	१०८
१२	मुक्ताभरणव्रत	१०१
१३	ऋषिपंचमी व्रत	१४२
१४	अपराधनिवेदनस्तोत्र	१०१
१५	अभंग व स्फुट पदें	

या एकंदर ग्रंथाची पद्यसंख्या सुमारें ४०००० होईल.

भक्तविजयांत ज्या संतकथा वर्णन करावयाच्या राहिल्या त्यांचा संग्रह करावा म्हणून महीपतींनीं ' संतलीलामृत ' हा दुसरा ग्रंथ लिहिला, हें पुढील ओव्यांवरून दिसतें :—

आतां कलियुगामाजी निश्चिती । बौद्ध अवतार धरी श्रीपति ।
तरी अज्ञानी जन कैसे तरती । मग अवतार संतीं घेतले ॥ ६२ ॥
त्यांचें चरित्र यथापद्धती । तें वर्णिलें भक्तविजय ग्रंथीं ।
परी ते कदा संपूर्ण न होती । आस्था चित्तीं दुणावे ॥ ६३ ॥
असंख्य ईश्वराच्या विभूति । संख्या करितां न पुरेचि मती ।
अंगींचे रोम आहेत किती । ते न गणवती सर्वथा ॥ ६४ ॥
परी एक सांगतों आपुलें मत । भक्तस्तवनीं रमलें चित्त ।
यालागीं संतलीलामृत । दुसरा ग्रंथ आरंभिला ॥ ६५ ॥
भक्तविजयांत राहिलीं चरित्रें । तीं येथें ऐकावीं सविस्तर ।
बुद्धीचा दाता रुक्मिणीवर । सर्व भार तयावरी ॥ ६६ ॥

या ओव्यांत भक्तविजयानंतर संतलीलामृत लिहिलें असें स्पष्ट सांगितलें आहे, पण १८८६ सालीं मारुती जनार्दन दांडेकर यांनीं प्रसिद्ध केलेल्या व त्यांच्याच प्रतीवरून पुढील तीन प्रकाशकांनीं छापलेल्या ' संतलीलामृता'च्या अखेरीस ग्रंथसमाप्तिकाल

शके सोळाशें एकूणऐशीं । सर्वजित नाम संवत्सरासी ।
फाल्गुन शुद्ध चतुर्थीसी । ग्रंथ सिद्धीसी पावला ॥

असा दिला आहे. पण यांतला 'एकोणऐंशी' हा पाठ चुकीचा असून, महीपतींच्या स्वदस्तुरच्या हस्तलिखित प्रतींत 'शके सोळाशें नव्यायशीं' असा पाठ आहे.

संतलीलामृतानंतर महीपतींनीं 'भक्तलीलामृत' हा सर्वांत मोठा संतकथाग्रंथ लिहिला. त्याच्या पहिल्या अध्यायांत ते लिहितात :—

त्यांचीं चरित्रें व्हावया प्रख्यात । युक्ति केली पंढरीनाथें ।
मज पुढें करूनि निमित्त । श्रीभक्तविजय ग्रंथ वदविला ॥
दुसरा संतलीलामृतसार । त्यांतही चरित्रें वर्णिलीं फार ।
परी आणिक कथा राहिल्या अपार । मग रुक्मिणीवरें आज्ञापिलें ॥
म्हणोनि भक्तलीलामृत जाण । ग्रंथ आरंभिला दुसऱ्यानें ।

महीपतींचा संतचरित्रविषयक चौथा ग्रंथ 'संतविजय' हा अपूर्ण आहे अशी समजूत आहे. याचे २६ अध्याय असून त्यापैकीं पहिल्या २५ अध्यायांत श्रीसमर्थ रामदासचरित्र विस्तारेंकरून वर्णिलें आहे व २६ व्या अध्यायात बाबाजीबावा अरणगांवकर यांचें चरित्र दिलें आहे. या ग्रंथाचा शेवटचा कलशाध्याय म्हणून १८९ ओव्यांचा एक अध्याय हल्लीं छापला आहे, पण तो इतका अशुद्ध आहे की तो महीपतिकृतच आहे असें मानण्यास मन प्रवृत्त होत नाहीं.

हा 'संतविजय' ग्रंथ महीपतिकृत नसून कोणी तरी रामदाससांप्रदायी गृहस्थानें तो महीपतींच्या नांवावर दडपून दिला असावा अशा अर्थाचा एक लेख प. वा. डॉ. प्रभाकर रामकृष्ण भांडारकर यांनीं 'एक पुण्यकपट' या सदराखालीं 'विविधज्ञानविस्तार' मासिकात पूर्वी प्रसिद्ध केला होता, पण खुद्द महीपतींनींच लिहिलेला 'संतविजय' त्यांच्या वंशजांपाशीं असल्यामुळें, तशी शंका घेण्याचें कांहीं कारण नाहीं. महीपतींनीं स्वहस्तें लिहिलेला हा 'संतविजय' अपूर्ण आहे असें त्यांच्या वंशजांचें म्हणणें आहे व उपलब्ध असलेल्या संतविजयाचे शेवटीं ज्या अर्थी फलश्रुति व ग्रंथसमाप्तिकालनिर्देश नाहीं त्या अर्थी तें म्हणणें खरें असावें असें वाटतें; व यावरून सदर ग्रंथ पूर्ण होण्यापूर्वी महीपति स्वर्गस्थ झाले असावे असेंही वाटतें. पूर्वी भक्तविजयांत रामदासस्वामींचें थोडेंसें चरित्र महीपतींनीं दिलें

होतें; त्यानंतर त्या चरित्राची अधिक माहिती मिळत गेली व इतरांनीं लिहिलेले समर्थचरित्रग्रंथ महीपतींच्या अवलोकनांत आले तेव्हां त्यानी संतविजयांत समर्थचरित्र विस्तारेंकरून वर्णिलें.

कै. वि. का. राजवाडे यांनीं ‘सरस्वतीमंदिर’ मासिकांत “नाभाजीनें व महीपतीनें वर्णिलेले संत” या सदराखालीं एक उपयुक्त यादी प्रसिद्ध केली आहे तींत त्यांनीं महीपतींच्या ग्रंथांचा जो क्रम दिला आहे त्यांत भक्तविजयानंतर संतविजय झाला असें म्हटलें आहे, पण हें विधान प्रमाणशुद्ध नाहीं हें खुद्द महीपतींनीं दिलेल्या वरील ग्रंथरचनाक्रमावरून उघड दिसतें.

वरील ग्रंथाशिवाय महीपतींनीं ‘सारांश ज्ञानेश्वरी’ या नांवाचा एक ग्रंथ तयार केला आहे, त्यांत ज्ञानेश्वरीतल्या १४३१ निवडक ओंव्या दिल्या आहेत. ओंव्यांची निवड करताना ‘भक्ति’ या विषयावर महीपतींनीं विशेष कटाक्ष ठेविला होता असें त्या ओंव्यांवरून दिसतें. हा ग्रंथ पुणें येथील ‘चित्रशाळे’नें प्रसिद्ध केला आहे.

महीपति स्वभावानें फार नम्र, प्रेमळ आणि मोठे बहुश्रुत होते. सगुणोपासनेकडेच त्यांचा ओढा विशेष दिसतो. ते कट्टे वैष्णव—तुकारामबुवांचे पूर्ण अनुयायी होते. अहिंसा, भूतदया आणि वसुधैव कुटुंबकत्व हे गुण त्याच्या अंगीं पूर्णत्वानें वास करीत होते. त्याच्या वेळीं महाराष्ट्रांत मोठा दुष्काळ पडला होता त्यास ‘करंड्याचें साल’ असें म्हणतात. या दुष्काळात महीपतींनीं आपल्या घरावर तुलसीपत्र ठेवून तें गरिबांकडून लुटविलें! ती हकीकत गांवच्या जहागिरदारास (हा मुसलमान होता हें पूर्वीं सांगितलेंच आहे) समजतांच त्यानें महीपतींकडे पुष्कळ गाड्या भरून साहित्य पाठविलें, परंतु त्याचा स्वीकार न करितां त्यानीं आपला चरितार्थ भिक्षेवर चालविला. ह्याप्रमाणें दर तीन वर्षांनीं आपलें घर लुटविण्याचा क्रम त्यांनीं चालू ठेविला. पुढें लोकांनीं सांगितलें कीं हा आपला क्रम आपल्या पश्चात् चालणें कठिण आहे तरी जें निरंतर चालेल तें करावें. मग महीपतींनी ताहराबाद येथें श्रीविठ्ठलाचें मंदिर अयाचित वृत्तीनें बांधिलें व तेथें आषाढ वद्य १० पासून अमावास्येपर्यंत पांडुरंगाचा उत्सव करण्याची चाल सुरू केली ती अद्याप चालू आहे.

तुकारामबुवानीं स्वप्नात येऊन आपणांस दृष्टांत दिल्याची हकीकत महीपतीनीं आपल्या ओवीबद्ध ग्रंथांत सांगितलीच आहे, पण एका स्वतंत्र अभंगांतही ती सांगितली आहे:—

बाळपणीं मरे माता । मग प्रतिपाळी पिता ॥
तैशापरी संभाळिलें । ब्रीद आपुलें साच केलें ॥
यात्रा नेली पंढरीसी । ध्यान ठेविलें पायासीं ॥
हृदयीं प्रकटोनी बुद्धि । भक्तविजय नेला सिद्धि ॥
स्वप्नीं येउनी तुकाराम । आपुलें सांगितलें नाम ॥
महीपति म्हणे हरी । तुमच्या हातीं सूत्रदोरी ॥

एकदां पंढरपुरास जात असतां महीपति घोड्यावरून पडले व त्यामुळे त्यांना परत घरीं यावें लागलें त्या वेळीं त्यांनीं पांडुरंगास पुढील ओवीबद्ध पत्र पाठविलें:—

जय क्षीराब्धिवासा अनंता । अनंतशायी मायातीता ।
भक्तवत्सल पंढरीनाथा । रुक्मिणीकांता श्रीविठ्ठला ॥
सेवेसि विज्ञापना ऐसी । येत होतों पंढरीसी ।
पांच कोस प्रथम दिवशीं । नांदुरासी पातलों ॥
एक रात्र क्रमोनि तेथ । प्रातःकाळीं उठलों त्वरित ।
अश्वावरूनि अकस्मात । ग्रामद्वारीं पडियेलों ॥
तेणें देहदुःखेंकरून । विकल मूर्च्छित पडिलों जाण ।
चित्तीं झालें तुझें स्मरण । अगाध महिमान संतांचें ॥
इष्टमित्र आप्त ब्याहीं । डोली करूनि आणिलें गांवीं ।
चित्तवृत्ति विठाबाई । तुझे पायीं लागली ॥
त्रितापाचे विस्तार किती । पत्रीं ल्याहावे तुजप्रती ।
शरीरीं किंचित् नाहीं शक्ति । लेखणी हातीं धरवेना ॥
अंतरसाक्ष चैतन्यघन । जाणसी जीवाची निजखूण ।
आरुष म्हणोनि तुजकारण । पत्र लिहूनि पाठवूं ॥
शेवटील हेत आहे साचा । संबंध तोडीं या देहाचा ॥
ठाव इच्छितसें पायांचा । आणिक वाचा न बोले ॥
मागें भक्तां पावलासि अंतीं । तें यथार्थ करीं रुक्मिणीपती ॥
विष्णुदास महीपति । सेवेसी विनंति करीतसे ॥

× ‘ निरसिला भवभ्रम ’ असाही पाठ आहे.

या १० च ओव्यांवरून महीपतींच्या निरपेक्ष हरिभक्तीची आणि प्रेमळपणाची साक्ष कोणासही पटण्यासारखी आहे. परदेशांत आजारी पडलेल्या मुलानें घरीं आपल्या प्रेमळ पित्यास पत्र लिहावें तसें हें पत्र महीपतींनीं पांडुरंगास लिहिलें आहे. दगडाच्या मूर्तीत जर देवत्व नसेल तर असलें हें अत्यंत करुणरसभरित पत्र ऐकण्यासाठीं तरी तें देवत्व मूर्तीत क्षणभर तरी उत्पन्न झालें असेल यात संशय नाहीं. भक्त भगवंताचे ठायीं किती समरस होऊं शकतात याचा हा सुंदर नमुना आहे. महीपतींनीं आपलें हृदय या पत्रांत साफ उकललें आहे. आणि महीपति देवापाशीं मागतात तरी काय? धनदौलत मागतात काय? आरोग्य मागतात काय? दीर्घायुष्य मागतात काय? नाहीं. तर, "संबंध तोडीं या देहाचा," "मला मृत्यु येऊं दे" असें मागतात. महीपतींच्या ग्रंथांत सर्वत्र जो इतका प्रेमळपणा वोसंडत आहे तो कोठून आला याचा उलगडा या एका ९ ओव्यांच्या पत्रावरून येतो. गंगाजलनिर्मल अशा हृदयांत प्रेमळपणाशिवाय दुसरें काय असणार?

पायांनीं पंढरपूरची वारी करण्याचें सामर्थ्य, वार्धक्यामुळें, आपल्या अंगीं उरलें नाहीं याबद्दल महीपतीस फार दुःख होत असे. ते म्हणतातः—

अभंग

सदां डोळयांपुढें राहो तुझें ध्यान।
ऐसी इच्छा पूर्ण वाटे जीवा॥
दैवावांचोनियां निष्फळ वासना।
ऐसें नारायणा दिसताहे॥
तुझे यात्रे गमन घडावें चरणीं।
नसे या प्राक्तनीं करूं काय॥
आहे जों शरीर घडो परोपकार।
असत्य उत्तर न यो वाचे॥
महीपति म्हणे दाखवीं ते सोय।
जेणें भवभय निवारेल॥

आमच्या साधुसंतांस "अंतरसाक्ष जो चैतन्यघन परमेश्वर तो जीवाची निजखूण जाणतो, त्याला भेटण्यासाठीं पंढरपुरासारख्या ठिकाणींच गेलें पाहिजे असें नाहीं" हें समजत होतें, पण सगुणभक्तीच त्यांना विशेष प्रिय असल्यामुळें

आपलें ' आरुष 'पत्र पांडुरंगाकडे पाठविण्यास महीपतींस कांहीं हरकत वाटली नाहीं. महीपतींचे गुरु तुकाराममहाराज यांनींही असेंच पांडुरंगास एक अभंगबद्ध पत्र वारकऱ्यांबरोबर पाठविलें होतें. देवास पत्रें पाठविणें किंवा त्याच्याशीं अन्य प्रकारें सलगी करणें म्हणजे त्याचा अपमान किंवा थट्टा करणें होय असें कित्येकांस वाटतें, पण असल्या अपमानाबद्दल देवानें तुकोबांस किंवा महीपतींस एखादी भयंकर शिक्षा केली होती असा पुरावा ज्या अर्थी उपलब्ध नाहीं, उलट असले सलगी करणारे लोकच देवास विशेष प्रिय झाले होते असें दिसतें, त्या अर्थी देवाच्या मानापमानाबद्दल आपणास काळजी करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं.

महीपति शके १७१२ (इ. स. १७९०) श्रावण वद्य १९ या दिवशीं दिवंगत झाले. त्या वेळीं त्यांचें वय ७५ वर्षांचें होतें.

महाराष्ट्र कविवर्य मोरोपंत यांनीं महीपतींचे ग्रंथ वाचले होते, परंतु त्या उभयतांची भेट कधीं झाली होती कीं नाहीं, त्यांचा परस्पर पत्रव्यवहार होता कीं काय, हें समजण्यास कांहीं मार्ग नाहीं. महीपतींचे पुत्र विठोबा गोसावी यांचीं पंतांस गेलेलीं कांहीं पत्रें उपलब्ध झाली आहेत त्यांवरून पंत व विठोबा याचा स्नेहसंबंध होता हें मात्र उघड दिसतें. हे विठोबा गोसावी पंढरपुरास बाबा पाध्ये यांजकडे विद्याभ्यासासाठीं राहिले होते. बाबांनींच त्यांची शिफारस मोरोपंतांकडे करून त्यांचा परिचय करून दिला. बाबा पंतांस एका पत्रांत लिहितात:—" हरिदास राजेश्री विठोबा गोसावी ताहराबादकर यांहीं आपणास पुस्तकाविषयीं लिहिलें. आपण ग्रंथ पाठवून द्यावे. ते प्रति करून आपणास शीघ्र परत करतील." यापुढें पंत व विठोबा गोसावी यांचा स्नेहसंबंध जडला व तो उत्तरोत्तर दृढ होत गेला पंतांनीं आपल्या ' सन्मणिमालें'त महीपतींचा उल्लेख केलेला नाहीं. पुढें विठोबा गोसावी ताहराबादकर यांच्या सूचनेवरून त्यांनीं ' महीपतिस्तुति ' या नांवाचें एक लहानसें प्रकरण लिहिलें ते येथें देतों:—

आर्या

श्रीहरिभक्तजनांचीं श्रीहरिभक्तिरससत्सुधाभरितें
चरितें गातां जेणें आयुष्य क्षण पडों दिलें न रितें ॥ १ ॥
हरिभक्तविजय नामें रचिला सद्ग्रंथ दोष साराया।
वाराया तापातें प्राणी भवसागरांत ताराया ॥ २ ॥

त्या महिपतितें पाहुनि ऐकुनि सच्चित्त कां न लोभावें ।
शोभावें यश ज्याचें चिर नामिला विष्णुदास तो भावें ॥ ३ ॥
ज्याचा ग्रंथ हरिजनां सेव्य चकोरां जसा सदा इंदु ।
जो पसरला जगांत स्नेहाचा सत्सरीं जसा बिंदु ॥ ४ ॥
सत्य तुकारामाचा या महिपतिवरि वरप्रसाद असे ।
सदनुग्रहाविणें हे निघतिल उद्गार सार काय असे ॥ ५ ॥
साधूंचें यश गाया येणें देऊनियां सुभा केला ।
निःसंशय ताराया जड महिपति विठ्ठलें उभा केला ॥ ६ ॥
महिपतिच्या वाणीतें सेवुनि तरतात जेंवि गंगेतें ।
विषयांत रंगलें जें जनमानस सद्यशींच रंगे तें ॥ ७ ॥
ज्ञानोबाची जैशी एकोबाची जशी सुधा वाणी ।
कीं मुक्तेश्वर कविची महिपतिची सेविती तशी प्राणी ॥ ८
महिपतिचा सुत विठ्ठल त्याला श्रीपांडुरंग आठव दे ।
तत्प्रेरणेंकरुनियां आर्या आर्यादरार्थ आठ वदे ॥ ९ ॥
*स्वस्तुति केली म्हणवुनि महिपति हरिभक्त न विटोबा ।
मज तों वाटे ऐसा साधुजनांहूनि अन्य न विठोबा ॥ १० ॥
संतांसि नावडे स्तुति हें ठावें मज परंतु देवास ।
महिपति म्हणेल ' विठ्ठलराया, या निजपदींच दे वास ॥ ११ ॥
श्रीविठ्ठलासि आहे साधूंची फार सर्वदा भीड ।
चीड प्रभुसि न येइल देइल मज करुनि निजपदीं नीड ॥ १२ ॥
अंजलि करूनि असतो गरुड उभा जेंवि अहिपतिसमोर ।
हरिभक्तिप्रेमगुणें नम्र सदा तेंवि महिपतिस मोर ॥ १३ ॥

या आर्यावरून महिपतींच्या योग्यतेविषयीं पंतांच्या मनांत केवढा आदरभाव होता हें स्पष्ट दिसतें. वरील तिसऱ्या आर्येंत " त्या महिपतितें पाहुनी " असे शब्द आहेत त्यांवरून पंतांनीं महीपतींस पाहिलें होतें हेंही उघड दिसतें. वरील आर्यांत फक्त ' भक्तविजय ' ग्रंथाचा उल्लेख आहे, महीपतिकृत इतर ग्रंथांचा नाहीं, यावरून व " स्वतःची स्तुति केली म्हणून महीपतींस विषाद न वाटो " अशा अर्थाच्या पंतांच्या उद्गारांवरून महीपतींच्या हयातींतच पंतांनीं या

* या चरणांत तीन मात्रांचा एक शब्द कमी आहे.

आर्या रचिल्या असाव्या यांत संशय नाहीं. भक्तविजय ग्रंथ लिहून होतांच तो सगळ्या महाराष्ट्रांत कसा पसरला हें "जो पसरला जगांत स्नेहाचा सत्सरीं जसा बिंदु" या आर्यार्धांत पंतांनीं सांगितलें आहे.

राजाराम प्रासादीकृत भक्तमंजरीमाला, अर्वाचीन भक्तलीलामृत, कै० द. अ. आपटे (कवि अनंततनय) कृत कविचरित्र, नवनीत, चरित्रकोश, ज्ञानकोश, व महाराष्ट्र सारस्वत इतक्या ग्रंथांत महीपतींची थोडीबहुत माहिती दिलेली आढळते. मी माझ्या महाराष्ट्रकविचरित्राच्या दुसऱ्या भागात,महिपतींचें विश्वसनीय चरित्र विस्तारपूर्वक दिलें असून त्याच्याच आधारानें प्रस्तुत लेख लिहिला आहे. असो.

महीपतींच्या चरित्रासंबंधाची बहुतेक महत्त्वाची माहिती येथपर्यंत दिली. महीपतराव व नरहरि महीपति या नांवाचे आणखी दोन महीपति महाराष्ट्रांत होऊन गेले आहेत व त्यांपैकीं नरहरि महीपति बरेच प्रसिद्ध आहेत. 'काव्य-संग्रह' मासिकांत महीपतींचीं म्हणून जी पदें प्रसिद्ध झाली आहेत तीं बहुतेक सर्व या नरहरि महीपतींचींच होत.

महीपतींनीं आपले ग्रंथ फार शोधपूर्वक लिहिले आहेत. तत्कालीन परिस्थित्यनुसार जें संशोधन करणें अवश्य होतें तें करण्यांत त्यांनीं बिलकुल कसूर केलेली नाहीं. त्यांच्यापूर्वी कांहीं लेखकानीं संतचरित्रें लिहिलीं होतीं, त्यांचा उपयोग तर त्यांनीं केलाच, परंतु स्वतः पुष्कळच नवीन माहिती मिळवून तिच्या आधारानें बहुतेक सर्व संतांचीं चरित्रें त्यांनीं विस्तारपूर्वक लिहिलीं. महाराष्ट्रावर हे त्यांचे मोठे उपकार आहेत. महीपतींनीं ही एवढी मोठी ग्रंथ-रचना केवळ विषयाची आवड म्हणून किंवा आवडीचा विषय म्हणून, निरपेक्षबुद्धीनें केली. ऐतिहासिक चरित्रग्रंथ लिहिण्यासाठीं जो शोध आणि खटाटोप करणें अवश्य आहे तो सगळा त्यांनीं केला होता. पुष्कळ संतांच्या गांवीं जाऊन, त्यांच्या वंशजांस भेटून, त्यांच्या घरची दप्तरें व पोथ्या पाहून, दंतकथा व आख्यायिका ऐकून जी माहिती उपलब्ध झाली तिचा समावेश त्यांनीं आपल्या ग्रंथांत केला आहे. पाश्चात्य वाङ्मयाच्या परिचयामुळें जी एक प्रकारची ऐतिहासिक दृष्टि हल्लीं आपणांस प्राप्त झाली आहे असें आपण समजतों ती महीपतींच्या अंगीं अल्पांशानें तरी होती असें मानण्यास त्यांच्या ग्रंथांत पुष्कळ पुरावा आहे. चमत्कारादि गोष्टी त्यांनीं आपल्या ग्रंथांत दिल्या

आहेत, इतक्याचमुळें त्यांच्या ग्रंथांची योग्यता बिलकुल कमी होत नाहीं. चमत्कारांवर विश्वास ठेवण्याचा तो काल होता इतकेंच नव्हे तर खुद्द महीपतींनीं निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या प्रकारचे पाचदहा चमत्कार केले होते अशीही प्रसिद्धि आहे. अशा स्थितींत त्यांनीं, इतर साधूंनीं केलेल्या अलौकिक चमत्काराच्या ज्या गोष्टी ऐकल्या त्या आपल्या ग्रंथात नमूद कराव्या यात कांहीं आश्चर्य नाहीं. शिवाय, अलौकिक चमत्कारांच्या सर्वच कथा झूट असेंही मानण्याचें कारण नाहीं. कारण हा शास्त्रीय विषय आहे. ज्या योगशास्त्राच्या जोरावर असले अलौकिक चमत्कार करून दाखविले जातात तेंदेखील एक शास्त्रच आहे. अर्थात् यांत अशास्त्रीय असें कांहीं नाहीं. मात्र अतिशयोक्ति असेल तर ती केव्हांही त्याज्यच आहे. असो.

महीपतींची वाणी फार रसाळ, प्रासादिक आणि साधी आहे. भाषा सोपी. जुने कठिण शब्द तींत फारसे नाहींत. दीडशें वर्षांपूर्वींच्या खेडवळ देशस्थ ब्राह्मणाच्या भाषेचा तो नमुना आहे. व्याकरणदृष्ट्या महीपतींची वाक्यरचना पुष्कळ ठिकाणीं सदोष आहे, परंतु भाषाशुद्धीकडे बहुतेक जुन्या कवींनीं अमळ दुर्लक्षच केलेलें असल्यामुळें एकट्या महीपतींसच दोष देण्यांत अर्थ नाहीं. मुक्तेश्वरांची प्रतिभा महीपतींत नाही, वामनाची विद्वत्ता नाही, पंतांचें भाषाप्रभुत्व नाहीं, किंवा श्रीधराची रसोत्कटता नाहीं, परंतु प्रेमळ-पणाच्या बाबतींत मात्र महीपतींचा हात धरणारा दुसरा मराठी कवि नाहीं. ज्ञानदेव, तुकाराम, एकनाथ आणि रामदास यांची महीपतींशीं तुलना करणें अयोग्य होईल. महीपतींच्या ग्रंथांत भक्तिरस नुसता उचंबळून राहिला आहे. ज्ञानदेवांप्रमाणें उपमा व दृष्टांत देण्याची महीपतींस फार हौस दिसते व त्यांच्या उपमादृष्टांतापैकीं कांहीं उपमा व दृष्टांत फार समर्पक आणि सुंदर आहेत यांत संशय नाहीं; परंतु कोठें कोठें त्यांचा अतिरेक झालेला आहे हेंही नमूद केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. महीपतींच्या या भोळ्याभाबड्या बालबोध ग्रंथांनीं महाराष्ट्रांत फार मोठें धर्मकार्य केलें आहे. संतचरित्रें हा महीपतींचा अगदीं आवडता विषय. संतचरित्रवर्णनपर चार मोठे ओवीबद्ध ग्रंथ लिहून त्यांचें समाधान झालें नाहीं म्हणून अभंगवृत्तांत त्यांनीं कांहीं संतचरित्रें पुनः गायिलीं आहेत त्यांची यादी येथें देतोंः—

नामदेवचरित्र	अभंग	६२	जगमित्र नागाचरित्र	,,	६३
हरिपाळचरित्र	,,	५८	माणकोजी बोधलेचरित्र	,,	६७
कमालचरित्र	,,	६७	संतोबा पवारचरित्र	,,	१०२
नरसिंह मेहताचरित्र	,,	५२	चोखामेळाचरित्र	,,	४७
राका कुंभारचरित्र	,,	४७			

महीपतींच्या ओव्यांप्रमाणेंच त्यांचीं पदें व अभंग फार सुरस आहेत. त्यांनीं चार चरणी करुणापर अभंग लिहिले आहेत ते, आरत्या, पदें, इतर फुटकळ अभंग, गणेशचरित्र, कांहीं फुटकळ ओवीबद्ध प्रकरणें, व वरील अभंगबद्ध संतचरित्रें इतकी त्यांची कविता अद्याप अप्रकाशित आहे. आपल्या बहुतेक मोठया ग्रंथाच्या अखेरीस त्या ग्रंथांतील प्रत्येक अध्यायांत कोणता कथाभाग आला आहे याची अनुक्रमणिका महीपतींनीं दिली असून ती त्यांच्या सशास्त्र ग्रंथरचनापद्धतीची निदर्शक आहे.

आपण जें काय लिहीत आहोंत तें पांडुरंगाच्या कृपेनें आणि तुकारामबुवांच्या प्रेरणेनें लिहीत आहोंत असा महीपतींचा ठाम समज होता, त्यामुळें, स्वतःच्या कर्तबगारीसंबंधानें ज्यांत थोडासाही अहंभाव व्यक्त झाला आहे असा एक शब्दही त्यांच्या कवितेंत आढळत नाहीं.

कै. वि. ल. भावे यांनीं लिहिलेल्या ‘ महाराष्ट्र सारस्वत ’ ग्रंथांत महीपतींविषयींची आणखी कांहीं माहिती मिळाली तिचाही येथें संग्रह करितों.

महीपतींस लहानपणापासून धर्माचे व विद्येचे बाबतींत मोरोबा तांभेरकर नामक एका गृहस्थाश्रमी सत्पुरुषाची शिक्षा असे. महीपतिबाबांस श्रीमंत पंतप्रधान पेशवे यांजकडून व त्याच्या सरदारांकडून कांहीं जमिनी इनाम मिळाल्या होत्या. त्यांच्या सनदा त्यांच्या वंशजांपाशीं आहेत. ह्या सनदा शके १७१० नंतरच्या म्हणजे बाबांची विशेष प्रसिद्धि झाल्यानंतरच्या आहेत. हल्लीं हीं इनामें चालू नाहींत.

—:o:—

श्रीएकनाथचरित्र

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीदेवकीनंदनाय नमः ॥ ऐका श्रोते हो कथा रसिक ॥ ऐकतां निवारी भवरोगदुःख ॥ अंतरीं ठसावे पूर्णविवेक ॥ निजशांतिसुख ये हाता ॥ १ ॥ कांहीं न करितां योगसाधन ॥ न घडतांचि तीर्थाटन ॥ भक्तकथा ऐकतां मन लावून ॥ वैकुंठभुवन पावती ॥ २ ॥ जरी बहुत नसली शास्त्रव्युत्पत्ती ॥ अंगासी न येतां वैराग्यस्थिती ॥ परी हरिकीर्तनीं लावितां प्रीती ॥ ते पावन होती क्षणमात्रें ॥ ३ ॥ जयांसी न घडे व्रतनेम ॥ रसनाविषय नव्हेचि शम ॥ तिहीं वाचेसी स्मरतां रामनाम ॥ स्वयें पुरुषोत्तम ते होती ॥ ४ ॥ अंगीं जयांसी कृपणता ॥ आणि कुटुंबीं वाढली विशेष ममता ॥ तिहीं श्रवण करितांचि भक्तकथा ॥ अनुताप चित्ता ठसावे ॥ ५ ॥ जैसा लोहदंड होता मळकट ॥ परी परिस लागतां तत्काळ पालट ॥ तेवीं भक्तकथेची लागतां चट ॥ विवेकभेट अज्ञाना ॥ ६ ॥ जरी पूर्वपुण्याची असेल कोडी ॥ तरीच ये कथेची लागेल गोडी ॥ इतर प्राक्तनहीन जीं बापुडीं ॥ तीं विकल्पें नाडलीं सर्वस्वें ॥ ७ ॥ म्हणोन तुम्ही भाविक प्रेमळ ॥ मज दिसतां दैवाआगळ ॥ जे सात्त्विक कथेचे गराळ ॥ सेवितां सकळ निजप्रेमें ॥ ८ ॥ मागील अध्यायीं कथा निगुतीं ॥ परमपावन परिसिली श्रोतीं ॥ जे भानुदासें पांडुरंगमूर्ती ॥ पंढरीसी मागुती आणिली ॥ ९ ॥ त्या भानुदासाचा पुत्र सद्गुणी ॥ त्याचें नाम ठेविलें चक्रपाणी ॥ तो परम भाविक वैष्णव ज्ञानी ॥ श्रीहरिभजनीं निमग्न ॥ १० ॥ त्याचा पुत्र सूर्यनारायण ॥ जो ज्ञानप्रकाशें देदीप्यमान ॥ त्याची कांता सुलक्षण ॥ नाम रुक्मीण तियेचें ॥ ११ ॥ तिचे उदरीं जन्मला सुत ॥ नाम त्याचें एकनाथ ॥ जो जगद्गुरु

अवतरला साक्षात ॥ परिसा चरित्र तयाचें ॥ १२ ॥ तो दिवसेंदिवस जाहला थोर ॥ व्रतबंध केला सत्वर ॥ मायबापें तयावर ॥ कृपा अपार करिताती ॥ १३ ॥ तेथें जनार्दनपंत ज्ञानराशी ॥ दत्तात्रेयदर्शन होत त्यासी ॥ एकनाथ उठोनि एके दिवसीं ॥ गेला दर्शनासी तयाच्या ॥ १४ ॥ आंगडें टाकूनि मस्तकावरी ॥ सद्भावें त्यास नमस्कारी ॥ जनार्दन देखोनि ते अवसरीं ॥ विस्मित अंतरीं होतसे ॥ १५ ॥ म्हणे तूं कवणाचा सांग त्वरित ॥ कशास्तव आलासी येथ ॥ जनार्दन संबोखोनि तयाप्रत ॥ वृत्तांत पुसत तेधवां ॥ १६ ॥ टाकूनि मातापितयांसीं ॥ रुसोनि आलासी आम्हांपासीं ॥ हें यथार्थ सांगावें मजसीं ॥ संकोच मानसीं न धरितां ॥ १७ ॥ मग जोडूनियां दोन्ही कर ॥ एकनाथ बोले मधुरोत्तर ॥ म्हणे मी ऋग्वेदी ब्राह्मणकुमार ॥ दर्शना साचार पातलों ॥ १८ ॥ मायबापांवरी न रुसतां ॥ उगाच अनुताप वाटला चित्ता ॥ कीं देहीं जडली प्रपंचममता ॥ कामक्रोधें चित्ता गांजिलें ॥ १९ ॥ लोभ माया दंभ अहंकार ॥ हे देहीं दिसती अनिवार ॥ मग स्वामींच्या दर्शनासी सत्वर ॥ आलों साचार निजप्रेमें ॥ २० ॥ आतां हेचि इच्छा असे मानसीं ॥ कीं निरंतर रहावें तुम्हांपासीं ॥ सेवा करावी अहर्निशीं ॥ निजभावेंसीं आवडीं ॥२१॥ मी पतित शरण आलों पाहें ॥ अंगिकार करीं सद्गुरुमाये ॥ ऐसें बोलोनि लवलाहें ॥ धरिले पाये सद्भावें ॥ २२ ॥ एकनाथाचें ऐकूनियां वचन ॥ आश्चर्य करिती जनार्दन ॥ म्हणे वय तों दिसतें लहान ॥ परी विशाल ज्ञान अनुपम ॥ २३ ॥ मग जनार्दनें अभय देऊनि त्यासी ॥ म्हणे सुखें असावें आम्हांपासीं ॥ हें वचन ऐकूनि मानसीं ॥ उल्हास चित्तासी वाटला ॥ २४ ॥ जैसा द्वैपायन पडतां संशयवनीं ॥ तयासी भेटले नारदमुनी ॥ तेवीं जनार्दनाच्या अभयवचनीं ॥ एकनाथ

मनीं संतोषला ॥ २५ ॥ कीं हंसरूप भेटतां नारायण ॥ विरिंचीस वाटलें समाधान ॥ तेवीं जनार्दनाचे अभयेंकरून ॥ एकनाथ मनीं संतोषला ॥ २६ ॥ स्वामिसेवेसी निरंतर ॥ अहोरात्र असे तत्पर ॥ कोणेविषयीं न पडेचि अंतर ॥ भावार्थ थोर धरियेला ॥ २७ ॥ रात्रीं निजतां जनार्दन ॥ स्वकरें चुरीत बैसे चरण ॥ निद्रा लागतां त्याजकारण ॥ परी न उठणें सर्वथा ॥ २८ ॥ विडा करूनि निजहस्तें ॥ सर्व साहित्य मिळवून त्यांत ॥ जनार्दनासी होऊन विनीत ॥ घाली मुखांत निजप्रेमें ॥ २९ ॥ मुख प्रक्षाळावयासी तस्त ॥ निजकरें पुढें आणोनि ठेवीत ॥ स्नान घालूनियां आपुले हस्तें ॥ साहित्य देत पूजेचें ॥ ३० ॥ गंधाक्षता सुमन चंदन ॥ धूपदीपादि उपचार जाण ॥ जेव्हां जें मागती जनार्दन ॥ तें सत्वर आणून देतसे ॥ ३१ ॥ जेवितां शेष उच्छिष्ट राहात ॥ तें निजप्रीतीं भक्षी एकनाथ ॥ ऐसी सेवा दिवस बहुत ॥ असे करीत निजप्रेमें ॥ ३२ ॥ .... ॥ ३३ ॥ बहिर्भूमीचें जें स्थळ ॥ तें स्वहस्तें करी अति निर्मळ ॥ ऐसा गुरुभक्तीसी सर्वकाळ ॥ एकनाथ केवळ विनटला ॥ ३४ ॥ हें जनार्दनें दृष्टीं देखतां ॥ मग आश्चर्य करी निजचित्ता ॥ म्हणे मनुष्य म्हणूं नये एकनाथा ॥ सकळ गुरुभक्तां वरिष्ठ कीं ॥ ३५ ॥ एकांत पाहोनि एके दिवसीं ॥ जनार्दन कृपेनें पुसती त्यासी ॥ तूं सेवा करितोसी आम्हांपासीं ॥ मायबापांसी न कळतां ॥ ३६ ॥ तुम्ही तंव विरक्त दिसतां जाण ॥ घरीं पाहिजे वस्त्र अन्न ॥ वडील वृद्ध दोघें जण ॥ चिंता दारुण करितील ॥ ३७ ॥ ऐसें जाणूनि जनार्दन ॥ घरीं पाठवीत वस्त्र अन्न ॥ वडिलांसी कळतां वर्तमान ॥ समाधान वाटलें ॥ ३८ ॥ जनार्दन विचारी निजअंतरीं ॥ म्हणे यासी सांगावी कांहीं चाकरी ॥ मग एकनाथासी आज्ञा करी ॥

हिशेब दप्तरीं राखावा ॥ ३९ ॥ तूं तेथें असलासी जरी प्रवीण ॥ तरी कळों येईल अवघेंच ज्ञान ॥ मग अवश्य म्हणोनि केलें नमन ॥ म्हणे आज्ञा प्रमाण स्वामींची ॥ ४० ॥ परी सेवेसी न पडतां अंतर ॥ हिशेब राखावा निरंतर ॥ जनार्दन म्हणती परम चतुर ॥ कळला विचार मजलागीं ॥ ४१ ॥ तरी कांहीं निमित्त करून जाण ॥ स्वरूपीं लावावें याचें मन ॥ एकनाथास जवळी बोलावून ॥ म्हणे हिशेब दाखवणें आम्हांसी ॥ ४२ ॥ पाहूनि खरडा खतावणी ॥ हिशेब दाखवीं आम्हां-लागूनी ॥ अवश्य म्हणोनि तये क्षणीं ॥ पुढती चरणीं लागला ॥ ४३ ॥ सेवेचा सारूनि नित्यनेम जाण ॥ रात्रीं दीपकासी घातलें भरण ॥ त्यांत एक अडका राहिला चुकोन ॥ तोचि धुंडोनि पाहातसे ॥ ४४ ॥ परि कोठेंचि न सांपडे त्वरित ॥ ताळा न पडेचि हिशेबांत ॥ मग एकाग्र करून चित्त ॥ हिशेब पहात बैसला ॥ ४५ ॥ क्षणभरीही न करी शयन ॥ न मानी निजदेहाचा शीण ॥ तृषा लागली अति-दारुण ॥ परी उदकपान करीना ॥ ४६ ॥ म्हणे उपाहार करूनि उदक प्राशितां ॥ तरी निद्रा आळस येईल तत्त्वतां ॥ मग काय सांगावें गुरुनाथा ॥ विवेक चित्ता करीतसे ॥ ४७ ॥ जनार्दन जागृत होऊनि त्वरित ॥ सभोंवतें विलोकूनि जंव पाहात ॥ तों एकनाथ न दिसे तेथ ॥ म्हणोनि विस्मित जाहले ॥ ४८ ॥ अंतर्गृहीं धुंडितां देखा ॥ तों हिशेब पाहत बैसला एका ॥ भरण घालोनि दीपका ॥ धुंडीत अडका निश्चलत्वें ॥ ४९ ॥ तों अकस्मात ताळा पडतां ॥ हर्ष वाटला एकनाथा ॥ मग आपुल्याच हातें टाळी पिटित ॥ दुसरा नसतां सन्निध ॥ ५० ॥ मागें उभे राहून तेथ ॥ जनार्दन पाहती कौतुकांत ॥ मग सम्मुख येऊनि त्वरित ॥ स्वमुखें पुसत तयासी ॥ ५१ ॥ सद्गुरु म्हणती एक-नाथा ॥ काय आश्चर्य वाटलें चित्ता ॥ म्हणोनि हर्ष मानूनि आतां ॥

हांसलासी ये क्षणीं ॥ ५२ ॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ वरतें पाहे विलोकून ॥ मग सत्वर उभा राहून ॥ केलें नमन सद्भावें ॥ ५३ ॥ म्हणे सर्व हिशेब शोधून पाहतां ॥ त्यांत एक अडका चुकला होता ॥ त्याचा अकस्मात ताळा पडतां ॥ उल्हास चित्ता वाटला ॥ ५४ ॥ म्हणोनि संतोष पावून मन ॥ हांसें आलें मजकारण ॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ जनार्दन झाले विस्मित ॥ ५५ ॥ मग एकनाथासी सद्गुरु बोलत ॥ तुझें अडक्याकडे लागलें चित्त ॥ तैसें श्रीकृष्णचरणीं होतां रत ॥ तरी पावशील निजहित आपुलें ॥ ५६ ॥ ऐसीं अक्षरें पडतां कानीं ॥ अनुताप जाहला तये क्षणीं ॥ म्हणे हेचि इच्छा होती मनीं ॥ जे आज्ञा स्वामींनीं मज द्यावी ॥ ५७ ॥ धन्य दिवस सुदिन आजिचा ॥ अनुग्रह जाहला निजकृपेचा ॥ विकार तुटोनि मायेचा ॥ ठाव प्रपंचाचा पुसिला ॥ ५८ ॥ मग लेखणी घेऊनि तये क्षणीं ॥ एकनाथें ठेविली सद्गुरुचरणीं ॥ सांगितली जमाखर्चवडणी ॥ ते ऐकावी सज्जनीं निज-प्रीतीं ॥ ५९ ॥ नरदेह मुद्दल सालमजकुर ॥ गुदस्तां रुजू पूर्वसंस्कार ॥ प्रेमपत्र हृदयीं अक्षर ॥ स्वधर्म थोर खर्च केला ॥ ६० ॥ फळत्याग करितांचि सकळ ॥ रुजू पावेल स्वामींजवळ ॥ ब्रह्मार्पणीं तये वेळ ॥ अर्पिलें न कळे सर्वथा ॥ ६१ ॥ विचार सुरस हा निजनेमाचा ॥ सावधानपणीं लिहितां साचा ॥ वरी मनसुर सद्गुरुकृपेचा ॥ हिशेब सकळाचा पुसिला ॥ ६२ ॥ एवं नरदेहजमा झाडियासी आणूनी ॥ अज्ञानबाकी झाडा करूनी ॥ मी विनटलों तुमचे चरणीं ॥ व्यापार सांडोनि निजछंदें ॥ ६३ ॥ त्रैलोक्याचे स्वामी आपण ॥ व्यापार जाहला तुम्हांपासून ॥ ते वाचेसी आवडे कृष्णनाम ॥ कृपेकरून आपुल्या ॥ ६४ ॥ सोहं दिधलें खुर्द खत ॥ तें मस्तकीं वंदिलें त्यां त्वरित ॥ प्रेमाचीं वस्त्रें अपरिमित ॥ पावलों निश्चित ये काळीं ॥ ६५ ॥

निजमुक्तीचा लाधलों विडा ॥ तेणें वारिली भवरोगपीडा ॥ कैवल्यपुरासी जाऊनि रोकडा ॥ चैतन्यहुडा बैसलों ॥ ६६ ॥ स्वानुभवाची तहसील निकी ॥ रसद स्वामींसी दिधली शेखीं ॥ सत्संग सारून वसूलबाकी ॥ हुजत नेटकी भक्तीची ॥ ६७ ॥ पूर्वसुकृत होतें कांहीं ॥ मग रामनाम-व्यापारीं लागलों पाहीं ॥ ऐसें म्हणूनि तये समयीं ॥ घातलें पायीं दंडवत ॥ ६८ ॥ हें वचन ऐकतांचि श्रवणीं ॥ जनार्दन विस्मित जाहले मनीं ॥ म्हणे यासी उपदेश द्यावयालागूनी ॥ अधिकार दिसोनि येतसे ॥ ६९ ॥ मग उठवोनि एकनाथाप्रती ॥ जनार्दन कृपेनें आलिंगिती ॥ रामकृष्णमंत्र तारक निश्चितीं ॥ सद्गुरु सांगती तेधवां ॥ ७० ॥ तेथेंच विश्वास धरूनि दृढ ॥ परमार्थयोग साधिला गूढ ॥ कीर्तनीं हरिगुणपवाडे ॥ गातसे कोडें निजप्रीतीं ॥ ७१ ॥ इतुकी कृपा जाहलियावरी ॥ परी सद्गुरुसेवेंत अंतर न करी ॥ दिवसेंदिवस अधिकोत्तरीं ॥ सद्भाव साचारीं बैसला ॥ ७२ ॥ हा निश्चय देखोनि जनार्दन ॥ म्हणे यासी मनुष्य म्हणेल कोण ॥ विश्वोद्धार करावयालागून ॥ अवतार पूर्ण विष्णूचा ॥ ७३ ॥ यावरी करूनि कृपादृष्टी ॥ श्रीदत्तात्रेयाची करवावी भेटी ॥ ऐसें विचारूनियां पोटीं ॥ जीवींची गोष्टी सांगतसे ॥ ७४ ॥ एकनाथासी म्हणे जनार्दन ॥ तुज श्रीदत्तात्रेयाची भेट करवीन ॥ परी निर्भय असूनि त्वां मनें ॥ चित्तीं न भिणें सर्वथा ॥ ७५ ॥ ते आपुलीं स्वरूपें कडोविकडी ॥ पालट करिती घडोघडी ॥ अज्ञानी जन निंदिती रोकडी ॥ काया चोखडी तेचि धरिती ॥ ७६ ॥ तरी मी जयासीं बोलेन गोष्टी ॥ तूं त्याचे चरणीं घालीं मिठी ॥ आलिंगन देऊनि उठाउठीं ॥ सद्गुरूसी पोटीं धरावें ॥ ७७ ॥ प्रसाद दिधला तुजकारण ॥ तरी तेथेंच भक्षीं निजप्रीतीन ॥ ऐसी जनार्दनें देतां शिकवण ॥ एकनाथ चरण धरीतसे ॥ ७८ ॥ म्हणे हेचि इच्छा बहुत दिनीं ॥

वाटतसे माझिया मनीं ॥ परी स्वामींची मर्यादा उल्लंघोनी ॥ सर्वथा माझेनि न बोलवे ॥ ७९ ॥ तें आजि आपले स्वमुखेंकरून ॥ स्वामींनीं मज दिधलें अभयवचन ॥ ते आजि मनोरथ पूर्ण करून ॥ करवावें दर्शन दत्ताचें ॥ ८० ॥ ऐसा पूर्ण जाणूनि हेत ॥ एकनाथासी नेलें अरण्यांत ॥ तंव तेथें अनसूयासुत अकस्मात ॥ आले त्वरित भेटावया ॥ ८१ ॥ जनार्दन म्हणे एकनाथा ॥ आमुचे स्वामी ओळखें आतां ॥ तों अविंध बैसोनि अश्वावरुता ॥ आला अवचिता त्या ठाया ॥ ८२ ॥ ऐसें रूप देखतां दृष्टी ॥ एकनाथ भयभीत जाहले पोटीं ॥ म्हणे प्रत्यक्ष यवन दिसतो दृष्टी ॥ असत्य गोष्टी मज वाटे ॥ ८३ ॥ विशाल भाल आरक्त नयन ॥ हातीं शस्त्रें अश्ववाहन ॥ संनिध येऊन उतरला जाण ॥ मग केलें नमन जनार्दनें ॥ ८४ ॥ यवनभाषेनें अनसूयासुत ॥ जनार्दनासीं बैसले बोलत ॥ हें दृष्टीस देखोनि एकनाथ ॥ आश्चर्य करीत मानसीं ॥ ८५ ॥ सद्गुरु म्हणती जनार्दना ॥ क्षुधा लागली करूं भोजना ॥ तेथें पक्वानें निर्मूनि नाना ॥ आश्चर्यरचना दाखविली ॥ ८६ ॥ रत्नजडित कनकताट ॥ त्यांत षड्रस वाढिले गोमट ॥ जनार्दन बैसोनि निकट ॥ जेवीत स्पष्ट सांगातें ॥ ८७ ॥ सद्गुरु म्हणती जनार्दना ॥ पैल तो मूल दिसतो नयना ॥ त्यासी सत्वर बोलवावें भोजना ॥ तुमच्या मना येईल तरी ॥ ८८ ॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ विकल्प वाटला त्याजकारण ॥ म्हणे यवनाचें कैसें भक्षावें अन्न ॥ गेले पळून दूर तेंव्हां ॥ ८९ ॥ दत्तात्रेय तत्काळ अदृश्य होतां ॥ आश्चर्य वाटलें एकनाथा ॥ सद्गुरु-चरणीं ठेवूनि माथा ॥ झाला पुसता निजप्रेमें ॥ ९० ॥ म्हणे कोण आला होता यवन ॥ तुम्ही भेटलेती त्यालागून ॥ ते म्हणती तुज नेणवेचि खूण ॥ तो अत्रिनंदन होता कीं ॥ ९१ ॥ साधन करितां नाना सायास ॥ परी त्यांचें दर्शन नव्हेचि कोणास ॥ ते तुज भेटतां

अनायासें ॥ परी विकल्प चित्तास आला कीं ॥ ९२ ॥ वाटेसी जातां अभाग्य नरू ॥ तों अवचित भेटला कल्पतरू ॥ त्यासी डावलोनि केला अव्हेरू ॥ तैसाचि विचारू त्वां केला ॥ ९३ ॥ नातरी अमूल्य मुक्ताफळ ॥ हातावरी पडिलें तत्काळ ॥ तंव दैव बसतां झांकिले डोळे ॥ तैसेंच घडलें तुजलागीं ॥ ९४ ॥ अमृतसिंधु पडल्या दृष्टी ॥ काळासही मारवेल काठी ॥ परी अनसूयासुत उठाउठीं ॥ प्राक्तनदृष्टी पडे ना ॥ ९५ ॥ वज्रासनयोग अवघडे ॥ तोही साधवेल वाडेंकोडें ॥ परी दत्तात्रेयाचें दर्शन न घडे ॥ तें तुज जोडे अनायासें ॥ ९६ ॥ जीवमात्राचें मनोगत ॥ न सांगतांचि कळेल त्वरित ॥ परी दृष्टी पडावा अत्रिसुत ॥ हें अघटित एकनाथा ॥ ९७ ॥ निजबळें पोहूनि आपण ॥ सप्तसागरांचें घडेल स्नान ॥ परी सद्गुरूचें दर्शन ॥ दैवेंकरून साधलें ॥ ९८ ॥ पुढील भविष्य नेणेचि कोणी ॥ तेंही एक वेळ कळेल मनीं ॥ परी दत्तात्रेय साक्षात येऊनी ॥ कोणालागूनि न भेटती ॥ ९९ ॥ ते तुज अनायासें भेटले असतां ॥ वायांचि विकल्प धरिला चित्ता ॥ बरें पुढें दर्शन दिधल्या अवचितां ॥ तरी सावधानता असावी ॥ १०० ॥ यावरी एकनाथ उत्तर देत ॥ मी तुमचा म्हणवितों मुद्रांकित ॥ आणिके ठायीं लावितां चित्त ॥ विकल्प धरितों निजमनीं ॥ १ ॥ बालक पित्याचे जाण अंतरीं ॥ पितामह सहजचि लोभ करी ॥ तेवीं तुमचे चरण धरितां शिरीं ॥ श्रीदत्त मजवरी तुष्टेल ॥ २ ॥ कीं पुष्पें धरितां देंठास ॥ त्यासी सहजचि पावेल मूळीचा रस ॥ तेवीं तुमचा लागतां निदिध्यास ॥ दत्त अनायासें भेटती ॥ ३ ॥ ऐसें सद्गुरूसी बोलोनि वचन ॥ उभयतां घरासी आले त्वरेन ॥ एके दिवशीं जनार्दन ॥ एकनाथासी बोलती ॥ ४ ॥ आजि वनांत जाऊनि तुजकारण ॥ श्रीदत्तात्रेयाचें करवितों दर्शन ॥ परी कोणत्या रूपें येतील जाण ॥

आम्हांकारण कळेना ॥ ५ ॥ ऐसें बोलोनि तयाप्रती ॥ अरण्यांत गेले सत्वरगती ॥ तंव मलंगरूपें अवचितीं ॥ दत्तात्रेयमूर्ति येतसे ॥ ६ ॥ मायारूप तेचि कामिनी ॥ कामधेनु सवें दिसली शुनी ॥ ऐसें रूप दृष्टीसी देखोनी ॥ जनार्दन मनीं आनंदले ॥ ७ ॥ मग पुढें होऊनि सत्वर ॥ केला साष्टांग नमस्कार ॥ आलिंगन देऊनि निजकरें ॥ बोलती उत्तर एकमेकां ॥ ८ ॥ यवनभाषेनें अनसूयासुत ॥ जनार्दनासी काय बोलत ॥ क्षुधा लागली आम्हां बहुत ॥ तरी भोजन त्वरित करावें ॥ ९ ॥ मग मृत्तिकापात्र सत्वर काढोनी ॥ त्यामाजी स्वकरें दोहिली शुनी ॥ तिच्या दुग्धांत अन्न चुरोनी ॥ बैसले भोजनीं उभयतां ॥ ११० ॥ सद्गुरु म्हणती जनार्दना ॥ पैल तो कोण दिसतो नयना ॥ तयासी पाचारूनि आणा ॥ सवें भोजना बैसावया ॥ ११ ॥ वचन ऐकूनि एकनाथ ॥ मनांत जाहले संकोचित ॥ म्हणे साक्षात् फकीर दिसत ॥ कैसें अनुचित करावें ॥ १२ ॥ जनार्दन दाखविती निजखूण ॥ तुज मागें दिधली शिकवण ॥ त्या जगद्गुरूचें जाहलें दर्शन ॥ तरी प्रसाद घेऊन जाईं कां ॥ १३ ॥ मग एकनाथ संकोच करूनि चित्त ॥ समीप आले भीतभीत ॥ म्हणे समागमें न बैसें निश्चित ॥ तरी प्रसाद त्वरित मज द्यावा ॥ १४ ॥ तेंव्हां उच्छिष्ट ग्रास निजप्रीतीं ॥ जनार्दन देत तया हातीं ॥ तो वस्त्राचे पदरीं बांधोनि निश्चितीं ॥ निवांतस्थिती बैसले ॥ १५ ॥ भोजन समाप्त होतां पाहें ॥ जनार्दनासी बोलती दत्तात्रेय ॥ पैल तो मूल कोण आहे ॥ सांग लवलाहें आम्हांसी ॥ १६ ॥ मग एकनाथासी बोलावूनि लवलाहीं ॥ उचलोनि घातला स्वामींचे पायीं ॥ त्यांनीं आश्वासन देऊनि पाहीं ॥ वरदान कांहीं बोलत ॥ १७ ॥ श्रुतिशास्त्रांचें जें मथित ॥ व्यासें काढिलें श्रीभागवत ॥ त्याचा अर्थ सखोल गुप्त ॥ वदेल प्राकृत प्रसिद्ध हा ॥ १८ ॥ आणिक भावार्थ-

रामायण ॥ वदेल रसाळ निरूपण ॥ तें श्रवण करितां प्रीतीकरून ॥ तरतील जन सकळिक ॥ १९ ॥ आणिक पदपदांतरें बहुत ॥ श्रीहरिचरित्र अति अद्भुत ॥ कीर्तनीं गाऊनि प्रेमयुक्त ॥ उद्धरील पतित श्रवणमात्रें ॥ १२० ॥ ऐसा वर देऊनि सत्वर ॥ मस्तकीं ठेविला अभयकर ॥ निमिष लोटतां साचार ॥ अदृश्य जाहले तेधवां ॥ २१ ॥ जनार्दन म्हणे एकनाथा ॥ आजि तरी यथार्थ वाटलें चित्ता ॥ तुजला प्रसाद दिधला होता ॥ तो ठेविला केउता मज सांग ॥ २२ ॥ येरू यथार्थ बोले वचन ॥ तो ग्रास म्यां दिधला टाकून ॥ मग जनार्दनें तांबूल काढोन ॥ निजकरें मुखांत घातलें ॥ २३ ॥ एकनाथासी धरूनि हातीं ॥ मंदिरांत आले त्वरितगती ॥ एकमेकांसी न विसंबती ॥ जेवीं लेंकुराप्रती निजमाय ॥ २४ ॥ आणि तान्हयासी न पडे मायेचा विसर ॥ हें परस्परें साक्ष देतसे अंतर ॥ तेवीं एकनाथ जनार्दन निरंतर ॥ असती साचार एकचित्तें ॥ २५ ॥ दीपक आणि प्रकाशज्योती ॥ कीं सुवर्ण आणि त्याची कांती ॥ द्रवत्व आणि उदक निश्चितीं ॥ अभिन्न असती एकत्वें ॥ २६ ॥ कीं रवि आणि त्याचीं किरणें ॥ कीं चंद्र आणि शीतलत्व जाण ॥ कीं समीर आणि चंचळपण ॥ अभिन्नपणें असती कीं ॥ २७ ॥ समुद्र आणि कल्लोल कैसे ॥ कीं भिन्नपणें एकत्र जैसे ॥ अमृत आणि स्वादरसें ॥ एकत्रपणें नांदती ॥ २८ ॥ कीं अवधान आणि श्रवण ॥ कीं पृथ्वी आणि घनवटपण ॥ अध्यात्म आणि सत्त्वगुण ॥ नामाभिधानें वेगळालीं ॥ २९ ॥ तेवीं जनार्दन आणि एकनाथ ॥ नामें दोन परी अभिन्न असत ॥ एकमेकांसी न विसंबत ॥ कासावीस आप्त जयापरी ॥ १३० ॥ तंव कोण एके दिवसीं ॥ जनार्दन विचारी मानसीं ॥ आतां सेवा घेणें याजपासीं ॥ अनुचित मजसीं दिसताहे ॥ ३१ ॥

मग एकनाथासी बोलती वचन ॥ माझी आज्ञा तुज प्रमाण ॥ तरी आतां प्रतिष्ठानासी जाऊन ॥ गृहस्थाश्रम चालवीं ॥ ३२ ॥ स्नान संध्या देवतार्चन ॥ वैश्वदेवादि अतिथिपूजन ॥ नित्यनैमित्तिक कर्माचरण ॥ दाखवीं वर्तवून लोकांसी ॥ ३३ ॥ तूं अध्यात्मज्ञानीं प्रवीण होसी ॥ परी सर्वथा न सोडीं सत्कर्मासी ॥ नदीपार जाहलिया आपणासी ॥ तरी केवीं नावेसी फोडावें ॥ ३४ ॥ तेवीं मिथ्या कर्म कळलें अंतरीं ॥ तरी वर्तावें लोकाचारीं ॥ यथाविधि वर्तोनि निर्धारीं ॥ मग तें ईश्वरीं अर्पावें ॥ ३५ ॥ हें वचन प्रमाण करितां त्वरित ॥ तुज प्रसन्न होईल रुक्मिणीकांत ॥ जनार्दनें मस्तकीं ठेविला हात ॥ प्रतिष्ठानीं त्वरित चालिले ॥ ३६ ॥ सद्गुरुवचन हेंचि प्रमाण ॥ त्याहूनि वरिष्ठ नव्हेचि साधन ॥ हे गुरुभक्तचि जाणती खूण ॥ इतरांकारण न घडेचि ॥ ३७ ॥ मग निजमंदिरा येऊन ॥ वडील वृद्धांस केलें नमन ॥ पुत्र देखतां त्यांजकारण ॥ समाधान वाटलें ॥ ३८ ॥ स्नान संध्या देवतार्चन ॥ मातापित्यांचें करी सेवन ॥ ऋतुकाळीं स्वदारागमन ॥ विधिआज्ञेनें करीतसे ॥ ३९ ॥ न करी कोणाचें उपार्जन ॥ दृष्टीस न येती थोर सान ॥ चराचर जें जें दिसे आन ॥ तें तें जनार्दन भासत ॥ १४० ॥ घरीं पुरातन पांडुरंगमूर्ती ॥ एकनाथ पूजी निजप्रीतीं ॥ जैसी बोलिली शास्त्रीं नीती ॥ तैशाच रीतीं अर्चीतसे ॥ ४१ ॥ नानापरीचीं सुमन चंदन ॥ परिमळ उपचार सुगंध भूषण ॥ धूप दीप कर्पूर नीरांजन ॥ नैवेद्य अर्पण निजभावें ॥ ४२ ॥ पुष्पांजलि स्तोत्रें पढोनि नाना ॥ देवासी घालीतसे प्रदक्षिणा ॥ मग साष्टांग नमस्कार घालोनि जाणा ॥ भाकीत करुणा अनुतापें ॥ ४३ ॥ जय पतितपावना जगदुद्धारा ॥ द्वारकावासिया रुक्मिणीवरा ॥ अनाथनाथा करुणाकरा ॥ सर्वेश्वरा पांडुरंगा ॥ ४४ ॥ मी अनन्यभावें तुज

शरण ॥ म्हणूनि पुढती करीत नमन ॥ मग तुलसीप्रसाद घेऊन ॥ तीर्थ प्राशन करीतसे ॥ ४५ ॥ ब्राह्मण घेऊनियां पंक्ती ॥ भोजन करीत निजप्रीती ॥ तृतीयप्रहरीं पुराणव्युत्पत्ती ॥ श्रवण करीत सद्भावें ॥ ४६ ॥ रात्रीं आरंभी हरिकीर्तन ॥ श्रवणासी येती भाविक जन ॥ एकनाथाचें ऐकोनि वचन ॥ होती तल्लीन नरनारी ॥ ४७ ॥ जनार्दनाचे कृपेंकरूनी ॥ कवित्व बोलती प्रसादवाणी ॥ संत सज्जन ऐकती कानीं ॥ संतोष मनीं मानीत ॥ ४८ ॥ एके दिवसीं एकनाथ ॥ निद्रित होते यामिनींत ॥ तों स्वप्नीं येऊनि श्रीरघुनाथ ॥ काय बोलत तयासी ॥ ४९ ॥ म्हणे वाल्मीकिकृत रामायण ॥ संस्कृत वाणी न कळे गहन ॥ यावरी महाराष्ट्र टीका करून ॥ जनांकारणें सांगावी ॥ १५० ॥ ऐसें स्वप्न देखतांचि जाण ॥ जागृतीस आले न लागतां क्षण ॥ तेचि आज्ञा करूनि प्रमाण ॥ आरंभी रामायण प्राकृत ॥ ५१ ॥ सुदिन पाहोनि एके दिनीं ॥ सप्त कांडें पाहिलीं शोधोनी ॥ तो अभिप्राय ध्यानीं आणोनी ॥ एकनाथ मनीं तल्लीन ॥ ५२ ॥ म्हणे याचा अर्थ सखोल गहन ॥ मी प्राकृत काय बोलों जाण ॥ परी जनार्दनाचे कृपेंकरून ॥ ग्रंथ वदेन यथामती ॥ ५३ ॥ बालकांड आरंभितांचि जाण ॥ प्रथमाध्यायीं मंगलाचरण ॥ गणपतिसरस्वतींचे वंदोनि चरण ॥ सद्गुरुस्तवन मग केलें ॥ ५४ ॥ प्रार्थूनि संतसज्जनमूर्ती ॥ ग्रंथ आरंभिला एकनाथीं ॥ सद्भावें बोलिला वचनोक्ती ॥ मग भावार्थ म्हणती रामायण ॥ ५५ ॥ मुखीं बैसोनि श्रीरघुनाथ ॥ ग्रंथ वदविती यथार्थ ॥ एकनाथ पुढें निमित्तमात्र ॥ जाणती पवित्र निजभक्त ॥ ५६ ॥ परी एक गृहस्थ होता शेजारीं ॥ तो नित्य त्याची निंदा करी ॥ म्हणे प्राकृत टीका संस्कृतावरी ॥ एकनाथ करी कासया ॥ ५७ ॥ कोणी भाविक होते प्रेमळ ॥ ते याचें कवित्व म्हणती रसाळ ॥ श्रवणीं पडतांचि

तत्काळ ॥ राहे तळमळ चित्ताची ॥ ५८ ॥ एके दिवशीं रात्रींत ॥ निद्रित झाले एकनाथ ॥ तों स्वप्नीं येऊनि जानकीकांत ॥ काय बोलत तयासी ॥ ५९ ॥ आतां निद्रा आळस टाकूनि जाण ॥ लिहीत बैसें रामायण ॥ तुझे मुखींचें रसाळ भाषण ॥ मजकारणें आवडे ॥ १६० ॥ दौत लेखणी पत्र हातीं ॥ आणोनि देत अयोध्यापती ॥ जागृत होऊनि जंव पाहाती ॥ तंव दृष्टीस न दिसती श्रीराम ॥ ६१ ॥ मग करूनि रघुनाथस्मरण ॥ लिहीत बैसले रामायण ॥ तों अद्भुत वर्तलें गहन ॥ तें परिसा सज्जन निजप्रीतीं ॥ ६२ ॥ सीताशुद्धीस जातां मारुती ॥ ते कथा लिहितां सप्रेम चित्तीं ॥ एकनाथासी नसे देहभ्रांति ॥ मीपण निश्चितीं स्फुरेना ॥ ६३ ॥ महेंद्र पर्वतावरूनी ॥ हनुमंत उडाला जये क्षणीं ॥ ते ओंवी लिहितां यालागूनी ॥ आविर्भाव मनीं दाटला ॥ ६४ ॥ तो प्रेमा दाटोनि मनांत ॥ मग उडोनि चालिले एकनाथ ॥ शेजारियाचे वाड्यांत ॥ पडिले अवचित अर्धरात्रीं ॥ ६५ ॥ गृहस्थ होऊनियां जागृत ॥ आंगणीं येऊनि जंव पाहात ॥ तों मूर्च्छित पडिले एकनाथ ॥ देखोनि विस्मित अंतरीं ॥ ६६ ॥ मग हातींचें पत्र घेऊनी ॥ वाचूनि पाहे तये क्षणीं ॥ तेव्हां तो उमजला आपुले मनीं ॥ म्हणे प्रेमेंकरूनि उडाले ॥ ६७ ॥ गृहस्थ पुसतसे वर्तमान ॥ किमर्थ येथें पडिलां येऊन ॥ परी त्यासी नाहीं देहभान ॥ कांहीं न वचन बोलत ॥ ६८ ॥ ऐसी स्थिति देखतां सत्य ॥ अनुताप जाहला चित्तांत ॥ म्हणे एकनाथ अवतार मूर्तिमंत ॥ म्यां निंदिलें व्यर्थ याप्रती ॥ ६९ ॥ मग आपुले पाठीवर बांधोनि सत्वरी ॥ नेऊनि बैसविलें त्याचे मंदिरीं ॥ एकनाथ सावध होऊनि लवकरी ॥ लेखन करीत बैसले ॥ १७० ॥ गृहस्थें करूनियां नमन ॥ आपुले गृहा गेला जाण ॥ म्हणे एकनाथाचा उपदेश घेईन ॥ विचार त्यानें दृढ केला ॥ ७१ ॥ चमत्कार देखिला

अति अद्भुत ॥ मग तयावरी जरी बैसला हेत ॥ तरी तो नव्हे शुद्ध भावार्थ ॥ दांभिक निश्चित या नांव ॥ ७२ ॥ परिसाचा देव जाणत केला ॥ मग देव्हारीं षोडशोपचारें पूजिला ॥ ऐसा भक्तभावार्थ देखिला ॥ तरी दांभिक त्याजला म्हणावें ॥ ७७ ॥ कामधेनूचा चमत्कार देखोनि जाणा ॥ मग तीस घातल्या प्रदक्षिणा ॥ त्यांच्या सद्भावाच्या खुणा ॥ कळती सज्ञाना भाविकां ॥ ७४ ॥ कल्पतरूस ओळखोनी ॥ मग कामनिक त्यासी घालिती पाणी ॥ त्यासी परोपकारी म्हणतां कोणी ॥ तरी यथार्थ सज्जनीं न म्हणावें ॥ ७५ ॥ तेवीं संतांचा उपहास आधीं केला ॥ मग चमत्कार पाहोनि भावार्थ जडला ॥ तरी दांभिक म्हणावें त्याला ॥ अन्यथा बोल असेना ॥ ७६ ॥ वैभव पातलें सोयऱ्यासी ॥ मग पिशुन आदर करिती त्यासी ॥ परी मागील अपमान आठवणें मानसीं ॥ प्रशस्त त्यासी वाटेना ॥ ७७ ॥ तेवीं गृहस्थें उपहास आधीं केला ॥ मग चमत्कार पाहोनि शरण आला ॥ परी एकनाथासी दांभिक भासला ॥ वृत्तांत पहिला आठवूनि ॥ ७८ ॥ एके दिवसीं जनार्दनसुत ॥ एकांतीं बैसले देवघरांत ॥ तों गृहस्थ सत्वर येऊनि तेथ ॥ प्रार्थना करीत तयाची ॥ ७९ ॥ म्हणे स्वामी तुमचा महिमा नेणतां ॥ म्यां मागें उपहास केला वृथा ॥ आतां भावार्थ धरूनि चित्ता ॥ आलों समर्था तुजपासीं ॥ १८० ॥ तरी माझे मस्तकीं ठेवूनि हात ॥ उपदेश द्यावा जी त्वरित ॥ वचन ऐकोनि एकनाथ ॥ राहिले निवांत उगेचि ॥ ८१ ॥ म्हणती अधिकार न पाहतां कांहीं ॥ कैसा करावा सांप्रदायी ॥ बरड भूमि असतां पाहीं ॥ तेथें सर्वथा कांहीं न पेरावें ॥ ८२ ॥ कुळासी नाहीं ठाव ठिकाण ॥ तयासी सर्व न द्यावें धन ॥ कुंभ फुटका न पाहतां जाण ॥ तरी तयांत जीवन भरूं नये ॥ ८३ ॥ ऐसें म्हणोनि एकनाथ ॥

गृहस्थासी काय उत्तर देत ॥ तुम्हीं आपणायोग्य पाहूनि समर्थ ॥ तयासीं भावार्थ धरावा ॥ ८४ ॥ ऐसें तयासी म्हणतां पाहीं ॥ परी तो सर्वथा नायके कांहीं ॥ म्हणे तुम्हांविण उपदेश घेणें नाहीं ॥ म्हणूनि पायीं लागला ॥ ८५ ॥ त्याचे भिडेस्तव बाह्यात्कारें ॥ म्हणे उदयिक मुहूर्त आहे बरें ॥ तुम्हीं स्नान करूनि सत्वरें ॥ यावें ऐसें बोलिले ॥ ८६ ॥ मग गृहस्थ उठोनि गेलिया घरीं ॥ एकनाथ विचार करिती अंतरीं ॥ म्हणती आळसी कृपणासी उपदेश सत्वरीं ॥ देऊं नयेचि सर्वथा ॥ ८७ ॥ उदयिक स्नान करूनि त्वरित ॥ देउळासी आले जनार्दनसुत ॥ घरच्या मनुष्यांसी काय सांगत ॥ अग्रोदक येथें न ठेवावें ॥ ८८ ॥ आम्हीं हांक मारिलिया सत्वर ॥ परी कोणींच न द्यावें प्रत्युत्तर ॥ ऐसा दृढ सांगोनि विचार ॥ मग मानसपूजेसी बैसले ॥ ८९ ॥ तों गृहस्थ स्नान करूनि त्वरित ॥ सत्वर आले देवघरांत ॥ तंव एकनाथ बैसले ध्यानस्थ ॥ मुखीं जपत कृष्णनाम ॥ १९० ॥ विचार करिती आपुल्या चित्ता ॥ याची परीक्षा पाहावी आतां ॥ दांभिक असला तरी सर्वथा ॥ उपदेश वृथा देऊं नये ॥ ९१ ॥ मग हांक मारूनि मंदिरांत ॥ घरच्या मनुष्यांसी काय बोलत ॥ अग्रोदक ठेविलें नाहीं येथ ॥ काय निमित्त पैं आजि ॥ ९२ ॥ मागुती सांगती ते अवसरीं ॥ आतां तरी आणूनि द्या झडकरी ॥ परी कोणीच न बोलती मंदिरीं ॥ मग एकनाथ झडकरी ऊठिले ॥ ९३ ॥ हातीं चंबू घेऊनि त्वरित ॥ म्हणे कोणी उदक द्यावया नाहीं येथ ॥ मग आपणचि जाऊनि मंदिरांत ॥ अग्रोदक निश्चित आणिलें ॥ ९४ ॥ गृहस्थाची परीक्षा घेऊनि ऐसी ॥ एकनाथ लागला देवपूजेसी ॥ मनांत म्हणे हा कुटिल आळसी ॥ तरी उपदेश यासी देऊं नये ॥ ९५ ॥ जो फुकाचें उदक नेदी देवा ॥ तो काय

पुढें करील सेवा ॥ जो नमस्कार न करी भूदेवा ॥ तो पक्वान्न जेवाया नेदीच ॥ ९६ ॥ जो वाट न सांगे पथिकासी ॥ तो मंदिरा ठाव दे केवीं त्यासी ॥ कीं जो बैसावया नेदी पाहुण्यासी ॥ तो शिरपाव डोईसी बांधीना ॥ ९७ ॥ तेवीं फुकाचें आणोनि नेदी जीवन ॥ तो पुढें काय करी साधन ॥ ऐसें मनांत विचारून ॥ करीत पूजन श्रीहरीचें ॥ ९८ ॥ यावरी गृहस्थ काय बोलत ॥ माझे मस्तकीं ठेवा हात ॥ एकनाथ म्हणती टळला मुहूर्त ॥ आतां नाहीं दिसत यापुढें ॥ ९९ ॥ वचन ऐकोनि त्या अवसरीं ॥ गृहस्थ गेला निजमंदिरीं ॥ एकनाथाच्या अंतरीं ॥ समाधान वाटलें ॥ २०० ॥ म्हणे दांभिकपण व्यर्थ वायां ॥ आम्हांस सांप्रदायी पाहिजे कासया ॥ तरी सर्व उपाधि टाकोनियां ॥ पंढरीराया भजावें ॥ १ ॥ जनार्दनाचे तान्हया बाळका ॥ कासया पाहिजेत शिष्यशाखा ॥ अंगा जाणीव येईल देखा ॥ म्हणोनि आशंका वाटत ॥ २ ॥ यापरी असोनि वैराग्य-भरित ॥ भजन करिती एकनाथ ॥ पुढें द्वारकेहूनि श्रीकृष्णनाथ ॥ सेवेसी येतील निजांगें ॥ ३ ॥ ते कथा कानीं ऐकतां फुडी ॥ श्रोतयां अधिक लागेल गोडी ॥ मग भवरोगाची दिसते वांकडी ॥ ते जाईल रोकडी उठाउठीं ॥ ४ ॥ म्हणोनि श्रोतयां पुढतपुढती । विनंति करी महीपती ॥ कथाश्रवणीं लावूनि प्रीती ॥ अवधान चित्तीं असावें ॥ ५ ॥ स्वस्ति श्रीभक्तविजय ग्रंथ ॥ ऐकतां तुष्टेल जगन्नाथ ॥ प्रेमळ ऐका भाविक भक्त ॥ पंचचत्वारिंशाध्याय रसाळ हा ॥ २०६ ॥ ॥ अध्याय ॥ ४५ ॥ ॥ ओंव्या ॥ २०६ ॥ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीधेनुकासुरमर्दनाय नमः ॥ आजि अमृत-सिंधूसी भरतें आलें ॥ कीं ब्रह्मविद्येचें भांडार उघडलें ॥ कीं वासर-मणीचें तेज भलें ॥ हृदयीं प्रगटलें श्रोतयांचे ॥ १ ॥ नातरी शुद्ध-ज्ञानाचें गुज ॥ कानीं अवचट पडिलें सहज ॥ कीं मोक्षयुक्तीचेंही बीज ॥ लाधलें आज निजभाग्यें ॥ २ ॥ कीं हा मंत्रराज मंगळनिधी ॥ दैवदशेनें प्रगटला आधीं ॥ कीं वैराग्यविवेकाची बुद्धी ॥ भक्तकथेसंधीं पातली ॥ ३ ॥ नातरी शांतीचें निजसुख ॥ कीं विवेकवल्लीचें उगवलें रोप ॥ कीं आनंदसुखाचा हरिख ॥ प्रगटला देख भूमंडळीं ॥ ४ ॥ कीं वैराग्याची निरपेक्षता ॥ कीं भूतदयेची ही ममता ॥ कीं प्रेम-आवडी तत्त्वतां ॥ ते हे भक्तकथा रसाळ ॥ ५ ॥ कीं सायुज्यतेचें निजधाम ॥ कीं कीर्तनसुखाचें हें प्रेम ॥ कीं निर्विकल्प प्रगटला कल्पद्रुम ॥ कीं साधन निष्काम म्हणावें ॥ ६ ॥ मागिले अध्यायीं एकनाथ ॥ परीक्षा करूनि वाळिला गृहस्थ ॥ जेवीं पितळ तावितां अग्नींत ॥ काळें दिसत दृष्टीसी ॥ ७ ॥ कीं कसवटी लावितां सुव-र्णासी ॥ डांकलग दिसे हीनकसी ॥ मग परीक्षक सोडून देती त्यासी ॥ न ये मानसीं म्हणोनियां ॥ ८ ॥ नातरी वेश्येचें सुंदर गायन ॥ परी विरक्त तेथें न घालिती मन ॥ कीं राजमंदिरींचें वर्षासन ॥ पवित्र सज्जन न घेती ॥ ९ ॥ कीं एकचि शीत चांचपटोनी ॥ भात पाहती सुगरिणी ॥ तेवीं एकनाथें त्यास मागोनि पाणी ॥ कुचर निजमनीं ओळखिला ॥ १० ॥ षोडशोपचारें नित्य पूजा ॥ सद्भावें अर्पीत अधोक्षजा ॥ साहित्य द्यावयासी नाहीं दुजा ॥ हें गरुडध्वजा जाण-वलें ॥ ११ ॥ म्हणे माझे पूजनीं अति आवडी ॥ एकनाथासी प्रीति लागली गाढी ॥ तरी निजांगें जाऊनि तांतडी ॥ कार्य लवडसवडी साधावें ॥ १२ ॥ ऐसें बोलूनि द्वारकानाथ ॥ ब्राह्मणरूप धरूनि

त्वरित ॥ प्रतिष्ठानीं येऊनि अनंत ॥ पुसे वृत्तांत लोकांसी ॥ १३ ॥ जो अंतरसाक्ष चैतन्यघन ॥ ब्रह्मांडनिवासी जगज्जीवन ॥ तो एकनाथाचें पुसे सदन ॥ ठावें असोन अंतरीं ॥ १४ ॥ म्हणे या ग्रामांत वैष्णववीर ॥ श्रीकृष्णपूजनीं अति सादर ॥ ब्राह्मणभोजन करी निरंतर ॥ तयाचें मंदिर कोणतें ॥ १५ ॥ ऐसें बोलोनि घनसांवळा ॥ त्याचे मंदिरांत प्रवेशला ॥ नरनारी दाविती ते वेळां ॥ मग नमस्कार केला तयासी ॥ १६ ॥ एकनाथासी म्हणे जगज्जीवन ॥ मी अनाथ परदेशी ब्राह्मण ॥ तुम्ही नित्य करितां ब्राह्मणसंतर्पण ॥ ती कीर्ति ऐकून मी आलों ॥ १७ ॥ तरी मज वस्त्र अन्न घालावें पोटभरी ॥ मग मी येथेंच राहीन निरंतरीं ॥ सांगाल कार्य तें करीन सत्वरीं ॥ आळस अंतरीं न आणितां ॥ १८ ॥ एकनाथ पुसती त्याकारण ॥ तुम्ही कोठें असतां कोण ॥ काय परिवार असे जाण ॥ नामाभिधान कोणतें ॥ १९ ॥ ऐकोनि म्हणे रुक्मिणीपती ॥ मी एकला एकटा असें निश्चितीं ॥ पुत्र दारा आणि संपत्ती ॥ कांहींच नसती मजलागीं ॥ २० ॥ तुमचा प्रसाद सेवून येथ ॥ सेवा करावी अनन्यचित्त ॥ ऐसा निजमनीं धरूनि हेत ॥ आलों त्वरित या ठायीं ॥ २१ ॥ आणिक स्थळें पाहिलीं बहुत ॥ परी सांप्रत कोठें न रमे चित्त ॥ वचन ऐकोनि एकनाथ ॥ आश्चर्य करीत मानसीं ॥ २२ ॥ म्हणे तुमची इच्छा असेल जरी ॥ तरी राहावें आमुचे मंदिरीं ॥ ऐसें ऐकतांचि श्रीहरी ॥ संतोष अंतरीं मानीतसे ॥ २३ ॥ जो ब्रह्मादिकां पूज्यमान ॥ शिवादि करिती ज्याचें ध्यान ॥ तो लीलानाटकी जगज्जीवन ॥ ब्राह्मणजन जाहला कीं ॥ २४ ॥ ज्याची कीर्ति वर्णितां चोखडी ॥ श्रुति पुराणें झालीं वेडीं ॥ तो गंगोदकें भरूनि कावडी ॥ लवडसवडी धांवतसे ॥ २५ ॥ क्षीरसागरीं प्रभाकर बेट ॥ तेथें शेषशायी वैकुंठ-

पीठ ॥ तो प्रातःकाळ होतांचि उठे ॥ देहासी कष्ट न मानितां ॥ २६ ॥ अष्टांगयोगसाधनीं जाण ॥ योगी शिणती जयाकारण ॥ तो देवपूजेसी उपकरण ॥ सोज्ज्वळ उटोन देतसे ॥ २७ ॥ सुकुमार सांवळा रुक्मिणी-कांत ॥ सायुज्यदानी जगविख्यात ॥ तो सडासंमार्जन करूनि त्वरित ॥ देवघर सारवीत निजांगें ॥ २८ ॥ जयाच्या चरणापासूनि निश्चितीं ॥ प्रगट जाहली भागीरथी ॥ तो देवपूजेसी अग्रोदक प्रीतीं ॥ भरूनि श्रीपती ठेवितसे ॥ २९ ॥ अठ्यायशीं सहस्र ऋषी जाण ॥ सद्भावें ज्याचें करिती अर्चन ॥ तो ब्राह्मण होऊनि जगज्जीवन ॥ उगाळी चंदन निजप्रीतीं ॥ ३० ॥ अष्टसिद्धि सकळ दासी ॥ जयासी ओळंगती अहर्निशीं ॥ तो हार गुंफोनि हृषीकेशी ॥ देवपूजेसी ठेवीतसे ॥ ३१ ॥ चंद्र सूर्य नक्षत्रराज ॥ ज्याचे योगें दिसती सतेज ॥ तो दिपक सरसावी अधोक्षज ॥ परी मनीं न लाजे सर्वथा ॥ ३२ ॥ सकळ सुरगण इंद्रादिक ॥ जयाचे म्हणविती आज्ञाधारक ॥ तो देव-पूजेचे उपचार अनेक ॥ एकनाथासी देतसे ॥ ३३ ॥ कृष्णा म्हणोनि हांक मारितां ॥ तंव पुढें सादर होय अवचिता ॥ कोठें अंतर न पडे सर्वथा ॥ सावधानता सर्वकाळ ॥ ३४ ॥ चंदन देतसे उगाळून ॥ कोणी म्हणती श्रीखंड्या ब्राह्मण ॥ नगरवासी सकळ जन ॥ आश्चर्य मनीं करिताती ॥ ३५ ॥ म्हणती एकनाथाचे घरीं ॥ एक ब्राह्मण करितो चाकरी ॥ कांहीं वेतन न घेतां पदरीं ॥ अवघी भरोवरी करीतसे ॥ ३६ ॥ एकनाथासी न कळत ॥ मंदिरांत जाती द्वारका-नाथ ॥ कांतेशीं धंदा करूं लागत ॥ उल्हासयुक्त निजप्रीतीं ॥ ३७ ॥ सडासंमार्जन पात्रें धुवून ॥ उशीर होतांचि करी घुसळण ॥ म्हणे कार्य सांगाया मजकारण ॥ संकोच मनीं न धरावा ॥ ३८ ॥ विलंब होतांचि घनसांवळा ॥ निजांगें झाडीत पाकशाळा ॥ साहित्य

घेऊन एकवेळां ॥ स्वयंपाकासी निघतसे ॥ ३९ ॥ होतां कार्याची आडाआडी ॥ आपण निजांगें द्विजांसी वाढी ॥ त्या अन्नासी अधिक लागे गोडी ॥ नवल परवडी अभिनव ॥ ४० ॥ उदक वाढीत जगज्जीवन ॥ तें प्राशन करिती जंव ब्राह्मण ॥ तंव अभिनव गोडी त्याकारण ॥ विस्मितमन होताती ॥ ४१ ॥ उच्छिष्टें काढावया लवडसवडी ॥ त्या देवास अत्यंत आवडी ॥ ओंचे खोंवूनियां तांतडी ॥ अन्न सावडी निजहस्तें ॥ ४२ ॥ प्रीतीनें धरूनि पत्रावळी ॥ बाहेर टाकीत वनमाळी ॥ हस्त प्रक्षालून ते वेळीं ॥ भूमिका जळें धूतसे ॥ ४३ ॥ एकनाथाचीं मातापिता ॥ क्रमोनि गेलीं आयुष्य सरतां ॥ तों एक वर्तली अभिनव कथा ॥ ते परिसा आतां भाविक हो ॥ ४४ ॥ एकदां पितृतिथि येतां जाण ॥ ब्राह्मणांसी दिधलें आमंत्रण ॥ म्हणे उदयिक तुह्मां पितृक्षण ॥ भोजनासी येणें निश्चित ॥ ४५ ॥ प्रातःकाळीं उठोनि सत्वरगती ॥ गृहांत करविली पाकनिष्पत्ती ॥ दीड प्रहर येतांचि निश्चितीं ॥ स्नानें सांगितलीं विप्रांसी ॥ ४६ ॥ जेथें श्रीकृष्ण ब्राह्मणजन ॥ तेथें साहित्यासी काय उणें ॥ धोतरजोडे दक्षिणा सुवर्ण ॥ द्विजांकारणें सिद्ध केलीं ॥ ४७ ॥ मग स्नान करूनि सत्वरगती ॥ एकनाथ आले मंदिराप्रती ॥ उपरीवरी जाऊनि निश्चितीं ॥ धोत्रें वाळविती तेधवां ॥ ४८ ॥ तों अनामिक आणि त्याची कांता ॥ बिदीस झाडिती उभयतां ॥ पक्वान्नांचा सुवास तत्त्वतां ॥ आला अवचिता तयांसी ॥ ४९ ॥ मग अंत्यजासी कांता बोले उत्तर ॥ अन्नाचा सुवास येतसे सुंदर ॥ हें आपुल्यासी प्राप्त नव्हे साचार ॥ खातील द्विजवर भाग्याचे ॥ ५० ॥ तेव्हां अनामिक म्हणे स्त्रियेसी ॥ तूं व्यर्थचि कासया लाळ घोंटिसी ॥ हें उष्ण उष्ण पक्वान्न आपणासी ॥ आपल्या जन्मासी लाधेना ॥ ५१ ॥ आजि

याचे घरीं श्राद्ध जाण ॥ उच्छिष्टही टाकिती पुरोन ॥ तुवां नेणोनियां मूर्खपणें ॥ वासना मनीं धरियेली ॥ ५२ ॥ वृषभ गेला लग्नाप्रती ॥ तरी समर्थ कडबा त्यासी देती ॥ तेवीं पक्कान्नभोजन आपुले संचितीं ॥ कोठोनि असेल निजकांते ॥ ५३ ॥ ऐसी परस्परें बोलतां वाणी ॥ एकनाथाच्या पडिली श्रवणीं ॥ मग खालीं उतरूनि तये क्षणीं ॥ कांतेलागोनि पुसतसे ॥ ५४ ॥ म्हणे अनामिक दोघें झाडिती ॥ त्यांनीं पक्कान्नभोजन इच्छिलें चित्तीं ॥ तरी घरांत जाहली पाक-निष्पत्ती ॥ तें भोजन त्यांप्रती घालावें ॥ ५५ ॥ यावरी कांता बोलत ॥ अन्न तों निपजलें असे बहुत ॥ तरी मुलांलेंकरांसमवेत ॥ अतिशूद्र समस्त बोलावा ॥ ५६ ॥ दोघांसीच जरी घातलें भोजन ॥ तरी इतर अतृप्त राहतील जाण ॥ ते जाऊन सांगतील त्यांकारण ॥ मग येतील धांवून सकळिक ॥ ५७ ॥ तरी आधीं बोलावून सकळांप्रती ॥ भोजन घालावें सत्वरगती ॥ जनार्दन आहे सर्वां भूतीं ॥ तरी करावी तृप्ति अनामिकां ॥ ५८ ॥ मग बाहेर येऊन तत्काळ ॥ अंत्यज बोलाविले सकळ ॥ बिदीस बैसवून ते वेळ ॥ अति कळवळ निज-मनीं ॥ ५९ ॥ करावया ब्राह्मणपूजन ॥ गंधाक्षता पुष्पें सुमन ॥ साहित्य ठेविलें होतें करून ॥ तें केलें अर्पण अनामिकां ॥ ६० ॥ शूद्रांहातीं पात्रें मांडवून ॥ तयांसी वाढविलें पक्कान्न ॥ घृत शर्करा शाका लवण ॥ बाहेर आणोनि ठेविलीं ॥ ६१ ॥ जनीं जनार्दन आहे निश्चित ॥ हा भाव जाणोनि चित्तांत ॥ संकल्प सोडी एकनाथ ॥ भोक्ता कृष्णनाथ म्हणूनियां ॥ ६२ ॥ ग्रास घ्या म्हणतां त्यांकारणें ॥ अनामिक सेविती पक्कान्नें ॥ मुलें लेंकुरें थोर लहानें ॥ करिती भोजनें यथारुचि ॥ ६३ देखिला ऐकिला नव्हता कर्णीं ॥ तो रस लाधला त्यांलागूनी ॥ म्हणती धन्य एकनाथा तुझी करणी ॥ आम्हांलागोनि

तृप्त केलें ॥ ६४ ॥ आम्ही अंत्यज यातिहीन ॥ देखिलें नव्हतें कधीं अन्न ॥ तूं दयावंत वैष्णव जाण ॥ केली आठवण जन्मवरी ॥ ६५ ॥ जें जें अपेक्षित ज्यांसी ॥ मागतां तैसेंच वाढी त्यांसी ॥ तृप्त केलें सकळिकांसी ॥ विडे समस्तांसी दीधले ॥ ६६ ॥ उरलें अन्न होतें घरीं ॥ तेंही घातलें त्यांचे पदरीं ॥ मग सडासंमार्जन करूनि मंदिरीं ॥ पात्रें झडकरी धूतलीं ॥ ६७ ॥ आणिक सामग्री उदक देऊनी ॥ पाकासी घातल्या स्वयंपाकिणी ॥ पहिल्याहूनि दशगुणी ॥ निपजलीं गृहीं पक्वान्नें ॥ ६८ ॥ ब्राम्हणांसी सांगितलीं होतीं स्नानें ॥ तयांसी कळलें हें वर्तमान ॥ कीं तुम्हाआधीं एकनाथानें ॥ अंत्यजां भोजन दीधलें ॥ ६९ ॥ एकमेकांसी बोलत वचन ॥ हें तंव अघटित केलें तेणें ॥ आम्हां देऊन पितृक्षण ॥ घातलें भोजन अनामिकां ॥ ७० ॥ विप्र होऊनि क्रोधायमान ॥ विचार करिती अवघेजण ॥ आजपासोनि या भ्रष्टाचें अन्न ॥ कोणीं न घेणें सर्वथा ॥ ७१ ॥ मग सकळ शास्त्रज्ञ झडकरी ॥ पातले एकनाथाचे घरीं ॥ सक्रोध होऊनि त्या अवसरीं ॥ कठोर शद्बें ताडिती ॥ ७२ ॥ म्हणती ऐक रे कर्मभ्रष्टा ॥ तुवां अघटित केल्या चेष्टा ॥ ब्राम्हण न जेवितांचि दुष्टा ॥ अंत्यजां आधीं पूजिलें ॥ ७३ ॥ आजि तुझे वडिलांची पितृतिथी देख ॥ ते काय होते अनामिक ॥ म्हणोनि अतिशूद्र पूजिले अनेक ॥ जे कां निंदिले वेदशास्त्रीं ॥ ७४ ॥ तुझेनि योगें वर्णसंकर ॥ आतांच होऊं पाहे सत्वर ॥ निजांगें मांडिला भ्रष्टाचार ॥ ब्राह्मणआचार बुडवूनी ॥ ७५ ॥ ऐसी ऐकोनि विप्रवाणी ॥ एकनाथ विनवी कर जोडोनी ॥ दुसरा स्वयंपाक तुम्हांलागोनी ॥ मंदिरीं करूनी ठेविला ॥ ७६ ॥ पहिला स्वयंपाक होता सदनीं ॥ त्याचा सुवास घेतला अंत्यजांनीं ॥ तें उच्छिष्ट अन्न तुह्मांलागोनी ॥ कैशा रीतीं घालावें ॥ ७७ ॥ म्हणोनि

तें त्यांस अर्पोनि निश्चितीं ॥ दुसरा स्वयंपाक करविला प्रीतीं ॥ तरी क्षमा करून कृपामूर्ती ॥ करावी पितृतिथि पुनीत ॥ ७८ ॥ यावरी द्विज बोलती काय ॥ आजि तूं आमुचा अपमान केला आहे ॥ महायज्ञाचा पुरोडाश पाहें ॥ वायसापुढें टाकिला ॥ ७९ ॥ कीं भागीरथीची कुपी जाण ॥ बहिर्भूमीसी दिधली लवंडोन ॥ किंवा राजकांतेचें जडित भूषण ॥ दासीस नेऊन दीधलें ॥ ८० ॥ नातरी मैलागिरी शुद्ध चंदन ॥ त्याचें खरासी केलें लेपन ॥ कीं विष्णुपूजेच्या तुलसी जाण ॥ मसिदीस नेऊन वाहिल्या ॥ ८१ ॥ कीं अग्निहोत्रींचा कृशान झडकरी ॥ नेऊनि ठेविला गुडगुडीवरी ॥ सुधारस ओतिला राखेवरी ॥ तरी वायांच निर्धारीं गेला कीं ॥ ८२ ॥ तेवीं आम्हां न देतां भोजन ॥ अंत्यज पूजिले त्वां प्रीतीन ॥ हें अनुचित केलें जाण ॥ लाविलें दूषण आपणासी ॥ ८३ ॥ ऐसें बोलोनियां त्वरित ॥ ब्राह्मण घालोनि गेले वाळित ॥ एकनाथ होऊनि चिंताक्रांत ॥ बैसले निवांत ते समयीं ॥ ८४ ॥ तों घरीं कृष्णा ब्राह्मणजन ॥ श्रीखंड्या दुसरें नामाभिधान ॥ तो म्हणे एकनाथाकारण ॥ उद्विग्न मन कासया ॥ ८५ ॥ आजि पितृतिथी आहे घरीं ॥ म्हणूनि चिंता सर्वथा न करीं ॥ तुमचे पितर साक्षात झडकरी ॥ येतील सत्वरीं जेवावया ॥ ८६ ॥ पाकसिद्धि झालिया घरांत ॥ पात्रें घालावीं तुम्हीं त्वरित ॥ एकनाथ जाहले हर्षयुक्त ॥ आश्चर्य करीत मानसीं ॥ ८७ ॥ नानापरीचें पक्वान्न ॥ घृत शर्करा वाढिलीं जाण ॥ आगतं म्हणतां निजमुखेंकरून ॥ तों पितर येऊन बैसले ॥ ८८ ॥ अर्घ्यपाद्यपूजा करून ॥ पूगीफल गोपीचंदन ॥ यज्ञोपवीतें सकळांसी देऊन ॥ हिरण्यदक्षिणा दीधली ॥ ८९ ॥ ब्रह्मार्पण सोडितांचि एकनाथ ॥ साक्षात पितर बैसले जेवीत ॥ जें जें अन्न जयासी रुचत ॥ तें तें भक्षिती

निजप्रीतीं ॥ ९० ॥ जनार्दनपायीं भाव धरिला ॥ तो पितृस्वरूपीं प्रकटला ॥ एकनाथासी आनंद वाटला ॥ कीं दृष्टीसी देखिला पितृलोक ॥ ९१ ॥ तृप्त जाहलिया पितृपंक्ती ॥ करशुद्धि दिधली तयांप्रती ॥ विडे दक्षिणा देऊनि प्रीतीं ॥ एकनाथ पुसती तयांसी ॥ ९२ ॥ शेष उरलें आहे अन्न ॥ काय करावें यालागून ॥ इष्टांसमवेत करावें भोजन ॥ उत्तर दिधलें तयांनीं ॥ ९३ ॥ तंव ब्राह्मण द्वारीं उभे राहूनी ॥ हे शब्द ऐकिले त्यांनीं श्रवणीं ॥ कवाडें उघडोनि तये क्षणीं ॥ आंत येऊनि पाहती ॥ ९४ ॥ तंव साक्षात पितर येऊन जेविले ॥ यांस देखतांचि अदृश्य जाहले ॥ सकळ द्विजांसी आश्चर्य वाटलें ॥ नवल देखिलें म्हणोनियां ॥ ९५ ॥ मग ब्राह्मण बाहेर जाऊनि त्वरित ॥ एकमेकांसी उत्तरें बोलत ॥ मानवी नव्हे हा एकनाथ ॥ अवतार साक्षात विष्णूचा ॥ ९६ ॥ आपण धरूनि कर्माभिमान ॥ वायांच करितों याचें छळण ॥ परी तयासी साह्य श्रीकृष्ण ॥ जाहला प्रसन्न निजनिष्ठें ॥ ९७ ॥ तयासी संकट पडतां सहज ॥ तत्काळ पावे गरुडध्वज ॥ पितर साक्षात जेवविले आज ॥ आणिली लाज आपणांसी ॥ ९८ ॥ एक म्हणती पक्कान्नें नाना ॥ आणि हातींची गेली दक्षिणा ॥ पुढें होणार तें कळेना ॥ बोल प्राक्तना ठेवावा ॥ ९९ ॥ आतां उदयिक जाऊनि अवघे त्वरित ॥ एकनाथासी सांगावी नीत ॥ कीं आतां घेऊनि प्रायश्चित्त ॥ स्वयातींत असावें ॥ १०० ॥ येरवींच तयासी पवित्र म्हणतां ॥ तरी आपुली गेली व्यर्थ अहंता ॥ तरी दंड करूनि एकनाथा ॥ लावावा मागुता सत्कर्मीं ॥ १ ॥ दुसरे दिवशीं द्विजवर सकळ ॥ वाळुवंटीं गोळा जाहले तत्काळ ॥ मग एकनाथासी ते वेळ ॥ पाचारिलें तेधवां ॥ २ ॥ ब्राह्मणांसी देखोनि नयनीं ॥ नमस्कार केला ते क्षणीं ॥ म्हणे कोणता हेतु धरून मनीं ॥ मज स्वामींनीं बोलाविलें ॥ ३ ॥

यावरी द्विज बोलती वचन ॥ तुज न कळतां घडलें दूषण ॥ आतां विधियुक्त प्रायश्चित्त घेऊन ॥ द्यावा मान वेदवचना ॥ ४ ॥ ऐकोनि म्हणे एकनाथ ॥ मी सर्वथा न घें प्रायश्चित्त ॥ मायबाप असतां श्रीकृष्ण-नाथ ॥ कैसें विपरीत करावें ॥ ५ ॥ ब्राह्मण म्हणती यथार्थ पाहीं ॥ परी आमुच्या वचनासी मान देईं ॥ प्रायश्चित्त घेतल्याविण नाहीं ॥ शुद्धता देहीं सर्वथा ॥ ६ ॥ मग गंगेंत स्नान घालूनि त्वरित ॥ एक-नाथासी देती प्रायश्चित्त ॥ भस्म गोमय लावूनि त्वरित ॥ मंत्र वेदोक्त म्हणताती ॥ ७ ॥ तों त्र्यंबकेश्वराहूनि तेथ ॥ एक ब्राह्मण आला अकस्मात ॥ लोकांप्रती काय बोलत ॥ कोणता एकनाथ मज सांगा ॥ ८ ॥ त्याच्या सर्वांगासी जाहलें कुष्ठ ॥ तिळप्राय अंग नसे नीट ॥ ऐसें रूप देखोनि दुष्ट ॥ सांगती स्पष्ट तयासी ॥ ९ ॥ पैल तो उदकांत प्रायश्चित घेत ॥ त्यासीच म्हणती एकनाथ ॥ कैसियास्तव पुससी त्यातें ॥ सांग त्वरित आम्हांसी ॥ ११० ॥ यावरी बोले कुष्ठी ब्राह्मण ॥ म्यां त्र्यंबकीं केलें अनुष्ठान ॥ मग शंकरें दृष्टांत दाखवून ॥ येथ पाठवून दीधलें ॥ ११ ॥ मज सांगत उमाकांत ॥ कीं पैठणीं एकनाथ विष्णुभक्त ॥ तेणें अनामिक जेवविले बहुत ॥ होती पितृतिथ ते दिवशीं ॥ १२ ॥ तें पुण्य आहे त्याचे पदरीं ॥ तरी तूं जाऊन तेथ सत्वरीं ॥ तो किंचित पुण्य देईल जरी ॥ कुष्ठ सत्वरीं जाईल ॥ १३ ॥ हें स्वप्न होतांचि त्वरित ॥ मी तत्काळ धांवत आलों येथ ॥ वचन ऐकोनि द्विज समस्त ॥ आश्चर्य करिती मानसीं ॥ १४ ॥ ब्राह्मण टाकोनि अंत्यज जेवविले ॥ हें पुण्य कोण्या शास्त्रीं बोलिलें ॥ एक म्हणती असत्य भलें ॥ धरणें उठविलें शंकरें ॥ १५ ॥ एक म्हणती उगेच बैसा ॥ हातींच्या कंकणासी काय आरसा ॥ एकनाथाचा भाव कैसा ॥ निवडेल आपैसा ये समयीं ॥ १६ ॥ मग कोडी जाऊन गंगेआंत ॥ एकनाथासी काय बोलत ॥

एका अनामिकाचें सुकृत ॥ शंकरें देवविलें मजलागीं ॥ १७ ॥ अवश्य म्हणोनि तये क्षणीं ॥ त्याचे हस्तावरी घातलें पाणी ॥ सकळ ब्राह्मण तटस्थ होउनी ॥ कौतुक नयनीं पाहती ॥ १८ ॥ तों नेत्रांसी न लागतां पातीं ॥ सुंदर झाली कोडियाची कांती ॥ हें कौतुक देखोनि समस्तीं ॥ आश्चर्य केलें मनांत ॥ १९ ॥ म्हणती कर्माचा धरिला अभिमान ॥ तेणेंचि नाडलों आम्ही जाण ॥ विष्णुभक्तासी प्रायश्चित्त देणें ॥ हेंचि दूषण आपुल्यासी ॥ १२० ॥ एकनाथासी म्हणती द्विजवर ॥ तूं केवळ विष्णूचा अवतार ॥ सर्वथा नव्हसी मानववीर ॥ कळलें साचार आम्हांसी ॥ २१ ॥ हिमालयासी न लगे विंझणवारा ॥ प्रावरण न लगेचि अंबरा ॥ स्नान न लगेचिं वैश्वानरा ॥ तेवीं वैष्णववीरा निर्मळ तूं ॥ २२ ॥ अमृता नलगे पाककरण ॥ उदधीस कासया तीर्थाटन ॥ तेवीं तुजला प्रायश्चित्त न लगेचि जाण ॥ आम्हांकारणें समजलें ॥ २३ ॥ तुवां अघटित दाविली करणी ॥ साक्षात पितर जेवविले आणोनी ॥ हें देखिलें ऐकिलें नव्हतें कोणी ॥ तें प्रत्यक्ष नयनीं दाविलें ॥ २४ ॥ मग एकनाथासी धरूनि हातीं ॥ गृहास आले सत्वरगति ॥ म्हणती तुज साह्य रुक्मिणीपती ॥ निश्चयें चित्तीं कळों आलें ॥ २५ ॥ द्विजांसी अर्पोनि दक्षिणा ॥ तीर्थ मस्तकीं वंदिलें जाणा ॥ ते जाऊनि आपुल्या सदना ॥ आश्चर्य मना करिताती ॥ २६ ॥ म्हणती धन्य हा विष्णुभक्त ॥ ब्राह्मणसेवेसी अति निरत ॥ देवतार्चन विधियुक्त ॥ प्रेमभावें करीतसे ॥ २७ ॥ यापरी पैठणींचे लोक समस्त ॥ कोणी निंदीत कोणी स्तवीत ॥ परी एकनाथ सदा संतोषयुक्त ॥ हर्षशोकांत पडेना ॥ २८ ॥ तों एक ब्राह्मण जाऊनि द्वारावती ॥ तप करी अनुतापयुक्ती ॥ म्हणे मज भेटावा रुक्मिणीपती ॥ धरिला चित्तीं हेत पूर्ण ॥ २९ ॥ मग स्वप्नांत येऊनि राधा रुक्मिणी ॥ काय

सांगती त्यालागोनी ॥ द्वारकेंत नाहींत चक्रपाणी ॥ तूं जाईं येथोनि सत्वर ॥ १३० ॥ गंगातीरीं प्रतिष्ठानांत ॥ वैष्णवभक्त एकनाथ ॥ ब्राह्मणसंतर्पण नित्य करीत ॥ तुवां जावें निश्चित ते ठायीं ॥ ३१ ॥ कृष्णा श्रीखंड्या ब्राह्मणजन ॥ द्वादश वर्षे राहिला जाण ॥ तो साक्षात् परब्रह्म नारायण ॥ तरी घ्यावें दर्शन तयाचें ॥३२॥ निजभक्ताची सेवा करीत ॥ तेथेंच बैसला वैकुंठनाथ ॥ आमुची कदा न करी मात ॥ तरी आणावें त्वरित जाऊनि ॥ ३३ ॥ ऐसा दृष्टांत ऐकोनि कानीं ॥ ब्राह्मण हर्षला स्वमनीं ॥ मग प्रतिष्ठानासी येऊनी ॥ लोकांप्रती पुसतसे ॥ ३४ ॥ येथें एकनाथ वैष्णवभक्त ॥ ब्राह्मणसेवनीं अति निरत ॥ त्याचें मंदिर दावा त्वरित ॥ ऐसें बोलत चालिला ॥ ३५ ॥ पुसतपुसत तें अवसरीं ॥ ब्राह्मण पातला त्याचे मंदिरीं ॥ तापसी देखतांचि सत्वरीं ॥ नमस्कार करी एकनाथ ॥ ३६ ॥ बैसावया दिधलें आसन ॥ म्हणे कोठोनि झालें जी आगमन ॥ कवण कवण तीर्थाटन ॥ आलेति हिंडोन या ठाया ॥ ३७ ॥ यावरी तापसी बोले वचन ॥ कृष्णा श्रीखंड्या ब्राह्मणजन ॥ त्याचें घ्यावया दर्शन ॥ आलों धांवोन या ठाया ॥ ३८ ॥ एकनाथ म्हणती ते अवसरीं ॥ उदकासी गेला गंगातीरीं ॥ तुम्ही स्वस्थ बसावें निमिषभरी ॥ येईल सत्वरीं या ठाया ॥ ३९ ॥ तों खांदीं कावड घेऊनी ॥ वाड्यांत आले चक्रपाणी ॥ तापसियासी देखतां नयनीं ॥ संकोच मनीं वाटला ॥ १४० ॥ म्हणे द्वादश वर्षेपर्यंत ॥ मी आनंदयुक्त होतों येथ ॥ हा कोठोनि पातला ऋणायित ॥ देखिला अवचित या ठाया ॥ ४१ ॥ ऐसें म्हणोनि वैकुंठनाथ ॥ मनीं जाहले चिंताक्रांत ॥ तों नवल वर्तलें अद्भुत ॥ तें परिसा निजभक्त भाविक हो ॥ ४२ ॥ एकनाथ म्हणे तापसियासी ॥ कृष्णा ब्राह्मण पहा दृष्टीसी ॥ तेणें

सत्वर उठोनि वेगेंसीं ॥ मिठी चरणांसी घातली ॥ ४३ ॥ मग कावड घेऊनि जगन्नाथ ॥ सत्वर गेला देवघरांत ॥ घागरी खालीं ठेवूनि त्वरित ॥ अदृश्य जाहला ते ठायीं ॥ ४४ ॥ तापसी बाहेर वाट पाहत ॥ तंव परतोनि न येचि रुक्मिणीकांत ॥ देवगृहांत जंव विलोकीत ॥ तंव कोणीच तेथ दिसेना ॥ ४५ ॥ तेव्हां शोक करीत तये क्षणीं ॥ अंग टाकूनि दिधलें धरणीं ॥ म्हणे मज देखोनि चक्रपाणी ॥ गेला पळोनि लवलाहें ॥ ४६ ॥ हें दृष्टीस देखतां एकनाथ ॥ तापसियासी पुसे वृत्तांत ॥ म्हणे कां झालासी शोकाकुलित ॥ सांग त्वरित मजपासीं ॥ ४७ ॥ त्यानें सकळ वृत्तांत सांगोनी ॥ एकनाथाचे लागला चरणीं ॥ दोघेही सद्गदित होऊनी ॥ एकमेकांसी भेटती ॥ ४८ ॥ एकनाथ म्हणे तापसियास ॥ धन्य तुमचें भाग्य विशेष ॥ दृष्टीं ओळखूनि जगन्निवास ॥ चरण सावकाश वंदिले ॥ ४९ ॥ आम्हीं न ओळखोनि देवा ॥ त्यापासूनि बहुत घेतली सेवा ॥ ऐसा अनुताप धरूनि जीवा ॥ एकनाथ केशवा आळवीतसे ॥ १५० ॥ म्हणे भक्तवत्सला दीननाथ ॥ तुवां बहुत कष्ट केले येथ ॥ मज न कळतां वृत्तांत ॥ घडला अनर्थ थोर हा ॥ ५१ ॥ तूं परम सुकुमार चक्रपाणी ॥ कावडी वाहिल्या अनवाणी ॥ खडे रुतले असतील चरणीं ॥ अघटित करणी हे केली ॥ ५२ ॥ द्वादश वर्षे जवळ असतां ॥ परी कांहींच नेणत्ये माझिया चित्ता ॥ ब्राह्मणवेष धरून अनंता ॥ कार्य नेणतां सांगितलें ॥ ५३ ॥ तूं ब्रह्मादिकांसी पूज्यमान ॥ सदाशिव चिंती तव चरण ॥ तो तूं स्वकरें उगाळूनि चंदन ॥ देत होतासी पूजेसी ॥ ५४ ॥ तापसी तप करूनि अवघड ॥ तुज लक्षिती वाडकोड ॥ एक तीर्थाटनें करिती गाढ ॥ परी दृष्टीपुढें न दिससी ॥ ५५ ॥ ऐसा दुर्लभ तूं हृषीकेशी ॥ तुझें लाघव न कळे कोणासी ॥

येऊनि यशोदेचे उदरासी ॥ ते पुत्रपणें तुजसी लेखीतसे ॥ ५६ ॥ मग गोकुळ टाकूनि मथुरेसी जातां ॥ तेव्हां उमजलें तियेचे चित्ता ॥ तेवीं द्वादश वर्षे जवळी असतां ॥ मी नेणेंचि अनंता तुजलागीं ॥ ५७ ॥ ऐसा अनुताप धरूनि अंतरीं ॥ खेद करीत नानापरी ॥ तो प्रेमा वर्णितां सविस्तरीं ॥ तरी ग्रंथ विस्तारीं वाढेल पैं ॥ ५८ ॥ एकनाथाची निजकांता ॥ परम भाविक पतिव्रता ॥ म्हणे देवाधिदेवा रुक्मिणीकांता ॥ तुज आम्हीं वृथा कष्टविलें ॥ ५९ ॥ तूं परम सुकुमार गोविंदा ॥ प्रातःकाळीं उठोनि करिसी धंदा ॥ आम्ही केली अमर्यादा ॥ नेणतां मुकुंदा तुजलागीं ॥ १६० ॥ तूं सकळ देवांसी पूज्यमान ॥ आम्हां-मागूनि करिसी भोजन ॥ नाहीं जाणिली भूक ताहान ॥ अशी मी अधम श्रीकृष्णा ॥ ६१ ॥ द्वादश वर्षेपर्यंत निश्चितीं ॥ श्रीकृष्ण होता त्यांचे संगतीं ॥ तितुके गुण नित्य आठविती ॥ विस्तारें किती सांगावें ॥ ६२ ॥ यावरी एके दिवसीं एकनाथ ॥ निद्रित होते यामिनींत ॥ तों ज्ञानदेव येऊनि स्वप्नांत ॥ काय सांगत तयासी ॥ ६३ ॥ तुवां अलकावतीस येऊन ॥ समाधि उघडोनि घ्यावें दर्शन ॥ तेथें अजान-वृक्षाची मुळी जाण ॥ सन्निध येऊन लागली ॥ ६४ ॥ ते एकीकडे लावून हातें ॥ मागुती समाधि बुजवीं त्वरित ॥ ऐसें देखोनि एकनाथ ॥ जाहला जागृत तत्काळ ॥ ६५ ॥ मग अलकावतीस येऊन ॥ इंद्रायणीचें केलें स्नान ॥ सिद्धेश्वराचें घेऊनि दर्शन ॥ समाधि उघडोन पाहिली ॥ ६६ ॥ तों वज्रासन घालोनि सहज ॥ तेथें बैसले ज्ञानराज ॥ दिव्य स्वरूप दिसे तेजःपुंज ॥ उपमा न साजे तयासी ॥ ६७ ॥ नमस्कार करूनि ते वेळीं ॥ एकनाथ समाधींत न्याहाळी ॥ तों अजानवृक्षाची मुळी ॥ ज्ञानदेवाजवळी पातली ॥ ६८ ॥ ते निजकरें लावूनि एकीकडे ॥ मागुती समाधीचें लाविलें कवाड ॥ चुनेगच्चीनें

बुजवोनी दृढ ॥ पूर्ववत दगड रचियेले ॥ ६९ ॥ तेव्हां अलकावती उजाड बहुत ॥ सिधासामग्री न मिळे तेथ ॥ शिष्यसंप्रदायी जाहले क्षुधित ॥ तों पंढरीनाथ पावले ॥ १७० ॥ निजभक्तांची भूक ताहान ॥ निजांगें पुरवी जगज्जीवन ॥ तेथें वाणियाचें रूप धरून ॥ पाल देऊन बैसले ॥ ७१ ॥ हें दृष्टीस देखोनि त्वरित ॥ चित्तीं हर्षले एकनाथ ॥ म्हणे व्यवसायी आले बाजारांत ॥ सामग्री विकत आणावी ॥ ७२ ॥ मग दोघे ब्राह्मण पाठवून झडकरी ॥ सर्व साहित्य घेतलें पदरीं ॥ म्हणती द्रव्य आणून देतों सत्वरी ॥ तुम्हीं स्वस्थ अंतरीं असावें ॥ ७३ ॥ यावरी बोलती पंढरीनाथ ॥ आम्ही आजचा दिवस आहों येथ ॥ तुम्हीं स्वयंपाक करूनि त्वरित ॥ जेवा समस्त बिऱ्हाडीं ॥ ७४ ॥ एकनाथासी जाणतों आम्ही ॥ परी ते नोळखती मजलागोनी ॥ ते यात्रेयी आले ऐकोनी ॥ सामग्री घेऊनि मी आलों ॥ ७५ ॥ पाठमोरे होतां ब्राह्मणासी ॥ तों अदृश्य जाहले हृषीकेशी ॥ आश्चर्य वाटलें सकळांसी ॥ एकनाथासी सांगितलें ॥ ७६ ॥ म्हणती आम्हांसी सामग्री देऊनि ॥ तत्काळ अदृश्य जाहला वाणी ॥ द्रव्यही न देतां त्यालागूनी ॥ जाहली करणी अद्भुत ॥ ७७ ॥ ऐसी ऐकोनियां मात ॥ एकनाथ झाले सद्गदित ॥ म्हणती आम्हांसाठीं पंढरीनाथ ॥ शिणले बहुत वाटतें ॥ ७८ ॥ मग पाकसिद्धी होतां जाण ॥ ब्राह्मणांसहित केलें भोजन ॥ ते दिवशीं रात्रीस राहून ॥ मांडिलें कीर्तन निजप्रेमें ॥ ७९ ॥ समाधीस करूनि नमस्कार ॥ दुसरे दिवशीं निघाले सत्वर ॥ प्रतिष्ठानीं येऊन साचार ॥ सप्रेम भजन करीतसे ॥ १८० ॥ एकनाथाची ऐसी स्थिती ॥ जनार्दनस्वरूप त्रिजगतीं ॥ तोचि व्यापक सर्वां भूतीं ॥ संशय चित्तीं न वाटे ॥ ८१ ॥ जनार्दनाचें लागतां ध्यान ॥ स्वयेंच

झाले जनार्दन ॥ तेथें कांहींच न दिसे भिन्न ॥ जेंवी सरिताजीवन सागरीं ॥ ८२ ॥ कीं दीप प्रकाश दोघे जण ॥ नामें वेगळीं परी एकाचि जाण ॥ तेवीं एकनाथ आणि जनार्दन ॥ नव्हती भिन्न सर्वथा ॥ ८३ ॥ कीं कर्पूर सुगंध एक पाहीं ॥ कीं द्रवत्व नीरासी द्वैत नाहीं ॥ नातरी पुष्प मकरंद एके ठायीं ॥ निजप्रीतीनें नांदती ॥ ८४ ॥ तेवीं एकनाथ आणि जनार्दन ॥ समरस असती एकपणं ॥ महीपति तयांसी अनन्य शरण ॥ वंदी चरण सद्भावें ॥ ८५ ॥ स्वस्ति श्रीभक्त-विजय ग्रंथ ॥ ऐकतां तुष्टेल जगन्नाथ ॥ प्रेमळ ऐका भाविक भक्त ॥ षट्चत्वारिंशाध्याय रसाळ हा ॥ १८६ ॥ ॥ अध्याय ॥ ४६ ॥ ॥ ओंव्या ॥ १८६ ॥ ॥

श्रीतुकारामचरित्र

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीपंढरीनाथाय नमः ॥ ॥ जय जय करुणासागरा आनंदघना ॥ भक्तवत्सला राजीवनयना ॥ विधिजनका दानवभंजना ॥ जगज्जीवना जगदीशा ॥ १ ॥ जय जय विश्वव्यापका कमलापती ॥ सज्जनजीवना आनंदमूर्ती ॥ निर्गुणसगुणा विश्वपती ॥ अतर्क्यगति वेदशास्त्रां ॥ २ ॥ जय जय विश्वबाहो अपरिमिता ॥ विश्वचक्षूनें तूं देखता ॥ विश्वपादें गमनकर्ता ॥ निगम वार्ता बोलिले ॥ ३ ॥ जय जय चित्स्वरूपा आत्मारामा ॥ गुणनिधाना उत्तमोत्तमा ॥ स्वानंद-प्रकाशा पुरुषोत्तमा ॥ अनुपम महिमा पैं तुझा ॥ ४ ॥ तुझी ध्यानांत आणितां मूर्ती ॥ श्रुति परतल्या म्हणोनि नेति नेति ॥ कुंठित झाली पुराणव्युत्पत्ती ॥ शास्त्रसंपत्ति लज्जित ॥ ५ ॥ करितां तपें तीर्थाटनें ॥ प्राप्त नव्हेचि अनुष्ठानें ॥ तो तूं निजभक्तांचीं ऐकोनि कीर्तनें ॥ जाशी धांवून त्या ठायीं ॥ ६ ॥ करूनि योगाची आटणी ॥ साधक बैसले वज्रासनीं ॥ त्यांसी नेणतां चक्रपाणी ॥ भाविक धुंडोनि पाहसी ॥ ७ ॥ तूं सर्व देवांत मुकुटमणि श्रेष्ठ ॥ सनकादिकांसी पूज्य वरिष्ठ ॥ तो तूं भाविकांचे घरीं कष्ट ॥ करिसी स्पष्ट निजांगें ॥ ८ ॥ निज-भक्तांचें काम करितां ॥ लज्जा न वाटे तुझिया चित्ता ॥ मानापमान नेणवे सर्वथा ॥ पंढरीनाथा तुजलागीं ॥ ९ ॥ तुझ्या निजभक्तांची ऐसी निष्ठा ॥ कदा न घालिती तुज संकटा ॥ प्रपंचदुःखाचे दावूनि कष्टा ॥ वैराग्य वरिष्ठा त्यां देशी ॥ १० ॥ त्या वैराग्याचें निजबळ ॥ तुझें भजन करिती सर्वकाळ ॥ कीर्तन गाती भक्त प्रेमळ ॥ सांडोनि तळमळ चित्ताची ॥ ११ ॥ तूं अभक्तांच्या हृदयीं रिघोन ॥ त्या भक्तांचें करविसी छळण ॥ मग आपणचि निजांगें उडी घालून ॥

राखिसी सन्मान दासांचा ।। १२ ।। अघटित दावूनि करणी ।। कीर्ति वाढविसी त्रिभुवनीं ।। ऐसा निजभक्तांचा ऋणी ।। तूं चक्रपाणी गोविंदा ।। १३ ।। त्यांचें वर्णावया सगुण चरित्र ।। कोणासी करिसी निमित्त-मात्र ।। मी तंव मंदबुद्धि स्वतंत्र ।। तूं राजीवनेत्र प्रकाशिता ।। १४ ।। अनाथनाथा रुक्मिणीपती ।। आतां नमूं तुज पुढतपुढती ।। ऐसेंही म्हणतां निजप्रीतीं ।। कुंठित मति होतसे ।। १५ ।। तुझी कृपा न होतांचि जाण ।। कदापि न करवे तुज नमन ।। जें ज्या काळीं येईल घडोन ।। तें तुझे सत्तेविण नव्हेचि ।। १६ ।। क्षणक्षणा पालटोनि मती ।। संकल्प विकल्प येतील चित्तीं ।। तूं तर साक्ष जाणसी श्रीपती ।। सांगों किती निजमुखें ।। १७ ।। न सांगों जरी रुक्मिणीकांता ।। तरी करुणा न येचि तुज सर्वथा ।। तान्हें बाळक रुदन न करितां ।। धरी-तसे माता दूर तयासी ।। १८ ।। तैशा रीतीं चक्रपाणी ।। भक्त आळविती तुज करुणावचनीं ।। मग कृपादृष्टीं विलोकूनी ।। सप्रेमभजन त्यां देसी ।। १९ ।। ऐसीच तुझ्या गृहींची रीती ।। मागें वर्णिली सभाग्य संतीं ।। त्या निजभक्तांची अद्भुत कीर्ती ।। तूंचि श्रीपति वदवीं कां ।। २० ।। मागिले अध्यायीं कथालाघव ।। रामदासाचा निश्चय दृढभाव ।। देखूनियां पंढरीराव ।। जाहले रामराव निजांगें ।। २१ ।। आतां सादर होऊनि प्रेमळजनीं ।। निरूपण रसाळ ऐकावें श्रवणीं ।। दीड योजन अलकापुरीहूनी ।। देहू गांव धरणीं पुण्यक्षेत्र ।। २२ ।। तेथील निजभक्त तुका वाणी ।। आंबळे उपनाम त्यालागोनी ।। तरी व्यवसाय करीत असतां जनीं ।। असत्य सर्वथा न बोले ।। २३ ।। दोघी कांता तयासी असती ।। घरीं उदंड धनसंपत्ती ।। परी त्याची अखंड विदेहवृत्ती ।। स्मरण एकांतीं करीतसे ।। २४ ।। माता पिता क्रमलियावर ।। दुःखरूप जाहला संसार ।। दुष्काळ देशीं पडला

थोर ॥ तेणें द्रव्य समग्र आटलें ॥ २५ ॥ धन धान्य जें कांहीं होतें ॥ तें आटोनि गेलें जेथिंच्या तेथें ॥ जैसें पौर्णिमेचें भरतें ॥ सागराआंत सामावे ॥ २६ ॥ कीं वर्षाऋतूचें अभ्र पाहें ॥ शीतकाळीं नाहींसें होय ॥ नातरी होतां सूर्योदय ॥ नक्षत्रें गगनींच हरपती ॥ २७ ॥ कीं वार्धक्य अंगीं येतां पाहीं ॥ तारुण्यदशा न दिसे देहीं ॥ नातरी उष्णकाळ येतां ठायीं ॥ तृणें सर्वही नासती ॥ २८ ॥ तेवीं स्वदेशीं पडतां दुष्काळ ॥ धनधान्य आटोनि गेलें सकळ ॥ मुलेंमाणसें करिती तळमळ ॥ परी अन्न न मिळे सर्वथा ॥ २९ ॥ ज्येष्ठ कांतेसी पुत्र दोघे जण ॥ कनिष्ठेसी नव्हतें संतान ॥ भाजीपाला खाती उकडोन ॥ परी दृष्टीस कण दिसेना ॥ ३० ॥ तरी होणार न चुकेचि सर्वथा ॥ ज्येष्ठ निवर्तली अन्नअन्न करितां ॥ तेणें लज्जित होऊनि चित्ता ॥ प्रपंचममता नाठवे ॥ ३१ ॥ संपत्ती वैभव हरपतां जाण ॥ त्यांसर्वेंच गेला सन्मान ॥ देखतां हांसती सोयरे पिशुन ॥ तेव्हां लज्जित मन तुकयाचें ॥ ३२ ॥ जे राखीत होते बहु मर्यादा ॥ तेचि स्वमुखें करिती निंदा ॥ अन्नवस्त्राची सदा आपदा ॥ उदीमधंदा चालेना ॥ ३३ ॥ पुरुष झालिया द्रव्यहीन ॥ त्यासी न पुसती सोयरे पिशुन ॥ जेवीं वृक्षाचीं पत्रें गेलिया झडोन ॥ तेथें विलासी जन न रमती ॥ ३४ ॥ कीं रणीं पडतांचि नृपती ॥ देहलोभी रण टाकूनि पळती ॥ तेवीं दरिद्र येतां पुरुषाप्रती ॥ पिशुन करिती अपमान ॥ ३५ ॥ हा कठीण काळ येतांचि देखा ॥ परम लज्जित झाला तुका ॥ प्रपंचीं कोणी न दिसे सखा ॥ मग चित्तीं विवेका आठविलें ॥ ३६ ॥ कांहीं करितां उदीमाची हातवटी ॥ तंव तेथें अधिक होतसे तुटी ॥ हा कठीण काळ पडतां संकटीं ॥ अनुताप पोटीं उपजला ॥ ३७ ॥ म्हणे प्रपंच लटिका मिथ्या माया ॥ नरदेह

केवळ नाशवंत काया ॥ म्यां जन्म दवडिला वायां ॥ पंढरीराया विसरोनि ॥ ३८ ॥ ढेंकुणांचे बाजे करितां शयन ॥ तेथें सुखनिद्रा न लागेचि जाण ॥ कीं विष कालवूनि रांधिलें अन्न ॥ तें उत्तम भोजन म्हणूं नये ॥ ३९ ॥ तेवीं प्रपंचीं म्हणती विषयसुख ॥ ते केवळ म्हणावे अति मूर्ख ॥ जैसा वांझेचा पुत्र उपजतां देख ॥ वायांचि हरिख मानावा ॥ ४० ॥ ऐसा विवेक करूनि मानसीं ॥ वैराग्य जाहलें तुकयासी ॥ सुख दुःख दोनी मानूनि सरसीं ॥ भजन अहर्निशीं करीतसे ॥ ४१ ॥ पांडुरंगाचें देऊळ पुरातन ॥ बहुतां दिवसांचें होतें जीर्ण ॥ निजांगें तें लिंपोनि जाण ॥ केलें सारवोन सोज्वळ ॥ ४२ ॥ सकळ साधनांमाजी श्रेष्ठ ॥ एकादशीव्रत वरिष्ठ ॥ तें आरंभूनियां एकनिष्ठ ॥ जागरण वरिष्ठ करावें ॥ ४३ ॥ कीर्तन करावें निजमतें ॥ परी आधीं अभ्यासीं नव्हतें चित्त ॥ कोणी सप्रेम गाती संत ॥ धरावें ध्रुवपद त्यांमागें ॥ ४४ ॥ मागील संत झाले श्रेष्ठ ॥ त्यांचीं वचनें केलीं पाठ ॥ त्याहूनि मार्ग नाहीं वरिष्ठ ॥ भाव एकनिष्ठ धरियेला ॥ ४५ ॥ भूतमात्रासी देखोनि दृष्टीं ॥ त्यांची करुणा येतसे पोटीं ॥ त्यासी परोपरी काया कष्टी ॥ संतप्त पोटीं निववीत ॥ ४६ ॥ तें जरी म्हणाल कैसिया रीतीं ॥ सकळिक ऐका मथितार्थी ॥ कोणी प्रवासी पाहतां वस्ती ॥ त्यांसी मंदिराप्रती आणावें ॥ ४७ ॥ क्षुधार्थियासी नसल्या अन्न ॥ तरी घालावें त्यासी भोजन ॥ नसेल तरी कष्ट करून ॥ आणावें मेळवून त्यासाठीं ॥ ४८ ॥ कोणी तृषाक्रांत झालिया वनीं ॥ त्यासी नेऊन पाजावें पाणी ॥ कोणी चालत आले दुरूनी ॥ त्यांसी रगडूनि निववावें ॥ ४९ ॥ कोणाचे मस्तकीं असला भार ॥ तो आपण घ्यावा सत्वर ॥ तें ओझें वाहूनि पाठीवर ॥ विसांवा क्षणभर त्या द्यावा ॥ ५० ॥ कोणी रोगी प्रवासीं पीडित ॥ जवळीं

नसतां सुहृद आप्त ॥ त्यावरी होऊनि कृपावंत ॥ औषध देऊन पथ्य करवी ॥ ५१ ॥ गाईवृषभांसी निर्बळपणीं ॥ मोकलूनि देती निर्दय धनी ॥ ते निजकरें कुरवाळोनी ॥ चारा पाणी त्यांस द्यावें ॥ ५२ ॥ गृहासी येतां वैष्णवजन ॥ तयांसी घालूनि लोटांगण ॥ सद्भावें धुवोनियां चरण ॥ तीर्थ प्राशन करावें ॥ ५३ ॥ हें शारीरतप करितां निश्चितीं ॥ यावरी जाहली कवित्वाची स्फूर्ति ॥ जे श्रुतिशास्त्रांनीं वर्णिली कीर्ती ॥ ते प्राकृतमतीं बोलत ॥ ५४ ॥ येथील मागील निरूपणासरिसें ॥ दृष्टांतीं आलें अनायासें ॥ तें कथानक अति सुरसें ॥ श्रोतीं सावकाशें परिसावें ॥ ५५ ॥ एकदां नामा वैष्णवभक्त ॥ पांडुरंगासी वचन बोलत ॥ शतकोटि कवित्व प्राकृत ॥ तुझी कीर्ति वर्णीन मी ॥ ५६ ॥ ऐकोनि म्हणे रुक्मिणीकांत ॥ नामया त्वां प्रतिज्ञा केली व्यर्थ ॥ कलीमाजी आयुष्य वर्षे शत ॥ त्यांतही आघात सर्वथा ॥ ५७ ॥ आणि प्रतिज्ञा करून बोलसी आतां ॥ परी सिद्धीस न जाय हे सर्वथा ॥ मग नामदेव चरणीं ठेवूनि माथा ॥ रुक्मिणीकांता विनवीत ॥ ५८ ॥ मी तुझ्या आश्रयें बोलिलों देवा ॥ तो निजांगें पण सिद्धीस न्यावा ॥ तूं काय एक न करिसी देवा ॥ आमुचा केवा तो किती ॥ ५९ ॥ ऐकूनि नामयाचें करुणाउत्तर ॥ प्रसन्न जाहला शार्ङ्गधर ॥ मस्तकीं ठेवूनि अभयकर ॥ सरस्वतीस काय आज्ञापी ॥ ६० ॥ तुवां बैसोनि जिह्वाग्रीं ॥ कवित्व वदवावें अति कुसरी ॥ जे श्रुतीचे गर्भ आहेत अंतरीं ॥ ते प्राकृत वैखरी वदावे ॥ ६१ ॥ मग ब्रह्मतनया करी विनवणी ॥ नामदेव वदतील प्रसादवाणी ॥ परी याचा चपळत्वें लिहिणार कोणी ॥ चक्रपाणी यांजावा ॥ ६२ ॥ मुखांतूनि निघतांचि अक्षरें ॥ तत्काळ लिहावीं निजकरें ॥ परतोनि पुसिल्या उत्तरें ॥ तरी न येती सर्वथा ॥ ६३ ॥ यावरी म्हणे घननीळ ॥

मी लिहीत बैसेन सर्वकाळ ॥ आणिक लेखक तों ये वेळ ॥ न दिसे चपळ सर्वथा ॥ ६४ ॥ मग विलास भोग सर्व टाकूनी ॥ नामयाचें कवित्व चक्रपाणी ॥ हातीं घेऊनि दऊत लेखणी ॥ निजांगें लिहीत बैसले ॥६५॥ ज्याची वेदशास्त्रें करिती स्तुती ॥ व्यासवाल्मीकादिक वर्णिती ॥ तो नामयाचें कवित्व लिहीं निश्चितीं ॥ नवल मजप्रती वाटलें ॥ ६६ ॥ सांडोनियां वैकुंठभुवन ॥ सांडोनि क्षीरसागर शेषशयन ॥ हातीं घेऊनि दऊत लेखण ॥ जगज्जीवन तिष्ठती ॥ ६७ ॥ काय निघेल मुखांतूनी ॥ तेथें अवधान देत चक्रपाणी ॥ निद्रा आळस सर्व टाकूनी ॥ असती निशिदिनीं सावध ॥ ६८ ॥ ऐसे बहुत दिवस श्रीपती ॥ नामयाचे बैसोनि संगतीं ॥ तों कवित्वसंख्येची पाहतां गणती ॥ जाहली किती ऐका ते ॥ ६९ ॥ चाळीस लक्ष चौऱ्याण्णव कोटी ॥ नवलक्ष लिळित आलें शेवटीं ॥ इतुकी संख्या देखोनि दिठी ॥ जाहले जगजेठी विस्मित ॥ ७० ॥ म्हणती धन्य नामयाचा प्रेमा ॥ अद्भुत वर्णिला माझा महिमा ॥ सर्वथा पार न लागे निगमा ॥ त्या मज पुरुषोत्तमा वश केलें ॥ ७१ ॥ ऐसें म्हणूनि जगजेठी ॥ निजकरें नामयाची पाठी थापटी ॥ म्हणे कांहीं प्रेमा राहिला पोटीं ॥ तो पुढें गोष्टीं वदवीन ॥ ७२ ॥ आतां माझें स्वरूप आठवोनि मनीं ॥ सप्रेम पहा दृष्टी भरोनी ॥ ऐसें बोलतां चक्रपाणी ॥ नामा चरणीं लागला ॥ ७३ ॥ त्वां शतकोटींचा केला पण ॥ तो सिद्धीस न्यावया जगज्जीवन ॥ बाकी राहिलें कवित्वलेखन ॥ तें करी संपूर्ण निजांगें ॥ ७४ ॥ मग नामयाचा धरूनि हात ॥ तुकयाचे स्वप्नीं आले त्वरित ॥ म्हणे वाउगें न बोलावें निश्चित ॥ करावें कवित्व ममाज्ञा ॥ ७५ ॥ प्रमाणाची संख्या शतकोटी ॥ ते सिद्धी पाववीं तूं शेवटीं ॥ ऐसें म्हणोनि जगजेठी ॥ पाठ थापटी निजकरें ॥ ७६ ॥ जागृत होऊनि

जंव पाहात ॥ तंव दृष्टीसी न दिसे रुक्मिणीकांत ॥ नामदेवही नाहीं तेथ ॥ चमत्कार अद्भुत देखिला ॥ ७७ ॥ मग तेचि आज्ञा वंदोनि शिरीं ॥ आरंभिली कवित्वकुसरी ॥ त्याविण वाउगी वैखरी ॥ गोष्टी दुसरी न बोले ॥ ७८ ॥ कीर्तन करितां प्रेमेंकरूनी ॥ प्रासादिक रसिक वदे वाणी ॥ प्रेमळ भक्त आवडीकरूनी ॥ ऐकती श्रवणीं सद्भावें ॥ ७९ ॥ कोणी विकल्पी जे विचक्षण ॥ ते म्हणती हें कवित्व नूतन ॥ आम्हांसी न वाटे प्रमाण ॥ न करूं श्रवण सर्वथा ॥ ८० ॥ मागील संतांचीं टाकूनि वचनें ॥ आपुलीं कासया दाविशी भूषणें ॥ आइतीं टाकोनी पक्वान्नें ॥ हात पोळवणें कासया ॥ ८१ ॥ म्हणाल आज्ञाकर्ता रुक्मिणीरमण ॥ त्याचें कवित्व कां निंदिती जन ॥ तरी भाविकांपाठीं पुरातन ॥ विकल्पी असती बहुसाल ॥ ८२ ॥ मागें त्रेतायुगीं वाल्मीकीन ॥ भविष्य केलें रामायण ॥ तेव्हांही होते अभक्त जन ॥ ते अप्रमाण मानिती ॥ ८३ ॥ मग अवतार घेऊनि जानकीपती ॥ लीला दाविली तैशाच रीतीं ॥ ते अनुभवास येतां प्रचीती ॥ यथार्थ मानिती सकळिक ॥ ८४ ॥ द्वापारीं बोलिले कवि व्यास ॥ परी कौरवांसी न वाटे विश्वास ॥ मग घडोनि आलिया अनायास ॥ धृतराष्ट्र संजयास नमस्कारी ॥ ८५ ॥ एवं भावार्थियामागें विकल्पी नर ॥ लागले असती अपंरपार ॥ म्हणोनि तुकयाचे अभंग साचार ॥ निंदिती पामर निजमुखें ॥ ८६ ॥ सूर्याचा प्रकाश देखोनि दृष्टी ॥ डुडुळ उगेंचि जल्पती पोटीं ॥ कीं पूर्वेस चंद्र येतां निकटी ॥ तस्करांसी भेटी नावडे ॥ ८७ ॥ दातयाची ऐकोनि कीर्ती ॥ कृपण उगेंचि त्या धिक्कारिती ॥ कीं दिव्य औषधी चमकतां रातीं ॥ रोग तळमळती चित्तांत ॥ ८८ ॥ पंडिताची देखोनि वक्तृता ॥ अजापाळ म्हणती हे बडबड वृथा ॥ कीं गंधर्व सुस्वर गायन करितां ॥ तेथें गर्दभ

भुंकतां न राहती ॥ ८९ ॥ बकुळीचा सुगंध येतां पाहें ॥ तो पुंगळवेलीस मानेल काये ॥ सुंदर कपिला असली गाय ॥ तरी यवन काय पूजिती ॥ ९० ॥ ब्राह्मण प्रतिमेची पूजा करिती ॥ आणि अविंध तिये फोडूं पाहती ॥ तेवीं भाविक तुकयाचें कीर्तन ऐकती ॥ विकल्पी निंदिती निजमुखें ॥ ९१ ॥ परी दोन्ही मानून ते समान ॥ करीतसे तो श्रीहरिभजन ॥ कोणी हरिदास करितां कीर्तन ॥ तरी सादर श्रवणीं ऐकावें ॥ ९२ ॥ दिवसेंदिवस अधिकचि प्रीती ॥ या नांवें चढती वाढती भक्ती ॥ निद्रा किंचित न लागे रातीं ॥ करितां एकांतीं हरिभजन ॥ ९३ ॥ आषाढी कार्तिकी पंढरीसी ॥ नेमें वारी धरिली ऐसी ॥ मग पंधरा दिवसीं एकादशीसी ॥ जाय दर्शनासी निजभावें ॥ ९४ ॥ निरपेक्षता तरी किती ॥ एके दिवसीं शिवाजी नृपती ॥ तुकोबाची ऐकूनि कीर्ती ॥ दर्शनाप्रती पातले ॥ ९५ ॥ तेथें अविंधांचें प्राबल्य थोर ॥ सिंहगडीं होता नृपवर ॥ कोणासी न कळतां साचार ॥ पुण्यासी सत्वर पातला ॥ ९६ ॥ तेथें एका वाणियाचे घरीं ॥ तुका वैष्णव कीर्तन करी ॥ राजयासी कळतां सत्वरी ॥ संतोष अंतरीं वाटला ॥ ९७ ॥ मग निशीमाजी कोणा न कळत ॥ लपोनि आला नगरांत ॥ यवनांचें भय वाटे बहुत ॥ कीं नेती त्वरित धरूनियां ॥ ९८ ॥ तुकोबाचें घेऊन दर्शन ॥ गडावरी जावें परतोन ॥ ऐसा मनीं हेत धरून ॥ आला लपोन नृपनाथ ॥ ९९ ॥ रुप्याचें तबक सोज्ज्वळ जाण ॥ तयांत घातल्या मोहरा होन ॥ तुकयापुढें द्रव्य ठेवून ॥ केलें नमन साष्टांग ॥ १०० ॥ तें राजद्रव्य देखोनि त्वरित ॥ थरथरां कांपे विष्णुभक्त ॥ मग शिवाजीसी काय बोलत ॥ तें परिसा संत भाविक हो ॥ १ ॥ कासया पाहिजे द्रव्यठेवा ॥ एक विठ्ठलचि आम्हांसी व्हावा ॥ त्याविण आणिक प्रपंचहेवा ॥ आमुच्या जीवा नावडे ॥ २ ॥

जैशा जोहारियाच्या साटोवाटी ॥ गारा आणिल्या उठाउठीं ॥ तेवीं आमुची घ्यावया भेटी ॥ कनकओंटी आणिली ॥ ४ ॥ तुझी विशाळ ऐकतों मती ॥ आजि उदारत्व कळलें नृपती ॥ आम्हां वैष्णवांसी नावडे चित्तीं ॥ तें पुढें निजप्रीतीं ठेविलें ॥ ४ ॥ तुवां आणिलें द्रव्य होन ॥ हें आम्हां गोमांससमान ॥ ऐसें ऐकोनि निर्वाणवचन ॥ लाज्जित मनीं नृपनाथ ॥ ५ ॥ पुढती रायासी बोले वचन ॥ आमुचें व्हावें समाधान ॥ ऐसें इच्छीत असेल तुझें मन ॥ तरी ते ऐकें खूण सांगतों ॥ ६ ॥ तुम्हीं करावें विठ्ठलनामस्मरण ॥ तेणेंचि आम्ही सुख-संपन्न ॥ येर संपत्ति देशील धन ॥ तें मृत्तिकेसमान नृपनाथा ॥ ७ ॥ गळ्यांत कंठीं मिरवा तुळसी ॥ व्रत करावें एकादशी ॥ तेणेंचि समाधान आम्हांसी ॥ द्रव्यराशी न घेतां ॥ ८ ॥ चित्तीं धरूनि प्रेम उल्हास ॥ म्हणवावें विठोबाचा दास ॥ हेचि आमुची आहे आस ॥ पुरवा सावकाश धणीवरी ॥ ९ ॥ ऐसी निरपेक्ष देखोनि स्थिती ॥ मनांत आश्चर्य करी नृपती ॥ मग अनन्यभावें लोटांगण प्रीतीं ॥ नृपें मागुती घातलें ॥ ११० ॥ ते दिवसीं असे हरिदिनी ॥ कीर्तन ऐके प्रेमेंकरूनी ॥ तों दोनसहस्र पठाण चाकणाहूनी ॥ अविंधें त्वरित पाठविले ॥ ११ ॥ हेर ठेविले होते पाळती ॥ त्यांनीं सांगितलें यवनांप्रती ॥ कीं पुण्यासी आला नृपती ॥ दर्शनासी रातीं तुकयाचे ॥ १२ ॥ मग स्वार पाठविले त्या दुर्जनीं ॥ कीं त्यासी आणावें शीघ्र धरूनी ॥ नानापरींचीं शस्त्रें घेऊनी ॥ आले धांवूनि अर्धरात्रीं ॥ १३ ॥ जेथें मांडिली होती कथा ॥ तो वाडा वेढिला सभोंवता ॥ आंतील मनुष्य बाहेर निघतां ॥ ते जाऊं सर्वथा न देती ॥ १४ ॥ म्हणती शिवाजीस ओळखोनि सत्वर ॥ बांधोनि आणावें बाहेर ॥ रायासी कळला समाचार ॥ कीं वेढिलें मंदिर परचक्रें ॥ १५ ॥ कोणी म्हणती नृपवरासी ॥

आतां उठोनि पळा वेगेंसीं ॥ तेणें भय उपजलें मानसीं ॥ विचार तयासी पडियेला ॥ १६ ॥ देखोनि श्रोतयांचें दुश्चित चित्त ॥ तुकयासी कळला वृत्तांत ॥ म्हणे काय गुजगुज करितां मनांत ॥ सांगा त्वरित मजपाशीं ॥ १७ ॥ ऐकोनि तुकयाचें वचन ॥ हळूच सांगती सज्ञानी जन ॥ कीं राजयासी न्यावयाकारण ॥ परचक्र दारुण पातलें ॥ १८ ॥ म्हणोनि आतां सत्वरगती ॥ येथोनि पळवावा नृपती ॥ आज्ञा द्याल आम्हांप्रती ॥ तरीच वांचती प्राण याचे ॥ १९ ॥ तयांसी तुका बोले काये ॥ कीर्तनांतूनि सर्वथा उठों नये ॥ धर्मनीति तों ऐसी आहे ॥ नेणतां काय सकळिक ॥ १२० ॥ ऐसें ऐकोनि नृपती ॥ निश्चय करून बैसला एकचित्तीं ॥ म्हणे तारिता मारिता रुक्मिणीपती ॥ त्याविण त्रिजगतीं असेना ॥ २१ ॥ आज एकादशी पर्वकाळ सुदिन ॥ संनिध संत वैष्णवजन ॥ येथें कीर्तनांत आलें जरी मरण ॥ तरी भाग्य धन्य पैं माझें ॥ २२ ॥ इकडे बाहेर परदळ विचार करिती ॥ कीं धरूनि आणावा सत्वर नृपती ॥ वाड्यांत हेर उदंड येती ॥ परी कोणीच नोळखती रायासी ॥ २३ ॥ यवनासी सांगती जाऊन ॥ कीर्तनीं बैसले बहुत जन ॥ तयांत शिवाजी आहे कोण ॥ आम्हांकारण कळेना ॥ २४ ॥ ऐकोनि पायिकांचें वचन ॥ क्रोधें संतापला तो दुर्जन ॥ म्हणे कथेंत बैसले जितुके जन ॥ तितुके मारून टाकावे ॥ २५ ॥ त्यांत सहजचि राजा सांपडला ॥ ऐसा निश्चय दृढ केला ॥ तों अंतरसाक्ष तुकयाला ॥ वृत्तांत कळला ते समयीं ॥ २६ ॥ मग ध्यानांत आणोनि पंढरीनाथ ॥ नानापरीची करुणा भाकीत ॥ जय जय अनाथनाथ कृपावंत ॥ धांवें सत्वर ये समयीं ॥ २७ ॥ तुझ्या कीर्तनासी आले सज्जन ॥ तयांसी तत्काळ ओढवलें विघ्न ॥ आतां हें अरिष्ट निवारण ॥ तुजविण कोण करील ॥ २८ ॥ जेथें

तुझें नामसंकीर्तन ।। तेथूनि विघ्नें जाती पळोन ।। ऐसें संत बोलिले वचन ।। तें असत्य होऊन आलें कीं ।। २९ ।। माझें चित्त पाहसी जगज्जीवना ।। मी भीत नाहीं आपुल्या मरणा ।। परी दुःख होईल संतसज्जनां ।। तें माझिया नयना न देखवे ।। १३० ।। आमुची जातिपरंपरा ऐसी ।। रुक्मिणीपती तूं काय नेणसी ।। विक्षेप झाला जो भजनासी ।। याहूनि मरण आम्हांसी कोणतें ।। ३१ ।। ऐसें ऐकोनि करुणावचन ।। तत्काळ आले जगज्जीवन ।। तुकयासी देऊनि आलिंगन ।। म्हणे त्वां कीर्तन करावें ।। ३२ ।। परचक्र आलें महाविघ्न ।। तें मी निजांगें करितों निवारण ।। तूं स्वस्थ करूनि आपुलें मन ।। सप्रेम भजन करावें ।। ३३ ।। ऐसें म्हणोनि घनसांवळा ।। शिवाजी राजा आपण जाहला ।। अश्वारूढ होऊनि ते वेळां ।। सत्वर चालिला बाहेरी ।। ३४ ।। कीर्तनीं बैसले लोक समस्त ।। तयांसी न कळतां हा वृत्तांत ।। कौतुक मांडिलें अत्यद्भुत ।। तें परिसा निजभक्त भाविक हो ।। ३५ ।। ज्या वाडियांत होतें हरि-कीर्तन ।। तेथें अकस्मात प्रकटले जगज्जीवन ।। आपणचि स्वमुखें हांक मारून ।। म्हणे जातो पळून नृपनाथ ।। ३६ ।। दोनसहस्र पठाणीं वेढोनि वाडा ।। घातला होता गराडा ।। तितुकेही होऊनि मागांपुढां ।। पाहती रोकडा नृपनाथ ।। ३७ ।। क्षण एक पडोनि तयांचे दिठीं ।। चपळत्वें चालिले उठाउठीं ।। सैन्य लावूनि आपुले पाठीं ।। लाघव जगजेठी दावीत ।। ३८ ।। नगरवासी लोक समस्त ।। जागृत होऊनि अति त्वरित ।। माड्या माळवदीं उभे राहत ।। काय बोलत परस्परें ।। ३९ ।। राजा पुढें जातो पळोन ।। तयामागें लागले यवन ।। आतां न वांचतील त्याचे प्राण ।। अनर्थ होईल दिसताहे ।। १४० ।। अविंधाच्या सैन्यांतून ।। पाळती हेर जे ठेविले जाण ।। त्यांसी दिसे जगज्जीवन ।।

जैसा नृपवर शिवाजी ॥ ४१ ॥ एक म्हणती धरा धरा ॥ राजा पळोन जातो खरा ॥ हडबड झाली महावीरां ॥ म्हणोनि सत्वरा धांवती ॥ ४२ ॥ एका जवळीच दिसे पाहीं ॥ धरूं जातां कांहींच नाहीं ॥ एक म्हणती पळोनि कायी ॥ आतांच लवलाहीं मारावा ॥ ४३ ॥ एक म्हणती घाला वेढा ॥ काय पाहतां रे मागांपुढां ॥ एक म्हणती तुम्हां भ्याडां ॥ वीर रोकडा धरवेना ॥ ४४ ॥ आपण दोन सहस्र शूर ॥ इतक्यांतूनि पळतो एकला वीर ॥ कासया वागवितां हतियार ॥ प्राण सत्वर द्यावा कां ॥ ४५ ॥ एक म्हणती उगवेल दिवस ॥ मग राजयास धरूं सावकाश ॥ आतां आमुचे डोळां न दिसे ॥ व्यर्थ कासावीस कां होतां ॥ ४६ ॥ क्षण एक ठायीं राहिले स्थिर ॥ तंव कौतुक करी शार्ङ्गधर ॥ आपण प्रकट झाले सत्वर ॥ म्हणती धरा रे सांपडला ॥ ४७ ॥ मागुती सकळ लागले पाठीं ॥ तरी तयांसी नातुडे जगजेठी ॥ क्षण एक संनिध पडोनि दृष्टि ॥ धरितां निकटीं आतुडेना ॥ ४८ ॥ मग शुक्लपक्षींचें पडिलें चांदणं ॥ त्या प्रकाशें धांवती यवन ॥ प्रहररात्रींत पांच योजन ॥ अरण्यांत नेऊन घातले ॥ ४९ ॥ ज्या डोंगरीं लागलें कंटकवन ॥ महाभयानक ओसाड अरण्य ॥ त्या स्थळाप्रति नेऊनि सैन्य ॥ मग जगज्जीवन परतले ॥ १५० ॥ तेथें सकळ वीर सभोंवते पाहती ॥ तों कोठेंचि न दिसे शिवाजी नृपती ॥ म्हणती आपुल्यास पडली भ्रांती ॥ धांवलों रातीं व्यर्थचि ॥ ५१ ॥ एक म्हणती तरळली दृष्टि ॥ तेणें वायांचि झालों कष्टी ॥ एक म्हणती सन्निध स्पष्टी ॥ आम्हीं तंव दृष्टीं देखिला ॥ ५२ ॥ परतोनि चालिले मागुती ॥ तंव मावळोनि गेला निशापती ॥ अंधारीं काहींच न दिसे रातीं ॥ मार्ग निश्चितीं सांपडेना ॥ ५३ ॥ एकापुढें एक अश्व हांकिती ॥ अडखळोनि तेचि ठायीं पडती ॥ येरयेरांसी काय बोलती ॥ बरवी

गति दिसेना ॥ ५४ ॥ अंगासी लागतां कांटवण ॥ तेणें वस्त्रें गेली फाटून ॥ एक दीर्घस्वरें करिती रुदन ॥ जातील प्राण म्हणोनि ॥ ५५ ॥ हिंव सुटलें अति प्रबळ ॥ तेणेंचि सैन्य झालें विकळ ॥ ओसाड अरण्यांत करिती तळमळ ॥ अश्व तंव सकळ पळाले ॥ ५६ ॥ अद्भुत केलें जगज्जीवनें ॥ कोणासी न मारितां जीवेंप्राणें ॥ नागडे फिरती यवन ॥ आली नागवण सकळांसी ॥ ५७ ॥ शस्त्रें हातींचीं पडलीं सत्वरी ॥ अश्व तों जाहले रानभरी ॥ कांटवणीं राहिलीं वस्त्रें दूरी ॥ केले भिकारी सकळिक ॥ ५८ ॥ ऐसा दुर्जनांसी दंड करूनी ॥ परतोनि आले चक्रपाणी ॥ तुकयाचे कीर्तनीं येऊनी ॥ प्रेमरंगणीं नाचती ॥ ५९ ॥ श्रवणासी बैसले लोक समस्त ॥ तयांसी न कळतां हा वृत्तांत ॥ विघ्न टाळीत पंढरीनाथ ॥ मात्र अघटित करूनियां ॥ १६० ॥ तुकयाचे कानीं जगज्जीवन ॥ येऊनि सांगे वर्तमान ॥ आतां निर्भय करून मन ॥ करावें कीर्तन आवडीं ॥ ६१ ॥ मग जयजयकारें पिटोनि टाळी ॥ हरिनामें गर्जती सकळ मंडळी ॥ वैष्णव नाचती कीर्तनमेळीं ॥ तुष्टला वनमाळी म्हणोनी ॥ ६२ ॥ रायासी सांगती सकळ जन ॥ परचक्र आलें होतें दारुण ॥ तयाचें न करितां निवारण ॥ गेलें पळोन आपोआप ॥ ६३ ॥ आश्चर्य करी नृपवर ॥ म्हणे मज पावला रुक्मिणीवर ॥ अरिष्ट आलें होतें थोर ॥ आम्हां अनिवार सकळांसी ॥ ६४ ॥ यापरी मानूनि समाधान ॥ श्रवण करिती हरिकीर्तन ॥ चार प्रहर झालें जागरण ॥ तों उदयासी अरुण पातला ॥ ६५ ॥ मग उजळोनि मंगळारती ॥ ओंवाळिला रुक्मिणीपती ॥ हरिनामें गर्जोनि क्षितीं ॥ दंडवत प्रीतीं घातलें ॥ ६६ ॥ बिऱ्हाडासी जातां नृपनाथ ॥ ग्रामांत नरनारी काय बोलत ॥ तुम्हां-ऐसाचि रात्रीं पळत ॥ गेला त्वरित नगरांतूनि ॥ ६७ ॥ हें यवनांनीं देखोनि

दृष्टी ॥ पळतचि गेले त्याचिया पाठीं ॥ कैसे वांचलेत संकटीं ॥ आश्चर्य पोटीं वाटतें ॥६८॥ राजा चमत्कारला मनीं ॥ म्हणे ईश्वराची अघटित करणी ॥ वांचविलें अरिष्टापासोनि ॥ चक्रपाणी कृपाळें ॥ ६९ ॥ एके दिवसीं शिवाजी नृपती ॥ विचार करी आपुले चित्तीं ॥ तुकोबासी देतां धनसंपत्ती ॥ परी तो न घेईच सर्वथा ॥ १७० ॥ परी दीनरूप धरूनि आपण ॥ नेऊन द्यावें त्याचे घरीं धान्य ॥ येरवीं तों माझें राजान्न ॥ तें तो न घेचि सर्वथा ॥ ७१ ॥ ऐसी युक्ती योजूनि जाण ॥ वस्त्रें नेसला फाटकीं जीर्ण ॥ वृषभावरी धान्य दोन मण ॥ चालिला घेऊन तेधवां ॥ ७२ ॥ दोन घटिका लोटतां यामिनी ॥ तुकोबाचिया पातला सदनीं ॥ तों ते बैसले होते वृंदावनीं ॥ हातीं स्मरणी घेऊनियां ॥ ७३ ॥ तों राजा येऊनियां सत्वरी ॥ गोणी लोटोनि टाकिली द्वारीं ॥ म्हणे स्वामी म्यां करूनि मजुरी ॥ धान्य मेळवूनि आणिलें ॥ ७४ ॥ तुमचे चरणीं धरूनि हेत ॥ येथें घेऊनि आलों किंचित ॥ मी अनाथ दीन आहें बहुत ॥ हें सांठवा गृहांत आपुल्या ॥ ५ ॥ मग नमन करूनि सत्वरीं ॥ राजा गेला ते अवसरीं ॥ तुकयासी कळलें निजअंतरीं ॥ कृत्रिम परी म्हणोनियां ॥ ७६ ॥ म्हणे ओळख सांगतां रायाकारण ॥ त्याचे प्रेमाचें होईल खंडन ॥ म्हणोनि उगेंचि धरून मौन ॥ नामस्मरण करीतसे ॥ ७७ ॥ मग निजकांतेप्रती बोलत ॥ धान्य आणिलें तों नृपनाथें त्वरित ॥ गृहांत ठेविलें जरी समस्त ॥ तरी खंडेल सुकृत आपुलें ॥ ७८ ॥ तरी एका दिवसापुरतें अन्न ॥ निजकरें घ्यावें त्यांतून ॥ वरकड द्विजांसी बोला-वून ॥ त्यांजकारणें अर्पावें ॥ ७९ ॥ ऐसी ऐकोनियां गोष्टी ॥ कांता सक्रोध जाहली पोटीं ॥ आपुल्या करें ललाट पिटी ॥ म्हणे मी करंटी अभागी ॥ १८० ॥ अवचित गोणी आली घरा ॥ तें धान्य खाऊं

नेदीच पोरां ॥ वांटिलें गांवींचिया द्विजवरां ॥ म्यां काय संसारा करावें ॥ ८१ ॥ यावरी कांतेसी उत्तर देत ॥ जैसें आपुलें आहे संचित ॥ तो वांटा टाकोनि निश्चित ॥ घ्यावें बहुत कोठोनि ॥ ८२ ॥ एके दिवसीं देवालयांत ॥ तुकोबा आनंदें कीर्तन करीत ॥ तों नवल वर्तलें अद्भुत ॥ तें परिसा चरित्र भाविक हो ॥ ८३ ॥ टाळ मृदंग वाजविती सुस्वर ॥ तेणें नादें कोंदलें अंबर ॥ तटस्थ होऊनि नारीनर ॥ ऐकती सादर हरिलीला ॥ ८४ ॥ तेथें एक कांसार भाविक सज्जन ॥ ऐकावया येतसे कीर्तन ॥ त्याचिया मुलास व्यथा दारुण ॥ होताती प्राण कासावीस ॥ ८५ ॥ कांता म्हणे तयासी ॥ आजि तुम्हीं न जावें हरिकीर्तनासी ॥ तेणें नायकोनि तिचे वचनासी ॥ गेला कीर्तनासी सत्वर ॥ ८६ ॥ तों मागें लेंकुराचे जातां प्राण ॥ माता दीर्घस्वरें करी रुदन ॥ तैसेंच प्रेत खांद्यावर घेऊन ॥ कीर्तनांत आणोनि टाकिलें ॥ ८७ ॥ कांसारीण म्हणे तुकोबासी ॥ त्वां आमुची पाठ घेतली कैसी ॥ वेड लावूनि भ्रतारासी ॥ मायालोभासी सांडविलें ॥८८॥ तुझी कथा ऐकिलियानें ॥ माझे बाळकाचे गेले प्राण ॥ आमचे घरीं पूर्वींपासून ॥ नाहीं धारजिण हरिनाम ॥ ८९ ॥ ऐसें बोलोनि उद्धत ॥ कीर्तनरंगीं ठेविलें प्रेत ॥ तेणें श्रोतयांचें दुखवोनि चित्त ॥ राहिले निवांत अवघेचि ॥ १९० ॥ जैसें भणंग पक्वान्न जेवीत ॥ त्यांत मृत्तिका पडली अकस्मात ॥ तेवीं कीर्तनामाजी आणितां प्रेत ॥ रंग समस्त वितुळला ॥ ९१ ॥ लोक म्हणती ऐक कांसारिणी ॥ तूं येथें कुणप आलीस घेऊनी ॥ परी याजपासीं नाहीं मृतसंजीवनी ॥ कीं लेंकरूं उठवूनि देईल ॥ ९२ ॥ ऐसें बोलतां सकळ लोकां ॥ प्रति-उत्तर देतसे तुका ॥ हरिनामापरीस सुधारस फिका ॥ जो इंद्रादिकां दुर्लभ ॥ ९३ ॥ विश्वास न मानी तुमचा जीव ॥ तरी तत्काळ पाहा

याचा अनुभव ॥ ऐसें म्हणोनि भक्त वैष्णव ॥ अपूर्व लाघव दावीत ॥९४॥ श्रोतयांसी म्हणे तये क्षणीं ॥ विठ्ठल विठ्ठल वदा वाणी ॥ हेचि अमृतसंजीवनी ॥ विकल्प मनीं न धरावा ॥ ९५ ॥ ऐसें बोलतां सभारंगणीं ॥ विठ्ठलनामाच्या उठल्या ध्वनी ॥ नादें ब्रह्म मुसावोनी ॥ गगन भरोनि कोंदलें ॥ ९६ ॥ मंडप तिवाशा गालिचे ॥ विठ्ठलनाम गर्जती वाचे ॥ खडे पाषाण ते भूमीचे ॥ बोलती वाचे हरिनाम ॥ ९७ ॥ दिंड्या पताका टाळांतूनी ॥ विठ्ठलनामाच्या निघती ध्वनी ॥ तेव्हां सुरवर आकाशीं येऊनी ॥ तो आनंद नयनीं पाहती ॥ ९८ ॥ जाणते नेणते थोर लहान ॥ विठ्ठल म्हणती प्रेमेंकरून ॥ साळे भोळे सकळ जन ॥ प्रेमेंकरून डुल्लती ॥ ९९ ॥ एकमेकांकडे लोक पाहती ॥ तंव अवघ्या दिसती विठ्ठलमूर्ती ॥ याती वर्ण वेगळे न दिसती ॥ अद्भुत स्थिती बाणली ॥ २०० ॥ तंव अद्भुत नवल वर्तलें तेथ ॥ प्रेत उठोनि बैसलें सावचित्त ॥ मग सावध म्हणती लोक समस्त ॥ देखतां विस्मित ते जाहले ॥ १ ॥ सन्निध होती त्याची माता ॥ संतोष वाटला तिचिया चित्ता ॥ म्हणे मीं अज्ञानपणें नेणतां ॥ निंदिलें वृथा तुकयासी ॥ २ ॥ कौतुक देखिलें सकळ जनीं ॥ विश्वास बैसला त्यांचे मनीं ॥ म्हणती अमृतसंजीवनी ॥ हरिनामाहूनि असेना ॥ ३ ॥ पुढिले अध्यायीं कथा सुंदर ॥ वदविता श्रीरुक्मिणीवर ॥ महीपतीस देवोन अभयकर ॥ वसविलें अंतर निजकृपें ॥ ४ ॥ स्वस्ति श्रीभक्तविजय ग्रंथ ॥ ऐकतां तुष्टेल जगन्नाथ ॥ प्रेमळ ऐका भाविक भक्त ॥ अष्टचत्वारिंशाध्याय रसाळ हा ॥ २०५ ॥ अध्याय ॥ ४८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ओंव्या ॥ २०५ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीलक्ष्मीरमणाय नमः ॥ ॥ जय कृपासागरा जगजेठी ॥ तूं सगुणस्वरूप दाखविसी दृष्टीं ॥ जैं भक्त पडती महा-संकटीं ॥ तैं तूं रक्षिसी आपेंआप॥ १ ॥ सर्वांगीं दिससी घनसांवळा॥ दिव्य पीतांबर कांसे पिंवळा ॥ पिंवळेंचि पदक वक्षस्थळा ॥ त्यावरी रत्नकळा फांकती ॥ २ ॥ पिंवळाचि मुकुट कनकदीप्ती ॥ देखोनि लज्जित निशापती ॥ पिंवळीं कुंडलें कानीं तळपती ॥ मकराकृती सुढाळ ॥ ३ ॥ पिंवळीच कंठीं मोहनमाळ ॥ मध्यें कौस्तुभ दिसे सुढाळ ॥ दृष्टीस देखोनि सर्व काळ ॥ भक्त प्रेमळ भुलले पैं ॥ ४ ॥ पिंवळा केशरी तिलक ललाटीं ॥ पिंवळीच अंगीं चंदनउटी ॥ पिंव-ळ्याच वळीनें क्षुद्रघंटी ॥ देखतांचि दृष्टी तल्लीन ॥ ५ ॥ पिंवळेंचि वस्त्र पांघुरण ॥ पिंवळेंच हातीं वीरकंकण ॥ पिंवळेंच अंगीं भूषण ॥ तुजकारण शोभतसे ॥ ६ ॥ पिंवळाच चरणीं वांकीतोडर ॥ पिंवळे शोभती वाळे नेपुर ॥ नखींचें तेज सर्व काळ ॥ भक्त प्रेमळ देखती ॥ ७ ॥ ब्रह्मांदिका दुर्लभ चरण ॥ ते प्राप्त जाहले दासांकारण ॥ जिहीं प्रपंचाचें टाकूनि भान ॥ वर्णिले सद्गुण पैं तुझे ॥ ८ ॥ माना-पमान नाठवूनि चित्तीं ॥ जिहीं सांडिली लौकिक स्थिती॥ जे निर्लज्ज होऊनि कीर्तनीं गाती ॥ ते तुज श्रीपती पावले ॥ ९ ॥ ज्यांनीं दुराशा टाकोनि मनें ॥ जे सारिखेंच लेखिती शेण सोनें ॥ स्वर्ग-सुखासी विटले मनें ॥ ते तुजकारणें आवडती ॥ १० ॥ जिहीं देहलोभ सांडोनि तत्त्वतां ॥ चहूं मुक्तींस हाणितल्या लाता ॥ ऐसी जयांची निरपेक्षता ॥ ते रुक्मिणीकांता तुज पावले ॥ ११ ॥ संकटीं पडतां भक्त प्रेमळ ॥ सगुणरूप धरिसी तत्काळ ॥ न विचारिसी काळवेळ ॥ तूं दीनदयाळा पावसी ॥ १२ ॥ कलियुगीं बौद्धावतार जाण ॥ ऐसें बोलती शास्त्रपुराण ॥ त्यांचें एक वेळ मोडोनि वचन ॥

होसी सगुण स्वइच्छें ॥ १३ ॥ जैसी सांजवेळ न होतां पाहें ॥ वत्स मातेसी पिऊं जाये ॥ परी मोहें पान्हा घालिताहे ॥ निष्ठुर न होये सर्वथा ॥ १४ ॥ तेवीं अवताराची न येतां वेळ ॥ तुज बोलाविती भक्त प्रेमळ ॥ तयांची मानोनि कळकळ ॥ बोलसी तत्काळ गुजगोष्टी ॥ १५ ॥ ऐसे एकनिष्ठ वैष्णवजन ॥ जिहीं तुज केलें आपुले स्वाधीन ॥ त्यांचे वर्णावया सद्गुण ॥ उल्हास मनें धरियेला ॥ १६ ॥ दीनदयाळ वनमाळी ॥ मीं तंव अघटित घेतली आळी ॥ तूं निजांगें बैसोनि हृदयकमळीं ॥ स्वानंदनवाळी बोलविसी ॥ १७ ॥ जैसा पिता पुत्राचा धरूनि हस्त ॥ खडे मांडोनि ओनामा शिकवीत ॥ तेवीं बुद्धीचा चालक तूं रुक्मिणीकांत ॥ लिहविसी ग्रंथ मजहातीं ॥ १८ ॥ गोवर्धन उचलोनि आपण ॥ गोपाळां दिधलें. थोरपण ॥ तेवीं माझी करूनि बुझावण ॥ ग्रंथरचना तूं करविसी ॥ १९ ॥ मी मंदबुद्धी पंढरीनाथा ॥ धड निरोप तोही न ये सांगतां ॥ त्या मुखें वदविशी भक्तकथा ॥ हें आश्चर्य चित्ता वाटतें ॥ २० ॥ कवणे वेळे वर्तलें कायी ॥ तें म्यां सर्वथा देखिलें नाहीं ॥ लिहितां अटक पडली कांहीं ॥ तूं देसी लवलाहीं आठवण ॥ २१ ॥ तूं बुद्धिप्रकाशक शार्ङ्गधर ॥ सर्व हा भार घातला तुजवर ॥ हरोनि मीपणाचा बडिवार ॥ ग्रंथ साचार वदविसी ॥ २२ ॥ मागील अध्यायाचे अंतीं ॥ विठ्ठलस्मरण करितां प्रीतीं ॥ कुणप उठविलें सत्वरगती ॥ तें कथानक श्रोतीं परिसिलें ॥ २३ ॥ तो चमत्कार अद्भुत देखोन ॥ बहुत सन्मान करिती जन ॥ मग तुकोबा अरण्यांत जाऊन ॥ करी चिंतन श्रीहरीचें ॥ २४ ॥ दांभिक लौकिक प्रतिष्ठा ॥ मानी जैसी श्वानविष्ठा ॥ टाकोनियां सन्मानचेष्टा ॥ करी एकनिष्ठा हरिभजन ॥ २५ ॥ जेणें लोक पिशाच म्हणती ॥ कुटिल स्वमुखें निंदा

करिती ॥ तैसीच धरूनि विदेहस्थिती ॥ जाऊनि एकांतीं बैसत ॥ २६ ॥ कोणी निजमुखें करिती स्तवन ॥ तेथून सत्वर जावें पळून ॥ आपणास कोणी ठेवितील दूषण ॥ तेथें करीत श्रवण बैसावें ॥ २७ ॥ कोणी पक्वान्नें करूनि नाना ॥ आदरेंकरूनि देतील भोजना ॥ तरी तें सर्वथा न ये मना ॥ विवेकें रसना आवरीत ॥ २८ ॥ कोणी दुर्बळ अनाथ दीन ॥ त्यानें वाढिलें भाजीचें पान ॥ तें देहनिर्वाहापुरतें जाण ॥ आवडीकरून भक्षावें ॥ २९ ॥ बह्याळाच्या वनाआंत ॥ दिवसा एकांतीं जाऊन बैसत ॥ रात्रीं येऊन ग्रामांत ॥ कीर्तन करीत सप्रेम ॥ ३० ॥ दोन मास असोनि आपुले नगरीं ॥ गेले नाहींत निजमंदिरीं ॥ कांता गाऱ्हाणें घरोघरीं ॥ लोकाचारीं देतसे ॥ ३१ ॥ ऐका साजणी एक मात ॥ माझें कर्म बहु विपरीत ॥ घरधनी न करीच आपुली परत ॥ बैसतो अरण्यांत जाउनी ॥ ३२ ॥ टाकूनियां धंदा उदीम ॥ कीर्तनीं नाचतो निजप्रेम ॥ हृदयांत आठवी पुरुषोत्तम ॥ भजनीं नेम धरियेला ॥ ३३ ॥ दोन महिने गांवांत असोनी ॥ भ्रतार आला नाहीं सदनीं ॥ मी चिंतातुर होऊनि मनीं ॥ झुरतें साजणी रात्रंदिवस ॥ ३४ ॥ कधीं भेटेल तुम्हांप्रती ॥ तयासी सांगा धर्मनीती ॥ कीं तुवां टाकिलें कांतेप्रती ॥ जाहली फजीती जनांत ॥ ३५ ॥ ऐसीं शेजारिणीं-लागोनी ॥ नित्य सांगतसे गाऱ्हाणीं ॥ तों एके दिवसीं उदकालागूनी ॥ घागर घेऊनि चालिली ॥ ३६ ॥ कुंभांत भरूनि जीवन ॥ परतोनि घरा येतां जाण ॥ तों तुकोबा करूनियां स्नान ॥ देवालयांत चालिले ॥ ३७ ॥ कांता लवलाहें जाऊनियां जवळी ॥ पदरीं धरिला तत्काळीं ॥ मर्यादा टाकूनि ते वेळीं ॥ काय बोलिली तें ऐका ॥ ३८ ॥ तूं निर्लज्ज निःशंक होऊनि मनीं ॥ कीर्तनीं नाचतोसी निशिदिनीं ॥

घरासी न येसी परतोनी ॥ मी तळमळ मनीं करीतसें ॥ ३९ ॥
लोकलज्जा धरूनि पाहीं ॥ घरीं मोकलितें नित्य धायी ॥ त्वां
आमुची वाट केली कायी ॥ सांग लवलाहीं ये समयीं ॥ ४० ॥
यावरी कांतेप्रती बोले वचन ॥ तुझिया मायबापें केलें लग्न ॥ त्यांहीं
आम्हांसी दिधलें नाहीं पाहोन ॥ तरी वस्त्र अन्न पुरवूं कासया ॥ ४१ ॥
कांता म्हणे मग तुकयासी ॥ पाहिलें तरी सांग कवणासी ॥
येरू म्हणे आमचे मायबापांसी ॥ निरविलें तुजसी निजकांते ॥ ४२ ॥
यावरी कांता उत्तर बोलिली ॥ तुझीं मायबापें मरोनि गेलीं ॥
तीं कोठें धुंडोनि पाहूं वहिलीं ॥ जीं मसणीं जाळिलीं निजकरें ॥ ४३ ॥
यावरी निजभक्त बोले काय ॥ पांडुरंग पिता माझा होय ॥
विश्वजननी रुक्मिणी माय ॥ अचळ अक्षय सर्वदा ॥ ४४ ॥ सृष्टीस
होती जैं उत्पत्ती ॥ तेणें काळें ते न वाढती ॥ विश्वास येतां प्रळयगती ॥
ते नाश न पावती सर्वथा ॥ ४५ ॥ घटांत आकाश बिंबतां जाण ॥
त्यास नाहीं दुजेपण ॥ नाश होतां घटाकारण ॥ तें गेलें फुटोन म्हणों
नये ॥ ४६ ॥ तेवीं आमुचीं बाप माये ॥ त्यांचे चित्तीं आठवीं पाये ॥
तीं अन्नवस्त्र पुरवितील पाहें ॥ न धरीं संशय सर्वथा ॥ ४७ ॥ मग
कांता म्हणे प्राणेश्वरा ॥ आतां चलावें निजमंदिरा ॥ तेणें पिशुनांसी
होईल उजगरा ॥ संसार बरा तुमचेनि ॥ ४८ ॥ मी श्रीहरीचे पाय
आठवीन ॥ तेच पुरवितील वस्त्र अन्न ॥ परी तुम्हीं उगेच घरीं बैसून ॥
श्रीहरिभजन करावें ॥ ४८ ॥ भ्रतार म्हणे ते अवसरीं ॥ माझें वचन
ऐकसील जरी ॥ तरी भाक देईं वो निजकरीं ॥ येतों मंदिरीं
आतांचि ॥ ५० ॥ कांतेनें वचन देऊनि देखा ॥ घरासी आणिला
वैष्णव तुका ॥ आश्चर्य वाटलें गांवींच्या लोकां ॥ बोलती एकमेकां
परस्परें ॥ ५१ ॥ चार दिवस वैराग्य दाखवून ॥ आपुली प्रतिष्ठा

वाढविली त्यानं ॥ पुनः मायेसी वरपडा होऊन ॥ प्रपंचीं जाऊन पडियेला ॥ ५२ ॥ एक म्हणती जाहलें यथास्थित ॥ प्रपंचींच साधे परमार्थ ॥ तुकयानें आपंगिलें निजकांतेतें ॥ तेणेंच समाधान चित्त आमुचें ॥ ५३ ॥ जाऊनि बैसतां गिरिकपाटीं ॥ कोण चढला देखा वैकुंठीं ॥ यापरी लोक बोलती गोष्टी ॥ विवेक पोटीं न करितां ॥ ५४ ॥ कोणी निंदिती कोणी स्तविती ॥ उत्तम अथवा अधम म्हणती ॥ परी तुकयासी नाहीं हर्ष खंती ॥ आनंद चित्तीं सर्वदा ॥ ५५ ॥ ते दिवसीं होती हरिदिनी ॥ तुकोबा बैसोनि वृंदावनीं ॥ कांतेसी सन्निध बोलावूनि ॥ म्हणे ऐकें श्रवणीं हरिकथा ॥ ५६ ॥ मग सन्मुख बैसवोनि तिजला ॥ निजकरीं टाळ वीणा घेतला ॥ अकरा अभंग उपदेश केला ॥ तो सज्जनीं ऐकिला असेल ॥ ५७ ॥ त्याचाचि अन्वय आणोनि ध्यानीं ॥ मीही बोलतों आर्षवाणी ॥ जैसें देखावया वासरमणी ॥ दीपक उजळोनि दाखविती ॥ ५८ ॥ नातरी व्हावया अमृतसिद्धि ॥ तेथें वैद्य देती आपुली औषधी ॥ तेवीं तुकयाचे अभंगांची अर्थसिद्धि ॥ मी मंदबुद्धी सांगतों ॥ ५९ ॥ गंगेंत ओहळ मिळालिया पाहें ॥ त्यासी अपवित्र सर्वथा म्हणों नये ॥ कीं परिसासी लोह भेटलिया काये ॥ काळिमा राहे तयासी ॥ ६० ॥ त्यांत संतांचें अनुपम वचन ॥ अर्थ पाहतां सखोल गहन ॥ परी किंचित वदेन त्यांचे कृपेन ॥ तें परिसा सज्जन निजप्रीतीं ॥ ६१ ॥ मग कांतेसी सन्मुख बैसवून ॥ म्हणे नरदेह हें क्षेत्र जाण ॥ येथें येऊनि केलिया हरिस्मरण ॥ तरी पिकेल दारुण निजभाग्यें ॥ ६२ ॥ जिहीं परमार्थ न केला दृढ ॥ त्यांची केवळ जाहली बूड ॥ वाहूनि प्रपंच काबाड ॥ झिजविलें हाड व्यर्थचि ॥ ६३ ॥ ऐशीं टक्के दिवाणदारा ॥ देणें लागतो याचा सारा ॥ नाहीं तरी काळोजी हुद्देदारा ॥ दाखवी दरारा बहुसाल ॥ ६४ ॥

याचेंचि भय पावोनि मनीं ॥ दहा टक्के टाकिले झाडोनि ॥ बाकी सत्तर त्यालागूनि ॥ ऐवज नयनीं दिसेना ॥ ६५ ॥ दहा टक्के म्हणशील कोणते ॥ ते आशंका वाटेल निजचित्तें ॥ तरी दशइंद्रियें क्षेत्राआंत ॥ झडलीं प्रस्तुत जाण वो ॥ ६६ ॥ अपशब्द आणि रसाळ स्तुती ॥ सारिखेंचि वाटे श्रवणाप्रती ॥ नेत्रांस सोनें आणि माती ॥ सारिखींचि दिसती माझिया ॥ ६७ ॥ साखर आणि वृंदावन ॥ जिव्हेसी नाहीं अधिक उण ॥ पुंगळवेल आणि बकुळसुमन ॥ घ्राणासी लागती सारिखीं ॥ ६८ ॥ इंद्रियांत मन चंचळ पाहीं ॥ तें स्थिरावलें विठ्ठलपायीं ॥ तैसींच कर्मइंद्रियें देहीं ॥ कर्तेपण नाहीं तयांसी ॥ ६९ ॥ ज्यांचा विषय न कळे त्यांसी ॥ तीं सहजचि दहा झाडलीं ऐसीं ॥ बाकी सत्तर उरले तयांसी ॥ ऐवज मजपासीं सांगतों ॥ ७० ॥ पांडुरंग चौधरी जाण येथींचा ॥ म्हणे झाडा करावा सकळ बाकीचा ॥ हृदयचोहटां बैसोनि साचा ॥ बोलतो वाचा ते ऐका ॥ ७१ ॥ म्हणतो हांडेंभांडें गुरें शेखीं ॥ देऊनि झाडीं आपुली बाकी ॥ हेचि बुद्धि करूनियां निकी ॥ होईं निष्कळंकी म्हणतसे ॥ ७२ ॥ हें यासी न देतां निजकांते ॥ तरी लपावयासी स्थळ कोणतें ॥ याविण स्थळ न दिसे रितें ॥ विवेकचित्तें विचारीं ॥ ७३ ॥ हा विश्वव्यापक जगजेठी ॥ याजभेणें पळतां उठाउठीं ॥ दुजा कोणी घालील पाठीं ॥ न दिसे दृष्टीं सर्वथा ॥ ७४ ॥ काय तें गव्हाण हिंडावें किती ॥ पाठ घेतली याच्या दूतीं ॥ आधींच कुळवाडी केली नसती ॥ तरी कां मजप्रती गांजिता ॥ ७५ ॥ तरी बेबाक होऊनि सर्वोपरी ॥ येथेंचि असावें निरंतरीं ॥ स्वइच्छा देईल जे मजुरी ॥ ते भक्षूं निजकरीं सकळिक ॥ ७६ ॥ यानें नागवून सोडिले किती ॥ ते संसारा आले नाहींत मागुती ॥ या भेणेंकरूनि पदरीं सूती ॥ कोणी न घेती

सर्वथा ॥ ७७ ॥ एकासी सद्गुरु घेऊनि जामीन ॥ केलें तयाचें निसंतान ॥ तयासी हांसती सकळ जन ॥ मानाभिमान टाकितां ॥ ७८ ॥ कसवटीस उतरले जे निकटीं ॥ तयांसी घालितो वैकुंठीं ॥ माझीही तैसी घेऊनि पाठी ॥ केली साठी जीवाची ॥ ७९ ॥ ऐसें पहिलें कळलें असतां ॥ जाणोनि जाहलों मी नेणता ॥ जेणें निर्दयपणें गांजिलें बहुतां ॥ त्याचे हाता सांपडलों ॥ ८० ॥ आतां विवेक करूनि मानसीं ॥ उदास होईं संसारासी ॥ नाश आरंभिला माझिया जीवासी ॥ मग अनुमानासी कासया ॥ ८१ ॥ जरूर दिसोन आलें सहज ॥ मग कां नावडे सांग तुज ॥ उपास रोकडे येती मज ॥ आतां कासया लाज धरावी ॥ ८२ ॥ देहाचा लोभ धरिलिया पाहें ॥ तुझिया जीवाचें व्हावें काये ॥ मज तूज तूट कदा न होये ॥ ते ऐक सोये सांगेन ॥ ८३ ॥ मुलांलेंकुरां-समवेत पाहीं ॥ उभयतां नांदों एकेच ठायीं ॥ हा विचार ऐकसील जरी निश्चयीं ॥ तरी वियोग नाहीं सर्वथा ॥ ८४ ॥ म्हणसील लेंकुरें खातील काये ॥ हे चिंता सर्वथा करूं नये ॥ तयांचें अन्नवस्त्र तयांस पाहें ॥ लिहिलें आहे विधीनें ॥ ८५ ॥ तूं आपुला गळा घेईं उगवुनी ॥ चुकवीं चौऱ्यायसीं लक्ष योनी ॥ गर्भवासाची चुकवीं जाचणी ॥ तो विचार कानीं ऐकें वो ॥ ८६ ॥ मी तुज टाकूनि पळतों निराळा ॥ कीं ऐवज देखोनि बांधिती गळा ॥ तुझे हातींचे मुजाईम मजला ॥ होऊनि घाला घालितील ॥ ८७ ॥ धर्मदूतांचा अवघड मार ॥ देखोनि जीव कांपे थरथर ॥ आतां माझी चाड असली जर ॥ तरी व्हावें उदार सर्वस्वें ॥ ८८ ॥ काय करूं या निजसंचिता ॥ साठी पडिलीसे जीवितां ॥ हे माझी करणी नव्हे सर्वथा ॥ पंढरीनाथा आवडलें ॥ ८९ ॥ मोकळा भिकारी जाहलों पाहें ॥ तरी पुढां पाठ घेतलीच आहे ॥ त्यासी सर्वथा करुणा न ये ॥ नागवण होये निश्च-

येंसी ॥ ९० ॥ भोंपळा घेऊनि प्यावें जीवन ॥ जेवाया देवें लाविलें पान ॥ तरी तुवां चित्त वाड करून ॥ सर्वस्वदान करावें ॥ ९१ ॥ ऐसा निश्चय करिसील चित्तीं ॥ तरी भले लोक तुजला मानिती ॥ उभयलोकीं वाढेल कीर्ती ॥ तो विचार चित्तीं ऐकें बो ॥ ९२ ॥ बरग पडोनि मेलीं गुरें ॥ भांडीं नेलीं म्हणावीं चोरें ॥ नाहीं जाहलीं मज लेंकुरें ॥ ऐसें कठिण अंतर करावें ॥ ९३ ॥ सर्वस्वें निरसोनियां आस ॥ कठिण करीं निजमानस ॥ उपमा समान वज्र जैसें ॥ धैर्य चित्तास करावें ॥ ९४ ॥ किंचित प्रपंचीं विषयसुख ॥ हें निःशेष थुंकोनि टाकितां देख ॥ परमानंदधणी पावसी अनेक ॥ जे सनकादिक इच्छिती ॥ ९५ ॥ हे सायास चुकती बहु मोटे ॥ भवबंधन आपोआप तुटे ॥ अंतीं सोहळे होती गोमटे ॥ वैकुंठवाटे चालतां ॥ ९६ ॥ तें सुख होईल उभयतांसी ॥ सोहळे करितील देवऋषी ॥ जडित विमानीं सन्मानेंसीं ॥ विष्णुदूत आपणासी बैसविती ॥ ९७ ॥ संत महंत सिद्ध किन्नर ॥ हे पुढें येतील सामोर ॥ विमानीं बैसवोनि सादर ॥ नाम-घोषगजर करितील ॥ ९८ ॥ मायबाप पडतां दृष्टी ॥ चरणीं घालूनि दृढ मिठी ॥ तेथें करून सुखगोष्टी ॥ असों निकटीं त्यांपासीं ॥ ९९ ॥ तें सर्व सुखाचें पुरावया कोड ॥ म्हणूनि चित्त करी तूं आपुलें वाड ॥ टाकूनि प्रपंचकाबाड ॥ परमार्थ दृढ साधावा ॥ १०० ॥ तूं देव पहावया सायास करीं ॥ नाशिवंताची आस न धरीं ॥ प्रातःकाळीं उठोनि झडकरी ॥ स्नान करीं अनुतापें ॥ १ ॥ सोमवार द्वादशी पर्वकाळ ॥ उदयीक पावला उत्तम काळ ॥ तरी मन शुद्ध करूनि उतावेळ ॥ ब्राह्मण सकळ पाचारीं ॥ २ ॥ संकल्प करूनि विधियुक्तीं ॥ गृह लुटवावें द्विजांहातीं ॥ पुढें मिळेल कैशा रीतीं ॥ हा उद्वेग चित्तीं करूं नको ॥ ३ ॥ मायबाप सखा जिवलग ॥ आपुले शिरीं आहे पांडुरंग ॥

तो सर्व पुरंवील निजांगें ॥ आपदा मग होऊं नेदी ॥ ४ ॥ तो सन्निध आहे मजजवळी ॥ परी दूर सांगतों पाल्हाळीं ॥ तूं देखोनी काय जाहलीस आंधळी ॥ चिन्हें सकळी न जाणसी ॥ ५ ॥ तो पांडुरंग हृदयीं प्रगटला देख ॥ म्हणूनि नावडे विषयसुख ॥ मनाच्या ओढी खुंटल्या अनेक ॥ सगुण स्वरूप न्याहाळितां ॥ ६ ॥ कनक कांता पदार्थ दोन ॥ जनांसी आवडती जीवाहून ॥ आम्हांसी ते पाषाणाहूनि हीन ॥ काय तूं खूण नेणसी ॥ ७ ॥ भूक तहान निश्चयें राहिली जाण ॥ सज्जन सोयरे आणि हें वन ॥ वृक्ष वल्ली आम्हांकारण ॥ दिसे समान सारिखेंचि ॥ ८ ॥ तो जवळी आहे रुक्मिणीपती ॥ म्हणोनि सुखदुःखें समान वाटती ॥ तोडोनि विषयांची निश्चल भ्रांती ॥ भजन प्रीतीं करावें ॥ ९ ॥ हें सद्गुरूचे कृपेंकरून ॥ देवें बोलविलें मजकारण ॥ त्वांही सादर केलें श्रवण ॥ तरी तैसेंच वर्तून दावीं कां ॥ ११० ॥ प्रसन्न होऊनि रुक्मिणीवर ॥ माझा तंव केला अंगीकार ॥ आतां सर्वथा आणिक विचार ॥ नव्हे साचार निश्चित ॥ ११ ॥ या वचनीं धरून विश्वास ॥ बळकट होईं घालूनि कास ॥ आतांच जाहला तुज उपदेश ॥ कांहीं सायास न करितां ॥ १२ ॥ करूनि सडा संमार्जन ॥ श्रृंगारीं तुळसीवृंदावन ॥ अतीत ब्राह्मणाचें पूजन ॥ सद्भावें जाण करावें ॥ १३ ॥ काया वाचा मनोभावेंसीं ॥ होईं वैष्णवांची अनन्य दासी ॥ विठ्ठलनाम निजप्रेमेंसीं ॥ अहर्निशीं घेईं कां ॥ १४ ॥ हा स्त्रीउपदेशाचा आशय जाण ॥ सहज आलें अनुसंधान ॥ अवलंबिलें असे संपूर्ण ॥ संतसज्जन जाणती ॥ १५ ॥ एकादश अभंग मुख्य देखा ॥ निजमुखें बोलिला वैष्णव तुका ॥ त्याजवर ओवीबद्ध टीका ॥ अर्थ नेटका निर्वाळिला ॥ १६ ॥ तीं मुळींचीं पदें पाहूनि निगुती ॥ अर्थ ध्यानासी आणिजे संतीं ॥ तेणेंप्रमाणें जे कां वर्तती ॥ ते तरती

निश्चितीं सभाग्य ॥ १७ ॥ निजकांतेचें करूनि मिष ॥ केला साधकांसी उपदेश ॥ जेणें तुटोनि भवबंधपाश ॥ शांतिसुख अनायासें येहाता ॥ १८ ॥ जैशी चातकाची देखोनि आर्ती ॥ गगनीं उगवला रोहिणीपती ॥ परी प्रकाश न वंची कोणाप्रती ॥ समान स्थिती तयाची ॥ १९ ॥ तेवीं कांतेसी उपदेश केला ॥ अर्थ नाहीं कोणासी वंचिला ॥ जो स्वभावें घेईल त्याजला ॥ असे ठेला स्वतःसिद्ध ॥ १२० ॥ तें वचन कानीं पडतां निश्चित ॥ तेणें द्रवलें तिचें चित्त ॥ मग अनुसंधानीं लावूनि प्रीत ॥ श्रवण करीत निजप्रेमें ॥ २१ ॥ आणिक श्रीहरीचे वर्णूनि गुण ॥ चार प्रहर केलें जागरण ॥ मग उदयासी येतां अरुण ॥ रुक्मिणीरमण ओंवाळिला ॥ २२ ॥ जाऊनि इंद्रायणीच्या तीरीं ॥ स्नान सारिलें ते अवसरीं ॥ कांता येऊनियां मंदिरीं ॥ द्विजांसी झडकरी पाचारिलें ॥ २३ ॥ चित्त शुद्ध करूनि निश्चितीं ॥ संकल्प केला निजप्रीतीं ॥ कांहीं कामना धरूनि चित्तीं ॥ मंदिर त्यांहातीं लुटविलें ॥ २४ ॥ भांडीं गुरें वस्त्र अन्न ॥ सकळ घेऊनि गेले ब्राह्मण ॥ तों एक जटिल संन्यासी येऊन ॥ मंदिर धुंडोन पाहतसे ॥ २५ ॥ तंव कांहींच न दिसे निश्चितीं ॥ मग चुलीची राख घेतली प्रीतीं ॥ सर्वांगासी चर्चिली विभूती ॥ देखूनि हांसती सकळिक ॥ २६ ॥ म्हणे चवदा रत्नें वांटिते वेळ ॥ शंकरासि लाधलें हलाहल ॥ तेवीं निर्दैवाचें प्राक्तन केवळ ॥ दिसोन आलें आपणासी ॥ २७ ॥ इतुकें करूनि ते अवसरीं ॥ तुकोबा चालिले बाहेरी ॥ तिळमात्र अन्न नाहीं घरीं ॥ म्हणोनि कांता उद्विग्न ॥ २८ ॥ कालची एकादशी निराहार ॥ क्षुधेनें पीडिती मुलेंलेंकुरें ॥ म्हणूनि अंतरीं चिंतातुर ॥ म्हणे कैसा विचार करावा ॥ २९ ॥ तंव गांवची महारीण होती दीन ॥ तिचें रूप धरीत माता रुक्मिण ॥ तुकयाचें सत्त्व पहावयाकारण ॥ वस्त्र मागोन

ाहावें ॥ १३० ॥ ऐसें म्हणोनि विश्वजननी ॥ बाहेर निघाली तये
्षणीं ॥ तुकयातें देखोनि नयनीं ॥ काय बोलिली तयासी ॥ ६१ ॥
र लुटविलें विप्रांहातीं ॥ मी तुमच्या घरची महारीण राबती ॥
ांहीं उरलें असेल तयां हातीं ॥ तरी द्यावें मजप्रती मायबापा
। ३२ ॥ तों वाडियामागून परसाआंत ॥ लुगडें वाळतां
ेखिलें तेथ ॥ तें तुकयानें ओढोनि त्वरित ॥ तिज-
ारणें दीधलें ॥ ३३ ॥ गांवींचे लोक देखोनि मनीं ॥ विस्मित
ाहले तये क्षणीं ॥ म्हणती यानें विपरीत केली करणी ॥ घातलें
ाणी संसारा ॥ ३४ ॥ त्यांणीं घरीं सांगतां मात ॥ ऐकोनि कांता
ोधभरित ॥ म्हणे प्राक्तन माझें विपरीत ॥ जाहली लोकांत
पकीर्ति ॥ ३५ ॥ वाड्यांत मिळाल्या शेजारिणी ॥ त्यांजवळ नेतसे
ाऱ्हाणीं ॥ दुःख कोणा सांगों साजणी ॥ तळमळ मनीं करी-
सें ॥ ३६ ॥ दोन मासपर्यंत जाण ॥ भ्रतारें त्यागिलें मजकारण ॥
रतोनि घरीं न येच जाण ॥ गांवांत असोन साजणी ॥ ३७ ॥
ानापरींचे त्रिविध जन ॥ मागें पुढें बोलती न्यून ॥ म्हणोनि काल
मजावून ॥ घरासी घेऊन मी आलें ॥ ३८ ॥ रात्रीं मांडोनि
ीर्तन ॥ त्यानें मज घातलें मोहन ॥ नानापरींचे दृष्टांत देऊन ॥
ोलिला वचन तें ऐका ॥ ३९ ॥ मायबाप विठ्ठलरखुमाई ॥ त्यांचे
ाय आठवीत जाई ॥ तीं अन्नवस्त्र देतील समयीं ॥ सायास कांहीं
 करितां ॥ १४० ॥ त्यांचा विश्वास म्यां धरून ॥ सकळ लुट-
ेलें धनधान्य ॥ भांडीं गुरें सर्व देऊन ॥ उदास होऊन बैसलें
। ४१ ॥ नेसतें वस्त्र आणिलें धुवोनी ॥ तें परसांत वाळूं घातलें
ाजणी ॥ तें महारिणीस दिधलें ओढूनी ॥ तुम्हीं तों नयनीं देखिलें
। ४२ ॥ मी करूनियां मोलमजुरी ॥ लेंकुरें पोशीत होतें बरीं ॥

त्याचें तों बाहेर बऱ्या परी ॥ चाले परभारीं प्रारब्धें ॥ ४३ ॥ यापरी काळ कडे लागतां ॥ म्यां वायांचि बुद्धि केली वृथा ॥ घरासी आणिलें प्राणनाथा ॥ मुकलें अर्था सर्वस्वें ॥ ४४ ॥ पाय आठवितां निशिदिनीं ॥ अन्नवस्त्र देतील मजलागोनी ॥ ऐसा विश्वास त्यांचे वचनीं ॥ आपुले मनीं जाणिला ॥ ४५ ॥ चिंतन केलें दोन तीन वेळ ॥ तों दरिद्र पातलें तत्काळ ॥ लेंकुरें करिती तळमळ ॥ अन्न न मिळे म्हणोनी ॥ ४६ ॥ ऐसा पायांनीं केला घात ॥ म्हणोनि संतप्त जाहलें चित्त ॥ तरी आतां मी जाऊन देउळांत ॥ करीन विपरीत तें ऐका ॥ ४७ ॥ घरधनी पायांची वर्णिती थोरी ॥ ते फोडूनि टाकीन ये अवसरीं ॥ मग पाषाण घेऊन मस्तकावरी ॥ चालिली लवकरी देउळांत ॥ ४८ ॥ म्हणे रुक्मिणीपतीचें चरण ॥ ब्रह्मादिक करिती ज्यांचें ध्यान ॥ नारदादि करिती ज्यांचें गायन ॥ वर्णिती थोरपण जयांचें ॥ ४९ ॥ त्यांवरी पाषाण घालोनि पाहें ॥ मी फोडूनि टाकीन लवलाहें ॥ ऐसा चित्तीं करून निश्चय ॥ महाद्वारासी जातसे ॥ १५० ॥ हें जाणोनि पंढरीनाथ ॥ देउळामाजी थरथरां कांपत ॥ तो भक्तवत्सल दीननाथ ॥ लीला दावीत दासांसी ॥ ५१ ॥ जेणें मत्स्यरूप धरूनी ॥ शंखासुर मारिला समुद्रजीवनीं ॥ तो तुकयाचे स्त्रियेस भिऊनी ॥ चक्रपाणी कांपत ॥ ५२ ॥ जो कूर्म होऊनि घननीळ ॥ पाठीवरी धरिला मंदराचळ ॥ तो सप्रेमभक्तीचें देखोनि बळ ॥ कांपे चळचळ निजांगें ॥ ५३ ॥ जो वराहरूप धरून श्रीहरी ॥ वसुधा धरिली दाढेवरी ॥ तो लीलानाटकी वैकुंठविहारी ॥ निजभक्तांसी भीतसे ॥ ५४ ॥ जो बळेंच प्रगटोनि स्तंभाआंत ॥ हिरण्यकशिपु विदारिला दैत्य ॥ तो निजभक्ताचें भय बहुत ॥ वागवी चित्तांत आपुल्या ॥ ५५ ॥ दानाभिमानें

फुगला बळी ॥ मग त्रिविक्रम होऊनि वनमाळी ॥ तयासी घातलें पाताळीं ॥ तो कांपत देउळीं थरथरां ॥ ५६ ॥ जो रेणुकेच्या उदरासी येऊनी ॥ निःक्षत्रिय केली सकळ अवनी ॥ तो निजभक्तासीं चक्रपाणी ॥ भयभीत होऊनि कांपत ॥ ५७ ॥ सकळ सुरवरांसी जिंकिलें जेणें ॥ तो दशकंठ निवटिला रघुनंदनें ॥ ऐसा प्रतापी भक्तभूषण ॥ भयेंकरून कांपत ॥ ५८ ॥ कंस चाणूर महादैत्य ॥ स्वहस्तें निवटी श्रीकृष्णनाथ ॥ तो तुकयाचे कांतेचें भय बहुत ॥ असे वागवीत मानसीं ॥ ५९ ॥ घर्मे डवडवला चक्रपाणी ॥ देखोनि विस्मित जाहली रुक्मिणी ॥ म्हणे कवण चिंता उपजली मनीं ॥ मजलागोनि सांगावें ॥ १६० ॥ यावरी म्हणे चक्रपाणी ॥ आजि चिंता उद्भवली आमुचे मनीं ॥ जे तुकयाची कांता सक्रोध होउनी ॥ पाषाण घेऊनि येतसे ॥ ६१ ॥ निजकरें फोडावे आमुचे चरण ॥ ऐसा निश्चय केला तिनें ॥ यासी उपाय करावा कवण ॥ हें मजलागोन कळेना ॥ ६२ ॥ रुक्मिणी म्हणे संकट काये ॥ येथोनि पळावें लवलाहें ॥ एवढी वेळ चुकवोनि पाहें ॥ परतोनि यावें मागुती ॥ ६३ ॥ यावरी म्हणे जगज्जीवन ॥ आपुले तें स्वाधीन नाहीं जाण ॥ मी जाहलों असें भक्तांआधीन ॥ त्यांचे आज्ञेनें वर्ततसें ॥ ६४ ॥ बाळक पदर धरितां पाहें ॥ पित्यासी बळें सोडवितां न ये ॥ तो निजमोहें थोकलाचि राहे ॥ तैसेंच आम्हां हें जाहलें ॥ ६५ ॥ मिलिंद निजमुखें कोरी काष्ठासी ॥ परी कमळिणी सर्वथा न फोडवे त्यासी ॥ अडकला राहे निजमोहेंसीं ॥ गति तैसी मज जाहली ॥ ६६ ॥ आपण गेलिया येथून ॥ तरी तुकयाचें मोडेल मन ॥ मूर्ति न देखतां सगुण ॥ तो देईल प्राण आपुला ॥ ६७ ॥ त्याचें मनोगत राखिलें जरी ॥ तरी कांता येऊनि ये अवसरीं ॥ पाषाण घालील पायांवरी ॥

हे चिंता अंतरीं मज वाटे ॥ ६८ ॥ इकडे पत्नी सक्रोध मानसीं ॥ सत्वर येतसे देउळासी ॥ देखोनि तुका पुसे तिजसी ॥ कोठें जातेसी मज सांग ॥ ६९ ॥ येरी तयासी उत्तर देत ॥ तुझा पिता रुक्मिणीकांत ॥ तेणेंचि माझा केला घात ॥ पाय चित्तांत आठवितां ॥ १७० ॥ तुवां उपदेशिलें मजकारण ॥ आठवीत जाई त्याचे चरण ॥ मग पुरवील वस्त्र अन्न ॥ तें म्यां वचन ऐकिलें ॥ ७१ ॥ विश्वासें वचन धरूनि चित्तीं ॥ घर लुटविलें विप्रांहातीं ॥ मुलेंलेंकुरें अनाथ दिसती ॥ अन्नवस्त्र त्यांप्रती मिळेना ॥ ७२ ॥ ऐसा पायांनीं केला घात ॥ म्हणोनि चालिलें देउळांत ॥ त्यांवरी पाषाण घालोनि त्वरित ॥ फोडीन निश्चित ये समयीं ॥ ७३ ॥ ऐसी पत्नीची ऐकोनि मात ॥ मोहें द्रवलें तुकयाचें चित्त ॥ म्हणे इनें तों मांडिलें विपरीत ॥ म्हणोनि अश्रुपात लोटले ॥ ७४ ॥ तरी इजसवेंचि जाऊनि आपण ॥ नम्र बोलावें विनीत वचन ॥ कीं क्रोध नावरेच तुजकारण ॥ तरी मजवरी पाषाण घालीं कां ॥ ७५ ॥ ऐसें विचारूनि चित्तीं ॥ मागूनि चालिले सत्वरगती ॥ हें जाणोनियां वैकुंठपती ॥ चिंता करिती मानसीं ॥ ७६ ॥ पहिले थरथरां होते कांपत ॥ ते उगेच राहिले निवांत ॥ देखोनि रुक्मिणी झाली विस्मित ॥ मग विनोदें पुसत देवासी ॥ ७७ ॥ म्हणे देवाधिदेवा पंढरीनाथा ॥ मघां चळचळां कांपत होतां ॥ आतां आश्रय जाहला कोणता ॥ हा संशय चित्ता वाटतसे ॥ ७८ ॥ कोण तुमचा प्राणसखा ॥ जिवलग पातला पाठिराखा ॥ म्हणोनियां वैकुंठनायका ॥ निवांत राहिलां ये समयीं ॥ ७९ ॥ मग म्हणे दीनदयाळ ॥ आणिकचि अरिष्ट ओढवलें सबळ ॥ तुकया आपुला भक्त प्रेमळ ॥ आली कळकळ माझी तया ॥ १८० ॥ कांता फोडील आपुले चरण ॥

म्हणोनि मागें येतसे जाण ॥ कीं पत्नीस ऐसें बोलावें वचन ॥ घालीं पाषाण मजवरी ॥ ८१ ॥ म्हणोनि आपुलें दुःख विसरून ॥ त्याचीच चिंता वाटते दारुण ॥ यास उपाय करावा कवण ॥ हें मजकारण कळेना ॥ ८२ ॥ तिची तों आहे विरोधभक्ती ॥ विवेक विचार नाहीं चित्तीं ॥ अवचित मारील तुकयाप्रती ॥ हे चिंता मजप्रती वाटते ॥ ८३ ॥ पाषाण घालील पायांवरी ॥ मग त्याचे पाय दुखले जरी ॥ तरी कीर्तनीं नाचेल कैशापरी ॥ हे चिंता अंतरीं मज वाटे ॥ ८४ ॥ यावरी रुक्मिणी उत्तर देत ॥ तुम्ही कां उद्विग्न जाहलेति व्यर्थ ॥ जयावरी आपुली दया किंचित ॥ कळिकाळ कांपत तयासी ॥ ८५ ॥ जयासी प्रसन्न जाहला भास्कर ॥ त्यावरी सर्वथा न पडे अंधार ॥ कीं वत्सीस मिळालिया क्षीरसागर ॥ तो सर्वदा क्षुधातुर राहेना ॥ ८६ ॥ साधलिया अमृतसंजीवनी ॥ तरी रोग न बाधी त्यालागोनी ॥ तेवीं तुमचें नाम तुकयाच्या वदनीं ॥ असतां चक्रपाणी भय काय ॥ ८७ ॥ ऐसें बोलतां जगन्माता ॥ तों आली अवचित तुकयाची कांता ॥ पाषाण ठेविला मस्तकावरुता ॥ देखिलें येतां महाद्वारीं ॥ ८८ ॥ ती अंतरीं प्रवेशतां सत्वर ॥ रुक्मिणीनें आड केलें द्वार ॥ तुकयासी ठेविलें बाहेर ॥ काय निमित्त पैं तेंव्हां ॥ ८९ ॥ कांता संतापोन अंतरीं ॥ पाषाण घालील तयावरी ॥ म्हणोनि येतांच भीतरी ॥ तुकयासी बाहेरी कोंडिलें ॥ १९० ॥ यापरी चुकवोनि आघात ॥ भक्तांसी रक्षी पंढरीनाथ ॥ जैसें बाळक अग्नीसी धरूं जात ॥ तंव माता रक्षीत तयासी ॥ ९१ ॥ तुकयाचे चित्तीं ऐसा भाव ॥ जे कांतेसी पावला पंढरीराव ॥ मजवरी रुसला रुक्मिणीराव ॥ म्हणूनि द्वार आड केलें ॥ ९२ ॥ कीर्तनीं जागला घनसांवळा ॥ आतां विश्रांति घ्यावया निद्रित जाहला ॥ मी जाऊन तेथें करीन गलबला ॥ कोंडिलें

मजला यासाठीं ॥ ९३ ॥ आतां परतोन जावें घरा ॥ सर्वथा न करावा उजगरा ॥ किंवा राग आला रुक्मिणीवरा ॥ आड केलें द्वारा यासाठीं ॥ ९४ ॥ कीं कांतेची भक्ति विशेष जाण ॥ तीस अपंगी जगज्जीवन ॥ मज बाहेर दिधलें टाकून ॥ म्हणोनि रुदन करीतसे ॥ ९५ ॥ असो ते समयीं तिचें प्रेम वर्णितां ॥ तरी ग्रंथीं विशेष वाढेल कथा ॥ पायांवरी पाषाण उचलोनी घालितां ॥ तंव रुक्मिणी माता बोलिली ॥ ९६ ॥ काय अपराध केला जगज्जीवनें ॥ म्हणोनि फोडितेसी याचे चरण ॥ तें सांग वो मजकारण ॥ संकोच मनीं न धरितां ॥ ९७ ॥ येरी म्हणे ऐक वो माये ॥ एकदोन वेळां आठविले पाये ॥ तों मंदिरीं न दिसे एकही ठाये ॥ संसारसोये मोडिली ॥ ९८ ॥ घरीं नाहीं वस्त्र अन्न ॥ मुलें लेंकुरें करिती रुदन ॥ म्हणोनि संतापलें मन ॥ फोडितें चरण यासाठीं ॥ ९९ ॥ पायांनीं केला आमुचा घात ॥ म्हणोनि संतप्त जाहलें चित्त ॥ ऐसी ऐकोनि तियेची मात ॥ रुक्मिणी बोलत तियेसी ॥ २०० ॥ जें संसारांत पडेल उणें ॥ मी निजांगें पुरवीन तुजकारणें ॥ मग साडी चोळी मूठभर होन ॥ तिजकारणें दीधले ॥ १ ॥ हें देतां पावली समाधान ॥ मग पाषाण दिधला टाकून ॥ वस्त्र करोनि परिधान ॥ धरिले चरण रुक्मिणीचे ॥ २ ॥ मूठभर होन घेऊन हातीं ॥ बाहेर आली सत्वरगती ॥ पुढिले अध्यायीं रसोत्पत्ती ॥ तरी सादर श्रोतीं परिसावें ॥ ३ ॥ हृदयीं बैसोनि रुक्मिणीकांत ॥ सर्वेंचि वदवीतसे यथार्थ ॥ महीपति त्याचा मुद्रांकित ॥ शरणागत दासांचा ॥ ४ ॥ स्वस्ति श्रीभक्तविजय ग्रंथ ॥ ऐकतां तुष्टेल जगन्नाथ ॥ प्रेमळ ऐका भाविक भक्त ॥ एकोनपंचाशत्तमोध्याय रसाळ हा ॥ २०५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ ओंव्या ॥ २०५ ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीप्रलंबासुरमर्दनाय नमः ॥ जय जय कृपासागरा चक्रपाणी ॥ भवभंजना सायुज्यदानी ॥ मज कृपादृष्टीं विलोकुनी ॥ कर्मापासूनि सोडवावें ॥ १ ॥ आशापाश तोडूनि श्रीपती ॥ करीं निरपेक्ष उदासवृत्ती ॥ तुझे भजनीं लागे प्रीती ॥ ऐसें श्रीपति करावें ॥ २ ॥ कामक्रोधादि मद मत्सर ॥ देहीं उठती अनिवार ॥ तूं कृपा करिसी जैं शार्ङ्गधर ॥ शुद्ध अंतर तैं होय ॥ ३ ॥ लौकिक प्रतिष्ठा मानाभिमान ॥ हें पुढें ओढवलें महाविघ्न ॥ तेथेंचि लावूनियां मन ॥ तुझें चिंतन घडेना ॥ ४ ॥ ऐसे अवगुण असोनि अंतरीं ॥ मी तुझा म्हणवितों लोकाचारीं ॥ हाचि अभिमान धरूनि श्रीहरी ॥ मज उद्धरीं पतितासी ॥ ५ ॥ चंचळ मन हें अनिवार ॥ तुझे चरणीं असावें स्थिर ॥ हेंचि इच्छितों निरंतर ॥ जाणसी अंतर पांडुरंगा ॥ ६ ॥ हस्त इच्छिती तुझें अर्चन ॥ षोडशोपचारें करावें पूजन ॥ त्यांचें करावें समाधान ॥ मनोरथ पूर्ण करावे ॥ ७ ॥ समदृष्टीनें चराचरभूतीं ॥ तुजचि पहावें वैकुंठपती ॥ विकल्प द्वेष हे नयेती चित्तीं ॥ ऐसें श्रीपति करावें ॥ ८ ॥ चरणांचें सार्थक तरीच जाण ॥ तुझे यात्रेस करावें गमन ॥ नृत्य करावें निर्लज्ज होऊन ॥ देहाभिमान टाकोनी ॥ ९ ॥ तुझे निजभक्त रुक्मिणीपती ॥ त्यांचीच मुखें वर्णावी कीर्ती ॥ हे इच्छा धरूनि चित्तीं ॥ विनवितों तुजप्रति दयाळा ॥ १० ॥ हे म्यां अघटित घेतली आळ ॥ तूं निरूपण वदवीं रसाळ ॥ जें श्रवणीं पडतांचि तत्काळ ॥ श्रोते प्रेमळ संतोषती ॥ ११ ॥ मागील अध्यायीं शेवटीं कथा ॥ देउळीं गेली तुकयाची कांता ॥ प्रसन्न होऊनि रुक्मिणी माता ॥ बोलिली अवचितां निजभाग्यें ॥ १२ ॥ साडी चोळी मुष्टीभरी होन ॥ देतांचि वाटलें समाधान ॥ पाषाणमूर्ति बोलिली वचन ॥ हें अघटित देखोन विस्मित ॥ १३ ॥

परिधान करूनि दिव्यांबर ॥ रुक्मिणीस केला नमस्कार ॥ बाहेर येतांचि सत्वर ॥ कळलें साचार तुकयासी ॥ १४ ॥ मग कांतेसी काय वचन बोलत ॥ तुवां उतावेळ केलें चित्त ॥ तेणें अंतरलें परमार्थहित ॥ ऐक ते मात निजकर्णीं ॥ १५ ॥ उभेंचि शेत मोडितां जाण ॥ पुढें राशीस येतसे उणेपण ॥ कीं दुधावरील साय भक्षितां जाण ॥ मग नवनीत कोठून येईल ॥ १६ ॥ नातरी ऊंस उभाचि चोखिला सारा ॥ तरी कोठूनि लाभेल शर्करा ॥ ऐसा विवेक करूनि अंतरा ॥ होन द्विजवरां वांटावे ॥ १७ ॥ काचमणियाचा त्याग करितां ॥ मुक्ताफळ येतसे हाता ॥ तरी धीर धरून निजचित्ता ॥ उदास आतां त्वां व्हावें ॥ १८ ॥ खद्यौत त्यागितां मनांतूनी ॥ गृहासी येतसे वासरमणी ॥ कीं थिल्लर टाकितां डावलोनी ॥ पयोब्धि येऊनि भेटेल ॥ १९ ॥ गुंजाहार न लेतां वाडेंकोडें ॥ तरी अनर्घ्य रत्नें लाधती पुढें ॥ कीं न धरितां औषधाची चाड ॥ तरी सुधारस गोड लाधेल कीं ॥२०॥ न करितां सिद्धीचा आदरू ॥ तरी निजभाग्यें भेटतो कल्पतरू ॥ दुर्जनत्यागें भेटती सद्गुरू ॥ तरी कां न अव्हेरू करावा ॥ २१ ॥ तेवीं ऋद्धि सिद्धि संपत्ति धन ॥ त्यांस त्यागितां मनांतून ॥ तरी तूं पावसी सायुज्यसदन ॥ जें इच्छिती सुरगण मानसीं ॥ २२ ॥ ऐसीं ऐकोनि दृष्टांतवचनें ॥ कांता पावली समाधान ॥ तत्काळ विप्र बोलावून ॥ वांटिले होन तयांसी ॥ २३ ॥ सांडोनियां लोभ ममता ॥ हृदयीं आठवी श्रीपंढरीनाथा ॥ पुढें वर्तली अपूर्व कथा ॥ ते सावधानता ऐकावी ॥२४॥ तुकयाची प्रशंसा जाहली फार ॥ मानूं लागले थोरथोर ॥ कीं याजसवें जेवितो रुक्मिणीवर ॥ लोक परस्पर बोलती ॥ २५ ॥ हें चिंचवडीं देवांसी कळतां जाण ॥ असह्य जाहलें त्यांजकारण ॥ म्हणती आम्हीं प्रतिष्ठित ब्राह्मण ॥ गणपति प्रसन्न केला कीं ॥ २६ ॥

आणि तुकया जातीचा शूद्रवाणी ॥ त्यासवें जेवितो चक्रपाणी ॥ हे तंव अघटित दिसे करणी ॥ आली दिसोनि यथार्थ ॥ २७ ॥ तरी तयासी बोलावूनि येथ ॥ दृष्टीस पहावी कांहीं प्रचीत ॥ ऐसें विचारिलें चित्तांत ॥ तो कळला वृत्तांत तुकयासी ॥ २८ ॥ म्हणे चिंचवडींचे थोर ब्राह्मण ॥ त्यांनीं केलें आपुलें स्मरण ॥ तरी आतां तेथवरी जाऊन ॥ ध्यावें दर्शन तयांचें ॥ २९ ॥ ऐसी कल्पना धरूनि पोटीं ॥ सत्वर निघाला उठाउठी ॥ मग मूषकवाहनाची घेऊनि भेटी ॥ बैसले निकटीं देवांचे ॥ ३० ॥ तुकयासी देखोनियां त्यांनीं ॥ म्हणती इच्छित होतों जें मनीं ॥ तें अनायासें आलें घडोनी ॥ चमत्कार नयनीं पहावा ॥ ३१ ॥ तों सहज पातला मध्यान्ह काळ ॥ पंक्तीस बैसले ब्राह्मण सकळ ॥ तुकयासी पात्र ते वेळ ॥ वाढिलें तत्काळ तयांनीं ॥ ३२ ॥ देवांसी म्हणे वैष्णवभक्त ॥ आमुचा सांगाती पंढरीनाथ ॥ तो भोजनासी येईल येथ ॥ तरी आणिक पात्र मांडावें ॥ ३३ ॥ आणखी तुम्हींही प्रार्थूनि गजवदनासी ॥ येथें आणावें भोजनासी ॥ वचन ऐकतांच मानसीं ॥ आश्चर्य देवांसी वाटलें ॥ ३४ ॥ म्हणती हें तों अघटित जाहलें ॥ आमुचे मंत्र आम्हांस फळले ॥ मग देव्हारां जाऊन ते वेळे ॥ करकमळ जोडिले तयासी ॥ ३५ ॥ नानापरींची केली स्तुती ॥ परी भोजनासी नयेच गणपती ॥ काय कराव्या शास्त्रयुक्ती ॥ एक सद्भक्ती नसतांचि ॥ ३६ ॥ बाह्यात्कारें केलें पूजन ॥ अंतरीं विकल्पें भरलें मन ॥ तरी कोणतेंही दैवत नव्हे प्रसन्न ॥ दुश्चित मन असतां पैं ॥ ३७ ॥ गजेंद्रासी पावला वैकुंठपती ॥ तो काय जाणे शास्त्रव्युत्पत्ती ॥ गोपी उद्धरिल्या नेणों किती ॥ सप्रेमभक्ति देखोनी ॥ ३८ ॥ विधियुक्त याज्ञिक कर्मठपण ॥ त्यांसी अंतरले श्रीकृष्णचरण ॥ ऋषिपत्न्यांनीं

नेलें अन्न ॥ त्यांसी जगज्जीवन भेटला ॥ ३९ ॥ भोळे भाविक भक्त प्रेमळ ॥ त्यांस्वाधीन जाह्ला दीनदयाळ ॥ ढुंबली घालितांच गोपाळ ॥ तें ऐके घननीळ निजप्रीतीं ॥ ४० ॥ असो आतां बोलून काय फार ॥ हें वर्म जाणती वैष्णववीर ॥ जिहीं शुद्ध करूनि अंतर ॥ शार्ङ्गधर वश केला ॥ ४१ ॥ मग ब्राह्मण म्हणती तुकयासी ॥ पाषाणमूर्ति जेवील कैसी ॥ नैवेद्य दाखवितां गजवदनासी ॥ सुवास तयासी जातसे ॥ ४२ ॥ यावरी बोले वैष्णववीर ॥ मूर्तीमाजी नाहीं विघ्नहर ॥ तुम्हांसी संशय असला जर ॥ तरी ऐका विचार निजकर्णीं ॥ ४३ ॥ समुद्रजीवनीं करितां स्नान ॥ एक भक्त बुडत होता जाण ॥ त्याणें एकदंताचें केलें स्तवन ॥ करीं धांवणें म्हणोनी ॥ ४४ ॥ तयासी काढावया त्वरित ॥ विनायक गेले असती तेथ ॥ याची पहाणें असेल प्रचीत ॥ तरी बैसावें मुहूर्त क्षणभरी ॥ ४५ ॥ देव्हारीं नसतां गजवदनासी ॥ तुम्हीं नैवेद्य दाखविला कवणासी ॥ ऐसें बोलतां तुकयासीं ॥ आश्चर्य देवांसी वाटलें ॥ ४६ ॥ तों एक मुहूर्त लोटतांचि त्यांनीं ॥ कौतुक देखिलें आपुले नयनीं ॥ गणपतीची मूर्ति सिंहासनीं ॥ उदकें भरूनी निथळत ॥ ४७ ॥ पीतांबर पिळोनि पाहतां जाण ॥ तों क्षार लागलें समुद्रजीवन ॥ हा चमत्कार अद्भुत गहन ॥ देखोन आश्चर्य करिताती ॥ ४८ ॥ तुकयासी पुसती द्विजवर ॥ किमर्थ भिजलासे पीतांबर ॥ यावरी म्हणे वैष्णववीर ॥ आले विघ्नहर ये ठायीं ॥ ४९ ॥ निजभक्त बुडतां जाण ॥ त्याचें सत्वर केलें धांवण ॥ ऐलतीरीं बैसवोनी त्याकारण ॥ गजवदन आले कीं ॥ ५० ॥ ऐकोनि तुकयाची वचनोक्ती ॥ देव निजमनीं आश्चर्य करिती ॥ म्हणे विष्णुभक्तांची अद्भुत स्थिती ॥ आपणांप्रति नेणवे ॥ ५१ ॥ पुढती ब्राह्मण काय बोलत ॥ समुद्रासी

गेले पार्वतीसुत ॥ हें तुम्हांस कैसें जाहलें श्रुत ॥ साक्षात प्रचीत दाखविली ॥ ५२ ॥ परस्परें आपण उत्तर देती ॥ याणें आराधिला रुक्मिणीपती ॥ सकळ देवतांची गती ॥ आलीसे हातीं यास्तव ॥ ५३ ॥ प्रसन्न होतां सूर्यनारायण ॥ काय एक न दिसे त्याकारण ॥ कां कल्पतरूचें देखतां उद्यान ॥ कामना अपूर्ण न राहे ॥ ५४ ॥ क्षीरसागरीं रहिवास केला ॥ तरी क्षुधेतृषेचा उद्वेग गेला ॥ नातरी अमृतसिद्धी येतां साधकाला ॥ औषधी त्याजला न लागती ॥ ५५ ॥ तेवीं कृपा करितां पंढरीनाथ ॥ तयासी ओळंगती सकळ दैवतें ॥ जेवीं विलोकितां रोहिणीपतीतें ॥ उडुगण समस्त दिसती ॥५६॥ यापरी परस्परें बोलती देव ॥ ऐकोनि म्हणे तुका वैष्णव ॥ भोजनासी आले पंढरीराव ॥ अंतरीं सद्भाव देखोनी ॥ ५७ ॥ तुम्हीं प्रार्थोनि गजवदन ॥ तयासी साक्षात जेववा अन्न ॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ देवीं मौन धरियेलें ॥ ५८ ॥ मग तुकयासी म्हणती द्विजवर ॥ तुम्हीं प्रार्थिला रुक्मिणीवर ॥ त्याचे पंक्तीस विघ्नहर ॥ जेववा साचार निजप्रीतीं ॥ ५९ ॥ अवश्य म्हणोनि तये क्षणीं ॥ पात्र वाढिलें त्यांजकडोनी ॥ मग गणपतीच्या सान्निध येवोनी ॥ कर जोडोनि विनवीत ॥ ६० ॥ जयजयाजी लंबोदरा ॥ चौदा विद्यांच्या सागरा ॥ तुझें तांडव देखोनि उमावरा ॥ हर्ष अंतरा न समाये ॥ ६१ ॥ तुझी होतांचि कृपादृष्टी ॥ विघ्नें पळती उठाउठी ॥ सप्रेम अनुभव घेतां दिठी ॥ तुटे फांसोटी भवबंध ॥ ६२ ॥ आतां प्रार्थितों तुजकारण ॥ नैवेद्य भक्षावा प्रीतीकरून ॥ वचन ऐकोनि गजवदन ॥ करिती भोजन तेधवां ॥ ६३ ॥ एके पात्रीं रुक्मिणीरमण ॥ त्या सान्निध गजवदन ॥ तुकयाचे भक्तीस्तव जाण ॥ बैसले येऊन उभयतां ॥ ६४ ॥ परी कोणासी न दिसती नयनीं ॥ अन्न तर सरलें पात्रांवरूनी ॥ हा चमत्कार देखोनि मनीं ॥ आश्चर्य वाटलें देवांसी

॥ ६५ ॥ म्हणती आम्हीं लंबोदर उपासिला ॥ परी साक्षात् नाहीं कधीं जेविला ॥ तुकयानें अघटित दाविली लीला ॥ नवल सकळां वाटलें ॥ ६६ ॥ गणपति जेविला अपूर्व काये ॥ हें अघटित सर्वथा म्हणों नये ॥ साक्षात आले पंढरीराये ॥ जें दुर्लभ होये साधकां ॥ ६७ ॥ पयोब्धीच जाहलिया स्वाधीन ॥ मग सरितांचा पाड कोण ॥ तेवीं कृपा करितां रुक्मिणीरमण ॥ दैवतें संपूर्ण तुष्टती ॥ ६८ ॥ कामधेनु गृहासी येतां पाहीं ॥ तेथें सहजचि येती इतर गायी ॥ कीं रोहिणीवराच्या दर्शनें पाहीं ॥ नक्षत्रें कायी न दिसती ॥ ६९ ॥ वज्रासनीं बैसोनि हटीं ॥ योगियांसी ज्याची दुर्लभ भेटी ॥ तो सगुण साकार जगजेठी ॥ पावतो संकटीं निजदासां ॥ ७० ॥ यापरी ब्रह्मण स्तविती देखा ॥ म्हणती वैष्णवभक्त प्रेमळ तुका ॥ स्वाधीन केलें वैकुंठनायका ॥ जो ब्रह्मादिकां दुर्लभ ॥ ७१ ॥ मग करशुद्धी तांबूल घेऊन ॥ तेथें मांडिलें हरिकीर्तन ॥ एक रात्र तेथें राहून ॥ चालिले पुसोन निजग्रामा ॥ ७२ ॥ गजवदनासी करोनि नमन ॥ देवांसी विनवी कर जोडून ॥ आतां देहूस जावया- कारण ॥ आज्ञा देणें मजलागीं ॥ ७३ ॥ यावरी ब्राह्मण बोलती वचन ॥ पुन्हां मागुती द्यावें दर्शन ॥ निरोप येईल तुम्हांकारण ॥ तैं करावें आगमन निजप्रीतीं ॥ ७४ ॥ अवश्य म्हणोनि वैष्णव भक्त ॥ तेथोनि चालिले अति त्वरित ॥ ग्रामासमीप येतां निश्चित ॥ तों एक माळी अकस्मात पातला ॥ ७५ ॥ तुकयासी करोनि साष्टांग नमन ॥ कर जोडोनि बोले वचन ॥ मळियांत गुऱ्हाळ लागलें जाण ॥ तेथवरी आगमन करावें ॥ ७५ ॥ सद्भाव देखोनि त्याचे अंतरीं ॥ अवश्य म्हणती ते अवसरीं ॥ तुकयासी येतां मळियाभीतरी ॥ माळी अंतरीं संतोषला ॥ ७७ ॥ बैसावयासी ते वेळे ॥ घडी

करोनि टाकिलें चवाळें ॥ म्हणे धन्य भाग्य माझें सफळ ॥ जे दीन-दयाळ पातले ॥ ७८ ॥ इक्षुदंड मोडोनी लवडसवडी ॥ काढोनि दिधली मध्यकांडी ॥ परि तुकयास तेथींची गोडी ॥ न रुचे चोखडी सर्वथा ॥ ७९ ॥ जेणें ब्रह्मरस सेविला प्रीतीं ॥ त्यास इतर सर्वथा नावडती ॥ जेवीं दिनकराचे लागतां संगती ॥ दीपक दिसती तेज-हीन ॥ ८० ॥ जो सिद्धांतज्ञानीं मग्न आहे ॥ तो पाखंड कर्णी ऐकेल काय ॥ कामधेनुऐसी जोडल्या गाय ॥ मग अजापालन कासया ॥ ८१ ॥ तेवीं नामसुधेची लागतां गोडी ॥ इतरांसी येत अनावडी ॥ म्हणोनि इक्षुदंडाची चोखडी ॥ चवी धडपुडी जाणेना ॥ ८२ ॥ परि माळियाचा सद्भाव देखोन ॥ तेथें बैसले निवांत क्षण ॥ त्याणें सोज्वळ पात्र उटोन ॥ रस आणोन पाजिला ॥ ८३ ॥ जाते समयीं तुकयाप्रती ॥ माळी कर जोडोनि करी विनंती ॥ कीं ऊंस न्यावे लेंकुरांप्रती ॥ मंदिराप्रती आपुल्या ॥ ८४ ॥ आकळून इक्षुदंड एके ठायीं ॥ बांधोन दिधले ते समयीं ॥ ते खांद्यावरी घेऊनि लवलाहीं ॥ तेथोन सत्वरी चालिले ॥ ८५ ॥ देहूस प्रवेशतां तुकयास ॥ गांवींचीं लेंकुरें मागती ऊंस ॥ तेव्हां आपुलें परावें न दिसे त्यास ॥ देतसे ऊंस त्यांप्रती ॥ ८६ ॥ जैसा घरधनी आणि तस्कर ॥ दिपकासी सारिखे निरंतर ॥ कीं दरिद्री आणि नृपवर ॥ यांसी प्रकाशे दिनकर सारिखा ॥ ८७ ॥ कीं चूतवृक्ष आणि बाभूळ जाण ॥ गंगातीरीं उगवलीं दोघें जाण ॥ परी तिजला अधिक उणें ॥ न वाटे जाण सर्वथा ॥ ८८ ॥ नातरी उर्वीवरी जाण ॥ वसती मुंगी आणि वारण ॥ सम विषम न वाटे तिजलागून ॥ लेखी समान दोहींतें ॥ ८९ ॥ कीं असंख्य जळचरें जाण ॥ पयोब्धींत वसती रात्रंदिन ॥ आपपर हा भाव जाण ॥ तो न लेखीच सर्वथा ॥ ९० ॥ नातरी

पौर्णिमेचा निशापती ॥ प्रकाशे सारिखा सर्वांप्रती ॥ तैसाच भाव तुकयाचा निश्चितीं ॥ अद्भुत स्थिति निरुपम ॥ ९१ ॥ इक्षुदंड न्यावे आपुले घरीं ॥ हा आठव सर्वथा नव्हे अंतरीं ॥ सर्वां भूतीं मैत्री बरी ॥ दृष्टी चराचरीं सारिखी ॥ ९२ ॥ मुलांस वांटितां ऊंस देख ॥ गृहासी न्यावया उरला एक ॥ हें कांतेनें देखिलें सम्यक ॥ देखोन संताप वाटला ॥ ९३ ॥ तंव गृहासी येऊनि वैष्णववीर ॥ कांतेसी बोले मधुरोत्तर ॥ तिणें ऊंस घेऊन सत्वर ॥ मग कठिण उत्तर बोलिली ॥ ९४ ॥ इक्षुदंड वांटिले सर्वांस ॥ ते काय पावले तुमचे वडिलांस ॥ घरीं लेंकुरें दिसती उदास ॥ नाहीं खावयास म्हणोनी ॥ ९५ ॥ मग सक्रोध होऊनि अंतरीं ॥ इक्षुदंड मारिला पाठीवरी ॥ दोन कांडीं पडलीं भूमीवरी ॥ एक निजकरीं राहिलें ॥ ९६ ॥ निजशांति अंतरीं धरोनि देखा ॥ कांतेसी बोले वैष्णव तुका ॥ वांटा जाहलासे नेटका ॥ साह्य निजसखा पांडुरंग ॥ ९७ ॥ तुझा तुजपाशीं राहिला भाग ॥ खालीं दोन पडले सवेग ॥ ते लेंकुरें आणि आम्ही सांग ॥ घेऊं वांटून निजप्रीतीं ॥ ९८ ॥ ऐसी निजांगें देखोनि शांती ॥ आश्चर्य वाटलें कांतेप्रती ॥ म्हणे हा निर्लज्ज जाहला निश्चितीं ॥ प्रंपचभ्रांती टाकोनि ॥ ९९ ॥ आतां मायाभ्रांती टाकोनि पाहीं ॥ यासी वायां छळोनि कायी ॥ मानापमान न कळे कांहीं ॥ संसारसोयी टाकिली ॥ १०० ॥ ऐसा विवेक करोनि चित्ता ॥ निवांत राहिली निजकांता ॥ तुकयाची शांति वर्णितां ॥ तुळणेसी दृष्टांता नये कीं ॥ १ ॥ मग विवेक करोनियां महीपती ॥ पुरातन भक्तांच्या धुंडोनियां स्थिती ॥ तंव एकादशस्कंधीं उद्धवाप्रती ॥ कदर्युकथा सांगितली ॥ २ ॥ तें एकनाथाचे टीकेवरूनी ॥ परिसिलें असेल संतसज्जनीं ॥ तैसीच तुकयाची शांति

मजला दिसोन येतसे गौण ॥ जे कदर्यूनें घेतलें संन्यासग्रहण ॥ मग केलें छळण तयाचें ॥ ४ ॥ आणि गृहस्थाश्रमी असतां वैष्णवभक्त ॥ मानापमान सारिखे मानित ॥ निजकांतेनें मारितां त्वरित ॥ परी क्रोध अणुमात्र नयेचि ॥ ५ ॥ म्हणोनि उपमा द्यावयासी पाहीं ॥ दृष्टांत न पुरे कवणे ठायीं ॥ जैसा क्षीरसागराचे तुळणेस पाहीं ॥ रत्नाकर कायी येईल ॥ ६ ॥ कीं सायुज्यतेचे साम्यतेसी निश्चितीं ॥ सलोकता समीपता न सरती ॥ तुकयाची तैसी अद्भुत स्थिती ॥ सभाग्य श्रोतीं जाणिजे ॥ ७ ॥ जेणें कलीमाजी वैकुंठीं सहज ॥ देहासहित लाविला ध्वज ॥ तो प्रेमळ भक्त वैष्णवराज ॥ जगद्गुरु सहज अवतरला ॥ ८ ॥ तयासी थोर थोर म्हणतां पाहें ॥ तरी वरिष्ठ सर्वथा म्हणों नये ॥ जैसा समुद्र गंभीर म्हणतां पाहें ॥ येरवीं काये नव्हे तो ॥ ९ ॥ कीं वासरमणी सतेज आगळा ॥ कासया म्हणावें वेळोवेळां ॥ नातरी शीतळ रोहिणीपतीला ॥ म्हणावयाला नलगेचि ॥ ११० ॥ पृथ्वीची क्षमा वर्णितां पाहें ॥ ते तेव्हांचि तैसी झाली काये ॥ ना ते स्वभावेंचि तैसी आहे ॥ तरी वानावें काय निजमुखें ॥ ११ ॥ तेवीं विवेकशांतीचें भूषण ॥ तुकयाचे अंगीं अक्षय लेणें ॥ तें निजमुखें वर्णावें कोणे ॥ पवित्र सज्ञान जाणती ॥ १२ ॥ कायिक वाचिक मानसिक पाहीं ॥ त्याचे तपासी तुळणा नाहीं ॥ असत्य वचन नयेचि कांहीं ॥ प्राणांतही ओढवल्या ॥ १३ ॥ हें वाचिक तप जाणा सुनिश्चितीं ॥ आतां मानसिकाची कैसी रीती ॥ सारिखीच करुणा सर्वां भूतीं ॥ विषम चित्तीं न धरितां ॥ १४ ॥ हा मानसतपाचा विचार ॥ संक्षेपें बोलिलों साचार ॥ आतां निजांगें करावा परोपकार ॥ हें तप शारीर बोलिजे ॥ १५ ॥ हीं तीन यथापद्धतीन ॥ तुकयासी सर्वांगीं जाहलें भूषण ॥ चरणचाली निजप्रीतीन ॥ पंढरी गमन करावें ॥ १६ ॥ पंधरा दिवसीं

हरिदिनीसीं ॥ नेमें वारी धरिली ऐसी ॥ एक दिवस राहोनि मंदि-रासी ॥ दुसरे दिवशीं निघावें ॥ १७ ॥ गात नाचत प्रेमभरित ॥ पंढरीस सातवे दिवशीं जात ॥ तीन रात्र राहून तेथ ॥ परतोनि येत गृहासी ॥ १८ ॥ तीन वर्षे लोटतां ऐसीं ॥ तों शीतज्वर लागला शरीरासी ॥ मग शक्तिहीन देखोन मानसीं ॥ तळमळ चित्तासी करी-तसे ॥ १९ ॥ निजांगें न चालवे पाऊलभरी ॥ म्हणे पंढरीची अंतरली वारी ॥ कांहीं दोष होता पदरीं ॥ तें विघ्न लौकरी ओढवलें ॥ १२० ॥ तों निजभक्त ते अवसरीं ॥ पंढरीस चालले वारकरी ॥ त्यांचे हातीं पत्र लिहून सत्वरीं ॥ पंढरीसी पाठविलें ॥ २१ ॥ त्या त्रिसां अभंगांचा अन्वय निश्चितीं ॥ अभिप्राय परिसिला वैष्णवभक्तीं ॥ जे श्रवण करितां निजप्रीतीं ॥ प्रेम चित्तीं ठसावे ॥ २२ ॥ ध्यानीं आणोनि पांडुरंगमूर्ती ॥ म्हणे देवाधिदेवा रुक्मिणीपती ॥ तुज विनवावया निश्चितीं ॥ भाग्य मजप्रती असेना ॥ २३ ॥ परी धीट होऊनि आपुले मनीं ॥ पत्र लिहितों आवडीकरूनी ॥ पार नेणिजे श्रुतिपुराणीं ॥ मी पामर कोठूनी वर्णूं शकें ॥ २४ ॥ परी जैसी तैसी आर्ष वाणी ॥ अगीकारावी चक्रपाणी ॥ सलगी केली पायांलागोनी ॥ मस्तक चरणीं ठेविला ॥ २५ ॥ तू सकळ सुरवरां वरिष्ठ देव ॥ गोपिकापति सगुण माधव ॥ उदारख्याती वर्णिती सर्व ॥ सत्कीर्तिवैभव त्रिभुवनीं ॥ २६ ॥ नाम-मात्रेंचि हृषीकेशी ॥ नाशितोसी पातकांच्या राशी ॥ कर्मे जळतील आपैसीं ॥ दारिद्र्य दृष्टीसी दिसेना ॥ २७ ॥ सर्व सुखें विठाबाई ॥ तुझ्या ओळंगती पायीं ॥ ऋद्धि सिद्धि अनुकूल ठायीं ॥ चारी मुक्ती आंदण्या ॥ २८ ॥ इंद्रादिकां जें दुर्लभ पद ॥ तें निजदास पावती सप्रेम बोध ॥ कीर्तनीं नाचतां अति आल्हाद ॥ टाळिया छंदें पीटितां ॥ २९ ॥ विश्वीं जड जीव असती अनंत ॥ त्यांचें जीवन तूं रुक्मिणीकांत ॥

परी माझेंचि खोटें संचित ॥ म्हणोनि मूळ न पाठविसी ॥ १३० ॥ नाहीं निरोप पाठविला तुज ॥ म्हणोनि उदास धरिलें मज ॥ निष्ठुर होऊनियां सहज ॥ मोकलिलें आज ये समयीं ॥ ३१ ॥ कीं कांहीं जरूर पडला धंदा ॥ म्हणूनि विसरलासी मज गोविंदा ॥ मी वाट पाहतसें मुकुंदा ॥ दाखवीं पदा आपुल्या ॥ ३२ ॥ नातरी कांहीं द्यावें लागेल मजला ॥ हेंचि सांकडें पडलें तुजला ॥ म्हणोनि सांड करूनि विठ्ठला ॥ मूळ मजला न पाठविसी ॥३३॥ एवढा संकोच मानसीं ॥ तरी पोरें कासया व्यालासी ॥ आम्हीं जाऊनि कोणापासीं ॥ तोंड वासूनि मागावें ॥ ३४ ॥ तुवां दिधलें मोकलून ॥ तरी कोण आहे आम्हां-कारण ॥ कोण निवारी भागशीण ॥ एका तुजविण पांडुरंगा ॥ ३५ ॥ कोणाची वाट पाहूं सांग ॥ कोण सखा आम्हांसी जिवलग ॥ तुवांच मोकलिलें श्रीरंग ॥ तरी होईल भवभंग कैशिया रीतीं ॥ ३६ ॥ कोण माझें जीवींचें सांकडें ॥ न सांगतां जाणेल वाडेंकोडें ॥ तुजविण निवारिता रोकडें ॥ मागें पुढें दिसेना ॥ ३७ ॥ देवाधिदेवा रुक्मिणी-पती ॥ काय माझी देखिली अनीती ॥ म्हणोनि करुणा न ये चित्तीं ॥ मोकलिलें मजप्रती दयाळा ॥ ३८ ॥ तरी डोळेभेट द्यावी सत्वर ॥ कांहीं वेंच न घालीं तुजवर ॥ अहर्निशीं नामोच्चार ॥ वारंवार करीतसे ॥ ३९ ॥ जें संचिताप्रमाणें मिळेल ॥ तेंचि करोनि दाट पातळ ॥ कडे लावूं आपुला काळ ॥ सोडोनि तळमळ चित्ताची ॥ ४० ॥ परी तुजवरी भार न घालीं सर्वथा ॥ हाचि निश्चय पंढरी-नाथा ॥ हृदयमंदिरीं तूं वसता ॥ जाणसी तत्त्वतां अंतरींचें ॥ ४१ ॥ परी आम्हां लेंकुरांची जाती ॥ भेटावयासी वाटे खंती ॥ म्हणोनियां रुक्मिणीपती ॥ तळमळ चित्तीं करीतसें ॥ ४२ ॥ तुज तंव पोरें जाहलीं फार ॥ त्यांची न साहे किरकिर ॥ म्हणोनि चित्तीं होऊनि

निष्ठुर ॥ माझा अव्हेर केला कीं ॥ ४३ ॥ आम्हीं करितों कळागती ॥ तुजसीं भांडतों रुक्मिणीपती ॥ म्हणोनियां मजप्रती ॥ सांडिलें निश्चिती दयाळा ॥ ४४ ॥ नातरी कुटुंब बहुत जाहलें पदरीं ॥ मग कन्या जाती वराचे घरीं ॥ निष्ठुरता धरोनि अंतरीं ॥ आम्हांस सासुरीं टाकिलें ॥ ४५ ॥ कां व्यवहार करितां जगजेठी ॥ व्यवसायांत आली तुटी ॥ म्हणोनि कृपणता धरोनि पोटीं ॥ मज ये संकटीं टाकिलें ॥ ४६ ॥ नातरी पत बुडाली लोकाचारीं ॥ ऋणकरी येऊनि बैसले द्वारीं ॥ म्हणोनि विसर अंतरीं ॥ पडला श्रीहरी आमुचा ॥ ४७ ॥ बरें मूळ पाठवावया न होय ॥ तरी निरोप धाडितां वेंचे काय ॥ कोरडें यशही न घेववे ॥ उपजलें भय मानसीं ॥ ४८ ॥ आम्हांसी टाकिलें जगजेठी ॥ तरी जोड संचिली कोणासाठीं ॥ एवढी करिसी आटा-आटी ॥ लेंकुरें दृष्टीं नावडती ॥ ४९ ॥ फुकाचा शब्द वेंचितां जाण ॥ यश न घेववे तुजकारण ॥ तरी धन केलें बहुत जतन ॥ तें कोणा-कारण देशील ॥ १५० ॥ पोटींच्या लेंकुरांसी नाहीं सुख ॥ रुदन करिती लागली भूक ॥ तरी जेणें होईल तुझा लौकिक ॥ तैसा विवेक करावा ॥ ५१ ॥ आमुचा तळतळाट घेशील जर ॥ तरी तुझें कदापि न होय बरें ॥ ऐसा मानसीं करूनि विचार ॥ घ्यावा समाचार दीनाचा ॥ ५२ ॥ नाहीं तरी भीड न धरितां अंतरीं ॥ सर्वथा न ठेवीं कांहीं उरी ॥ संतांसीं सांगोनियां सत्वरीं ॥ तुझी जोड निर्धारीं बुडवीन ॥ ५३ ॥ नाम जपतों अहर्निशीं ॥ तें कदापि मी न घें वाचेसी ॥ जरी तूं होऊनि उदासी ॥ आम्हां बुडविसी दयाळा ॥ ५४ ॥ तूं एवढा समर्थ जगजेठी ॥ पोटीं जन्मलों आम्हीं करंटीं ॥ हेंच अपकीर्ति जाहली खोटी ॥ फजीती मोठी जनांत ॥ ५५ ॥ येथें खावयास न मिळे अन्न ॥ मूळही न येचि माहेरींहून ॥ आतां वृथाच हें

खोटें जीवपण ॥ कासया वागवण व्यर्थचि ॥ ५६ ॥ पुढें आठव धरोनि रुक्मिणीपती ॥ सांगोनि पाठवावें मजप्रती ॥ रात्रंदिवस करितों खंती ॥ तरी निष्ठुर चित्तीं न व्हावें ॥ ५७ ॥ कंठीं धरोनियां प्राण ॥ पायां-पासीं पातलें मन ॥ चित्त जाहलें असे उद्विग्न ॥ तुझें दर्शन घ्यावया ॥ ५८ ॥ सांडोनि प्रपंच आडाआडी ॥ वाट पाहतों मी बराडी ॥ तरी कृपादृष्टि करोनि गाढी ॥ मूळ तांतडी पाठवावें ॥ ५९ ॥ धीर न धरवे निमेषभर ॥ कैंची बुद्धि माझी स्थिर ॥ मनासी आवरीं परि वारंवार ॥ मति साचार शुद्ध नाहीं ॥ १६० ॥ ऐसी दशा आली अंगा ॥ तूं सर्व जाणसी पांडुरंगा ॥ म्हणोनिया रुक्मिणीरंगा ॥ करीं भवभंगा माझिया ॥ ६१ ॥ शरणागत उपेक्षिला कोणी ॥ हे मात ऐकिली नाहीं कानीं ॥ म्हणोनि पाय आठवोनि मनीं ॥ मस्तक चरणीं ठेवितों ॥ ६२ ॥ कधीं करिसील उचित ॥ हें मज न कळेच निश्चित ॥ परी समाधान मानोनि चित्त ॥ वर्णितों कीर्त निशिदिनीं ॥ ६३ ॥ हे विनंति ऐकोनि शार्ङ्गधरा ॥ मूळ पाठवीं मज सत्वरा ॥ वारकरी परतोनि येती घरा ॥ तोंवरी वाट पाहतसें ॥ ६४ ॥ मग सामोरा जाऊन त्वरित ॥ सद्भावें घालीन दंडवत ॥ पुसेन निरोपाची मात ॥ कीं त्वां काय उचित पाठविलें ॥ ६५ ॥ महाद्वाराची पायरी निश्चित ॥ निवांत पडली आहे तेथ ॥ तैसेंच माझें दंडवत ॥ सांगतील संत तुजलागीं ॥ ६६ ॥ कीं दंडकाठी उभीच सोडितां ॥ धरणीस पडे अवचितां ॥ तैसेंच दंडवत पंढरीनाथा ॥ सांगतील संत तुजलागीं ॥ ६७ ॥ नातरी जननीपासीं छंद घेत ॥ बाळक गडबडां जैसें लोळत ॥ तैसेंच माझें दंडवत ॥ सांगतील संत तुजलागीं ॥ ६८ ॥ मग वारकरियांसी म्हणे तये क्षणीं ॥ माझी तुम्ही करा विनवणी ॥ कीं तुकयासी टाकूनि दिधलें वनीं ॥ अन्याय देखोनि कोणता ॥ ६९ ॥

दाखवोनियां कींव काकुळती ॥ मात पुसावी तयाप्रती ॥ कीं तुकयाचे अन्याय देखिले किती ॥ म्हणोनि तयाप्रती मोकलिलें ॥ १७० ॥ कां पंढरीस न होय त्याचें येणें ॥ विटेवरी न दिसती समचरणें ॥ मोकलूनि दिधलें कवण्या गुणें ॥ त्याजकारणें पुसा कीं ॥ ७१ ॥ मग कृपा करूनि पंढरीनाथ ॥ मज बोलावील जरी तेथ ॥ तरी मी धांवोन येईन त्वरित ॥ साधुसंत भेटतील ॥ ७२ ॥ त्रिविधताप आहेत पोटीं ॥ ते तत्काळ पळतील उठाउठीं ॥ जे गुणचरित्रें गातां कंठीं ॥ हरुषें वाळुवंटीं नाचतां ॥ ७३ ॥ मातेपुढें रिघोन जाण ॥ प्रेमें करीन स्तनपान ॥ परिसोनि माझें करुणावचन ॥ उत्तर पाठवणें सत्वर ॥ ७४ ॥ कृपासागरा जगज्जीवना ॥ गुण दोष कांहींच नाणीं मना ॥ करोनि पापाचा उगाणा ॥ दाखवीं चरणा मजलागीं ॥ ७५ ॥ माझीं दुरितें हरावया तुजसी ॥ सामर्थ्य नाहीं हृषीकेशी ॥ म्हणोनि निष्ठुर होवोनि मानसीं ॥ मज परदेशीं मोकलिलें ॥ ७६ ॥ कीर्ति ऐकोनि रुक्मिणीपती ॥ रात्रंदिवस वाटते खंती ॥ मी साक्षात् भेटतां निश्चितीं ॥ तै लाभ जोडती अपार ॥ ७७ ॥ तुझें चरित्र जगर्जीवना ॥ वर्णावयास नाहीं रसना ॥ प्रेमामृत चाखावया मना ॥ उतावीळ वासना होतसे ॥ ७८ ॥ परी काळ साह्य नसतां देख ॥ वायांच करीत बैसलों शोक ॥ पुढें अधिकचि वाटे दुःख ॥ कल्पना अनेक नावरती ॥ ७९ ॥ अंतरसाक्ष तूं श्रीहरी ॥ आतां जाणसील तैसें करीं ॥ मी तळमळ टाकोनि सर्वतोपरी ॥ निश्चल अंतरीं राहिलों ॥ १८० ॥ परी अव्हेरून टाकितां मज ॥ तरी दांतकसाळी लागेल तुज ॥ तूं मरोन गेलिया अधोक्षज ॥ पोरवडें मज येईल कीं ॥ ८१ ॥ तरी आशीर्वाद देतों तुज आतां ॥ सुखरूप नांदें रुक्मिणीकांता ॥ कधीं तरी धरोनि ममता ॥ आम्हां अनाथां आपंगिसी ॥ ८२ ॥ जरी टाकोनियां दिधलें दूर ॥

तरी निरोपें घेसी समाचार ॥ मोहें दाटलिया अंतर ॥ दाखविसी माहेर मजलागीं ॥ ८३ ॥ कृपासागरा जगजेठी ॥ आतां ऐक माझी गोष्टी ॥ कळेल तैसें करीं शेवटीं ॥ पुढें वटवटी करींना ॥ ८४ ॥ जैसें येईल तुझिया चित्ता ॥ तो जबाब पाठवीं पंढरीनाथा ॥ मी बोललों जाणतां नेणतां ॥ तो अपराध अनंता क्षमा करीं ॥ ८४ ॥ आधीं बाळकासी दिधला लाड ॥ तैसेंच पुरवीं माझें कोड ॥ भेट देऊनि निजनिवाड ॥ भवबंधसांकडें निवारीं तूं ॥ ८६ ॥ ऐसे करुणाशब्द लिहून प्रीतीं ॥ पाठविले वारकऱ्यांचे हातीं ॥ इतुका पाल्हाळ ऐकोनि श्रोतीं ॥ आशंकित चित्तीं न व्हावें ॥ ८७ ॥ म्हणाल अनुसंधान टाकोनि दूरी ॥ ग्रंथ लिहिला अति विस्तारीं ॥ स्वानंदप्रेमाचिये भुली ॥ आठवण मागिली न येचि ॥ ८८ ॥ तरी तैसेंचि नव्हे निश्चित ॥ वायांच वाढविला नाहीं ग्रंथ ॥ पत्रिकेचे अभंग पाहोनि त्वरित ॥ लिहिले संकलित ये ठायीं ॥ ८९ ॥ तुकयाचें प्रेम वर्णितां प्रीतीं ॥ सहसा न पुरे आपुली मती ॥ जैसा चिताऱ्यानें लिहिला गभस्ती ॥ परी प्रकाश त्याप्रती काढवेना ॥ १९० ॥ कां सरिता भरोनि चालिली जरी ॥ ते करील काय सागराची बरोबरी ॥ नातरी दुधाळ धेनु असली जरी ॥ ते कामधेनूची सरी करींना ॥ ९१ ॥ पितळ लखलखीत दिसे दुरून ॥ तें काय होईल शुद्ध कांचन ॥ कीं सुधारसाचें सामर्थ्य जाण ॥ औषधीकारणें नये कीं ॥ ९२ ॥ कां मेघ गर्जना करितां नाचे मयूर ॥ तैसेंच करूं पाहे झांडोर ॥ परी दोहींची कळा भिन्न साचार ॥ सज्ञान चतुर जाणती ॥ ९३ ॥ तेवीं तुकयाचें प्रेम वर्णितां प्रीतीं ॥ कुंठित जाहली सकळ मती ॥ जैसा उदयासी येतां गभस्ती ॥ उडुगणें लोपती त्यापुढें ॥ ९४ ॥ कस्तूरींत मृत्तिका पडतां भली ॥ परी तैशाच मोलें तुकासी

आली ॥ तेवीं संतस्तवनीं वैखरी भली ॥ हे पावन जाहली अनायासें ॥ ९५ ॥ असो मागील अनुसंधान ॥ पंढरीस चालिले वैष्णवजन ॥ त्यांजहातीं पत्र तुकयान ॥ दिधलें लिहून निजप्रीतीं ॥ ९६ ॥ मग तुकयासी भेटोनि सत्वरीं ॥ पंढरीस चालिले वारकरी ॥ पुढिले अध्यायीं भक्तचतुरीं ॥ सप्रेमभरीं परिसिजे ॥ ९७ ॥ जैसा कृपण मोजितां धन ॥ अणुमात्र फांकों नेदी मन ॥ कां परनिंदा कर्णी ऐकोन ॥ कुटिल तल्लीन होतसे ॥ ९८ ॥ तैशापरी अवधान प्रीतीं ॥ देतां: तुष्टेल रुक्मिणीपती ॥ श्रोतयांसी विनवी महीपती ॥ श्रवणीं सद्भक्ती असों द्या ॥ ९९ ॥ स्वस्ति श्रीभक्तविजय ग्रंथ ॥ ऐकतां तुष्टेल जगन्नाथ ॥ प्रेमळ ऐका भाविक भक्त ॥ पंचाशत्तमाध्याय रसाळ हा ॥ २०० ॥ अध्याय ॥ ५० ॥ ओंव्या ॥ २०० ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगोपालकृष्णाय नमः ॥ ॥ जय जय दीनदयाळा हृषीकेशा ॥ सप्रेमभक्तहृदयनिवासा ॥ रुक्मिणीरंगा पंढरीशा ॥ आदिसर्वेशा जगद्गुरो ॥ १ ॥ जयजय लीलानाटकी सूत्रधारिया ॥ गुणनिधाना यादवराया ॥ हृदयीं आठवूनि तुझिया पायां ॥ समुद्रतनया तल्लीन ॥ २ ॥ जय अंतरसाक्षा चराचरवासा ॥ आदिस्वरूपा निर्गुणवेषा ॥ पुंडलीकवरदा परेशा ॥ जय अविनाशा आत्मरूपा ॥ ३ ॥ जय करुणासागरा वैकुंठपती ॥ विराट्स्वरूप वामनमूर्ती ॥ तुवां परशुधरें निर्वीर करूनि क्षिती ॥ विप्रांप्रती स्थापिलें ॥ ४ ॥ जय असुरदमना धर्मस्थापका ॥ त्रैलोक्यपते विधिजनका ॥ प्रेमळ भक्तांसी सज्जनसखा ॥ तुजविण आणिक असेना ॥ ५ ॥ ग्यां निजमुखें करावी तुझी स्तुती ॥ तरी बुद्धीस नाहीं अखंड स्फूर्ती ॥

अर्चन करावें निजप्रीतीं ॥ तरी साहित्य निश्चितीं घडेना ॥ ६ ॥ अनुतापें करावें तीर्थाटन ॥ तरी शरीर जाहलें शक्तिहीन ॥ नातरी सत्पात्रीं करावें दान ॥ तरी पदरीं धन नसे कीं ॥ ७ ॥ व्रत करावें विधियुक्त ॥ तरी क्षुधेनें प्राण व्याकुळ होत ॥ वंदोनि नमावीं सर्व भूतें ॥ तरी गुण दोष आठवत अंतरीं ॥ ८ ॥ शास्त्राभ्यास करूं श्रीपती ॥ तरी आयुष्य नाहीं आपुले हातीं ॥ अनुतापें टाकावी प्रपंचभ्रांती ॥ तरी वैराग्य चित्तीं ठसेना ॥ ९ ॥ एकांतीं करावें तुझें ध्यान ॥ तरी बुद्धीसी नावरे चंचळ मन ॥ टाकूनि स्वरूपानुसंधान ॥ रानोरान हिंडतसें ॥ १० ॥ नातरी करावें इंद्रियदमन ॥ तरी रसना नव्हे स्वाधीन ॥ ऐसा वेष्टिलों अवगुणेंकरून ॥ जाणसी खूण अंतरींची ॥ ११ ॥ म्हणोनि प्रार्थना रुक्मिणीपती ॥ जे निजभक्त तुजला प्रिय असती ॥ त्यांची वर्णावया सद्गुणकीर्ती ॥ सप्रेम स्फूर्ति असों दे ॥ १२ ॥ कायावाचामनेंकरून ॥ हेंचि वांच्छितों प्रसाददान ॥ याविरहित इच्छा नसे आन ॥ तरी मनोरथ पूर्ण करावा ॥ १३ ॥ ऐका श्रोते हो सादर गोष्टी ॥ मागील अध्यायीं कथा गोमटी ॥ तुकयानें सप्रेम होऊन पोटीं ॥ पत्रिका शेवटीं पाठविली ॥ १४ ॥ ते चोवीस अभंग घेऊनि सत्वरी ॥ पंढरीस चालिले वारकरी ॥ मार्गीं जातां स्वानंदलहरी ॥ कीर्तनगजरीं डुल्लत ॥ १५ ॥ ऐशा खेळीमेळीं सत्वरा ॥ वैष्णव आले पंढरपुरा ॥ सकळ देखतांचि त्या अवसरा ॥ लोटांगण एकसरां घातलें ॥ १६ ॥ एकमेकांस अलिंगन देती ॥ आनंदाश्रु नेत्रीं वाहती ॥ आरती करूनि श्रीपती ॥ ओंवाळिती प्रीतीनें ॥ १७ ॥ मग दिंड्या पताका घेऊन करीं ॥ आले चंद्रभागेचे तीरीं ॥ स्नान करूनि झडकरी ॥ नित्यनेम सारिला ॥ ॥ १८ ॥ पुंडलिकासी भेटोनि जाणा ॥ मग केली क्षेत्रप्रदक्षिणा ॥

टाळ मृदंग लावूनि नाना ॥ नृत्य करिती स्वानंदें ॥ १९ ॥ असो यावरी वैष्णववीर ॥ सत्वर पावले महाद्वार ॥ पुढें देखोनि गरुडपार ॥ लोटांगणें घालिती ॥ २० ॥ पत्र लिहिलें जें तुकयान ॥ तें आनंदें गाती वैष्णवजन ॥ ऐसी करुणा ऐकूनि रुक्मिणीरमण ॥ गहिंवरें दाटले तेधवां ॥ २१ ॥ सावकाश नाहीं तुकयासी ॥ म्हणोनि घाबरले हृषीकेशी ॥ जैसें पाडस पडतां पारधीफांसीं ॥ ते व्यथा हरिणीसी वाटत ॥ २२ ॥ कीं बाळकासी देवी निघतां जाण ॥ चैन न पडे मातेकारण ॥ तेवीं तुकयाचें पत्र ऐकून ॥ जगज्जीवन घाबरले ॥ २३ ॥ जीवन जळदेवता शोषितां पाहीं ॥ मत्स्य तळमळती आपुले ठायीं ॥ तेवीं तुकयाची करुणा ऐकून पाहीं ॥ शेषशायी घाबरले ॥ २४ ॥ कीं कृपणाचिया धनावर ॥ पाळती लावी तस्कर ॥ ऐकोनि दचके त्याचें अंतर ॥ तेवीं शार्ङ्गधर घाबरले ॥ २५ ॥ मग रुक्मिणीसी म्हणे वैकुंठपती ॥ तुकयाची मज वाटते खंती ॥ म्हणोनि सद्गद होऊनि चित्तीं ॥ अश्रू पडती नेत्रकमळीं ॥ २६ ॥ वारकरी आले सकळिक ॥ परी दृष्टीसी तुकया न दिसे एक ॥ म्हणोनि माझे जीवासी सुख ॥ न वाटे देख सर्वथा ॥ २७ ॥ आतां आपण जावें येथून ॥ तरी यात्रेस आले बहुत जन ॥ यासी विचार करावा कवण ॥ तुजकारण पुसतसें ॥ २८ ॥ यावरी रुक्मिणी बोले वचन ॥ गरुडास मूळ पाठवावें जाण ॥ तो तुकयास पाठीवर बैसवून ॥ न लागतां क्षण आणील कीं ॥ २९ ॥ हें सामर्थ्य असोन आपणासी ॥ व्यर्थ कां चिंता करावी मानसीं ॥ ऐकोनि ऐशिया वचनासी ॥ हृषीकेशी संतोषले ॥ ३० ॥ मग बोलावून विनतासुत ॥ तयास सांगे पंढरीनाथ ॥ तुवां देहूसी जाऊनि त्वरित ॥ कार्य निश्चित साधावें ॥ ३१ ॥ मग स्वकरें लेखणी घेऊन ॥ पत्र लिहीत जगज्जीवन ॥ तें सादर करून

मन ॥ परिसा सज्जन भाविक हो ॥ ३२ ॥ म्हणे वैकुंठ कैलास असे जोंवरी ॥ चिरंजीव तुका असो तोंवरी ॥ आणि अखंड मजला ह्रदयमंदिरीं ॥ प्रेमभरें आठवो ॥ ३३ ॥ ऐसा आशीर्वाद होतां जाण ॥ तेव्हां रुक्मिणीचें विस्मित मन ॥ म्हणे हें आपुले मुखींचें वचन ॥ असत्य नोहे सर्वथा ॥ ३४ ॥ मौनेंचि हांसोन पंढरीनाथ ॥ ह्रदयीं दाटले प्रेमभरित ॥ म्हणे तुकया वाटे तुझी खंत ॥ व्यथा विपरीत ऐकोनि ॥ ३५ ॥ कैशा रीतीं म्हणसील जरी ॥ तरी तुझेंचि चित्त साक्ष अंतरीं ॥ निरोप सांगतां वारकरी ॥ जाहलों अंतरीं कासावीस ॥ ३६ ॥ भेटीसी धांवोनि यावें त्वरित ॥ तरी यात्रा मिळाली आहे बहुत ॥ म्हणोनि गरुड पाठविला तेथ ॥ तुजला निश्चित आणावया ॥ ३७ ॥ तरी कांहीं संकोच न धरितां अंतरीं ॥ बैसावें याचे पाठीवरी ॥ क्षण न लागतां येऊनि पंढरी ॥ भेट दे सत्वरीं मजलागीं ॥ ३८ ॥ ऐसें लिहूनि जगज्जीवन ॥ गरुडाप्रति बोले वचन ॥ माझे ठायीं तुकया जाणून ॥ आणीं बैसवून पाठीवरी ॥ ३९ ॥ अवश्य म्हणोनि ते अवसरीं ॥ माथा ठेविला चरणांवरी ॥ म्हणे स्वामींनीं जयासी धरिलें पदरीं ॥ तो आम्हां शिरीं वंद्य असे ॥ ४० ॥ मूर्खासी प्रसन्न सरस्वती ॥ जाहल्या पंडित सन्मानिती ॥ सरितेसी अंगीकारितां अपांपती ॥ तरी ओत अव्हेरिती कासया ॥ ४१ ॥ कीं बोरीबाभुळींस मैलागिरीनें ॥ शेजार दिधला निजप्रीतीनें ॥ तयांस कांटवण म्हणावें कवणें ॥ सुगंधा उणें नसेचि ॥ ४२ ॥ नातरी वाचस्पतीनें अंगीकार केला ॥ मग सकळ सुरगण मानिती त्याला ॥ कीं लोहदंड परिसासी लागला ॥ मग मलिन त्याला न म्हणावें ॥ ४३ ॥ तेवीं तुकयाचें शुद्ध देखोनि अंतर ॥ तुम्हीं तुष्ट जाहलेति तयार ॥ मग आम्हांसी धरावया दूर ॥ नाहीं अधिकार सर्वथा ॥ ४४ ॥ ऐसें म्हणोनि ते अवसरीं ॥ मस्तक

ठेविला चरणांवरी ॥ खगपति उठोनि झडकरी ॥ पवनचाली निघाला ॥ ४५ ॥ तों इकडे तुका उतावीळ मनीं ॥ निढळावरी ठेवूनि पाणी ॥ वाट पाहात निशिदिनीं ॥ जेवीं बाळक जननी न देखतां ॥ ४६ ॥ नातरी चातकासी तृषा लागत ॥ तो तोंड पसरूनि पाहे निरुत ॥ कीं क्षुधा लागतां पोटांत ॥ कांसव विलोकीत जननीसी ॥ ४७ ॥ कीं कृपणाचें धन हारपतां सकळ ॥ त्यासी रात्रंदिवस लागतो चळ ॥ नातरी मीनाचें तुटतां जळ ॥ करी तळमळ जया रीतीं ॥ ४८ ॥ तेवीं पंढरीच्या वियोगेंकरून ॥ तुका तळमळी रात्रंदिन ॥ तों अकस्मात गरुड येऊन ॥ उभा ठाकला सन्निध ॥ ४९ ॥ खगपतीस देखतां क्षणीं ॥ नमस्कार घातला साष्टांग धरणी ॥ आलिंगिला प्रीतीकरूनी ॥ प्रेमभावें तेधवां ॥ ५० ॥ मग वर्तमान पुसे निजप्रीतीं ॥ सुखी आहे कीं रुक्मिणीपती ॥ मज रात्रंदिवस वाटे खंती ॥ कधीं भेटती कळेना ॥ ५१ ॥ कां निष्ठुर होऊनि जगज्जीवन ॥ कठिण केलें बहुत मन ॥ मज परदेशीं दिधलें टाकून ॥ होतसें उद्विग्न यासाठीं ॥ ५२ ॥ वारकरी मिळाले असतील फार ॥ माझा किमर्थ पडला विसर ॥ कोणता दोष जाणोनि दुर्धर ॥ हें मज निर्धार कळेना ॥ ५३ ॥ ऐकूनि तुकयाचें वचन ॥ काय बोले विष्णुवाहन ॥ तुझ्या उद्वेगें जगज्जीवन ॥ अति विव्हळ मानसीं ॥ ५४ ॥ जेवीं तान्हयाच्या वियोगें जननी ॥ कीं पाडसवियोगें जैसी हरिणी ॥ कीं तृषाक्रांत जीवनावांचूनी ॥ तळमळ मनीं करीतसे ॥ ५५ ॥ तैशाचपरी रुक्मिणीपती ॥ रात्रंदिवस तुज आठविती ॥ मग मूळ पाठविलें मज निश्चितीं ॥ न्यावयाप्रति तुजलागीं ॥ ५६ ॥ पत्र पाठविलें रुक्मिणीकांतें ॥ तें तुकयासी वाचून दाविलें त्वरित ॥ तें श्रवणी पडतां अश्रुपात ॥ नेत्र सजल जाहले कीं ॥ ५८ ॥ जैसा सुकल्या झाडावरी सहज ॥ अवचितां

बोलला मेघराज ॥ तेवीं पत्र देखतांचि अंडराज ॥ तुकयास संतोष वाटला ॥ ५९ ॥ कीं उदया येतां वासरमणी ॥ संतोष पावती जैशा कमळिणी ॥ तेवीं गरुडाचे आगमनीं ॥ तुकयास संतोष वाटला ॥ ६० ॥ नातरी श्रीरामाची वाट पाहत ॥ नंदिग्रामीं बैसला भरत ॥ मग निरोप सांगतां अंजनीसुत ॥ संतोष वाटत ज्या रीतीं ॥ ६१ ॥ तेवीं पत्र पाठविलें रुक्मिणीवरें ॥ आणि निरोप सांगितला खगेश्वरें ॥ तेणें तुकयाचें अंतर ॥ जाहलें स्थिर ते समयीं ॥ ६२ ॥ मग गरुड बोले मधुरोत्तरीं ॥ आतां बैसावें माझे पाठीवरी ॥ निमेष न लागतां सत्वरीं ॥ दावीन पंढरी तुजलागीं ॥ ६३ ॥ रोगें शरीर जर्जर बहुत ॥ चालावयासी नाहीं शक्त ॥ म्हणोनि कृपा करी पंढरीनाथ ॥ पाठवी त्वरित मजलागीं ॥ ६४ ॥ तरी आतां ऊठ वेगेंसीं ॥ विलंब न करावा जावयासी ॥ वचनें ऐकोनियां ऐसीं ॥ उत्तर तयासी देतसे ॥ ६५ ॥ खगपतीस म्हणे ऐक वचन ॥ तूं आमुचे स्वामीचें वाहन ॥ आणि आम्हां सेवकां पूज्यमान ॥ होसी सुजाण विचक्षणा ॥ ६६ ॥ पायींची वाहाण पायीं बरी ॥ वागवूं नये मस्तकावरी ॥ कीं वाळे नेपुरें बांधितां शिरीं ॥ विचार चतुरीं करावा ॥ ६७ ॥ कीं महाद्वारींची पायरी पाहें ॥ प्रतिमास्थानीं बैसेल काये ॥ हडपी आवडता म्हणोनि रायें ॥ बैसवूं नये सिंहासनीं ॥ ६८ ॥ म्हणोनि विष्णुवाहना अवधारी ॥ मी सर्वथा न बैसें तुजवरी ॥ तुझे भाग्याची वर्णितां थोरी ॥ मज निर्धारीं कळेना ॥ ६९ ॥ जो पुराणपुरुष वैकुंठविहारी ॥ अनंत ब्रह्मांडें जयाचे उदरीं ॥ तया वागविशी पृष्ठावरी ॥ नवल अंतरीं वाटतसे ॥ ७० ॥ जो सुरां असुरां अजित जाण ॥ तयासी जिंतोनि सांडला पण ॥ शेखीं जाहलासी त्याचें वाहन ॥ सदा कर जोडूनि तिष्ठसी ॥ ७१ ॥ म्हणोनि आम्हां उपासकां जाण ॥ सेवक स्वामी तत्समान ॥ यालागीं

पाठीवरी बैसोन ॥ न घडे येणें सर्वथा ॥ ७२ ॥ तरी आतां असो हेचि विज्ञप्ती ॥ माझी अवस्था जाणोनि चित्तीं ॥ पंढरीस जाऊनि सत्वरगती ॥ रुक्मिणीपति आणावा ॥ ७३ ॥ मग गरुडाचे धरूनि चरण ॥ साष्टांगें घातलें लोटांगण ॥ म्हणे तुम्हांआधीन जगज्जीवन ॥ तो मज आणोन भेटवा ॥ ७४ ॥ अवश्य म्हणोनि त्वरित ॥ सत्वर निघाला विनतासुत ॥ तुकयास भेटवीन पंढरीनाथ ॥ विचार मनांत पैं केला ॥ ७५ ॥ हा निश्चय करूनि मानसीं ॥ गरुड पावला पंढरीसी ॥ पृष्ठीवरी न देखतां तुकयासी ॥ हृषीकेशी घाबरले ॥ ७६ ॥ जैसें कन्येसी मूळ पाठवितां ॥ तें फिरोनि रितें देखिलें येतां ॥ हिंवसली उगीच राहे माता ॥ तेवीं रुक्मिणीकांता जाहलें ॥ ७७ ॥ मग सन्निध येऊनि ते अवसरीं ॥ मस्तक ठेविला चरणांवरी ॥ म्हणे देवाधिदेवा श्रीहरी ॥ तुका मजवरी न बैसे ॥ ७८ ॥ परी तुझ्या वियोगें रुक्मिणी-पती ॥ रात्रंदिवस करितो खंती ॥ आतां कृपा करूनि वैकुंठपती ॥ चाल त्याप्रति भेटावया ॥ ७९ ॥ अवश्य म्हणोनि जगज्जीवन ॥ गरु-डास दिधलें आलिंगन ॥ मग रुक्मिणीस बोलावून ॥ सांगे खूण अंतरींची ॥ ८० ॥ मग विश्वजननी उत्तर देत ॥ यात्रेसी आले वैष्णवभक्त ॥ हा उत्साह टाकूनि जावें तेथ ॥ नसे उचित सर्वथा ॥ ८१ ॥ जैसें कांतेविण मंदिर शून्य ॥ कीं जीवनाविण सरिता जाण ॥ तेवीं तुम्हांविण पंढरी शून्य ॥ वैकुंठनाथा दिसेल कीं ॥ ८२ ॥ नातरी नृपावांचूनि सेनासंपत्ती ॥ कीं चंद्राविण उडुगण दिसती ॥ कीं कुंकुमाविण अलंकार निश्चितीं ॥ मलिन दिसती सर्वथा ॥ ८३ ॥ तेवीं आपण नसतां ये अवसरीं ॥ उदास दिसेल हे पंढरी ॥ तरी गोपाळकाला जाहलियावरी ॥ जाऊं भेटीस तुकयाचे ॥ ८४ ॥ ऐकोनि रुक्मिणीचें वचन ॥ अवश्य म्हणती जगज्जीवन ॥ तों दर्शनासी

आले संतजन ॥ नामाभिधानें तीं ऐका ॥ ८५ ॥ शेखमहंमद आणि गणेशनाथ ॥ बोधला निंबराज विख्यात ॥ संतोबा पवार वैष्णवभक्त ॥ आले त्वरित दर्शना ॥ ८६ ॥ टाळ विणे मृदंग वाजती ॥ सप्रेमभावें वैष्णव गाती ॥ पताका शोभायमान फडकती ॥ तयांत चमकती गरुडटके ॥ ८७ ॥ लोटांगण घालिती सकळ जन ॥ तेव्हां रुक्मिणीसी बोले जगज्जीवन ॥ निंबराजासी जाहला बहु शीण ॥ घालीत लोटांगण आला तो ॥ ८८ ॥ तरी यासी प्रसन्न होऊनि त्वरित ॥ कांहीं द्यावें वरदान उचित ॥ तंव श्रोते होऊन आशंकित ॥ प्रश्न करीत निजप्रेमें ॥ ८९ ॥ म्हणती निंबराज कोण ॥ तयाचें सविस्तर करीं कथन ॥ ऐसा करितांचि प्रश्न ॥ हर्षलें मन वक्तयाचें ॥ ९० ॥ तो प्रश्न वाटला कैशा रीतीं ॥ जैसा चकोरांसी उदेला निशापती ॥ कीं क्षुधार्थियांसी प्रारब्धगतीं ॥ अमृत अवचितीं वर्षलें ॥ ९१ ॥ कीं दुर्बळाचिया अंगणीं ॥ कामधेनु ठाकली येऊनी ॥ नातरी लोहसंदुकेंत जाउनी ॥ परीस अवचितां पडिला कीं ॥ ९२ ॥ कीं क्षेत्र पिकासी आलें जाण ॥ त्यावरी पुढती वर्षला घन ॥ मग द्विगुण दाटले कण ॥ ते सभाग्य जाण लाधती ॥ ९३ ॥ तेवीं श्रोतयांचे प्रश्नोत्तरीं ॥ वक्ता संतोषला निजअंतरीं ॥ म्हणे निंबराजचरित्र विस्तारीं ॥ प्रेमभरीं अवधारा ॥ ९४ ॥ स्वदेशांत ग्राम जाण ॥ देवपैठण म्हणती त्याकारण ॥ तया ग्रामींचें कुळकर्ण ॥ वृत्ति पुरातन तयाची ॥ ९५ ॥ मुलें लेंकुरें असती सर्व ॥ परी निंबराज म्हणवी भक्त वैष्णव ॥ संतपूजनीं धरितां भाव ॥ अनुताप जाहला तयासी ॥ ९६ ॥ मग म्हणे पुरे हा संसार ॥ दुर्धर माया अनिवार ॥ प्रपंच करितां व्यवहार ॥ आयुष्य समग्र वेंचलें ॥ ९७ ॥ ऐसा अनुताप धरूनि जाणा ॥ मग चालिले तीर्थाटना ॥ बारा ज्योतिर्लिंगें देखोनि

नयना ॥ संतोष मना वाटला ॥ ९८ ॥ भूतळींचीं तीर्थें अवघडें ॥ तीं दृष्टीसी देखिलीं अति चोखडें ॥ सप्त पुऱ्या करूनि पुढें ॥ हिमालयाप्रति पैं गेले ॥ ९९ ॥ त्या मार्गींची ख्याती वर्णितां ॥ तरी बहु विस्तारें वाढेल कथा ॥ म्हणोनि संकलित बोलिलों वार्ता ॥ जाणावें श्रोतीं अंतरीं ॥ १०० ॥ भागिरथीच्या तीन कावडी ॥ रामेश्वरीं घातल्या आवडी ॥ ऐसी सुकृताची करूनि जोडी ॥ मग आले तांतडी आश्रमा ॥ १ ॥ अंतरीं इच्छा धरिली जाण ॥ स्वमुखें करावें हरिकीर्तन ॥ हेच आवड मनीं धरून ॥ नामस्मरण करीतसे ॥ २ ॥ निष्कामबुद्धी व्रत तपें ॥ आचरला असेल जो साक्षेपें ॥ तरीच श्रीहरिकीर्तनीं अनुतापें ॥ होईल रत निजप्रीतीं ॥ ३ ॥ तीर्थें याग वेदपठण ॥ हीं तेव्हांच फळासी आलीं जाण ॥ जरी निर्लज्ज होऊनि मन ॥ वर्णील गुण श्रीहरीचे ॥ ४ ॥ असो आतां बहु भाषण ॥ वैष्णव जाणती सप्रेम खूण ॥ जे जे टाकोनियां मानाभिमान ॥ करिती भजन अहर्निशीं ॥ ५ ॥ श्रीहरिकीर्तनीं न होतां रत ॥ सकळ साधनें होती व्यर्थ ॥ जैसी वापी खाणिली सखोल बहुत ॥ जीवन नाहीं लागलें ॥ ६ ॥ कीं क्षेत्रीं कणसें आलीं सघन ॥ परी त्यांवरी उमटले नाहींत कण ॥ कीं देसायांनीं साधिलें वतन ॥ तें संतानाविण व्यर्थचि ॥ ७ ॥ कीं विद्याभ्यास केला फार ॥ परी समयीं नाठवे प्रत्युत्तर ॥ कीं शौर्यतेजेंविण नृपवर ॥ व्यर्थचि बैसला भद्रासनीं ॥ ८ ॥ कीं पात्रीं पक्वान्नें वाढिलीं बहुत ॥ परी शेवटीं नाहीं आलें घृत ॥ तेवीं श्रीहरिचरित्र न वर्णितां होत ॥ सकळ साधनें व्यर्थचि ॥ ९ ॥ तरी कीर्तन करावें प्रेमयुक्त ॥ निंबराजें धरिला हेत ॥ मग गजवदनासी पंढरीनाथ ॥ आज्ञा करीत एके दिनीं ॥ ११० ॥ म्हणे मत्कीर्तनीं होईल स्फूर्ती ॥ हा वर द्यावा तयाप्रती ॥ ऐसें सांगतां रुक्मिणीपती ॥ अवश्य गणपति

म्हणतसे ॥ ११ ॥ एके दिनीं यामिनींत ॥ निंबराज होते निद्रित ॥ तंव ब्राह्मणरूपें स्वप्नांत ॥ पार्वतीसुत पावले ॥ १२ ॥ थापटोनि सावध केलें पाहीं ॥ म्हणे वरप्रसाद माझा घेईं ॥ मग तांबूल काढोनि ते समयीं ॥ हातावरी दिधलें ॥ १३ ॥ तों निंबराजें सुषुप्तींत ॥ तत्काळ टाकिलें मुखांत ॥ मग गजवदन काय बोलत ॥ अक्षय वरदान दीधलें ॥ १४ ॥ आतां अभ्यास केल्याविण ॥ बहुत वर्णिशील हरीचे गुण ॥ आणि रंगदेवता येऊन ॥ अखंड कीर्तनीं नांदेल ॥ १५ ॥ ऐसा वर देऊनि त्वरित ॥ अदृश्य झाले पार्वतीसुत ॥ निंबराज होऊनि जागृत ॥ स्वप्न ध्यानांत आणिलें ॥ १६ ॥ तों विप्र दिसत नाहीं जवळ ॥ आणि मुखांत असे साक्षात तांबूल ॥ मग तैसाचि गिळोनियां ते वेळ ॥ उठोनियां बैसला ॥ १७ ॥ हाताकडे विलोकून पाहात ॥ तों डाग लागला असे आरक्त ॥ उदकेंकरूनि क्षाळिला हात ॥ परी तो न जाय सर्वथा ॥ १८ ॥ सागरें कूपासी दिधलें पाणी ॥ तें न आटे जैसें अवर्षणीं ॥ कीं योगियासी तृप्त करी उन्मनी ॥ तो नव्हे परतोनि क्षुधार्थी ॥ १९ ॥ नातरी परिसाचा गुण लोहासि लागला ॥ तरी पुढती काळिमा न येचि त्याला ॥ कां गंगेनें ओहळ अंगीकारिला ॥ तो अक्षय पूज्य सकळांसी ॥ २० ॥ कीं विरिंचीनें आयुष्य दिधलें पाहें ॥ तेथें भय व्याधि सर्वथा न जाये ॥ नातरी रंकासी हातीं धरिलें रायें ॥ त्याची संपत्ति न जाय सर्वथा ॥ २१ ॥ कां भास्करें दिधली दिव्य कांती ॥ तें हिंवें फुटेल कैशा रीतीं ॥ तेवीं तांबूलाचा डाग लागला हातीं ॥ तो धुतलिया न जाय सर्वथा ॥ २२ ॥ त्या दिवसापासून ॥ निंबराज करूं लागले कीर्तन ॥ श्रवण करिती वैष्णवजन ॥ ते तल्लीन होऊन राहती ॥ २३ ॥ टाकूनि लज्जा मान लौकिक ॥ टाकूनि आशापाश देख ॥

टाकूनि भेदाभेद अनेक ॥ सप्रेमसुख भोगीतसे ॥ २४ ॥ ऐसी वृत्ति असतां सहज ॥ पंढरीस आले निंबराज ॥ तेथूनि प्रश्न केलासे मज ॥ श्रोतीं उमज धरावा ॥ २५ ॥ रुक्मिणीस म्हणती जगज्जीवन ॥ निंबराजासी द्यावें वरदान ॥ जगन्माता तें ऐकून ॥ विस्मितमन होतसे ॥ २६ ॥ मग माळिणीचें रूप धरूनी ॥ वाटेसी बैसली विश्वजननी ॥ आरक्त गाजरें पांटींत भरूनी ॥ फांका करूनि ठेविल्या ॥ २७ ॥ निंबराज येतां देउळांतून ॥ तयासी बोले मधुर वचन ॥ म्हणे तान्हें बाळ घरीं रडतसे जाण ॥ मी जातें तयासी आणावया ॥ २८ ॥ तरी कृपा करूनि मजवरी ॥ येथें बसावें क्षण-भरी ॥ मी बाळक घेऊनि सत्वरी ॥ अशीच येते परतोनी ॥ २९ ॥ तूं नायकसी जरी वचन ॥ तरी येथें गाजरें राखील कोण ॥ बाजारीं फिरती बहुत जन ॥ जातील घेऊन यासाठीं ॥ १३० ॥ ऐसें बोलतां विश्वजननी ॥ करुणा उपजली तयाचे मनीं ॥ म्हणे सत्वर येईं परतोनी ॥ तरी मी बैसतो ये ठायीं ॥ ३१ ॥ मग पांटी करून त्याचे स्वाधीन ॥ राउळाकडे गेली माळीण ॥ एक प्रहरपर्यंत जाण ॥ न ये परतोन सर्वथा ॥ ३२ ॥ तेव्हां वस्त्र काढोनि पांटीवरूनी ॥ निंबराज विलोकी तये क्षणीं ॥ तों सुवर्णभांकळ्या देखिल्या नयनीं ॥ गाजर एकही दिसेना ॥ ३३ ॥ मग मनीं होऊन विस्मित ॥ म्हणे आदिमाया गोवूं पाहत ॥ कनक नव्हे हा महाअनर्थ ॥ दिसून येत मजलागीं ॥ ३४ ॥ ऐसा अनुताप धरिला मनीं ॥ जेवीं विप्र प्रवेशे यवनसदनीं ॥ तेथींचें मांस देखोनि नयनीं ॥ कंटाळूनि पळतसे ॥ ३५ ॥ कां गलितकुष्टी दृष्टीस पडे ॥ ती सुंदर न पाहे तयाकडे ॥ कीं मेघातें देखूनि दृष्टीपुढें ॥ अनुतापी उठे तेथूनी ॥ ३६ ॥ तैसें तें सुवर्ण पांटींत देखोन ॥ निंबराजाचें

चिळसलें मन ॥ मग राउळांत जाऊन ॥ घाली लोटांगण सद्भावें ॥ ३७ ॥ हात जोडून करी विनंती ॥ म्हणे देवा कां मज करितोसी गुंती ॥ तुझी कृपा इच्छितों चित्तीं ॥ नलगे संपत्ति धन कांहीं ॥ ३८ ॥ मग रुक्मिणीसी करून नमस्कार ॥ बिऱ्हाडासी आले सत्वर ॥ नामस्मरण निरंतर ॥ प्रेमभावें करीतसे ॥ ३९ ॥ इकडे रुक्मिणी म्हणे जगज्जीवना ॥ म्यां वंदोनि तुमची आज्ञा ॥ निंबराजासी दिधलें सुवर्ण जाणा ॥ परी त्याचे तें मना न ये कीं ॥ १४० ॥ हांसोनि म्हणे जगन्निवास ॥ भजनीं संतुष्ट माझे दास ॥ तयांसी ममता लोभ आस ॥ बाधूं न शके सर्वथा ॥ ४१ ॥ पर्वता न रुतती पर्जन्यधारा ॥ कीं काळें लावितां न ये अंबरा ॥ शीत न बाधेच दिनकरा ॥ न होय उबारा चंद्रासी ॥ ४२ ॥ कीं तृषा न बाधे समुद्राकारण ॥ अग्नीस न बाधे कदा अन्न ॥ बंदिखान्यांत कोंडेल पवन ॥ कैशा रीतीं सुजाणे ॥ ४३ ॥ तेवीं निजभक्त उदास वर्तती ॥ आशापाश न बाधे त्यांप्रती ॥ ऐसें बोलतां वैकुंठपती ॥ रुक्मिणी चित्तीं विस्मित ॥ ४४ ॥ दुसरे दिवशीं प्रातःकाळीं ॥ स्नानासी चालिली संतमंडळी ॥ निंबराज तयांचे मेळीं ॥ चंद्रभागेसी पैं आले ॥ ४५ ॥ तंव विचार करी पंढरीनाथ ॥ निंबराजासी द्यावें सुख उचित ॥ जेणेंकरूनि प्रेमभरित ॥ होईल रत मत्कीर्तनीं ॥ ४६ ॥ ऐसें म्हणोनि ते वेळ ॥ विप्रवेष धरिला तत्काळ ॥ गळां घालूनि तुळसीमाळ ॥ तमाळनीळ पातले ॥ ४७ ॥ डोईस टोपी कमरेंत मेखळा ॥ सुवास बुका भाळीं शोभला ॥ निंबराजासी घनसांवळा ॥ काय बोलिला ते समयीं ॥ ४८ ॥ मी स्नानासीं जातों भीमरथींत ॥ तस्कर फिरती यात्रेआंत ॥ तरी मेखळा टोपी माळ निश्चित ॥ आपणापासीं असों दे ॥ ४९ ॥ ऐसें म्हणोनि रुक्मिणीपती ॥ आभरणें दिधलीं त्याचे हातीं ॥ आपण न लागतां पातया

पातीं ॥ अदृश्य जाहले तेधवां ॥ १५० ॥ निंबराज पाहे सभोंवतें ॥ तों ब्राम्हण सर्वथा न दिसेच तेथ ॥ एक प्रहरपर्यंत ॥ वाट पाहत बैसला ॥ ५१ ॥ परी तो न येचि परतोन ॥ मग संतांसी सांगे वर्तमान ॥ येथें एक येऊनि ब्राह्मण ॥ बोलिला वचन तें ऐका ॥ ५२ ॥ म्हणे मी जातों स्नानासी ॥ आभरणें असों दे आपणापासीं ॥ मग माळ टोपी मेखळा मजपाशीं ॥ काढोनियां दीधली ॥ ५३ ॥ आपण न लागतां पातया पातें ॥ अदृश्य जाहला जेथिंच्या तेथें ॥ मी बैसलों वाट पाहात ॥ चिंताक्रांत होउनी ॥ ५४ ॥ तरी अजून न येचि सर्वथा ॥ याचा विचार काय सांगा आतां ॥ वचन ऐकोनियां संतां ॥ आश्चर्य चित्ता वाटलें ॥ ५५ ॥ सकळ बोलती वैष्णवभक्त ॥ ब्राह्मण नव्हे तो रुक्मिणीकांत ॥ तुम्हांसी उचित देऊनि त्वरित ॥ जाहले गुप्त तेचि ठायीं ॥ ५६ ॥ तरी आतां संशय न आणूनि मनें ॥ अंगावरी घ्या आभरणें ॥ ऐसीं ऐकोनि संतवचनें ॥ केलें नमन साष्टांग ॥ ५७ ॥ मग कमरेंत घातली मेखळा ॥ कंठीं शोभली तुळसीमाळा ॥ टोपी लेववूनि ते वेळां ॥ बुका लाविला संतजनीं ॥ ५८ ॥ वाळुवंटीं मिळोनि भक्तमंडळी ॥ निंबराजासी म्हणती ते वेळीं ॥ तुज उचित देऊनि वनमाळी ॥ केली दिवाळी भाविकां ॥ ५९ ॥ तरी वाळुवंटीं आज उभे राहून ॥ आपुल्या मुखें करावें कीर्तन ॥ क्षुधित जाहले आमुचे श्रवण ॥ तरी तृप्त करणें तयांसी ॥ १६० ॥ मग मृदंगाचे स्वरावरी ॥ वीणा मेळविला ते अवसरीं ॥ टाळघोळ मेळवून झडकरी ॥ दिव्य पताका उभारिल्या ॥ ६१ ॥ वैदिक शास्त्री पौराणिक ॥ संत महंत वैष्णव अनेक ॥ अठरा वर्णांचे बहुत लोक ॥ श्रवणासी देख पातले ॥ ६२ ॥ अस्तमानासी चालिला दिन ॥ तेव्हां आरंभिलें कीर्तन ॥ विठ्ठलनामें टाळिया पिटोन ॥ केलें नमन निंबराजें ॥ ६३ ॥

अतरीं आठवूनि रुक्मिणीपती ॥ आनंदाश्रू नेत्रीं वाहती ॥ विमानीं बैसोन विबुध येती ॥ कौतुक पाहती तेधवां ॥ ६४ ॥ साबडें सप्रेम गायन ॥ ऐकोन वेधले सकळ जन ॥ सज्ञान आणि विचक्षण ॥ तल्लीन होऊन राहिले ॥ ६५ ॥ वक्त्यासी चित्तीं असतां प्रेम ॥ तेथेंचि संतोषे पुरुषोत्तम ॥ कळा चातुर्य शहाणपण ॥ न लगेचि जाण सर्वथा ॥ ६६ ॥ प्रेमावांचून केलें गायन ॥ कीं शरीर जैसें प्राणेंविण ॥ कीं लवणाविण रांधिलें अन्न ॥ रुचि नेदीच सर्वथा ॥ ६७ ॥ एक सुगंध नसला जरी ॥ तरी ते काय जाळावी कस्तूरी ॥ कीं संतानाविण कांता सुंदरी ॥ तीस घरचारी म्हणों न ये ॥ ६८ ॥ नासिकाविण गोरेपण ॥ काय जाळावें तें सुंदर वदन ॥ तेवीं प्रेमेंविण केलें गायन ॥ तयासी कीर्तन न म्हणावें ॥ ६९ ॥ कृष्णा रामा मेघश्यामा ॥ गोविंदा गोपाळा पुरुषोत्तमा ॥ अच्युता नरहरे आत्मया रामा ॥ असों दे प्रेमा निजभजनीं ॥ १७० ॥ हीं नामें उच्चारूनि सहज ॥ नृत्य करीत निंबराज ॥ मग संतोषोनि गरुडध्वज ॥ काय करिती तेधवां ॥ ७१ ॥ बाळरूप धरून श्रीपती ॥ मयूरपिच्छें घेतलीं हातीं ॥ मग कौतुक मांडिलें तें संतीं ॥ सादर श्रवणार्थी परिसावें ॥ ७२ ॥ निंबराजाच्या खांद्यावरी ॥ उभे राहोनि श्रीहरी ॥ मोरचेल वारिती निजकरीं ॥ हें नवल परिसा भाविक हो ॥ ७३ ॥ जो क्षीरसागरवासी शेषशयन ॥ समुद्रतनयेचें अंतरजीवन ॥ तो निजभक्तांवरी जगज्जीवन ॥ चामरें वारितो निजप्रीतीं ॥ ७४ ॥ वज्रासनीं बैसले नेहटीं ॥ तयांसी लवकर नेदीच भेटी ॥ तो निंबराजाचे राहूनि पाठीं ॥ मयूरपिच्छें ढाळीतसे ॥ ७५ ॥ नाना याग व्रतें तपराशी ॥ करितां नातुडे साधकांसी ॥ तो दीनदयाळ हृषीकेशी ॥ निजदासांसी सन्मानी ॥ ७६ ॥ विरूपाक्ष आवरूनि मन ॥ एकांतीं करितो ज्याचें स्मरण ॥ तो भक्तभूषण रुक्मिणी-

रमण ॥ करी सन्मान दासांचा ॥ ७७ ॥ कीर्तनीं पातला घनसांवळा ॥ तेथेंचि आल्या चौसष्ट कळा ॥ आणि चवदा विद्याही अनुकूळा ॥ दिसोनि येती विचक्षणा ॥ ७८ ॥ तटस्थ पाहती सभाजन ॥ चारी प्रहर जाहलें कीर्तन ॥ परी निद्रा आलस्य कोणाकारणें ॥ न तेचि जाण सर्वथा ॥ ४९ ॥ दुष्काळ नाहीं क्षीरसागरासी ॥ रोग न राहे अमृतापासीं ॥ अंधार भास्कराचे गृहासी ॥ राहील कैसा चतुर हो ॥ १८० ॥ तेवीं प्रेमळाचे कीर्तनांत पाहें ॥ निद्रा आलस्य सहसा न ये ॥ टाकूनि जाती वर्णसोये ॥ जाहले एकमय सकाळिक ॥ ८१ ॥ टाळमृदंगांचे छंदें ॥ टाळिया पिटिती ब्रह्मानंदें ॥ विसरून भेदाभेदद्वंद्वें ॥ नामस्मस्मरणें डोलती ॥ ८२ ॥ चार घटिका उरल्यावरी यामिनी ॥ तों नवल वर्तलें तये क्षणीं ॥ एक सावकारकांता वस्त्र पांघरूनीं ॥ स्नानालागूनि चालिली ॥ ८३ ॥ तिनें दृष्टीस अकस्मात ॥ साक्षात देखिले पंढरीनाथ ॥ मग लगबगां धांवत धांवत ॥ कीर्तनांत पातली ॥ ८४ ॥ निंबराजापासीं येऊनि जाणा ॥ पाहूं लागली रुक्मिणीरमणा ॥ तों तो अदृश्य जाहला जाणा ॥ आश्चर्य मना वाटलें ॥ ८५ ॥ मग आक्रोशें करून रुदन ॥ निंबराजाचे धरिले चरण ॥ लोक पुसती निजकारण ॥ आलीस धांवूनि कां येथें ॥ ८६ ॥ दृष्टीस कौतुक देखिलें काय ॥ तें सांगें आम्हांसी लवलाहें ॥ मग सकळांसी नमस्कारूनि पाहें ॥ बोलिली काय तें ऐका ॥ ८७ ॥ निंबराजाच्या खांद्यावरी ॥ आतां म्यां देखिला श्रीहरी ॥ मयूरपिच्छें धरूनि करीं ॥ स्वहस्तें वारी निजप्रीतीं ॥ ८८ ॥ म्हणूनि धांवूनि आलें त्वरित ॥ तों आतां कांहींच न दिसे येथ ॥ कोठें गेला रुक्मिणीकांत ॥ हें मज निश्चित कळेना ॥ ८९ ॥ सांवळा सुकुमार जगजेठी ॥ पुढती पडावा माझे दृष्टीं ॥ म्हणोनि चित्तीं होतसें कष्टी ॥ परी नेदीच भेटी सर्वथा ॥ १९० ॥

लोक आश्चर्य करिती पाहें ॥ म्हणती हें नवल सांगतां न ये ॥ मग साक्ष पाहावया लवलाहें ॥ समीप आले विचक्षण ॥ ९१ ॥ निंबराजाचे खांद्यावरूनी ॥ अदृश्य जाहले चक्रपाणी ॥ परी बुका टाकिला होता सज्जनीं ॥ त्यावरी पाउलें चिमणीं उमटलीं ॥ ९२ ॥ ऐसी साक्ष देखोन ॥ आश्चर्य करिती संत सज्जन ॥ एकमेकांसी आलिंगून ॥ लोटांगण घालिती ॥ ९३ ॥ जिनें देखिले होते पंढरीनाथ ॥ तिजला नमिती भाविक भक्त ॥ म्हणती तुझे पदरीं होतें सुकृत ॥ रुक्मिणीकांत देखिला ॥ ९४ ॥ यापरी स्तवितां नारी नर ॥ तों उदयासी पातला दिनकर ॥ मग निंबराजें आरती करूनि सत्वर ॥ शार्ङ्गधर ओवाळिला ॥ ९५ ॥ पौर्णिमेस केला गोपाळकाला ॥ मग यात्रेचा समुदाय फुटला ॥ तेणें दीनबंधु खंतावला ॥ सद्गदित जाहला निजलोभें ॥ ९६ ॥ अबला कन्या सासऱ्यास जातां ॥ गहिंवरें रडे जैसी माता ॥ तेवीं यात्रा फुटतां पंढरीनाथा ॥ अवस्था पूर्ण जाहली ॥९७॥ रुक्मिणीस म्हणे श्रीहरी ॥ आतां उदास दिसे हे पंढरी ॥ निजभक्त गेले आपुले घरीं ॥ मज निर्धारीं न कंठे ॥ ९८ ॥ आतां उभयतां उठाउठीं ॥ जाऊं तुकयास द्यावया भेटी ॥ ऐसें म्हणोनि जगजेठी ॥ उतावेळ पोटीं जाहले कीं ॥ ९९ ॥ गरुडासी पाचारिलें सत्वर ॥ सगुणरूप धरिलें साकार ॥ जें अखंड आठवी अपर्णावर ॥ शुद्ध अंतर करोनी ॥ २०० ॥ विनतासुताचे पाठीवरी ॥ रुक्मिणीसहित बैसले हरी ॥ इच्छामात्रें झडकरी ॥ देहुग्रामासी पावले ॥ १ ॥ तों इकडे वैष्णव तुकया वाणी ॥ उतावीळ वाट पाहे मनीं ॥ म्हणे कधीं येईल चक्रपाणी ॥ माता रुक्मिणीसमवेत ॥ २ ॥ आज उजवा लवतो माझा नयन ॥ घडीघडी बाहु करी स्फुरण ॥ क्षणक्षणा वाटे समाधान ॥ हे उत्तम शकुन होताती ॥ ३ ॥ तों आकाशपंथें अकस्मात ॥

गरुडटका देखिला झळकत ॥ मग सामोरा होऊनि त्वरित ॥ घाली दंडवत निजप्रेमें ॥ ४ ॥ मग निजभक्ताचा प्रेमभावो ॥ देखोनि प्रगटले देवाधिदेवो ॥ ब्रह्मादिकांसी ज्याचा ठावो ॥ नेणेचि पहा वो सर्वथा ॥५॥ रूप सांवळें अति सुकुमार ॥ कांसे वेष्टिला पीतांबर ॥ दिव्य कुंडलें मकराकार ॥ कौस्तुभ सुंदर शोभत ॥ ६ ॥ मुगुट विराजे देदीप्यमान ॥ त्यावरी जडलीं दिव्य रत्नें ॥ पदक एकावळी भूषणें ॥ जगज्जीवनें घातलीं ॥ ७ ॥ चरणीं नेपुरें वाळे वाजती ॥ ते ध्वनी ऐकूनि लाजती श्रुती ॥ रुक्मिणीसहित जगत्पती ॥ प्रगट जाहले तेधवां ॥ ८ ॥ ऐसें रूप देखोनि नयनीं ॥ तुकयासी हर्ष वाटला मनीं ॥ सप्रेम आलिंगन देउनी ॥ मिठी चरणीं घातली ॥ ९ ॥ पुढील अध्यायीं सुरसवाणी ॥ देवभक्तांसी होतील बोलणीं ॥ तें सादर होऊनि संतसज्जनीं ॥ परिसावें श्रवणीं निजप्रीतीं ॥ २१० ॥ जें प्रेमगंगेचें जीवन सुरस ॥ कीं आनंदसमुद्रींचा सुधारस ॥ महीपती विनवी श्रोतयांस ॥ सेवा सावकाश निजप्रांतीं ॥ ११ ॥ स्वस्ति श्रीभक्तविजय ग्रंथ ॥ ऐकतां तुष्टेल जगन्नाथ ॥ प्रेमळ ऐका भाविक भक्त ॥ एकपंचाशत्तमाध्याय रसाळ हा ॥ २११ ॥ अध्याय ॥ ५१ ॥ ओंव्या ॥ २१२ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीजगदीश्वराय नमः ॥ ॥ जय जय भक्तकरुणाकरा ॥ अक्षय अभंगा जगदुद्धारा ॥ आदिस्तंभा सायुज्यउदारा ॥ रुक्मिणीवरा श्रीविठ्ठला ॥ १ ॥ तूं जया पाहसी कृपादृष्टीं ॥ त्याची तुटे भवबंधफांसोटी ॥ करूनि प्रपंचाची तुटी ॥ देसी शेवटीं अक्षयपद ॥ २ ॥ तुझें उदारत्व वर्णितां पाहें ॥ सहस्रमुखातेंही लेखा नोहे ॥ महाकवीची मति कुंठित होये ॥ तेथें मी काये मशक ॥ ३ ॥ परी आवडीची ऐसी जाती ॥ बाळकें मातेसी भलतें बोलती ॥ परी जननीस त्याचीं न वाटे खंती ॥ ऐकूनि तुष्टे ती निजलोभें ॥ ४ ॥ तेवीं कृपा करूनि जगज्जीवनें ॥ अंगीकारावीं आर्ष वचनें ॥ हेंचि मागतों तुजकारणें ॥ तुझेचि सत्तेनें दयाळा ॥ ५ ॥ सागरींचें जीवन मेघ आणिती ॥ तें सरिता घेऊन समुद्रासि जाती ॥ तरी उपकार कोण तयाप्रती ॥ ज्याचें त्यास अर्पितां ॥ ६ ॥ भास्कराचे जावें भेटीसी ॥ तरी त्याचेच प्रकाशें पाहावें त्यासी ॥ तेवीं तुज प्रार्थावया हृषीकेशी ॥ सत्ता आम्हांसी असेना ॥ ७ ॥ कीं पृथ्वीस केला नमस्कार ॥ आणि तिजवरचि पडे शरीरभार ॥ तेवीं तुज वर्णावया साचार ॥ आणिक आधार असेना ॥ ८ ॥ नातरी विनवावें प्रभंजनास ॥ तरी त्याच्याच योगें निघती श्वास ॥ तेवीं तुझीं चरित्रें यावया वाचेस ॥ कारण तूंचि अससी पैं ॥ ९ ॥ कीं अग्नीस धूप दाखविला जर ॥ तरी त्याचेच योगें निघे धूर ॥ तेवीं तुझ्याच योगें चित्त होतें स्थिर ॥ निघती उद्गार कथेचे ॥ १० ॥ गंगेसी केला अभिषेक ॥ परी तिजचिपासाव घेतलें उदक ॥ तेवीं तुझिया प्रसादें देख ॥ कवि अनेक वर्णिती ॥ ११ ॥ नातरी चंद्र आला उदयास ॥ त्याच्याच प्रकाशें पाहावें त्यास ॥ कां मातेची सेवा केली विशेष ॥ तरी शरीर असे जननीचें ॥ १२ ॥ तेवीं तुझिया सामर्थ्यें तूं अधोक्षज ॥ जाणसी दासांचें अंतरगुज ॥ आतां अभय वर देऊन

मज ॥ वदवीं निजभक्तविजयकथा ॥ १५ ॥ मागील अध्यायाचे अंतीं ॥ देहूस आले रुक्मिणीपती ॥ सगुण रूप धरूनि निश्चितीं ॥ तुकयासी प्रीतीं भेटले ॥ १६ ॥ मग प्रसन्न होऊनि जगज्जीवन ॥ म्हणती कांहीं माग वरदान ॥ जें विरिंचीस न लाभे करितां प्रयत्न ॥ तें मी देईन तुजलागीं ॥ १७ ॥ यावरी तुका देत उत्तर ॥ म्हणे चित्तीं न पडावा तुझा विसर ॥ गुण गाईन वारंवार ॥ सप्रेम अंतरीं होउनी ॥ १८ ॥ आणि तुझे निजभक्त जे अंतरंग ॥ अखंड असावा त्यांचा संग ॥ हेंच मागतों आला प्रसंग ॥ न करीं मनोभंग दयाळा ॥ १९ ॥ तुझे भजनीं असावी प्रीती ॥ न लगे कांहीं धनसंपत्ती ॥ पुढें करिसील चाऱ्ही मुक्ती ॥ तरी त्या नावडती मजलागीं ॥ २० ॥ अखंड संत-समागम ॥ वाचेसी असावें तुझें नाम ॥ मग गर्भवास असतां संभ्रम ॥ होय सुगम सर्वदा ॥ २१ ॥ हेचि मागणें रुक्मिणीपती ॥ म्हणोनि नमन केलें पुढती ॥ ऐसें ऐकोनि वैकुंठपती ॥ आश्चर्य चित्तीं करी-तसे ॥ २२ ॥ मग गरुडासी म्हणे भक्तसखा ॥ उदास विरक्त प्रेमळ तुका ॥ येणें सर्वत्याग करूनि देखा ॥ मजाचि एका आराधिलें ॥२३॥ माझिया वियोगदुःखेंकरून ॥ अन्न उदक वर्जिलें जाण ॥ म्हणून देह कृश होऊन ॥ गेला वाळून पाहें तुका ॥ २४ ॥ यावरी बोले विनता-सुत ॥ तुम्हीं आशीर्वाद लिहिला पत्रांत ॥ कीं जोंवरी वैकुंठ कैलास दिसत ॥ तोंवरी चिरंजीव असावें ॥ २५ ॥ तें आपुलें वचन वैकुंठ-पती ॥ असत्य नव्हेचि कल्पांतीं ॥ तरी शरीर वाळलें म्हणोनि प्रीतीं ॥ उद्विग्न चित्तीं कां होतां ॥ २६ ॥ भजनीं रतलें याचें चित्त ॥ तेव्हांचि कळिकाळ जाहला अंकित ॥ हा नामयाचा अवतार साक्षात ॥ जाणती संत निजखूण ॥ २७ ॥ अनंत जन्मीं करूनि भजन ॥ एकाग्र निश्चळ करूनि मन ॥ तुम्हांस केले आपुले स्वाधीन ॥ वर्णितो गुण

निजप्रीतीं ॥ २८ ॥ यावरी तुकयास म्हणे जगजेठीं ॥ मी क्षुधित जाहलों बहु पोटीं ॥ उपवासी निघूनि उठाउठीं ॥ तुझिया भेटी पातलों ॥ २९ ॥ तरी गृहांत निपजलें असेल अन्न ॥ तें पात्रीं आणावें विस्तारून ॥ ओलें कोरडें म्हणोन ॥ संकोच मनीं न धरावा ॥ ३० ॥ म्हणाल सन्निध असतां रुक्मिणी ॥ क्षुधित कां आले चक्रपाणी ॥ तुकयाचा हेत होता मनीं ॥ कीं देवा भोजनीं बैसवावें ॥ ३१ ॥ तें मनोगत जाणोनि त्वरित ॥ तैसेंचि वदले पंढरीनाथ ॥ जेणें प्रेमळाचा पुरे हेत ॥ तेंचि दीननाथ करीतसे ॥ ३२ ॥ मग तुकयानें आणोनि जळ ॥ धुतले देवाचे चरणकमळ ॥ कोमल तुलसीदलांची माळ ॥ कंठीं तत्काळ घातली ॥ ३३ ॥ अत्यंत प्रीतीं करून नमन ॥ मग पात्रीं वाढूनि आणिलें अन्न ॥ शुष्क भाकरी भाजीपान ॥ शाकेसी लवण दुसरें असे ॥ ३४ ॥ तें आवडीनें खात जगज्जीवन ॥ ऐकोनि आशंका धरितील सज्जन ॥ म्हणतील क्षीराब्धिवासी नारायण ॥ कोरडें कदन्न खातसे ॥ ३५ ॥ तरी एक सद्भाव असतां अंतरीं ॥ तेथेंच क्षुधित होय श्रीहरी ॥ मग याति कुळ न विचारी ॥ निजप्रीति बरी देखोनियां ॥ ३६ ॥ पक्कान्नें करूनि नाना रीतीं ॥ वाट पाहे दुर्योधन कुमती ॥ परी तेथें न जेवितां श्रीपती ॥ कण्याचि खाती विदुराच्या ॥ ३७ ॥ कीं द्रौपदीनें सद्भावें पाहतां वाट ॥ जेवितां लोटून दिधलें ताट ॥ मग धांवत येऊन बैसले निकट ॥ मागत देंठ भाजीचा ॥ ३८ ॥ जो यज्ञपुरुष अति निर्मळ ॥ तो उच्छिष्ट गवळियांचें खातो बळें ॥ भिल्लिणीचीं उच्छिष्ट फळें ॥ भक्षी घननीळ निजप्रीतीं ॥ ३९ ॥ तो तुकयाचे घरीं कदन्न भक्षितां ॥ येथें आश्चर्य कोणतें चित्ता ॥ म्हणोनि साशंक न व्हावें श्रोतां ॥ पुरातन कथा ऐकोनी ॥ ४० ॥ असो रुक्मिणीसहित जगज्जीवन ॥ आवडीं बैसोन केलें भोजन ॥ करशुद्धी

देऊन तुकयान ॥ उच्छिष्ट आपण भक्षिलें ॥ ४१ ॥ देवास मुखशुद्धीस ते वेळ ॥ आणून दिधलें तुळसीदळ ॥ आवडी देखोनि दीनदयाळ ॥ अति आदरें भक्षिती ॥ ४२ ॥ यापरी होऊन संतुष्टी ॥ मग तुकयासी बोले जगजेठी ॥ आतां मज ठेवूनि हृदयसंपुटीं ॥ वियोगहिंपुटी न व्हावें ॥ ४३ ॥ तूं बोलाविसील जैं मज ॥ तैं सगुण स्वरूपें भेटेन तुज ॥ ऐसें म्हणोनि अधोक्षज ॥ जाते जाहले तेधवां ॥ ४४ ॥ तुकयानें धांवून ते वेळीं ॥ मस्तक ठेविला चरणकमळीं ॥ मग रुक्मिणीसहित वनमाळी ॥ पंढरपुरासी पातला ॥ ४५ ॥ तंव एक ब्राह्मण कामना धरूनी ॥ आळंदीस बैसला अनुष्ठानीं ॥ म्हणे पुराणव्युत्पत्ति व्हावी मजलागुनी ॥ मनीं अखंड चिंतित ॥४६॥ मग दृष्टांत दाविला ज्ञानेश्वरें ॥ कीं तुकयापासीं जाय तूं त्वरें ॥ तो तुज प्रसाद देईल स्वकरें ॥ तरी मनोरथ साचार पुरतील ॥४७॥ तेव्हां ब्राह्मणें विचारूनि चित्तीं ॥ सत्वर आला देहूप्रती ॥ तुकयासी भेटोनि एकांतीं ॥ कामना चित्तींची सांगितली ॥ ४८ ॥ म्हणे म्यां अनुष्ठान केलें अलकावतीसी ॥ ज्ञानदेवें पाठविलें तुम्हांपासीं ॥ वचनें ऐकोनियां ऐसीं ॥ तुका मानसीं विस्मित ॥ ४९ ॥ कांहीं पुण्य नाहीं गांठीं ॥ जरी तें वेंचूं यासाठीं ॥ ज्ञानदेवें हे शेवटीं ॥ पाठी लाविली उपाधी ॥५०॥ मग विचार करीत आपुले मनीं ॥ म्हणे विद्या नाहीं याचे प्राक्तनीं ॥ म्हणोनि ज्ञानदेवें कंटाळोनी ॥ धरणें पाठवूनि दीधलें ॥ ५१ ॥ म्हणे मी नेणता अज्ञान ॥ नेणेंचि जप तप अनुष्ठान ॥ ज्ञानदेवें मजलागून ॥ कासया थोरपण दीधलें ॥ ५२ ॥ मग अकरा अभंग आणि नारळ ॥ ब्राह्मणासी दिधले ते वेळ ॥ म्हणे हें भक्षिशी जे वेळ ॥ ज्ञान तत्काळ तुज होईल ॥ ५३ ॥ ब्राह्मणाचें विकल्पी मन ॥ म्हणे नारळ भक्षितां नव्हे ज्ञान ॥ प्राकृत अभंग मजकारण ॥ [illegible] तैं

कासया ॥ ९४ ॥ ऐसा विकल्प चित्तीं धरून ॥ टाकूनि गेला प्राक्तनहीन ॥ जैसा चिंतामणि हातीं लागतां जाण ॥ गोफणींत घालून दवडिला ॥ ५५ ॥ कां निधान सांपडतां अभाग्याला ॥ तें कोळशाऐसें दिसे त्याला ॥ नातरी पक्वान्न रोगियाला ॥ कडवट जिव्हेसी लागत ॥ ५६ ॥ कां भागीरथीची कुपी जाण ॥ उन्मत्तासी भासे मद्यपान ॥ नातरी कल्पतरूचें वन ॥ जाय डावलून दरिद्री ॥ ५७ ॥ तेवीं तुकयानें प्रसाद दिधला ॥ तो विप्रें तेथेंचि टाकिला ॥ मग अलकावतीस ज्ञानराजाला ॥ पत्र लिहून पाठविलें ॥ ५८ ॥ मज पामरासी देऊनि थोरी ॥ येथें पाठविला धरणेकरी ॥ तुमची आज्ञा वंदोनि शिरीं ॥ उचित झडकरी दीधलें ॥ ५९ ॥ तेणें विकल्प धरूनि मग ॥ टाकिले एकादश अभंग ॥ महाफळाचा करूनि त्याग ॥ गेला सवेग येथूनी ॥ ६० ॥ ऐसें कल्पोनि मानसीं ॥ निरोप पाठविला आळंदीसी ॥ मग ध्यानांत आणूनि हृषीकेशी ॥ नामस्मरण करीतसे ॥ ६१ ॥ तंव शिवाजीराजापासीं देख ॥ शास्त्रज्ञ होता पुराणिक ॥ त्याचा ब्राह्मणजन एक ॥ होता अति मूर्ख अज्ञानी ॥ ६२ ॥ तो तुकोबापासीं सत्वर ॥ करावयासी आला नमस्कार ॥ तोचि नारळ उचलोनि वैष्णववीरें ॥ त्याचे हातीं दीधला ॥ ६३ ॥ आणि एकादश अभंग ठेविले लिहून ॥ तेही दिधले त्याजकारण ॥ तेणें तो नारळ फोडून ॥ तेथेंच भाक्षिला निजप्रीतीं ॥ ६४ ॥ बिऱ्हाडासी गेला तो ब्राह्मण ॥ तों तेथें मांडिलें होतें पुराण ॥ श्रवणासी बैसले पंडितजन ॥ अतिनिपुण वेदशास्त्रीं ॥ ६५ ॥ आणिक श्रोते सज्ञान चतुर ॥ ऐकावया बैसले सादर ॥ तेथे तो ब्राह्मणजन येऊनि सत्वर ॥ करीत प्रश्न पुराणिका ॥ ६६ ॥ तुम्हीं श्लोक वाचिला आतां ॥ त्याचे पदाचा अर्थ राहिला सांगतां ॥ पंडित मागुती विचारितां ॥ तों यथार्थ समस्तां वाटलें ॥ ६७ ॥

म्हणती हें आश्चर्य बहुत ॥ यासी ओनामा तों नव्हता येत ॥ एकाएकीं पुराणें अवगत ॥ कैसीं जाहलीं कळेना ॥ ६८ ॥ वृत्तांत पुसतां त्याकारण ॥ साकल्यें सांगितलें वर्तमान ॥ म्हणे एकादश अभंग तुकयानें ॥ आणि नारळ एक दीधला ॥ ६९ ॥ तो फोडोनि खातांचि ते वेळीं ॥ गीर्वाण भाषा कळों लागली ॥ ऐसी ऐकोनियां बोली ॥ तटस्थ जाहली सकळ सभा ॥ ७० ॥ पुराणिकें समीप बोलावूनि प्रीतीं ॥ पत्र दिधलें त्याचे हातीं ॥ म्हणे हें वाचून दावीं आम्हांप्रती ॥ तरी सत्य प्रतीती वाटेल ॥ ७१ ॥ मग तुकयाचे पाय आठवूनि चित्तीं ॥ सांगूं लागला पुराणव्युत्पत्ती ॥ ऐकोनि पंडित तटस्थ होती ॥ आश्चर्य त्यांप्रति वाटलें ॥ ७२ ॥ म्हणती विष्णुभक्तांची अघटित करणी ॥ नव्हे तेंच करूनि दाविती जनीं ॥ एक सद्भाव चित्तीं धरूनी ॥ चक्रपाणी वश केला ॥ ७३ ॥ जो लीलानाटकी भगवंत ॥ राईचा करी पर्वत ॥ त्याचे आवडते जे निजभक्त ॥ अघटित चरित्र तयांचें ॥ ७४ ॥ मूर्खासी ज्ञान जाहलें अद्भुत ॥ ही चिंचवडीं देवांसी कळली मात ॥ मग ब्राह्मण मिळोन समस्त ॥ स्वभावें बोलती एकमेकां ॥७५॥ आपण मताभिमान करून ॥ तुकयाचें करितों हेळण ॥ परी मनुष्य न म्हणावें त्यालागून ॥ यथार्थ वचन जाणिजे ॥ ७६ ॥ एक म्हणती पाचारूनि त्यासी ॥ प्रीतीनें पुसावें एके दिवसीं ॥ तूं कोण आहेस हें सांग आम्हांसी ॥ ऐसें तुकयासी पुसावें ॥ ७७ ॥ तो ब्राह्मणभक्त अति प्रेमळ ॥ आपणासी सांगेल तत्काळ ॥ ऐसा चिंचवडीं ते वेळ ॥ विचार केला द्विजवरीं ॥ ७८ ॥ मग मनुष्य करून मोलकरी ॥ त्यासी सांगितलें ते अवसरीं ॥ तुवां जाऊनि तेथवरी ॥ तुकयासी लवकरी पाचारिजे ॥ ७९ ॥ इतुकेंच जाऊनि सांग वहिलें ॥ कीं चिंचवडीं देवांनीं पाचारिलें ॥ ऐसें ऐकूनि ते वेळे ॥ मनुष्य उठिला सत्वरीं ॥८०॥

मग देहूस येऊन तयान ॥ तुकयासी केलें साष्टांग नमन ॥ तंव तेथें होतसे हरिकीर्तन ॥ बैसले सज्जन श्रवणासी ॥ ८१ ॥ सप्रेमभावें अति सादर ॥ श्रवण करिती नारी नर ॥ नामघोषें कोंदलें अंबर ॥ पडला विसर देहाचा ॥ ८२ ॥ नाठवे कोणासी प्रपंचभ्रांती ॥ लवों विसरलीं नेत्रपातीं ॥ नामरूपीं जडली वृत्ती ॥ जाहली विश्रांती सकळिकां ॥ ८३ ॥ टाळकरी आणि मृदंग्यांसी ॥ आम्ही कोण हें नाठवे त्यांसी ॥ आपपर नाठवेच कोणासी ॥ प्रेम मानसीं प्रगटलें ॥८४॥ हिलाल धरिला होता ज्यानें ॥ तयासी नाहीं देहभान ॥ नामरूपीं जडलें मन ॥ मी कोण हें स्फुरेना ॥ ८५ ॥ तेणें हिलाल करितां वरी ॥ तों मंडपासी लागला ते अवसरीं ॥ तों आणिक कथा लागली दुसरी ॥ ते सादर चतुरीं परिसावी ॥ ८६ ॥ चांभारगोंदियांत प्रसिद्ध ॥ ज्ञानसागर शेख महंमद ॥ तो कीर्तन करीत सानंद ॥ प्रेमछंदें नामाच्या ॥ ८७ ॥ श्रवणासी बैसले बहुत जन ॥ अठरा वर्णांचे थोर लहान ॥ आणिक चतुर श्रीमंत जन ॥ सज्ञान ब्राह्मण पंडित जे ॥ ८८ ॥ एकाग्र ऐकती कीर्तन सांग ॥ कथेसी आला अद्भुत रंग ॥ पाखंडियांसी वचन न सुचे मग ॥ आरोगिले मूग ते समयीं ॥ ८९ ॥ तों वक्तयानें ते वेळां ॥ उडी मारूनि मंडप चोळिला ॥ हें कौतुक देखोनि डोळां ॥ आश्चर्य सकळां वाटलें ॥ ९० ॥ मग पुढें बैसले होते श्रवणीं ॥ ते पुसते जाहले तये क्षणीं ॥ कशाकरितां मंडप स्वामींनीं ॥ दाखविला चोळूनि आम्हांतें ॥ ९१ ॥ हें कौतुक दृष्टीं देखोन ॥ आशंकित जाहलें त्यांचें मन ॥ शेख महंमद देखोन ॥ काय बोलिला ते समयीं ॥ ९२ ॥ वैष्णव तुका देहूगांवांत ॥ प्रेमभावें कीर्तन करीत ॥ तों मंडपासी हिलाल अकस्मात ॥ लागला अवचित न कळतां ॥ ९३ ॥ तो जळतां दृष्टीं देखिला तेथ ॥ म्यां निजकरें

विझविला येथ ॥ ऐसी ऐकोनियां मात ॥ श्रोते आशंकित जाहले कीं ॥ ९४ ॥ हें कोणासी न वाटे साचार ॥ म्हणती देहूगांव बहुत दूर ॥ तुम्हांस तेथील समाचार ॥ कैशापरी श्रुत जाहला ॥ ९५ ॥ तेथेंही श्रोतयांचा असेल मेळा ॥ त्यांच्या काय न दिसे डोळां ॥ म्हणूनि मंडप तुम्हीं विझविला ॥ हें यथार्थ आम्हां न वाटे ॥ ९६ ॥ मग शेख महंमद बोले वचन ॥ तुकयाचे कीर्तनीं बैसले जन ॥ तयांसी नाहीं देहभान ॥ करितां श्रवण हरिलीला ॥ ९७ ॥ नामरूपीं जडलें चित्त ॥ सकळ जाहले देहातीत ॥ हिलाल लागोनि मंडप जळत ॥ तो म्यां त्वरित विझविला ॥ ९८ ॥ यावरी श्रोते पुसती मात ॥ कीर्तनीं असे पंढरीनाथ ॥ त्यानें कां न चुकविला आघात ॥ मंडप जळतां देखोनी ॥ ९९ ॥ मग शेख महंमद बोलती त्यांसी ॥ प्रेमें भुलला हृषीकेशी ॥ देवपण नाठवेच तयासी ॥ नाठवे भक्तांसी भक्त-पण ॥ १०० ॥ ते दोघे एक जाहले असती ॥ कोणी रक्षावें कोणाप्रती ॥ जेवीं दोन दीपक जळत असती ॥ भिन्न न दिसती सर्वथा ॥ १ ॥ ते एके ठायीं करितां वस्ती ॥ समरसपणें मिळोनि जाती ॥ ऐसी तयांची विदेहस्थिती ॥ माझे चित्तीं श्रुत जाहली ॥ २ ॥ कीं सरितेमाजी विशाळ बेटें ॥ तेथें उदकाचे होती दोन वांटे ॥ मग पुढें होऊनि एकवटें ॥ भिन्नत्व न दाविती सर्वथा ॥ ३ ॥ कां प्रतिमा आणि उपकरण ॥ एकेचि पितळेचीं असती जाण ॥ मुशींत आटतां त्यांकारण ॥ न दिसती भिन्न सर्वथा ॥ ४ ॥ नातरी घृत नवनीत पाहीं ॥ दोन्ही कढविलीं एकेचि ठायीं ॥ त्यांसी वेगळेपण पाहतां कांहीं ॥ भिन्नत्व नाहीं सर्वथा ॥ ५ ॥ तेवीं देव भक्त जाहले असतां एक ॥ कोण कोणाचें जाणेल दुःख ॥ समरसें अविनाश जाहलें सुख ॥ भेदाभेद मावळले ॥ ६ ॥ देवपणा विसरले रुक्मिणीकांत ॥

तुकया न स्मरे मी भक्त ॥ तैसेच श्रोते जाहले समस्त ॥ हा मज वृत्तांत समजला ॥ ७ ॥ हें जरी तुम्हांस न वाटेल साचार ॥ तरी तेथूनि आणा समाचार ॥ ऐसें ऐकूनि उत्तर ॥ श्रोते चतुर संतोषले ॥ ८ ॥ मग देहूचे पाटिलासी पत्र लिहूनी ॥ एक सांडणी पाठविली त्यांनीं ॥ कीं रात्रीं कौतुक देखिलें नयनीं ॥ तें यथार्थ लिहूनि पाठवावें ॥ ९ ॥ अस्तमाना जातां दिनकर ॥ आलें त्याचें प्रत्युत्तर ॥ रात्रीं होतां कीर्तनगजर ॥ मंडपासी हिलाल लागला ॥ ११० ॥ दीडहात छिद्र पडलें जाणा ॥ परी रात्रीं कळलें नाहीं कोणा ॥ सकाळीं उठोनि देखिलें नयना ॥ मग आश्चर्य मना वाटलें ॥ ११ ॥ ऐसें पत्र ऐकतां श्रवणीं ॥ यथार्थ वाटलें त्यांलागोनी ॥ मग शेख महंमदापासीं येऊनी ॥ अवघे नमस्कार घालिती ॥ १२ ॥ म्हणती तेथील वृत्तांत ॥ तुम्हांसी कैसा जाहला श्रुत ॥ हा चमत्कार देखोनि अद्भुत ॥ साश्चर्य चित्त सकळांचें ॥ १३ ॥ ऐसी ऐकोनि वचनोक्ती ॥ म्हणे काय सांगावें तुम्हांप्रती ॥ मीन नीटचि धार चढती ॥ ते आणिकां गती अवघड ॥ १४ ॥ आणिक जलचरें बहुत जाण ॥ परी मत्स्याऐसें त्यां न लोटे जीवन ॥ तेवीं भक्तांचे मनींची खूण ॥ भाविकांवांचून कळेना ॥ १५ ॥ कीं पिपीलिकांचे मार्गानें ॥ पिपीलिकाच चालूं जाणे ॥ तेवीं वैष्णवांचे मनींची खूण ॥ भाविकांवांचून कळेना ॥ १६ ॥ कीं अंतरिक्ष विहंगम उडतां ॥ तेथें मार्ग पहावा कोणता ॥ परी पक्षीच चालती त्या पंथा ॥ आणिकां सर्वथा कळेना ॥ १७ ॥ जे कूपामध्यें बेडूक राहत ॥ ते काय जाणती पयोब्धीची मात ॥ तेवीं गुरुभक्तांची खूण निश्चित ॥ मायालोभियांस कळेना ॥ १८ ॥ ऐसी वचनोक्ति बोलोनि त्वरित ॥ शेख महंमद राहिले निवांत ॥ आश्चर्य मानूनि श्रोते समस्त ॥ घातलें दंडवत सकळांनीं ॥ १९ ॥ असो

सिंहावलोकनें आतां ॥ श्रोतीं परिसावी मागील कथा ॥ जो चिंचवडीं-हूनि मनुष्य येता ॥ त्यानें ऐकिली कथा तुकयाची ॥ १२० ॥ तेथेंच जडला त्याचा भाव ॥ निरोप सांगावयाचा नाहीं आठव ॥ प्रपंच उद्वेग राहिला सर्व ॥ ऐसा जीव सुखावला ॥ २१ ॥ घरासी जावें परतोन ॥ हेंही सर्वथा नाठवे भान ॥ तुकयाचें होतांचि दर्शन ॥ जाहला तल्लीन निजप्रीतीं ॥ २२ ॥ इकडे चिंचवडीं देव वाट पाहात ॥ म्हणती तुकयासी दिवस लागले बहुत ॥ मनुष्यही परतोन नाहीं येत ॥ काय जाहलें कळेना ॥ २३ ॥ मग विचार करूनि सकळांनीं ॥ दुसरा मनुष्य पाठविला त्यांनीं ॥ तोही तुकयाचें कीर्तन ऐकूनि ॥ विदेही होऊनि बैसला ॥ २४ ॥ विलंब लागतांचि त्याप्रती ॥ तिसरा पाठविला मागुती ॥ त्याचीही उडाली देहभ्रांती ॥ सप्रेम चित्तीं होऊन ॥ २५ ॥ मग गजवदनाचे उपासक ॥ आश्चर्य करिती सकळिक ॥ तिघे मनुष्य गेले देख ॥ न ये एकही परतोनी ॥ २६ ॥ जेवीं गंगेसी वोहळ गेले ॥ ते आपलेपणासी समूळ मुकले ॥ कां नानापुष्पांचे मकरंद भले ॥ वायूस मिळाले समरसें ॥ २७ ॥ तरंग मिळाला जळांत ॥ कीं अभ्रचि लपलें आकाशांत ॥ कीं सुवागी पडे मुशींत ॥ ते नाहीं येत परतोनी ॥ २८ ॥ तैसेंचि जाहलें त्यांकारण ॥ निरोप-ही न सांगती येऊन ॥ तुकयाचें ऐकतां सप्रेम गायन ॥ राहिले तल्लीन होऊनी ॥ २९ ॥ तुकयासी सांगितलें असतें तयांनीं ॥ तरी यावया अनुमान न करिता मनीं ॥ त्याऐसा ब्राह्मणभक्त जनीं ॥ वैष्णव ज्ञानी असेना ॥ १३० ॥ तरी आपणचि सांडोनि वर्णा-भिमान ॥ जाऊनि घ्यावें त्याचें दर्शन ॥ संशय वाटतसे मनीं जाण ॥ ते जीवींची खूण पुसावी ॥ ३१ ॥ ऐसा विचार करूनि जाण ॥ ब्राह्मण निघाले तेथून ॥ हे अंतरीं तुकयालागून ॥ न सांगतां खूण

कळली कीं ॥ ३२ ॥ म्हणे मनुष्यें पाठविलीं विप्रांनीं ॥ परी तो सांगितला नाहीं निरोप कोणी ॥ आतां तेचि कृपावलोकनीं ॥ येताति चालोनि भेटावया ॥ ३३ ॥ तरी आपण न जातां येथून ॥ ब्राह्मणांचा होईल अपमान ॥ लक्ष्मीकांत ज्यांचे चरण ॥ हृदयीं भूषण वागवितो ॥ ३४ ॥ ते आले नाहींत येथवरी ॥ तों आपण पुढें जावें सत्वरीं ॥ ऐसें विचारून अंतरीं ॥ निघे सत्वरीं तेथवां ॥ ३५ ॥ जैसी चातका तृषा लागत ॥ तों मेघ सत्वर धांवूनि येत ॥ कीं उदया येतां रोहिणीकांत ॥ सरितानाथ उचंबळे ॥ ३६ ॥ नातरी हिरकणी देखोनि सुंदरा ॥ ऐरणींतूनि निघे हिरा ॥ येरयेराच्या अंतरा ॥ साक्ष जैसी प्रतीती ॥ ३७ ॥ कां चुंबकाची देखोनि प्रीती ॥ लोहरज येती तयाप्रती ॥ तेवीं द्विजवरांची अत्यंत प्रीती ॥ तुकया चित्तीं जाणवलें ॥ ३८ ॥ म्हणूनियां लवडसवडी ॥ विष्णुभक्त जातसे तांतडी ॥ श्रीहरीचे गुण कडोविकडी ॥ अति आवडी गातसे ॥ ३९ ॥ अर्ध पंथ लोटतां त्वरित ॥ तों द्विजवर देखिले अकस्मात ॥ तुकयानें मग दंडवत ॥ अतिप्रीतीनें घातलें ॥ १४० ॥ यावरी धरामर बोलत ॥ तूं साक्षात विष्णुभक्त ॥ म्हणोनि दर्शनाचा धरूनि हेत ॥ येत होतों तुजपासीं ॥ ४१ ॥ तंव येथेच मनोरथ पूर्ण जाहले ॥ मग सप्रेम आलिंगन दिधलें ॥ आसनावरी द्विजवर बैसले ॥ तुकयासी बोलिले तें ऐका ॥ ४२ ॥ कलीमाजी अवतार घेऊनी ॥ त्वां अघटित चरित्र दाखविलें जनीं ॥ हें देखिलें आपुले नयनीं ॥ विस्मित मनीं होतसों ॥ ४३ ॥ मग अवसर पाहूनि एकांतीं ॥ पुसावयासी आलों तुम्हांप्रती ॥ तरी कोण आहां तें सत्वरगती ॥ आम्हांसी निश्चितीं सांगावें ॥ ४४ ॥ ऐकूनि द्विजवरांचें वचन ॥ विचार करी मनांतून ॥ म्हणे यांसी प्रचीत दाखविल्याविण ॥ संशयखंडन नव्होचि ॥ ४५ ॥ मग आपले

मांडीचें चर्म धरूनी ॥ ओढून चिरिलें तये क्षणीं ॥ तंव निखळ कापूस पिंजारोनी ॥ भरिला असे त्यामाजी ॥ ४६ ॥ हें द्विजवरांहीं देखोनि दृष्टीं ॥ आश्चर्य करिती आपुले पोटीं ॥ म्हणती तुकयाची मनुष्यरहाटी ॥ कैसी चालती कळेना ॥ ४७ ॥ रुधिर मांस नसतां कांहीं ॥ कैसें चैतन्य राहिलें देहीं ॥ एक म्हणती मायालाघवी ॥ ईश्वरकरणी अघटित ॥ ४८ ॥ पंचभूतांचें ओडंबर कोडें ॥ माया-ममतेच्या लावूनि तोंडें ॥ जीवासी लाविलें विषयवेडे ॥ प्रपंचकाबाडें वाढविलें ॥ ४९ ॥ याविरहित तुका वैष्णवभक्त ॥ अनुभवें कळों आली प्रचीत ॥ यासी म्हणों नये मनुष्य प्राकृत ॥ जगद्गुरु निश्चित अवत-रला ॥ १५० ॥ जैसें गंगेसी न म्हणावें जीवन ॥ कीं परिसासी न म्हणावें पाषाण ॥ कनकासी अन्य धातूंसमान ॥ लेखों नये सर्वथा ॥ ५१ ॥ वृक्ष नव्हेचि कल्पतरू ॥ कीं समुद्र न म्हणावा सरोवरू ॥ कीं इतर पर्वतांसमान मेरू ॥ लेखों नये सर्वथा ॥ ५२ ॥ अंडजयातीमाजी जाण ॥ निजभक्त जन्मला सुपर्ण ॥ तेवीं शूद्रयातींत हा वैष्णवजन ॥ उपमा गौण दिसताहे ॥ ५३ ॥ गरुडें विष्णूचें होऊनि वहन ॥ आपुलें शरीर केलें पावन ॥ तुकयानें करूनि हरिकीर्तन ॥ जड जीव संपूर्ण उद्धरिले ॥ ५४ ॥ पुढेंही याची ऐकोनि कविता ॥ वैराग्य उपजेल खळांचे चित्ता ॥ भाविक सज्ञान वैराग्य भक्तां ॥ मार्ग पांजळ दावील ॥ ५५ ॥ ऐसे बोलोनि द्विजवर ॥ तुकयासी करिती नमस्कार ॥ येरू वरचेवरी धरूनि शिर ॥ चरणीं सादर लागला ॥ ५६ ॥ विप्रांसी म्हणे ऐका मात ॥ हें तुम्ही करीतसां अनुचित ॥ आमुचा स्वामी भृगूची लात ॥ हृदयीं वागवीत अद्यापि ॥ ५७ ॥ जो देवाधिदेव जगज्जीवन ॥ त्यासही तुम्ही पूज्यमान ॥ आणि मी हीन-याति अनाथ दीन ॥ देतसां थोरपण निजकृपें ॥ ५८ ॥ यावरी

द्विजवर उत्तर देती ॥ ज्यासी विष्णुभजनीं लागली प्रीती ॥ त्याची म्हणावया नीच जाती ॥ कुंठित श्रुति जाहल्या कीं ॥ ५९ ॥ वानर विनटले श्रीरामभजनीं ॥ तें वाल्मीकें वर्णिलें रामायणीं ॥ गोवळयांची कीर्ति पुराणीं ॥ ठेविली लिहूनि श्रीव्यासें ॥ १६० ॥ म्हणोनि तुझी करावया स्तुति ॥ अधिकार आहे आम्हांप्रती ॥ जे विष्णुभक्तांची अद्‌भुत कीर्ति ॥ भरूनि त्रिजगतीं उरली असे ॥ ६१ ॥ बहुत दिवस होता हेत ॥ तो आज पुरला मनोरथ ॥ जे मांडी चिरूनि निजहस्तें त्वरित ॥ दाविली प्रचीत आम्हांसी ॥ ६२ ॥ पुढती आलिंगन देऊनि प्रीतीं ॥ ब्राह्मण तुकयासी काय बोलती ॥ चिंचवडीं चलोनि एक राती ॥ कीर्तन निगुती करावें ॥ ६३ ॥ त्यांचें राखावया मनोगत ॥ नगरात गेले एक रात ॥ तों लोहोगांवींचे मिळोनि गृहस्थ ॥ विचार करीत एकमेकां ॥ ६४ ॥ म्हणती तुकयासी आणोनि आपुले नगरीं ॥ कीर्तन ऐकावें धणीवरी ॥ ते सेवितां प्रेमामृतलहरी ॥ सार्थक संसारीं होईल ॥ ६५ ॥ मग तुकयासी विनीत होऊनी ॥ लोहोगांवास नेलें तयांनीं ॥ नित्यनित्य आवडी करूनी ॥ ऐकती श्रवणीं हरिकथा ॥ ६६ ॥ भाविक लोक जे सज्जन ॥ करिती ब्राह्मणसंतर्पण ॥ नाना-परींचीं पक्वान्नें करून ॥ घालिती भोजन विप्रांसी ॥ ६७ ॥ दिव्य मंडप उभारून ॥ पुष्पहार सुगंध चंदन ॥ कीर्तनासी प्रारंभ होतां जाण ॥ करिती पूजन वैष्णवांचें ॥ ६८ ॥ लोहोगांवांत एक मास ॥ नित्य नित्य सोहळा विशेष ॥ तंव पंढरपुरचे हरिदास ॥ देशावरास चालिले ॥ ६९ ॥ तंव एक व्यवसायी बैसोनि अश्वावरी ॥ सत्वर चालिला बाजारीं ॥ देखोनि हरिदास ते अवसरीं ॥ काय बोलती तयासी ॥ १७० ॥ अश्वारूढ होऊन मार्ग क्रमिसी ॥ येथें तुज निद्रा लागली कैसी ॥ हें नवल देखोनि दृष्टीसी ॥ आश्चर्य आम्हांसी वाटलें ॥७१॥

तंव व्यवसायी बोले त्यांकारण ॥ चाऱ्ही प्रहर रात्रीं जागरण ॥ ऐसें एक मासपर्यंत जाण ॥ होतसे कीर्तन तुकयाचें ॥ ७२ ॥ ऐसी ऐकोनियां मात ॥ हरिदास जाहले चिंताक्रांत ॥ म्हणती आपण लोहोगांवांत ॥ आतां न जावें सर्वथा ॥ ७३ ॥ जेथें प्रेमळाचें कीर्तन होत ॥ तरी आपुलें कसब न रुचे तेथ ॥ जेवीं रोगियास लाधलें दिव्यामृत ॥ तो न घे औषध कल्पांतीं ॥ ७४ ॥ अमूल्या हिरियांची दीप्ती ॥ काचमणी लोपोनि जाती ॥ नातरी उदयासी येतां गभस्ती ॥ दीपक हरपती त्यापुढें ॥ ७५ ॥ समीप गंगा वाहतां जाण ॥ तेथें मग वापीकूपांस पुसे कोण ॥ तेवीं प्रासादिकांचें ऐकतां कीर्तन ॥ धीटपाठ गायन रुचेना ॥ ७६ ॥ तरी लोहोगांव डावलोनियां पुढारीं ॥ आतां चलावें आणिका नगरा ॥ ऐसें बोलोनियां येरयेरां ॥ हरिदास सत्वरां परतले ॥ ७७ ॥ गांवींचे लोक होते तेथ ॥ ते सत्वर येऊनि नगरांत ॥ तुकयासी सांगती वृत्तांत ॥ जो देखिला निज दृष्टी ॥ ७८ ॥ ऐसें ऐकतांचि वचन ॥ तेथोन उठिला न लागतां क्षण ॥ म्हणे आपण सामोरा जाऊन ॥ आणावे प्रार्थून हरिदासां ॥ ७९ ॥ आपण सवेग चालत ॥ अंतरीं उल्हास वाटे बहुत ॥ ग्रामवासी लोक समस्त ॥ तेही चालती सामोरे ॥ १८० ॥ म्हणती पंढरी क्षेत्रीं हरिदास ॥ चालिले होऊनि उदास ॥ तरी आपण प्रार्थूनियां तयांस ॥ आणावें नगरास आपुल्या ॥ ८१ ॥ मग पुढें धांवणार पाठवूनी ॥ परतविलें तयांलागोनी ॥ म्हणती वैष्णव तुका आवडीकरूनी ॥ भेटावयास येतसे ॥ ८२ ॥ इतुका निरोप सांगतां जाण ॥ तंव तेही पावले न लागतां क्षण ॥ मग हरिदासांसी करूनि नमन ॥ देऊनि आलिंगन भेटले ॥ ८३ ॥ तुकयास म्हणती क्षेत्रवासी ॥ आम्हीं पातलों देशावरासी ॥ कीं घरीं लग्न वैशाखमासीं ॥ करणें असे पुत्राचें ॥ ८४ ॥ अवश्य म्हणोनि

ते वेळे ॥ गांवांत हरिदासांसी आणिलें ॥ राहावयासी देऊनि स्थळ चांगलें ॥ शिधासाहित्य पाठविलें ॥ ८५ ॥ मग करूनियां भोजन ॥ रात्रीं करिती हरिकीर्तन ॥ एकमासपर्यंत जाण ॥ होतसे आनंद या रीतीं ॥ ८६ ॥ मग ग्रामवासियां भाविक लोकां ॥ आज्ञा करी वैष्णव तुका ॥ आतां देशावर करूनि देखा ॥ हरिदासां वाटे लावावें ॥ ८७ ॥ ब्राह्मणांचे कष्ट घेऊन ॥ मग त्यांसी द्यावें द्रव्यदान ॥ हें तुम्हांसी वाटतें भूषण ॥ परी पदरीं पुण्य पडेना ॥ ८८ ॥ तरी नगरांत आहेत वस्तीकर ॥ नांदताती लहान थोर ॥ त्यांची शक्ति पाहूनि साचार ॥ मागा देशावर सकळांसी ॥ ८९ ॥ ऐकोनि तुकयाची वाणी ॥ अवश्य म्हणती तये क्षणीं ॥ मग लेखणी पत्र आणोनी ॥ असाम्या मांडोन दीधल्या ॥ १९० ॥ उत्तम मध्यम कनिष्ठ जाण ॥ नगरांत नांदत असती जन ॥ ते म्हणती तुकयालागोन ॥ पत्रीं अंक घालावा ॥ ९१ ॥ मग उत्तमावरी घालूनि तूळ ॥ टाळी लिहिली मध्यमावर ॥ कनिष्ठावरी पकार ॥ लिहिला सत्वर ते समयीं ॥ ९२ ॥ तें देखोनी ग्रामवासी ॥ म्हणती हें न ये आमुचे चित्तासी ॥ मग तुका उत्तर देत तयांसी ॥ जें येईल चित्तासी तें करा ॥ ९३ ॥ त्यांनीं उल्हास धरून अंतरीं ॥ मुळु लिहिलें उत्तमावरी ॥ उदाणूकें आंख झडकरी ॥ मध्यमावरी टाकिला ॥ ९४ ॥ पकार होता कनिष्ठावरी ॥ एक आंख घातला त्यावरी ॥ तुकयास दाऊनि सत्वरीं ॥ गांवकरी ऊठले ॥ ९५ ॥ गांवांत जाऊनि सत्वर ॥ उकलोनि आणिलें देशावर ॥ मुख्य जे म्हणवीत होते थोर ॥ ते तुकयासी उत्तर बोलती ॥ ९६ ॥ पुढें ठेवूनि द्रव्यराशी ॥ म्हणती आम्हीं युक्त केली कैसी ॥ आतां देशावर हरिदासांसी ॥ आपुले हातीं समर्पा ॥ ९७ ॥ ऐसें बोलतां ते अवसरीं ॥ तुकयासी कळों आलें अंतरीं ॥

कीं दातियांच्या चित्तांतरीं ॥ अहंकार वैरी प्रकटला ॥ ९८ ॥ जैसी पक्कान्नांत पडिली मक्षिका ॥ कीं दुग्धामाजी लवणकणिका ॥ कीं प्रेमळांमाजी लटिका ॥ कुटिल येऊन बैसला ॥ ९९ ॥ कीं तारुण्यदशेंत क्षयरोग ॥ कीं विप्रसभेंत प्रकटला मांग ॥ नातरी विरक्तासी स्त्रीसंग ॥ कर्मयोगें जोडला ॥ २०० ॥ कीं क्षेत्र पिकासी आलें बहुत ॥ तों टोळधाड पडली अकस्मात ॥ कीं पश्चिमधान्यावरी मार्गशीर्षांत ॥ तांबारा अविचित पडियेला ॥ १ ॥ नातरी गगनीं वोळल्या पर्जन्यधारा ॥ तों अकस्मात सुटला दक्षिणवारा ॥ कीं पौर्णिमेचा चंद्र उगवतां बरा ॥ तंव राहु प्रगटला त्याआड ॥ २ ॥ तेवीं दान देतेअवसरीं ॥ यांस अभिमान पातला वैरी ॥ जेणें होय याची बोहरी ॥ तैसीच परी करावी ॥ ३ ॥ मग लोकांसी म्हणे वैष्णवभक्त ॥ देशावर आणिलें तुम्हीं समस्त ॥ तरी चुकलें वांकलें गांवांत ॥ राहूं सर्वथा न द्यावें ॥ ४ ॥ लोक म्हणती ते वेळ ॥ गांवांत साळी एक दुबळ ॥ तो निंदक नष्ट महाखळ ॥ नाहीं प्रेमळ अंतरीं ॥ ५ ॥ तो एक राहिला असे जाण ॥ इतरीं दिधलें शक्तिप्रमाण ॥ ऐसें ऐकोनि वचन ॥ भक्त प्रेमळ बोलती ॥ ६ ॥ तुम्ही जाऊन त्याचे मंदिरीं ॥ माझा निरोप सांगा सत्वरीं ॥ रुका अधेला कांहीं तरी ॥ आणा धर्मार्थ मागुनी ॥ ७ ॥ ऐकूनि तुकयाचें वचन ॥ आश्चर्य करिती सकळ जन ॥ मग साळियाचे घरासी जाऊन ॥ अंगणीं उभे राहिले ॥ ८ ॥ परी तो कांहींच न बोले वचनासी ॥ पांजणी करी वेगेंसीं ॥ तुम्ही कोण आलेत कासयासी ॥ उत्तर कोणासी करीना ॥ ९ ॥ गांवकरी विस्मित होऊन ॥ एकमेकांसी सांगती खूण ॥ म्हणती तुकयाचे भिडेकरून ॥ मूर्खापासीं पातलों ॥ २१० ॥ परी हा कांहीं न बोले वचन ॥ मग बोलते जाहले सकळ जन ॥ पंढरीचे

हरिदास आले जाण ॥ एक मास कीर्तन होतसे ॥ ११ ॥ कांहीं देशावर मागावयासी ॥ तुकयानें पाठविलें तुजपासीं ॥ वचनें ऐकोनि ऐसीं ॥ मूर्ख मानसीं संतापला ॥ १२ ॥ म्हणे तुकयानें मांडिली बडबड ॥ तैंपासोनि तुम्हां लागलें वेड ॥ सांडोनियां लौकिकचाड ॥ नाचतां उघड कीर्तनीं ॥ १३ ॥ आपुल्या संसारा पाडूनि तुटी ॥ आतां कां घेतसां माझी पाठी ॥ घरीं नाहीं थाळा वाटी ॥ मी तुम्हांसी शेवटीं काय देऊं ॥ १४ ॥ ऐकूनि मूर्खाचें वचन ॥ कांता बोले त्यालागून. ॥ थोर थोर लोक तुकयाचे वचनें ॥ अंगणीं येऊन उभे कीं ॥ १५ ॥ तुम्ही निंदक परम खळ ॥ मुखें न बोला शब्द रसाळ ॥ बैसावयासी निर्मळ स्थळ ॥ तेंही न मिळे सर्वथा ॥ १६ ॥ आतां विवेक करूनि चित्तीं ॥ कांहीं तरी द्यावें यांप्रती ॥ ऐकोनि कांतेची वचनोक्ती ॥ मूर्ख चित्तीं संतापला ॥ १७ ॥ सक्रोध होऊनि बोले काय ॥ एक तांब्या घरांत आहे ॥ तो यांस देऊनि लवलाहें ॥ वाटे लावीं सत्वर ॥ १८ ॥ ऐकूनि भ्रताराचें वचन ॥ कांता पावली समाधान ॥ मग उदकपात्र आणून ॥ त्यांचे करीं दीधलें ॥ १९ ॥ त्यानें दिधलें डाव्या करीं ॥ यांनीं लाभ अनुभविला अंतरीं ॥ तांब्या घेवोनियां करीं ॥ निघाले झडकरी तेथूनी ॥ २२० ॥ आश्चर्य करिताती सकळ ॥ म्हणती प्रसन्न जाहला खळ ॥ दावाग्नि होय शीतळ ॥ कीं शेरास फळ जैसें आलें ॥ २१ ॥ आजि शुष्क काष्ठास अंकुर फुटला ॥ कीं पाषाणासी धर्म दाटला ॥ कीं राहु सोज्ज्वळ होऊनि भला ॥ प्रकाश पाडिला जगावरी ॥ २२ ॥ तैसेंचि घडोनि आलें स्पष्ट ॥ जे उदारत्व धरी हा परम नष्ट ॥ एक म्हणती आपुलें अदृष्ट ॥ सानुकूल होतें कीं ॥ २३ ॥ ऐसें बोलोनि परस्पर ॥ तुकयापासीं आले सत्वर ॥ पुढें ठेवूनि उदकपात्र ॥ करिती नमस्कार तेधवां

॥ २४ ॥ तें देखोनि वैष्णव वीर ॥ लोकांसी बोले प्रतिउत्तर ॥ तो साळी आहे मोठा उदार ॥ दिधलें देशावर बहुतचि ॥ २५ ॥ आपुले करें घेऊनि त्वरित ॥ म्हणती हें आहे सुवर्णपात्र ॥ तुम्हांस न कळलें अणुमात्र ॥ परीक्षा स्वतंत्र कळेना ॥ २६ ॥ लोक म्हणती तये वेळ ॥ हें पितळेचें पात्र सोज्वळ ॥ उजळोनि केलें अति निर्मळ ॥ कांचना-ऐसें दिसतें कीं ॥ २७ ॥ अग्नींत तावून पाहतां जाण ॥ तंव तें आहे शुद्ध सुवर्ण ॥ ऐसें कौतुक देखोन ॥ विस्मित मन सकळांचें ॥ २८ ॥ म्हणती अघटित संतांचा महिमा ॥ पितळेची दवडिली काळिमा ॥ अद्भुत तुकयाचा भजनप्रेमा ॥ द्यावया उपमा नसे कीं ॥ २९ ॥ मग हरिदासांसी बोलावून ॥ केलें तयांचें चरणक्षालन ॥ पुष्पहार गळां घालून ॥ दिधलीं वस्त्रें सकळांसी ॥ २३० ॥ गांवकरी म्हणती देशावर ॥ आणिला करा अंगीकार ॥ सकळ करिती नमस्कार ॥ अति आदरेंकरूनी ॥ ३१ ॥ मग वैष्णव तुका काय बोलत ॥ ग्रामवासी हे उदार बहुत ॥ यांनीं द्रव्य उकळोनि त्वरित ॥ दिधलें निश्चित तुम्हांसी ॥ ३२ ॥ एक दुर्बळ साळी ग्रामवासी ॥ परम शठ म्हणती त्यासी ॥ त्यानें सुवर्णपात्र तुम्हांसी ॥ मनोभावेंसीं अर्पिलें ॥ ३३ ॥ हें तुळसीदळ अंगीकारून ॥ करावें आपुल्या पुत्राचें लग्न ॥ ऐसें बोलूनियां वचन ॥ वंदिले चरण सद्भावें ॥ ३४ ॥ आम्ही एक उदार दाते जनीं ॥ हा अभिमान होता ज्यांचे मनीं ॥ ते हें कौतुक देखोनि नयनीं ॥ लज्जित होऊनि राहिले ॥ ३५ ॥ हरिदास संतोष मानूनि बहुत ॥ पंढरपुरासि गेले त्वरित ॥ प्रेमळ तुका अति विरक्त ॥ देहूग्रामासी पातला ॥ ३६ ॥ सांडोनियां सन्मानपूजा ॥ हृदयीं चिंती अधोक्षजा ॥ दीन अनाथ आणि राजा ॥ सारिखेचि मानी दृष्टीसी ॥ ३७ ॥ तंव एके दिवसीं प्रेमळ भक्त ॥ किंचित होता निद्रित ॥

तों दृष्टांत देखिला साक्षात ॥ तो परिसा श्रोते भाविक हो ॥ ३८ ॥ इंद्रायणीचे स्नानास जात ॥ तंव काय करीत पंढरीनाथ ॥ विप्राचा वेष धरूनि त्वरित ॥ तुकयासी अवचित भेटले ॥ ३९ ॥ ब्राह्मण देखोनि दृष्टीसी ॥ साष्टांग नमस्कार घातला तयासी ॥ मग तुकयाचे मस्तकीं हृषीकेशी ॥ हस्त ठेवीत निजकृपें ॥ २४० ॥ उपदेश देतांचि त्या अवसरा ॥ नमस्कार केला द्विजवरा ॥ म्हणे स्वामी येऊनि माझिया घरा ॥ भोजन करा निजप्रीतीं ॥ ४१ ॥ त्यावरी ब्राह्मण उत्तर देत ॥ आम्हांस पावशेर पाहिजे घृत ॥ तें देशील तरी निश्चित ॥ येतों त्वरित घरासी ॥ ४२ ॥ अवश्य म्हणूनि ते अवसरीं ॥ विप्रासी धरिला आपुले करीं ॥ सत्वर येऊनि स्वमंदिरीं ॥ कांतेप्रती बोलत ॥ ४३ ॥ ब्राह्मण क्षुधित उपवासी ॥ तरी शिधा साहित्य द्यावें त्यासी ॥ पावशेर घृत नित्य भोजनासी ॥ मनोभावेंसी अर्पावें ॥ ४४ ॥ ऐसें बोलतांचि वचन ॥ कांता जाहली क्रोधायमान ॥ म्हणे कोठोनि आणिला ब्राह्मण ॥ घृत कोठून म्यां द्यावें ॥ ४५ ॥ ऐसें ऐकोनि कठीणोत्तर ॥ अदृश्य झाले शार्ङ्गधर ॥ जो लीलानाटकी सर्वेश्वर ॥ कौतुक दाखवी निजभक्तांसी ॥ ४६ ॥ ऐसा देखोनि स्वप्नसंभ्रम ॥ जागृतीस आले तुकाराम ॥ हृदयीं अद्भुत दाटलें प्रेम ॥ कौतुक निरुपम देखोनी ॥ ४७॥ म्हणती कृपा केली सद्गुरुनाथें ॥ परी सेवा घडली नाहीं मातें ॥ मार्गीं जातां गंगास्नानातें ॥ सांपडविलें मजलागीं ॥ ४८ ॥ मस्तकीं ठेवूनियां कर ॥ घृत मागोनि पावशेर ॥ घरीं कलह मांडिला थोर ॥ गेले सत्वर म्हणूनी ॥ ४९ ॥ केशवचैतन्य राघवचैतन्य ॥ सांगितली माळिकेची खूण ॥ बाबाजी आपुलें नामाभिधान । बोलिले वचन सद्गुरु ॥ २५० ॥ आवडीचा मंत्र झडकरी ॥ सांगितला रामकृष्ण-हरी ॥ जो प्रीतीकरूनि त्रिपुरारी ॥ निरंतरीं जपतसे ॥ ५१ ॥

माघ शुद्ध दशमी साचार ॥ पाहोनियां गुरुवार ॥ माझा करूनि अंगीकार ॥ गेले सत्वर सद्गुरु ॥ ५२ ॥ ऐसा विश्वास धरून ॥ प्रेमें करी हरिभजन ॥ रात्रीं आनंदेंकरून ॥ करीत कीर्तन निजनिष्ठें ॥ ५३ ॥ नानापरींचे दृष्टांत अनेक ॥ रसाळ कवित्व प्रासादिक ॥ श्रवणीं ऐकतां सभाग्य लोक ॥ होती तल्लीन मानसीं ॥ ५४ ॥ म्हणती हा नव्हे मानववीर ॥ केवळ ईश्वरी अवतार ॥ याचेनि मुखें रुक्मिणीवर ॥ करी उद्धार जनांचा ॥ ५५ ॥ ऐसी प्रतिष्ठा वाढतां जनीं ॥ दुरात्मे संतप्त जाहले मनीं ॥ म्हणती शास्त्रमार्ग टाकोनी ॥ पाखंडवाणी बोलतसे ॥ ५६ ॥ कर्ममार्ग सकळ बुडवून ॥ भजनीं लाविले भाविक जन ॥ एक भक्तिमार्गावांचून ॥ न बोले आन सर्वथा ॥ ५७ ॥ तुकयानें केलें कवित ॥ त्या वह्या बांधोन वस्त्रांत ॥ उदकांत बुडवाव्या त्वरित ॥ विचार निश्चित दृढ केला ॥ ५८ ॥ जैसी गंडिकामूर्ती देखोनी ॥ यवन उगेंचि जळती मनीं ॥ मग अंतरीं कुमती धरूनि ॥ टाकूं फोडून म्हणताती ॥ ५९ ॥ कां पिंजऱ्यांत शुक बैसोन ॥ स्वच्छंदें करी रामभजन ॥ तो शब्द कानीं ऐकून ॥ ससाणा मनीं संतापे ॥ २६० ॥ नातरी व्रत करितां एकादशी ॥ मान्यत्व पावला अंबऋषी ॥ मग दुर्वास संतप्त होऊनि मानसीं ॥ पातला छळणासी सक्रोध ॥ ६१ ॥ तैशापरी ते दुर्जन ॥ प्रवेशले तुकयाचें सदन ॥ म्हणती तुवां पाखंड रचून ॥ लाविले जन भक्तीसी ॥ ६२ ॥ हे तुझी प्राकृत अशुद्ध वाणी ॥ सर्वथा ऐकूं नये श्रवणीं ॥ ऐसें म्हणूनि त्या दुर्जनीं ॥ पुस्तकें हिरोनि घेतलीं ॥ ६३ ॥ मोटा बांधोनि सत्वरी ॥ पाषाण घातले त्यांभीतरीं ॥ नेऊनि इंद्रायणीचे तीरीं ॥ उदकामाझारी बुडविल्या ॥ ६४ ॥ ब्राह्मण म्हणती तुकयालागून ॥ तेरा दिवसांचा घातला पण ॥ जरी कोरडे काढील

जगज्जीवन ॥ तरी मानूं प्रमाण यथार्थ ॥ ६५ ॥ ऐसें बोलोनि ते अवसरीं ॥ गेले सत्वर आपुले घरीं ॥ तुकयाचिया चित्तांतरीं ॥ विक्षेप फार वाढला ॥ ६६ ॥ जैसी कांचेची कुपी ओतिली ॥ ते अवचित फोडूनि टाकिली ॥ कां पट्टदुकूलाची घडी केली ॥ ते पावकें जाळिली अकस्मात ॥ ६७ ॥ नातरी बकुळाचा वृक्ष लागला ॥ तो अजापाळकें तोडोनि टाकिला ॥ विक्षेप वाटे बनकराला ॥ तैसें तुकयाला जाहलें कीं ॥ ६८ ॥ कीं निर्जळ वर्नांच्या विहिरी बुजवितां ॥ तळमळ करी कनवाळू दाता ॥ नातरी तुळसीवन बोकडें खंडितां ॥ वैष्णवभक्तां विक्षेप ॥ ६९ ॥ कां षड्रस रांधिले पक्वान्न ॥ त्यासी अकस्मात शिवे श्वान ॥ मग स्वयंपाकीण विक्षेप पावोन ॥ उद्विग्न मनीं होतसे ॥ २७० ॥ कीं गार म्हणोनि अकस्मात ॥ मुक्ताफळ टाकिलें अग्नींत ॥ मग जोहरी आपुले चित्तांत ॥ हळहळ करीत मानसीं ॥ ७१ ॥ तेवीं वह्या बुडवितां दुर्जन ॥ तुकयाचें विक्षेप पावलें मन ॥ जाहलें प्रेमाचें खंडन ॥ अरिष्ट दारुण देखोनी ॥ ७२ ॥ मग देऊळांत येऊनि ते अवसरीं ॥ धरणें घेतलें महाद्वारीं ॥ जैसी द्वारांतली पायरी ॥ उठों नेणेच सर्वथा ॥ ७३ ॥ म्हणे अनाथनाथा पंढरीराया ॥ मजहातीं कष्ट करविले वायां ॥ शेवटीं अरिष्ट उठवोनियां ॥ बुडविल्या वह्या उदकांत ॥ ७४ ॥ तुवां स्वप्नीं येऊनि वनमाळी ॥ मज मतिमूढासी आज्ञा केली ॥ जे नामदेवाची बाकी राहिली ॥ ते बोलविली प्रासादिक ॥ ७५ ॥ ऐसें असतां रुक्मिणीकांता ॥ तरी हें अरिष्ट ओढवलें कां आतां ॥ बरें जें येईल तुझिया चित्ता ॥ तें पंढरीनाथा करावें ॥ ७६ ॥ ऐसें म्हणोनि ते अवसरीं ॥ रूप आठविलें निजअंतरीं ॥ मुखीं मंत्र रामकृष्णहरी ॥ सप्रेमभरीं जपतसे ॥ ७७ ॥ न घे फल मूल अथवा

अन्न ॥ न बोले कोणासी प्रतिवचन ॥ सांडोनि देहलोभ आशा जाण ॥ उदकपान करीना ॥ ७८ ॥ हें निर्वाण देखोनि जगज्जीवनें ॥ बाळरूप सांवळें धरिलें सगुण ॥ तुकयाचें करावया समाधान ॥ रुक्मिणीरमण पातला ॥ ७९ ॥ मस्तकीं ठेवूनि अभयकर ॥ म्हणे तुझें स्वस्थ असों दे अंतर ॥ अरिष्ट जाहलें जें दुर्धर ॥ तें मी शार्ङ्गधर निवारितों ॥ २८० ॥ ऐसें बोलोनि ते वेळ ॥ अदृश्य जाहला तमालनीळ ॥ कीं तुकयाचें हृदयकमळ ॥ देखिलें निर्मळ बैसावया ॥ ८१ ॥ तेथेंचि अदृश्य होउनी ॥ सुरवाडले चक्रपाणी ॥ पदसंधीचे निरूपणीं ॥ मजलागोनी भासतें ॥ ८२ ॥ ऐसे तेरा दिवस लोटतां जाण ॥ पुस्तकें पाहती विचक्षण ॥ तों अक्षरांलागीं जीवन ॥ आतळलें नाहीं सर्वथा ॥ ८३ ॥ म्हणती अन्याय घडला नेणतपणें ॥ विष्णुभक्ताचें केलें छळण ॥ परी तयाचा साह्य जगज्जीवन ॥ अरिष्ट दारुण निरसिलें ॥ ८४ ॥ ऐसा अनुताप धरूनि अंतरीं ॥ सत्वर आले महाद्वारीं ॥ तुकयासी म्हणती ते अवसरीं ॥ पावले श्रीहरी तुजलागीं ॥ ८५ ॥ कोरडे कागद निघाले जाण ॥ आतां पाहें दृष्टि उघडून ॥ ऐसें म्हणोनि सकळ जन ॥ करिती नमन साष्टांगीं ॥ ८६ ॥ म्हणती जयासी साह्य रुक्मिणीपती ॥ तेथें आमुचा अपाय तो किती ॥ अमृतकुपींत रोग शिरती ॥ हें कल्पांतीं घडेना ॥ ८७ ॥ नातरी भास्कराचिया घरा ॥ प्रवेश नव्हेचि अंधकारा ॥ कीं चंद्रमंडळांत उबारा ॥ रिघों न शके जया रीतीं ॥ ८८ ॥ तेवीं विष्णुभक्तावरी प्रयत्न ॥ करितां अरिष्ट न चले जाण ॥ ऐसें परस्परें बोलोनि वचन ॥ नामस्मरण करिताती ॥ ८९ ॥ तुकया जों नेत्र उघडोनी ॥ पुढें पाहे विलोकूनी ॥ तों कोरड्याचि वह्या ब्राह्मणांनीं ॥ देउळीं आणूनी ठेविल्या ॥ २९० ॥ हें कौतुक

दृष्टीसी देखोन ॥ चित्तीं वाटलें समाधान ॥ जैसें अंधासी नेत्र येतां जाण ॥ उल्हासे मन तयाचें ॥ ९१ ॥ कीं मुखीं घालितां सुधारस ॥ मृत प्रेत उठोन सोडी श्वास ॥ तैसा तुकयाचे मनीं उल्हास ॥ म्हणे पंढरीनिवास पावला ॥ ९२ ॥ बद्धांजली जोडूनि मग ॥ स्वमुखें बोलिला सात अभंग ॥ तो अनुपम बहुत प्रेमरंग ॥ वर्णितां न ये सर्वथा ॥ ९३ ॥ परी किंचित अन्वय यथानिगुतीं ॥ परिसा श्रवणीं निजप्रीतीं ॥ तुकयानें लाविलीं नेत्रपातीं ॥ सद्गद चित्तीं होउनी ॥ ९४॥ म्हणे जयजयाजी श्रीविठ्ठला ॥ बहुत अन्याय मज घडला ॥ लागूनि लोकांचिया बोला ॥ भार घातला तुजवरी ॥ ९५ ॥ तुज केला बहुत शीण ॥ मी तंव अधम यातिहीन ॥ तेरा दिवस झांकोनि नयन ॥ तुझ्या द्वारीं बैसलों ॥ ९६ ॥ ताहानभुकेचें कोडें श्रीहरी ॥ तोही भार घातला तुजवरी ॥ माझिया बैसोनि हृदयमंदिरीं ॥ योगक्षेम मुरारी त्वां केला ॥ ९७ ॥ उदकीं कोरडे राखिले कागद ॥ चुकविला लौकिक अपवाद ॥ त्वां अनाथनाथें आपुलें बिरुद ॥ साच केलें दयाळा ॥ ९८ ॥ बाळवेष धरूनि निगुतीं ॥ मज भेटलासी रुक्मिणीपती ॥ समाधान करूनि प्रीतीं ॥ अभय निजहस्तें दीधलें ॥ ९९ ॥ आतां कापोत माझी मान ॥ सुखें पीडा करोत दुर्जन ॥ परी कदापि संकट तुजकारण ॥ न घालीं जाण सर्वथा ॥ ३०० ॥ मी तंव चांडाळ दुष्ट पतित ॥ एकदां चुकी पडली यथार्थ ॥ उभें करूनि उदकांत ॥ वह्या राखविल्या तुजहातीं ॥ १ ॥ समर्थासी घालावया भार ॥ आपुल्यास नाहीं अधिकार ॥ हें सर्वथा नेणेंच मी पामर ॥ विवेकविचार कळेना ॥ २ ॥ होऊनि गेली जे श्रीपती ॥ ते गोष्टी परतोनि न ये पुढती ॥ पुढें तरी रुक्मिणीपती ॥ संकट तुजवरी घालींना ॥ ३ ॥ मानेवरी ठेविली नसतां सुरी ॥ घाय न

हाणितां पाठीवरी ॥ तों म्यां उतावीळ होऊनि श्रीहरी ॥ आकांत तुजवरी हा केला ॥ ४ ॥ मजपासीं आणि डोहाआंत ॥ दों ठायीं वांटलें तुझें चित्त ॥ दोन्ही चुकवूनियां आघात ॥ वाढविली कीर्ति लौकिकीं ॥ ५ ॥ तुज म्हणों मायबापासमान ॥ परी तीं स्वल्पासाठीं घेऊं पाहती प्राण ॥ म्यां तों अघटित केलें जाण ॥ परी साह्य जगज्जीवन तूं एक ॥ ६ ॥ तूं कृपासागर चक्रपाणी ॥ तुजसमान न देखों त्रिभुवनीं ॥ स्तुति करावी प्रीतीकरूनी ॥ तरी कुंठित वाणी जाहली कीं ॥ ७ ॥ तूं दीनबंधु दयाळ ॥ शशीपरीस अति शीतळ ॥ माउलीपरीस स्नेहाळ ॥ येती कल्लोळ प्रेमाचे ॥ ८ ॥ तूं अनिर्वाच्य देवाधिदेव ॥ उपमा द्यावयासी नाहीं ठाव ॥ सकळ जीवांचाही जीव ॥ निवाला शिव नाम जपतां ॥ ९ ॥ महद्भूतें पांच निर्माण ॥ तींही तुजपासोनि जाण ॥ गोड म्हणूं अमृतासमान ॥ तरी तूं जगज्जीवन त्यापरता ॥ ३१० ॥ आतां न बोलतां कांहीं ॥ उगाचि माथा ठेवितों पायीं ॥ अनंत अपराध विठाबाई ॥ क्षमा करीं तूं स्नेहाळे ॥ ११ ॥ मी अवगुणी अन्यायी फार ॥ किती सांगों वारंवार ॥ पुरे पुरे हा संसार ॥ चित्त स्थिर होऊं नेदी ॥ १२ ॥ अनंत बुद्धीचे विकल्प जाण ॥ तरंग पालटती क्षणक्षण ॥ संसर्गे करितां जाण ॥ तैं बद्ध मन होतसे ॥ १३ ॥ देवाधिदेवा पंढरीनाथा ॥ सकळ निरसीं माझी चिंता ॥ कर्मजाळ निरसोन अनंता ॥ हृदयमंदिरीं असावें ॥ १४ ॥ ऐशिया रीती तुकयान ॥ प्रेमें आळविला श्रीरुक्मिणी-रमण ॥ मग अंतरगाभारां रिघोन ॥ दिधलें आलिंगन देवासी ॥ १५ ॥ सगुण स्वरूपीं गुंतले लोचन ॥ मुखें करीत नामस्मरण ॥ पुढें देहासहित तुकाराम जाण ॥ वैकुंठभुवन पावला ॥ १६ ॥ ते कथा सविस्तर ल्याहावी ग्रंथीं ॥ तों हृदयस्थ सांगे रुक्मिणीपती ॥

कीं तुकाराम अद्यापि तेच स्थितीं ॥ आहे निश्चितीं इहलोकीं ॥ १७ ॥ निजनिष्ठ जे कां प्रेमळ भक्त ॥ तयांसी स्वप्नीं दर्शन देत ॥ जैसा दत्तात्रेय अनसूयासुत ॥ स्वेच्छा विचरत भूमंडळीं ॥ १८ ॥ याचा संशय वाटेल मनीं ॥ तरी साक्ष ऐकिजे संतसज्जनीं ॥ निळोबाचे स्वप्नीं येऊनी ॥ उपदेश केला निजकृपें ॥ १९ ॥ जरी चित्तीं शुद्ध असेल प्रेम ॥ त्यासी उपदेश देती तुकाराम ॥ तो जगद्गुरु निरुपम ॥ अद्यापि असे चिरंजीव ॥ ३२० ॥ त्यानें कृपा करून एकांतीं ॥ ग्रंथ लिहविला माझे हातीं ॥ तरी येविषयीं विचक्षण श्रोतीं ॥ संशय चित्तीं न धरावा ॥ २१ ॥ तो विश्वव्यापक चैतन्यघन ॥ सद्गुरु तुकाराम आम्हांलागून ॥ महीपति तया अनन्य शरण ॥ देहाभिमान टाकोनी ॥ २२ ॥ स्वस्ति श्रीभक्तविजय ग्रंथ ॥ ऐकतां तुष्टेल जगन्नाथ ॥ प्रेमळ ऐका भाविक भक्त ॥ द्विपंचाशत्तमाध्याय रसाळ हा ॥ ३२२ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ अध्याय ॥ ५२ ॥ ओंव्या ॥ ३२३ ॥

टीपा व स्पष्टीकरण

श्रीएकनाथचरित्र

महाराष्ट्रांत गेल्या सातशें वर्षांत जे हजार बाराशें लहान मोठे संतकवि होऊन गेले त्यांपैकीं प्रमुखांत एकनाथांची गणना होते. हे सुमारें ३५० वर्षांपूर्वी पैठण येथें होऊन गेले. यांच्या संबंधाची विस्तृत माहिती अनेक जुन्या व नव्या चरित्रग्रंथांत दिली आहे ती संक्षेपानें येथें देतों.

एकनाथ हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. त्यांचा जन्मशक उपलब्ध नाहीं; आपला जन्म मूळनक्षत्रीं झाला असें त्यांनींच स्वतः एका अभंगांत सांगितलें आहे. एकनाथांचे पणजे भानुदास यांचेंही नांव महाराष्ट्र संतमंडळांत विख्यात आहे. अनागोंदीच्या राजानें आपल्या नगरीं नेलेली पंढरपूरच्या पांडुरंगाची मूर्ति भानुदासांनीं परत आणली अशी कथा आहे. त्यांचा पुत्र चक्रपाणि हाही हरि-भक्त होता. चक्रपाणीचा मुलगा सूर्यनारायण हा एकनाथांचा पिता. तो व त्याची पत्नी नाथजन्मानंतर थोड्याच दिवसांनी निवर्तल्यामुळें नाथाचें संगो-पन त्यांचे आजे चक्रपाणि यांनीं केलें. वयाच्या पांचव्या सहाव्या वर्षापर्यंत लेखन वाचन व ब्राह्मणोचित ब्रह्मकर्म इत्यादिकांचें शिक्षण एकनाथांनीं संपा-दिलें व व्रतबंध झाल्यावर, आजोबांची आज्ञा न घेतांच एके दिवशीं उठून ते देवगिरी किल्ल्यावर जनार्दनस्वामी नामक एक सत्पुरुष राहात होते त्यांजकडे गेले. स्वामीपाशीं बरींच वर्षे राहून व त्यांची एकनिष्ठेनें सेवाचाकरी करून त्यांची त्यांनीं कृपा संपादन केली. स्वामींनीं त्यांना दत्तात्रेयाचें दर्शन घडविलें. पुढें एकनाथ तीर्थयात्रेस गेले. हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व प्रसिद्ध तीर्थक्षेत्रें पाहिल्यावर ते पैठणास आले आणि त्यांनीं गृहस्थाश्रम स्वीकारला. त्यांच्या पत्नीचें नांव गिरिजाबाई. नाथांनीं आपलें पुढील आयुष्य कथाकीर्तनांत आणि ग्रंथलेखनांत व्यतीत केलें. त्यांची गुरुभक्ति आणि भूतदया प्राचीन चरित्र-कारांनीं विशेषत्वानें वर्णिली आहे. ज्ञानेश्वरांनंतरच्या ३०० वर्षांत अपपाठां-मुळें अशुद्ध झालेल्या ज्ञानेश्वरीचें संशोधन करून एकनाथांनीं तिची शुद्ध प्रत तयार केली. त्यांनीं स्वतः सुमारें ६०,००० कविता लिहिली व ती बहुतेक सगळी छापून प्रसिद्ध झाली आहे. एकनाथी भागवत, भावार्थरामायण, रुक्मिणीस्वयंवर हे त्यांचे मुख्य ग्रंथ होत. यांशिवाय हस्तामलक, चतुःश्लोकी

भागवत वगैरे चारपांच ओवीबद्ध प्रकरणें व सुमारें २।३ हजार अभंग त्यांनीं लिहिले आहेत. त्यांची वाणी प्रौढ, प्रासादिक आणि रसाळ आहे. नाथांनीं भक्तिमार्गाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला. शके १५२१ विकारी संवत्सर फाल्गुन वद्य ६ रविवार या दिवशीं नाथ पैठण येथें समाधिस्थ झाले. ही नाथषष्ठी महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे. प्रसिद्ध महाराष्ट्र कवि मुक्तेश्वर हा एकनाथांचा नातू–मुलीचा मुलगा.

टीपा व शब्दार्थ, अध्याय १ ला.

ओवी (१)—रसिक = रसभरित, रसाळ. महीपतींनीं कथेला येथें ‘ रसिक ’ हें विशेषण लावलें आहे तें योग्य नाहीं. मनुष्य रसिक असूं शकेल, पण कविता रसिक असणें शक्य नाहीं. महीपती शब्द फारसे तोलून वापरीत नाहींत. भवरोगदु:ख = संसाररूपी रोगामुळें होणारी व्यथा. संसार हा एक रोग आहे असा पारमार्थिक कविसंकेत आहे. निजशांतिसुख=विवेकाच्या योगें शाश्वत काय आणि अशाश्वत काय हें समजलें म्हणजे मनाची तळमळ नाहींशी होऊन तें शांत–निश्चल–होतें. (२) वैकुंठभुवन=श्रीविष्णूचें वास्तव्यस्थान, वैकुंठलोक. (३) शास्त्रव्युत्पत्ति=भाषाशास्त्र, व्याकरणशास्त्र वगैरे. अंगासि न येतां वैराग्यस्थिति=अंगीं वैराग्य न बाणतांही, वैराग्य प्राप्त झालें नसतांही. (४) रसनाविषय = गोड गोड पदार्थ खाण्याची इच्छा. शम=शांत, तृप्त. पुरुषोत्तम=परमेश्वर, श्रीविष्णु. (५) कृपणता=कवडीचुंबकपणा, कंजूषपणा. (६) लोहदंड=लोखंडाचा दांडा. परीस=ज्याचा स्पर्श लोखंडास झाला असतां त्याचें सोनें होतें असा एक कविकल्पित दगड. विवेकभेट=विचाराची भेट, विवेकाची प्राप्ति, विचार उत्पन्न होणें. पारमार्थिक विवेक या अर्थानें हा शब्द शब्द येथें उपयोजिला आहे. (७) कोडी=जोड, सांठा. प्राक्तनहीन=कर्मदरिद्री, फुटक्या नशिबाचा. विकल्पें=संशयानें. (८) दैवाआगळे=सुदैवी; आगळें म्हणजे विशेष दैव आहे ज्यांचें ते. गराळ=चषक, घोंट (९) भानुदास=हे एकनाथांचे प्रपितामह. अनागोंदीच्या राजानें नेलेली पंढरीच्या पांडुरंगाची मूर्ति यांनीं परत आणली अशी कथा आहे. (१०) वैष्णव=विष्णुभक्त. (११) ज्ञानप्रकाशें=ईश्वरविषयक ज्ञानाच्या प्रकाशानें. देदीप्यमान=तेजस्वी. सुलक्षण=चांगल्या लक्षणांची, सदाचरणी. (१२) जगद्गुरु=जगाला ज्ञानोपदेश करणारा, जगाचा गुरु. साक्षात्=प्रत्यक्ष, मूर्तिमंत.

(१३) व्रतबंध=मौंजीबंधन, मुंज. (१४) ज्ञानराशी=महाज्ञानी. जनार्दन=हे एकनाथांचे गुरु. हे दौलताबादच्या नबाबाचे नोकर असूनही मोठे अधिकारी पुरुष होते. (१५) सद्भावें=शुद्ध भावानें, भक्तिभावानें. नमस्कारी=नमस्कार करी, नमस्कार करिता झाला. विस्मित=आश्चर्यचकित. अंतरीं=मनांत. (१६) संबोखोनि=आश्वासन देऊन, समाधान करून. (१८) मधुरोत्तर=गोड भाषण. ब्राह्मणकुमर=ब्राह्मणाचा मुलगा. मूळशब्द कुमार. साचार=खरोखर. (१९) अनुताप=पश्चात्ताप, (२१) अहर्निशीं=रात्रंदिवस.(२३) विशाल=भव्य, मोठे. अनुपम=ज्याला उपमा नाहीं असें. (२५) द्वैपायन=व्यास, महाभारतकार. संशयवनीं=संशयाच्या रानांत, संशयांत. (२६) हंसरूप नारायण=हंसाचें रूप धारण केलेला श्रीविष्णु. विरिंची=ब्रह्मदेव. (२८) त्याजकारण=त्याला (जनार्दनस्वामींना). (२९) विनीत=नम्र. (३०) प्रक्षाळावयासी=धुवावयास. (३१) सुमन=फूल. (३२) शेष=उरलेलें. उच्छिष्ट=उष्टावलेलें अन्न, पानांत सांडलेले अन्न. निजप्रीती=आवडीनें, मनापासून. (३३) बहिर्भूमीचें जें स्थल=शौचास जाण्याची जागा, शौचकूप. (३६) दारुण=फार, मोठी. (३९) प्रवीण=निपुण, माहितगार. (४१) स्वरूपीं=आत्मस्वरूपाकडे. (४२) खरडा=कच्चा हिशेब. खतावणी=हिशेबाची चोपडी. (४३) रात्रीं दीपकाशी घातलें भरण=रात्रौ दिव्यांत आणखी तेल घातलें. अडका=पैसा. (४४) ताळा=मेळ. (४६) उपाहार=उप+आहार, फराळ. (४८) अंतर्गृहीं=घराच्या आंतल्या भागांत, माजघरांत. निश्चलत्वें=एकाग्रतेनें. (४९) सन्निध=जवळ. (५०) संमुख=समोर. (५५) मजकारण=मला. (५६) रत=रममाण. (५७) ठाव प्रपंचाचा पुसिला=संसार समूळ नष्ट केला. (५८) जमाखर्च घडणी=जमाखर्चाची रचना. (५९) साल मजकूर=चालू वर्ष. गुदस्तां=गेल्या वर्षीं. रुजू=दाखल. पूर्वसंस्कार=पूर्वजन्मींचा संस्कार. (६१) मनसूर=राजाज्ञापत्रिका. (६२) नरदेहजमा=मनुष्यदेह हीच जमा (जमेचा आंकडा). झाडियासी आणुनी=झाडा देऊन, हिशोब देऊन. अज्ञान बाकी=अज्ञान हीच राहिलेली शिल्लक. विनटलों=रत झालों, रंगलों. (६४) सोहं=सोऽहं आणि कोऽहं हे आध्यात्मिक शब्द आहेत. सोहं म्हणजे तो मी आहें आणि कोहं म्हणजे=मी कोण आहें ? खुर्दखत=अखत्यारपत्र. (६५) भवरोगपीडा=संसाररूपी रोगाचें दुःख. (६६) कैवल्यपुरासी=मुक्तीला. केवलपासून कैवल्य. चैतन्यहुडां=चैतन्यरूप बुरुजावर, चैतन्याच्या शिखरावर.

(६६) तहसील=मामलत. रसद=इजारा. शेखीं=शेवटीं. हुजत=पावती. (६७) पूर्वसुकृत=पूर्वजन्मींचें पुण्य. रामनामव्यापारीं=रामाच्या नांवाच्या व्यापारास. (७०) रामकृष्ण मंत्र=रामकृष्ण या नांवाचा उच्चार करण्याची आज्ञा. तारक=तारणारा, उद्धार करणारा. (७१) परमार्थयोग=परमार्थाचें साधन, जोड. गूढ=गहन. कठिण. हरिगुण-पवाडे=श्रीहरीचें गुणगायन. कोडें=कौतुकानें. (७३) विश्वोद्धार करावया-लागून=विश्वाचा उद्धार करण्यासाठीं. (७५) निर्भय असूनि त्वां मनें=तूं कोण-त्याही प्रकारचें भय मनांत न बाळगिता. (७६) ते=श्रीदत्तात्रेय. कडोविकडी=अकराळ विकराळ, भय उत्पन्न करणारी. पालट करिती घडोघडी=वरचेवर निरनिराळीं रूपें धारण करितात. रोकडी=तत्काळ, पाहिल्याबरोबर. चोखडी=चागली. येथें मुद्दाम असाही अर्थ होईल. (७७) उठाउठी=तांतडीनें, ताब-डतोब (७८). तुजकारण=तुला. निजप्रीतीनें=आवडीनें. (७९) माझेनि=माझ्याच्यानें. (८०) स्वमुखें करून=आपल्या तोंडानें, आपण होऊन. (८१) अनसूयासुत=अत्री ऋषींची भार्या अनसूया हिचा मुलगा श्रीदत्तात्रेय. (८२) अविंध=यवन, मुसलमान. अश्वावरुता=घोड्यावर. अवचिता=अकस्मात्, एकाएकीं. (८३) ओवीचा अर्थ—असलें विचित्र रूप पाहून एकनाथांना मनांत भय वाटलें. ते म्हणाले, हा तर प्रत्यक्ष यवन दिसतो. हा दत्तात्रेय आहे हें मला खरें वाटत नाहीं. (८४) अश्ववाहन=घोडा आहे वाहन ज्याचें. संनिध=जवळ. (८५) यवनभाषेनें=मुसलमानी भाषेंत. (८७) कनकताट=सोन्याचें ताट. षड्रस=सहा रसांनीं युक्त असे भोज्य पदार्थ. आंबट, गोड, कडू, तिखट, तुरट, आणि खारट हे षड्रस. गोमट=सुंदर, रुचकर. स्पष्ट=उघड उघड. सांगातें=(दत्तात्रेया) बरोबर. (८८) पैल=पलीकडे, जवळच. मूल=मुलगा. (९१) अत्रिनंदन=दत्तात्रेय. (९३) अभाग्य=अभागी, दुर्दैवी. नरू=नर, मनुष्य. डावलूनि=चुकवून. (९४) मुक्ताफळ=मोतीं. (९५) उठाउठी=एकाएकीं. (९६) वज्रासनयोग=योगशास्त्रांत जीं अनेक आसनें सांगितलीं आहेत त्यांपैकीं एक आसन. हें फार कठीण आहे. वाडेंकोडें=अल्प श्रमानें, सहजासहजीं. (९७) जीवमात्र=प्राणिमात्र. अघटित=न घडणारें, क्वचित्च घडणारें, अशक्य. (९८) निजबळें=आपल्या बाहुबळानें. (९९) पुढील भविष्य=पुढें घडून येणारी गोष्ट. साक्षात=प्रत्यक्ष, मूर्तिमंत. (१०१) अनायासें=कोणताही प्रयत्न न करितां. (१०१) मुद्रांकित=मुद्राधारी, शिष्य. (१०२) पितामह=आजा.

(१०३) निदिध्यास=एखाद्या गोष्टीचा सारखा ध्यास घेणें. (१०५) आम्हां-कारण=आम्हाला, मला. (१०६) मलंगरूपें=फकिराच्या रूपानें. अवचितीं=अक-स्मात. (१०७) मायारूप तेचि कामिनी=भगवंताची जी माया तीच पत्नी. (मायेनें स्त्रीचें रूप घेतलें होतें.) कामधेनु सवें दिसली शुनी=मलंगरूपी दत्तात्रेयाबरोबर कामधेनु कुत्रीच्या रूपानें आली होती. दत्तात्रेयाबरोबर चार कुत्रीं असतात असें पुराणांत सांगितलें आहे; आणि हे चार कुत्रे म्हणजे चार वेद होत असेंही सांगितलें आहे. (११०) मृत्तिकापात्र=मातीचें भांडें, परळ. दोहिली शुनी=कुत्रीचें दूध काढलें. (१११) पाचारूनि=बोलावून, हाक मारून. सवें=आमच्याबरोबर, पंक्तीला. (११२) मनात जाहले संकोचित=(नाथांना) मनांत संकोच वाटला. अनुचित=अयोग्य, धर्मबाह्य. (११५) उच्छिष्ट ग्रास=आपल्या पानांतला घांस. निवांत स्थिती=निश्चल मनानें, शांत. (१८) श्रुतिशास्त्रें=चार वेद व सहा शास्त्रें. मथित=सार, तात्पर्य. व्यासें काढिलें श्रीभागवत=चार वेद व सहा शास्त्रें याचें मंथन करून व्यासांनीं त्या सर्वांचा सारांश भागवत नामक ग्रंथाच्या रूपानें लिहिला. सखोल गुप्त=समजण्यास सोपा नाहीं असा, गूढ. भागवताच्या अकराव्या स्कंधावर नाथांनीं लिहिलेली विस्तृत ओवीबद्ध टीका 'एकनाथी भागवत' या नांवानें प्रसिद्ध आहे. (११९) भावार्थरामायण= हा नाथांचा दुसरा मोठा ग्रंथ. यांत रामायणातील कथा विस्तारानें सांगितली आहे. (१२०) पदपदांतरें=पदें, अभंग वगैरे स्फुट कविता. श्रीहरिचरित्र= श्रीकृष्णाचे चरित्र. श्रवणमात्रें=ऐकवून, श्रवण करवून. (१२१) अभयकर= अभय देणारा हात. (१२२) यथार्थ वाटलें चित्ता=मनाला बरें वाटलें, मनाचें समाधान झालें. केउता=कसा, कोठें. (१२३) येरू=दुसरा. येथें एकनाथ. (१२५) मायेचा=आईचा. (१२६) दीपक=दिवा. द्रवत्व=पातळपणा. (१२७) समीर=वारा. (१२८) कल्लोळ=लाट. (१२९) अवधान-लक्ष, चित्त. घनवटपण=जडत्व, दाटपणा. (१३२) प्रतिष्ठानासी=पैठणास. गृहस्था-श्रम चालवीं=लग्न करून संसार कर. (१३३) देवतार्चन=देवतेची पूजा. वैश्वदेव=संध्येप्रमाणेंच वैश्वदेव हें ब्राह्मणाचें एक नित्यकर्म आहे. अतिथि= आयत्या वेळीं जेवावयास येणारा, अभ्यागत. नित्यनैमित्तिक कर्माचरण=नित्य म्हणजे रोज करावयाचीं संध्यादि कर्में व नैमित्तिक म्हणजे सणाच्या दिवशीं करावयाचीं किंवा श्राद्धादि कर्में. (१३४) अध्यात्मज्ञान=वेदांतादि परमार्थ विषयक ज्ञान. (१३५) लोकाचारीं=लोकांच्या, बहुजनसमाजाच्या आचार

विचाराप्रमाणें, लोकसंग्रहाकरितां. (१३६) यथाविधि=धर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें. निर्धारीं=निश्चयपूर्वक. (१३९) स्वदारागमन=आपल्या भार्येशीं समागम. (१४०) उपार्जन=सेवा. दृष्टीस न येती थोरसान=हा मोठा आणि हा लहान, हा श्रीमंत आणि हा गरीब असा भेदभाव धरीत नसे, सर्वांस समदृष्टीनें पहात असे. आन=अन्य, दुसरें. (१४१) पुरातन=प्राचीन काळची. (१४३) पुष्पांजलि=फुलांची ओंजळ. येथें कदाचित् मंत्रपुष्प असाही अर्थ होईल. (१४८) प्रसादवाणी=जींत प्रसाद (प्रतिभा) आहे अशी वाणी. (१४९) यामिनींत=रात्रौ. श्रीरघुनाथ=भगवान् रामचंद्र. (१५०) वाल्मीकिकृत रामायण=आद्य कवि वाल्मीकि यांनीं लिहिलेला संस्कृत रामायण ग्रंथ. गहन=गूढ, समजण्यास कठिण, दुर्लभ. महाराष्ट्र टीका=मराठी टीका (भाषांतर). जनाकारणें=जनतेसाठीं, लोकांस. सप्तकांडें=वाल्मीकिरामायणाचीं, बालकांड, अयोध्याकांड, अरण्यकांड, किष्किंधाकांड, सुंदरकांड, युद्धकांड आणि उत्तरकांड अशीं सात कांडें आहेत. अभिप्राय=मथितार्थ, भावार्थ. (१५४) भावार्थ म्हणती रामायण=ग्रंथाचें नांव भावार्थ रामायण ठेविलें. (१५९) जानकीकांत=सीतापति रामचंद्र. (१६१) अयोध्यापति=अयोद्धेचा राजा रामचंद्र. (१६३) सीताशुद्धीस जातां मारुती=रावणानें सीतेस पळवून लंकेंतील अशोकवनांत नेऊन ठेवलें होतें. तिचा शोध करण्यासाठीं मारुतीस रामानें पाठविलें होतें. सीताशुद्धि म्हणजे सीतेचा शोध. सप्रेमचित्तीं=प्रेमभरित अंतःकरणानें. देहभ्रांति=देहाची शुद्धि. भ्रांति शब्दाचा खरा अर्थ भ्रम, पण महीपतींनीं येथें तो शब्द शुद्धि या अर्थानें वापरला आहे. मीपण=मी एकनाथ आहें ही जाणीव. (१६४) महेंद्रपर्वत=रामायणांत उल्लेखिलेला दक्षिणेकडील एक पर्वत. या पर्वतावरून मारुतीनें सीतेच्या शोधार्थ उड्डाण केलें. आविर्भाव=येथें अभिनिवेश असा अर्थ. (१६८) किमर्थ=कां, कसे, कशासाठीं. १७२ व्या ओवीचा अर्थ=एखादा अलौकिक चमत्कार पाहून, तो चमत्कार करणाराविषयीं जरी आदर उत्पन्न झाला तरी ती शुद्ध भक्ति नव्हे; तो दांभिकपणा होय. १७३ व्या ओवीचा अर्थ=जाणूनबुजून परीस देव्हाऱ्यांत ठेवून त्याची षोडशोपचारें पूजा केली, तर तो दांभिकपणा होय. कारण परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें, हा चमत्कार त्या भक्तीला कारणीभूत आहे. म्हणून ती खरी भक्ति नव्हे. (१७५) कल्पतरु=इच्छिलेलें देणारा एक कविकल्पित वृक्ष. कामनिक=कांहीं तरी इच्छा मनांत

धरणारे, सकाम. १७७ व्या ओवीचा अर्थ=नातेवाईकास श्रीमंती आली म्हणून त्याच्या पूर्वीच्या निंदक सग्यासोयऱ्यांनीं जरी त्याचा आदर केला, तरी पूर्वीच्या अपमानाच्या आठवणीमुळें तो आदर त्याला प्रशस्त वाटत नाहीं. या ओवीच्या तिसऱ्या चरणांत ' आठवणें ' असा पाठ आहे तो अपपाठ असून त्याच्या ऐवजीं ' आठवूनि ' असा पाठ पाहिजे. (१७९) जनार्दनसुत=जनार्दन-स्वामींचे शिष्य एकनाथ. सुत शब्दाचा अर्थ मुलगा, परंतु गुरुशिष्यांचें पिता-पुत्रांचें नातें असल्यामुळें शिष्य या शब्दाऐवजीं सुत शब्द उपयोजिण्याची जुन्या कवींची चाल आहे. ज्ञानदेवांनीं आपल्या ज्ञानेश्वरींत " निवृत्तिनाथसुतें " या शब्दानें स्वतःचा पुष्कळ ठिकाणीं उल्लेख केला आहे. निवृत्तिनाथ हे ज्ञानदेवांचे वडील बंधु आणि गुरु होते. (१८२) सांप्रदाई=आपल्या संप्रदायाचा. आपल्या संप्रदायांत याला कसा समाविष्ट करून घ्यावा ? बरड=नापीक, खडकाळ. (१८९) मानसपूजा=इष्ट देवतेचें मनोमय पूजन. तुकोबांचे मानसपूजेचे अभंग प्रसिद्ध आहेत. (१९३) अवसरीं=वेळीं. (१९५) कुटिल=वांकडया मनाचा. (१९६) भूदेवा=ब्राह्मणाला. (१९७) पथि-कासी=वाटसरूला, पांथस्थाला. शिरपाव=एक शिरोभूषण. (१९८) जीवन=पाणी. (२०२) जनार्दनाचे=जनार्दनस्वामींच्या. जाणीव=येथें अहंता असा अर्थ. (१०४) फुडी=स्फुट, उघड. येथें चांगली, गोड, असा अर्थ. रोकडी=तत्काळ.

अध्याय २ रा.

ओवी (१) भरतें=भरती. ब्रह्मविद्या=अध्यात्म, वेदांतादि. वासरमणी=सूर्य. (२) शुद्धज्ञान=ईश्वरविषयक ज्ञान, आत्मज्ञान. अवचट=अकस्मात्. मोक्षयुक्तीचें=मुक्ति मिळविण्याच्या मार्गाचें. बीज=रहस्य. (३) मंत्रराज=सर्व मंत्रांतला प्रमुख मंत्र. दैवदशेनें=सुदैवानें. भक्तकथेसंधीं=साधुसंतांच्या कथा ऐकण्याच्या संधीस. (४) विवेकवल्ली=पारमार्थिक विवेकरूपी वेल. हरिख=हर्ष. (५) वैराग्याची निरपेक्षता=वैराग्याच्या योगानें प्राप्त होणारी निरिच्छता. (६) सायुज्यता=सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यता असे मुक्तीचे चार प्रकार आहेत, त्यांपैकीं सायुज्यता ही एक मुक्ति. निजधाम=खास वस्तीचें ठिकाण. निर्विकल्प=येथें निःसंशय असा अर्थ. कल्पद्रुम=कल्पवृक्ष. (७) वाळिला=टाळला, घालवून दिला. तावितां=तापविल्यावर. (८)

डांकलग=सोन्याच्या दागिन्यांतला लाखेचा भाग किंवा त्यांत मिसळलेली हीन धातू. (९) विरक्त=विरागी. राजमंदिरींचें वर्षासन=राजाकडून मिळणारी ठराविक वार्षिक रकम. (१०) सुगरिणी=सैंपाक करण्यांत कुशाल अशा स्त्रिया. कुचर=न शिजणारा किंवा न फुटणारा दाणा. येथें, अंगचोर. (११) अक्षोक्षज= श्रीविष्णु. साहित्य=पूजेची सामग्री. गरुडध्वजा=श्रीविष्णूला. (१२) या ओवींतील तांतडी आणि लवडसवडी हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत. त्यांचा अर्थ लगबगीनें. (१३) अनंत=विष्णूचें एक नांव. (१४) अंतरसाक्ष=सर्व प्राणिमात्राच्या मनांतलें जाणणारा. चैतन्यघन=चैतन्यरूप; ज्याच्यांत जडत्व नाहीं असा. (१५) ब्राह्मण=भोजन करी निरंतर=एकनाथांच्या घरीं नित्य ब्राह्मणभोजन होत असे. (१७) ब्राह्मणसंतर्पण=समाराधना, ब्राह्मणभोजन. (१८) त्याकारण=त्याला. परिवार=कुटुंबांतील माणसें, स्त्रीपुत्रादि. (२४) पूज्यमान=पूजा करण्यास योग्य, पूजनीय. लीलानाटकी=जगद्रंगभूमीवर आपल्या मायेनें नाना प्रकारचे खेळ करून दाखविणारा. (२५) चोखडी=चांगली, सुंदर. गंगोदकें=गंगेच्या (येथें गोदावरीच्या; कारण पैठणास गंगा नाहीं, गोदावरी आहे व तिलाहि तिकडे गंगाच म्हणतात.) पाण्यानें. (२६) शेषशायी=शेषावर निद्रा करणारा. वैकुंठपीठ=येथें विष्णु असा अर्थ. (२७) अष्टांगयोग=योगशास्त्रांत योगाचे आठ प्रकार सांगितले आहेत. जयाकारण=ज्याच्यासाठीं; ज्याची प्राप्ति व्हावी म्हणून. सोज्वळ उटोन=घांसून पुसून स्वच्छ करून. (२८) सायुज्यदानी=मोक्ष देणारा. (२९) विष्णूच्या पायांपासून गंगेचा उगम झाला अशी पौराणिक कथा आहे. (३१) ओळंगती=हात जोडून पुढें उभ्या असतात. (३२) दीपक सरसावी= दिव्याची वात सारी. (३३) सुरगण=सर्व देव. (३५) श्रीखंड्या ब्राह्मण= एकनाथाचे घरीं भगवान् श्रीविष्णु श्रीखंड्या ब्राह्मणाच्या रूपानें बारा वर्षे नाथांची सेवा करीत राहिले होते अशी कथा आहे. "श्रीएकनाथसदनीं माधवजी सर्व काम हें करितो । स्वकरें चंदन घांशी गंगेचें पाणि कावड्या भरितो" ही आर्या प्रसिद्धच आहे. अद्यापही, पैठण येथें, नाथषष्ठीच्या दिवशीं, एकनाथांच्या घरचा पाण्याचा मोठा रांजण, देवानें गुप्तरूपानें आणलेली घागर त्यांत ओतल्याशिवाय भरत नाहीं असें सांगतात. (३६) भरोवरी= सारावार, घरकाम. (३७) कांतेशीं=नाथांची पत्नी गिरिजाबाई हिजबरोबर. (३८) घुसळण=दहीं घुसळणें. मजकारण=मला. (३९)

(३९) पाकशाळा=स्वयंपाकगृह. साहित्य=जेवणाचें साहित्य. (४०) आडा-आडी=कामाची गर्दी. (४१) विस्मितमन=आश्चर्यचकित. (४२) सावडी=उष्टें अन्न व पत्रावळी उचलून टाकणें. (४४) क्रमोनि=मरून. (४५) पितृतिथि=वडिलांचा श्राद्धदिन. उदयिक=उद्यां. पितृक्षण=पितृश्राद्धास ब्राह्मण म्हणून जेवावयास येण्याचें आमंत्रण (४६) पाकनिष्पत्ति=स्वयंपाक. स्नानें सांगितलीं विप्रांसी=स्नान करून या असें ब्राह्मणांस सांगितलें. द्विजांकारणें=ब्राह्मणांसाटीं. (४८) उपरीवरी=माडीवर, गच्चीवर. (४९) अनामिक=अस्पृश्य जातीचा मनुष्य, महार. बिदीसी=गल्लींत, बोळांत. (५१) आपल्या जन्मासी=या जन्मांत. (५३) संचितीं=नशिबीं. (५९) बिदीस=घराच्या बाजूच्या बोळांत. (६१) घृत=तूप. शाका=भाज्या. लवण=मीठ. (६२) जनीं जनार्दन आहे निश्चित=सर्व जनांच्या ठायीं जनार्दन वास करीत आहे. भोक्ता=भोजन करणारा, भोगणारा. (६३) त्यांकारणें=त्या अनामिकांना. यथारुचि=आपापल्या आवडीप्रमाणें. (६५) यातिहीन=हलक्या जातीचे, ज्यांना जात नाहीं असे, चातुर्वर्ण्याबाहेरचे. वैष्णव=विष्णुभक्त. केली आठवण जन्मवरी=आम्हांला जन्मभर आठवण राहील अशी गोष्ट तुम्हीं केली. (६६) अपेक्षित=इष्ट, आवडतें. (६८) पाकासि घातल्या स्वयंपाकिणी=सैंपाक करणाऱ्या स्त्रियांस सैंपाक करण्यास सागितलें. पहिल्याहूनि=पहिल्यानें केलीं होतीं त्यांपेक्षां. दशगुणी=दसपट. (७०) अघटित=विचित्र, लोकविलक्षण. पूर्वीं कधीं कोणी केलें नव्हतें अशा प्रकारचें. (७१) शास्त्रज्ञ=धर्मशास्त्र जाणणारे. (७५) वर्णसंकर=निरनिराळ्या वर्णांचें मिश्रण, सब्रगोलंकार. (७८) पुनीत=पावन. (७९) पुरोडाश=यज्ञाहुतीचा अवशेष. वायसापुढें=कावळ्यापुढें. (८०) भागीरथीची कुपी=गंगेच्या पाण्यानें भरलेली कुपी. बहिर्भूमीसी=शौचाच्या जागीं. जडित भूषण=जडावाचा दागिना, रत्नखचित अलंकार. (८१) मैलागिरी=मलय पर्वत. मलबारात सह्याद्रिपर्वताचा जो भाग आहे त्याला मलयपर्वत म्हणतात व त्यावर होणाऱ्या चंदनाला मैलागिरी चंदन म्हणतात. हा चंदन उंची समजला जातो. खरासि=गाढवाला. (८२) अग्नि-होत्रींचा=कांहीं ब्राह्मण घरांत कायमचा अग्नि ठेवून त्याची पूजा करीत असतात त्याला अग्निहोत्र व त्या ब्राह्मणाला अग्निहोत्री म्हणतात. कृशान=अग्नि. सुधारस=अमृत. (८४) वाळित=बहिष्कार. (८५) एकनाथाकारण=एकनाथांना.

(८८) आगतं–या. (८९) पूगीफल=सुपारी. गोपीचंदन=हें एक प्रकारचें खनिज भस्म आहे. त्याचे गोळे करून त्याचा गंधादाखल उपयोग करितात. यज्ञोपवीतें=जानवीं. हिरण्यदक्षिणा=दक्षिणेदाखल सोन्याचीं नाणीं दिलीं. (९०) ब्रह्मार्पण=हें ब्रह्माला म्हणजे परब्रह्म जो परमेश्वर त्याला अर्पण असो. (९१) जनार्दनपायीं=परमेश्वराच्या पायांच्या ठायीं. येथें एकनाथांचे गुरु जनार्दनस्वामी त्यांच्या पायांच्या ठायीं असाही अर्थ घेतां येईल. पितृस्वरूपीं=पितरांच्या रूपानें. पितृलोक=मृतांचे आत्मे,पितरांचे आत्मे,ज्या लोकीं जातात अशी समजूत आहे तो पितृलोक.असे अनेक लोक आपल्या पुराणांत सांगितले आहेत. (९२) पितृपंक्ति= पितरांची पंगत, पंक्तीस बसलेले पितर. (९३) शेष=शिल्लक. इष्टांसमवेत= आप्त व इष्टमित्र यांच्यासह (९४) कवाडें=दारें (९५) साक्षात=प्रत्यक्ष. (९६) मानवी=मनुष्यकोटींतील (९७) कर्माभिमान=वेदोपदिष्ट कर्ममार्गाचा, कर्मठ-पणाचा अभिमान. निजनिष्ठें=(त्याच्या) श्रद्धेमुळें.(९८) गरुडध्वज=श्रीविष्णु. (९९) प्राक्तना=नशिबाला. (१००) उदयिक=उद्यां. नीत=नीति, रीतभात. स्वयातींत असावें=आपल्या जातींत असावें, ज्ञातिबाह्य वर्तन करूं नये. (१०१) येरवींच=अकारण, असें कांहीं तरी केल्याशिवाय. (१०२) पाचारिलें=बोलावलें. (१०४) दूषण=दोष. विधियुक्त=धर्मशास्त्रांत सांगितलेल्या विधीप्रमाणें. (१०५) विपरीत=आपल्या इच्छेविरुद्ध, मताविरुद्ध. (१०७) गंगेंत=येथें गोदावरींत. गोमय=गाईचें शेण. (१०८) त्र्यंबकेश्वर=नासिकापासून थोड्या अंतरावर असलेलें एक क्षेत्र. गोदावरी नदी येथें उगम पावते. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं त्र्यंबकेश्वर हें एक लिंग आहे. ज्ञानदेवांचे वडील बंधु व गुरु श्री–निवृत्तिनाथ यांची येथें समाधि आहे.(१०९) कुष्ठ=कोड.दुष्ट=कुरूप,किळसवाणें. (११०) पैल=पलीकडे, जवळच. (११२) उमाकांत=उमा म्ह० पार्वती तिचा पति श्रीशंकर. अनामिक=ज्यांचा नामोच्चार करूं नये असे अस्पृश्य. पितृतिथ=पितरांची श्राद्धतिथि. (११५) धरणें=अमुक एक गोष्ट झाल्याशिवाय मी येथून हालणार नाहीं अशी प्रतिज्ञा करून एखादा मनुष्य बसतो तेव्हां तो धरणें धरून बसला असें म्हणतात. धरणें उठविलें शंकरें=शंकरानें याला कांहीं तरी सांगून वाटेस लावलें; आपल्या देवळाच्या दारांतलें धरणें उठविलें. (११६) आपैसा=आपोआप. (११७) कोडी=अंगास कोड फुटलेला मनुष्य. एका अनामिकाचें सुकृत=एका अस्पृश्यास जेऊं

घातल्यामुळें झालेलें पुण्य. (११९) कांती=तेज, रूप. कोड गेलें. (१२२) विंझणवारा=पंख्याचा वारा. प्रावरण=पांघरूण, आच्छादन, वस्त्र. अंबरा= आकाशाला. वैश्वानरा=अग्नीला. (१२३) पाककरण=शिजविणें. उदधीस= समुद्रास. तीर्थाटन=तीर्थयात्रा करीत फिरणें. आम्हांकारणें=आम्हांला. (१२४) अघटित=न घडणारी, लोकोत्तर. (१२७) निरत=तत्पर, गढलेला. देवतार्चन= देवतेचें पूजन. (१२९) द्वारावती=द्वारकेला. सप्तपुऱ्यांपैकीं एक पुरी. ही काठेवाडांत आहे. अनुतापयुक्ती=पश्चात्तापयुक्त अंतःकरणानें. रुक्मिणीपती= श्रीकृष्ण. (१३०) गंगातीरीं प्रतिष्ठानांत=गोदावरीकांठीं पैठणांत. ब्राह्मण- संतर्पण=ब्राह्मणभोजन. .(१३२) ब्राम्हणजन=घरकाम करणारा ब्राम्हण, आचारी, शागीर्द. (१३५) ब्राह्मणसेवनीं=ब्राह्मणांची सेवाचाकरी करण्यांत. (१३६) तापसी=तपस्वी. (१४०) चक्रपाणि=सुदर्शन चक्र धारण करणारा श्रीविष्णु किंवा कृष्ण. (१४१) ऋणायित=ज्याचें आपण देणें लागतों असा. (१४४) जगन्नाथ=श्रीकृष्ण. (१४५) विलोकीत=पहात. (१४६) लवलाहें= तत्क्षणीं, तावडतोब. (१४७) शोकाकुलित=शोक+आकुल+इत=दुःखी. (१४८) सद्गदित=कंठ भरून येणें. (१५०) केशवा=श्रीकृष्णाला. आळवीतसे=विनवी- तसे. (१५१)वृत्तांत=येथें खरा प्रकार असा अर्थ. (१५२) सुकुमार=कोमल, नाजुक. (१५३)नेणवे=कळलें नाहीं. (१५४) पूज्यमान=पूजनीय. सदाशिव= श्रीशंकर. (१५५) वाडकोड=कौतुकानें, उत्कंठेनें. (१५६) लाघव=कौशल्य, माया. पुत्रपणें=आपला म्हणून. लेखीतसे=मानीतसे. (१६०) अमर्यादा=अप- मान. (१६३) यामिनींत=रात्रीं.

ज्ञानदेव–महाराष्ट्रांतील सर्वश्रेष्ठ संतकवि. हे सुमारें ६५० वर्षांपूर्वी होऊन गेले. मूळगांव आपेगांव. यांची समाधि आळंदी येथें आहे. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई अशीं हीं चार भावंडें होतीं. यांचे वडील विठ्ठलपंत व आई रुक्मिणी. विठ्ठलपंतांनीं विवाहितावस्थेंत संन्यास घेऊन पुनः गृहस्थाश्रम स्वीका- रला म्हणून त्यांचा व त्यांच्या मुलांचा कर्मठ ब्राह्मणांनीं फार छळ केला. हीं चारी भावंडें शेवटपर्यंत अविवाहित होतीं. ज्ञानदेवांस ज्ञानेश्वर असेंही म्हणतात. त्यांनीं आपले बंधु निवृत्तिनाथ यांचा उपदेश घेतला होता. भगवद्गीतेवर त्यांनीं विस्तृत मराठी टीका ओवीबद्ध लिहिली आहे तिचें नांव भावार्थदीपिका, पण ती ज्ञानेश्वरी या नांवानेंच प्रसिद्ध आहे. ज्ञानदेवांनीं आपल्या वयाच्या २२ व्या वर्षी समाधि घेतली. बहुतेक महाराष्ट्र संतकवि यांना गुरुस्थानीं मानतात.

ज्ञानेश्वरीच्या तोलाचा ग्रंथ मराठींत दुसरा नाहीं. हा ग्रंथ ज्ञानदेवांनीं आपल्या वयाच्या १६ व्या वर्षी लिहिला अशी आख्यायिका आहे. ' अमृतानुभव ' या नांवाचा त्यांचा दुसरा ग्रंथ आहे तो निव्वळ तत्त्वज्ञानपर असून समजण्यास फार कठिण आहे. (१६४) अलकावती=आळंदी. पुण्यापासून हें स्थान १६ मैलांवर इंद्रायणीतीरीं असून तेथें ज्ञानदेवांची समाधि आहे. अजानवृक्ष=वृक्ष-विशेष. हा वृक्ष फक्त आळंदी येथेंच ज्ञानदेवांच्या समाधीपाशीं आहे असें म्हणतात. अजानवृक्षाची मुळी जाण । सन्निध येऊन लागली=अजानवृक्षाची मुळी समाधींत येऊन अंगाला लागली. (१६६) सिद्धेश्वराचें=आळंदी येथील क्षेत्रदेवतेचें. (१६७) वज्रासन=आसनमांडी. ज्ञानराज=ज्ञानदेव. (१६९) ते निजकरें लावूनि एकीकडे=ती मुळी आपल्या हातानें बाजूस सारून. (१७०) तेव्हां=त्या काळीं. (१७१) पाल=लहान तंबू. व्यवसायी=व्यापारी. (१७६) पाठमोरे होतां ब्राह्मणांसी=ब्राह्मण मागें फिरताच. (१८१) जनार्दन-स्वरूप त्रिजगतीं=सर्व विश्वांत एक परमात्मा भरला आहे अशी भावना. (१८४) कर्पूर=कापूर. द्रवत्व=पातळपणा. नीरासी=पाण्याला. मकरंद=फुलां-तला मध.

श्रीतुकारामचरित्र

तुकारामाइतका प्रसिद्ध व लोकप्रिय साधुकवि महाराष्ट्रांत दुसरा झाला नाहीं. पुण्यानजीक इंद्रायणीतीरीं देहू नामक गांव आहे तेथें सुमारें २७५ वर्षांपूर्वी तुकाराममहाराज होऊन गेले. यांची जात कुणबी. धंदा व्यापारउदीम. आडनांव आंबळे. यांचे आईबाप लहानपणींच वारले व वडील बंधु घर सोडून कायमचा देशांतरास गेला. आरंभीं तुकोबांचा व्यापार व संसार बरा चालला, पण पुढें त्यांचें दिवाळें निघालें व दुष्काळांत त्यांची पहिली बायको वारली. एक मुलगाही वारला. दुसरी बायको फार कजाग निघाली. संसार सांवरण्याचा बुवांनीं पुष्कळ प्रयत्न केला, पण त्यास यश आलें नाहीं. ते दरिद्री झाल्यामुळें गांवांतले लोक त्यांचा उपहास करूं लागले. शेवटीं बुवा दैववादी बनले आणि विरक्त होऊन परमार्थमार्गास लागले. गांवानजीकच्या डोंगरावर जाऊन तेथें परमार्थसाधन करण्यांत आपला काल व्यतीत करण्यास त्यांनीं सुरुवात केली. त्यांचा धाकटा भाऊ कान्होबा विभक्त झाला. आपल्या वांट्याचे देण्याघेण्यासंबंधाचे कागदपत्र बुवांनीं इंद्रायणींत बुडविले.

पूर्वजांनीं बांधलेलें विठोबाचें देऊळ जीर्ण झालें होतें त्याचा त्यांनीं उद्धार केला. अनेक वर्षे एकांतभजन केल्यावर बुवांस दृष्टांत झाला व बाबाजी चैतन्य नामक एका मृत सत्पुरुषानें त्यांस स्वप्नांत उपदेश दिला. पुढें त्यांना कवित्व-स्फूर्ति झाली. बुवांनीं आपलें शेष आयुष्य कथाकीर्तन व अभंगलेखन यांच्या द्वारें महाराष्ट्रांत शुद्ध भागवतधर्माचा प्रसार करण्यांत घालविलें. रामेश्वरभट्ट नामक एका विद्वान् ब्राह्मणानें तुकोबांनीं आपले अभंग इंद्रायणींत बुडवावे अशी आज्ञा केली तेव्हां ती आज्ञा मान्य करून बुवांनीं आपल्या अभंगांच्या वह्या स्वहस्तें इंद्रायणीच्या डोहांत बुडविल्या, परन्तु पांडुरंगाच्या कृपेनें, तेरा दिवसांनीं त्या वह्या पाण्यावर तरंगूं लागल्या व अशा रीतीनें त्यांच्या अभंगाचें रक्षण झालें. पुढें तेच रामेश्वरभट्ट बुवांचे टाळकरी झाले! श्रीसमर्थ रामदास, छत्रपति शिवाजी महाराज वगैरे थोर पुरुष बुवांचे समकालीन होते. फाल्गुन वद्य २ सोमवार शके १५७३ या दिवशीं बुवा इंद्रायणीतीरीं कीर्तन करीत असतां अकस्मात् अदृश्य झाले. त्यांचें कलेवर सांपडलें नाहीं, यामुळें ते विमानांत बसून सदेह वैकुंठास गेले अशी दंतकथा प्रचलित झाली. तुकोबांचे सुमारें चार पांच हजार अभंग उपलब्ध आहेत. त्यांची वाणी फार प्रेमळ व अत्यंत परिणामकारक असून स्थलविशेषीं फार जोरदार व कठोरही आहे. त्यांची कविता इतकी लोकप्रिय आहे कीं, पट्टीच्या विद्वान् हरिदासाचेंही कीर्तन त्यांच्या अभंगा-वांचून सुरू व्हावयाचें नाहीं व 'हेंचि दान दे गा देवा' हा त्यांचा अभंग म्हटल्याशिवाय पुरें व्हावयाचें नाहीं. तुकोबांइतका लोकप्रिय संतकवि महाराष्ट्रांत दुसरा झाला नाहीं. त्यांचे वंशज अद्याप देहू येथें आहेत.

टीपा व शब्दार्थ अध्याय १ ला.

(ओवी १ ली) आनंदघन=आनंदाचा मेघ. राजीवनयन=कमलनेत्र, कमलासारखे सुंदर ज्याचे डोळे आहेत असा. विधिजनक=ब्रह्मदेवाचा बाप. दानवभंजन=दनूचे पुत्र ते दानव म्हणजे राक्षस, त्यांचा नायनाट करणारा. (२) सज्जनजीवन=साधुसंतांचें केवळ जीवनच असा. निर्गुणसगुण=येरवीं निर्गुण, पण अवतार घेतो तेव्हां सगुण. अतर्क्यगती वेदशास्त्रां=तुझी लीला वेदांना आणि शास्त्रांना अगम्य आहे. (३) अपरिमिता=मोजतां न येण्या-सारखा, अमर्याद. विश्वचक्षूनें तूं देखता=विश्वांतील प्राण्यांचें जितके डोळे आहेत तितक्या डोळ्यांनीं पाहणारा. निगम=श्रुति, वेद. (४) चित्स्वरूप=

चैतन्यरूप, चिदानंदरूप. गुणनिधान=सर्व गुणांचा ठेवा. (५) नेति नेति=तें नव्हे, तें नव्हे. (७) आटणी=आटाआटी, ओढाताण. योगसाधन फार कठिण आहे, त्यासाठीं देहास फार कष्ट द्यावे लागतात. त्यांसी नेणतां=त्यांजकडे लक्ष न देतां. (८) सनकादिकांसी=शुक, सनक, सनंदन हे मोठे भागवत होऊन गेले. (११२) अभक्त=भक्ति न करणारे. येथें दुर्जन असा अर्थ. ११३ ते १२० या ओव्यांचा अर्थ अगदीं सुलभ आहे. त्यांत कठिण शब्द फारसे नाहींत व रचनाही साधी आहे. (२१) रामदास=प्रसिद्ध साधु श्रीसमर्थ रामदास. हे तुकोबांचे समकालीन होते. ज्या भक्तविजय ग्रंथांतून हें तुकारामचरित्र उतरून घेतलें आहे त्याच्या ४७ व्या अध्यायांत रामदासचरित्रांतील कांहीं कथा महीपतींनीं दिल्या आहेत व त्यापुढील ४८ व्या अध्यायांत तुकारामचरित्राचा प्रारंभ झाला आहे. जाहले रामराव निजांगें=पांडुरंगानें रामाचें रूप धारण करून रामदासांस दर्शन दिलें. (२२) धरणीं=महीतलावर. (२३) व्यवसाय=व्यापार. (२४) विदेहवृत्ति=देहानें बाह्यतः प्रांपञ्चिक व्यवसाय करीत असतांही, मन परमार्थांत गढलेलें असणें, अंतर्मुखता. (२५) क्रमलियावर=मृत्यु पावल्यावर. दुःखरूप=दुःखानें भरलेला. (२६) भरतें=समुद्राच्या भरतीचें पाणी. वर्षाऋतु=पर्जन्यकाल. अभ्र=मेघपटल. शीतकालीं=हिंवाळ्यांत. (२७) हरपती=लोपतात. (२७) उष्णकाळ=उन्हाळा. तृणें=सर्व प्रकारचें गवत. (२९) स्वदेशीं=येथें महाराष्ट्रांत असा अर्थ. आटोनी=संपून. (३०) ज्येष्ठ कांतेसी=पहिल्या बायकोस. कनिष्ठेसी=दुसरीस, दुसऱ्या बायकोस. संतान=मूलबाळ, संतति. कण=धान्याचा कण. (३१) निवर्तली=मरण पावली. अन्न अन्न करितां=अन्नान्नदशा होऊन, उपास पडून. तेणें लज्जित होऊनि चित्ता। प्रपंचममता नाठवे=त्यामुळें (पहिली बायको अन्न अन्न करून मेली त्यामुळें तुकोबांच्या) मनाला मोठी लाज वाटली. स्त्रीला अन्न देऊन तिचा जीव आपणास वांचवितां आला नाहीं, या विचारानें ते लज्जायमान झाले व त्यांची संसारावरील आसक्ति उडाली. संसाराचा त्यांना वीट आला. (३२) हरपतां=नष्ट होतां. त्यांसवेंच गेला सन्मान=(संपत्ति आणि वैभव नष्ट होतांच) त्यांच्याबरोबरच समाजांत मिळणारा मानसन्मानही नष्ट झाला. (३४) विलासी जन=सुखेच्छु लोक, (वृक्षाच्या छायेंत बसून) चैन करूं इच्छिणारे लोक. (३५) देहलोभी=देहाचा लोभ धरणारे, मरणास भिणारे. रण टाकूनि पळती=

युद्धांत पाठ दाखवून पळून जातात. (३७) उदिमाची हातवटी=व्यापार-धंद्याचा उपक्रम. तुटी=नुकसान, तोटा. (३८) प्रपंच लटिका मिथ्या माया=संसार हा खोटा, केवळ माया आहे. नाशवंत=नष्ट होणारी. (३९) ढेकुणांचे बाजे=ढेकणांनीं भरलेल्या खाटेवर. (४०) वांझेचा पुत्र=वेदांतपरिभाषेंतील 'वंध्यापुत्र'. वांझेला पुत्र होणार कसा ? व जर झाला तर ती वांझ कशी ? अर्थात् वंध्यापुत्र म्हणजे नसलेली वस्तु. हरिख=आनंद. सरसीं=सारखीं, समान. (४२) पुरातन=जुन्या काळीं बांधलेलें. निजांगें=स्वतःच्या आंगमेहनतीनें. सोज्वल=सुंदर, नव्यासारखें. (४४) निजमतें=आपणास येईल तसें, आपल्या स्वतःच्या पद्धतीप्रमाणें. आधीं=पूर्वीं, आरंभीं. धरावें ध्रुवपद त्यांमागें=त्यांच्या-(कीर्तनकारांच्या) मागें उभें राहून त्यांची साथ करावी. (४५) वचन=उक्ति, निवडक कविता. (४६) भूतमात्रासि=प्राणिमात्रास. त्यासी परोपरी काया कष्टी । संतप्त पोटीं निववीत=प्राणिमात्राच्या सुखासाठीं आपला देह परोपरीनें झिजवी; संताप पावलेल्यांचें समाधान करी. (४६) मथितार्थीं=थोडक्यांत, सारांशरूपानें. (५१) पीडित=आजारी, रोगी. (५२) वृषभांसी=बैलांस. मोकलूनि देती=सोडून देतात. (५४) शारीर तप=शरीर झिजवून केलेलें तप. शारीरिक तप, मानसिक तप, वाचिक तप, असे तपाचे प्रकार आहेत. प्राकृतमती=प्राकृत भाषेंत, मराठींत. (५५) निरूपणासरिसें=सांगण्याच्या ओघांत. दृष्टांतीं=हा शब्द येथें निरर्थक आहे. दृष्टांतीं आलें अनायासें=सहज आठवण झाली. कथानक=गोष्ट, कथा. (५६) नामा=नामदेव. हे थोर संत ज्ञानदेवांचे समकालीन होते. महाराष्ट्र संतमंडळांत यांची योग्यता फार मोठी आहे. यांचे सुमारें २००० अभंग गाथ्यांत दिले आहेत. यांची वाणी फार प्रेमळ आणि परिणामकारक आहे. यांचे गुरु विसोबा खेचर. प्रसिद्ध संतकवयित्री जनी ही यांची दासी होती. शतकोटी कवित्व=अशी आख्यायिका आहे कीं, वाल्मीकींनीं शंभर कोटी श्लोकांचा रामायण ग्रंथ रचिला ही गोष्ट एकदां नामदेवांनीं ऐकली तेव्हां त्यांनीं स्वतः शंभर कोटि अभंग रचून ईश्वराची स्तुति करण्याची प्रतिज्ञा केली. (५७) कलीमाजी आयुष्य वर्षें शत=कलियुगांत शंभर वर्षें मनुष्याचें आयुष्य. आघात=अपमृत्यु वगैरे. (५९) तुझ्या आश्रयें=तुझ्या कृपेच्या जोरावर, तुझ्या भरंवशावर. निजांगें=स्वतः. पण=प्रतिज्ञा. तूं काय एक न करिसी देवा=देवा, तुला कोणती गोष्ट करतां येत नाहीं ? तुला अशक्य काय आहे ? केवा=येथें पाड असा अर्थ. (६०) करुणाउत्तर=नम्रपणाचें वचन, दया येईल असें

भाषण. शार्ङ्गधर=पांडुरंग, विष्णु. शार्ङ्ग नांवाचें धनुष्य धारण करणारा. काय आज्ञापी=काय आज्ञा करिता झाला? (सरस्वतीस काय आज्ञा केली?) (६१) जिव्हाग्रीं=(नामदेवांच्या) जिभेच्या टोंकावर. कुसरी=कौशल्ययुक्त, सुंदर, कलाकुसरीचें. श्रुतीचे गर्भ आहेत अंतरीं=वेदांच्या अंतरंगांत जे गूढ अर्थ भरले आहेत ते. प्राकृत वैखरी=मराठी भाषेंत. (६२) ब्रह्मतनया=ब्रह्मदेवाची कन्या सरस्वती. प्रसादवाणी=प्रासादिक कविता. याचा चपळत्वें लिहिणार कोणी। चक्रपाणी योजावा=नामदेवांच्या मस्तकावर तुझा वरदहस्त असल्यामुळें ते अतिशय जलद कविता रचतील, तरी ती तितकीच जलद लिहून घेणाऱ्या एकाद्या लेखकाची, हे देवा, या कामीं तूं योजना कर. ६३व्या ओवीचा अर्थ=नामदेवांच्या मुखांतून जे शब्द बाहेर पडतील ते तत्काळ लिहून घेतले पाहिजेत, कारण, पुनः तेच शब्द उच्चारावयास जर त्यांना सांगितलें तर ते त्यांना उच्चारतां येणार नाहींत. (६४) घननीळ=मेघांसारखा नीलवर्ण आहे ज्याचा तो, पांडुरंग. (६६) व्यासवाल्मीकादिक=व्यास हे महर्षि पराशरापासून मत्स्यगंधेच्या पोटीं जन्म पावले. इतिहासपुराणादि ग्रंथांचे कर्ते. यांची विद्वत्ता एवढी मोठी होती कीं "व्यासोच्छिष्टं जगत् सर्व' अशी म्हणच पडली आहे. वाल्मीकि=हे आरंभीं वाटमारेपणाचा धंदा करणारे कोळी होते. नारदांच्या उपदेशामुळें यांना पश्चात्ताप होऊन रामनामाच्या जपामुळें हे पुढें महर्षि झाले. रामायण ग्रंथाचे कर्ते. रामचंद्रानें सीतेचा त्याग केला त्या वेळीं यांनींच तिचा प्रतिपाल केला. यांना आदिकवि म्हणतात. (६७) वैकुंठभुवन=विष्णूचें वास्तव्यस्थान. शेषशयन=शेषाच्या पाठीवर निजणें. (६८) अवधान=लक्ष. (७०) ललित=हा एक कवित्वाचा प्रकार आहे. वेदांतांतील कोड्यांवर केलेली कूट कविता. ललित म्हणून जो एक नाट्यप्रकार आहे त्यांत असली कविता म्हटली जाते व म्हणून तिला ललित म्हणतात. एकनाथकृत हमामा, हुंबरी, एडका, अर्जदास्त, थट्टा, वगैरे पद्यें प्रसिद्ध आहेत, त्यांस भारूड असें म्हणतात व तेंच ललित होय. नामदेवाच्या नांवावर प्रसिद्ध असलेलें एक ललित येथें देतों:—

आम्ही न बोलों लटकें। अवघें वर्तमान खोटें॥ध्रुव०॥ मुंगी व्याली शिंगी झाली तिचें दूध किती। अठरा रांजण भरुन ठेविले प्याले बारा हत्ती॥ १॥ तळयांत कांसव गीत गाय ताडिवर कोल्हा नाचे। घेउनि कागद दौत लेखणी खेंकडा पुस्तक वाचे॥२॥ विष्णुदास नामा म्हणे ऐका याची ख्याती। जो लटकें म्हणेल

त्याचे पूर्वज नरकीं जाती ॥ ३ ॥ (७२) निगमा=वेदाला. म्हणे कांहीं प्रेमा राहिला पोटीं। तो पुढें गोष्टी वदवीन=शतकोटी अभंग रचण्याची प्रतिज्ञा नामदेवांनीं केली होती, ती अपुरी राहिली. कांहीं अभंग कमी पडले. देव नामदेवांस म्हणाला, " कांहीं अभंग रचावयाचे राहिले, ते मी पुढें करवीन. " हे अभंग पुढें देवानें तुकोबांच्या मुखानें वदविले व शतकोटि संख्या पुरी केली अशी आख्यायिका आहे. (७५) वाउगें=भलतेंच, विषयास धरून नसलेलें. ममाज्ञा=माझी आज्ञा किंवा माझ्या आज्ञेनें.(७६) प्रमाणाची=ठरलेली, निश्चित, संकल्पित. (७८) वैखरी=वाणी. (८०) प्रमाण=मान्य, सिद्धांतरूप. (८३) भविष्य केलें रामायण=पुढें होणारें रामचरित्र अगोदरच रामायणांत ग्रथित केलें. (८४) लीला दाविली तैशाच रीती=वाल्मीकींनीं अगोदरच भविष्य करून ठेविलें होतें त्याप्रमाणें वर्तन करून रामानें तें भाविष्य खरें करून दाखविलें. (८५) धृतराष्ट्र=कौरवांचा पिता व पांडवांचा चुलता. संजय= या नांवाचे अनेक पुरुष इतिहास-पुराणांत उल्लेखिले आहेत. या ठिकाणीं, धृतराष्ट्रास कौरव-पांडवांच्या युद्धाचा वृत्तांत सांगणारा सजय. (८६) एवं= याप्रमाणें. (८७) डुडुळ=घुबड, पिंगळा. जल्पती=वल्गना करितात. येथें ओरडतात. (८७) तस्करांसी=चोरांना. (८८) दातयाची=दात्याची, दान करणाराची. कृपण=कद्रू, कवडीचुंबक. (८९) अजापाळ=धनगर. (९०) घुंगळवेल=एक घाणेरडी वेल. हिचा पाला चुरगळला असतां एक प्रकारचा दुर्गंध येतो. (९१) अविंध=यवन, मुसलमान. (९५) शिवाजी नृपति= स्वराज्यसंस्थापक छत्रपति शिवाजीमहाराज. (९६) सिंहगड=पुण्यापासून थोड्या अंतरावर असलेला एक जुनाट डोंगरी किल्ला. पूर्वी याचें नांव 'कोंडाणा' असें होतें. शिवाजीचा सरदार तानाजी मालुसरे व त्याचा भाऊ सूर्याजी यांनीं छापा घालून मोंगलांपासून हा किल्ला घेतला. या युद्धांत तानाजी मारला गेला, त्याला अनुलक्षून महाराजांनीं " गड आला पण सिंह गेला ' असे उद्गार काढले, तेव्हांपासून या किल्ल्याचें नांव 'सिंहगड असें पडलें. (१००) होन=त्यावेळीं चालू असलेलें ३॥ रु. किंमतीचें सोन्याचे नाणें. (१०२) प्रपंचहेवा=संसाराची आवड. (१०३) जोहारियाच्या=रत्नपारख्याच्या. साटोवाटी=परीक्षेसाठीं. गारा=एक प्रकारचा चकाकणारा दगड. कनकओंटी=सोन्यानें भरलेली ओंटी. (२०७) सुखसंपन्न=सुखी. येर=दुसरी. (१०८) तुळसी=तुळसीची माळ. वारकरी लोक गळयांत तुळसीची माळ

घालीत असतात. (१०९) धणीवरी=आमचें समाधान होईल इतकी. (११०) निरपेक्ष=कोणत्याही वस्तूची अपेक्षा न करणारी. (१११) चाकणाहून= पुण्याहून थोड्या अंतरावर हें गांव असून तेथें किल्ला आहे. शिवाजीच्या वेळीं येथें मुसलमानाच्या सैन्याची छावणी होती. (११५) परचक्रें=शत्रुसैन्यानें. (११७) दुश्चित=चिंताग्रस्त. काय गुजगुज करितां मनांत=मनांतल्या-मनांत किंवा आपापसांत हळूहळू काय बोलतां ? (१२०) सर्वथा=कधींही, काय वाटेल तें झालें तरी. (१२१) एकचित्तीं=एकाग्र मन करून, कीर्तनाकडे सर्व लक्ष लावून. (१२३) परदळ=शत्रुसैनिक. (१२४) आम्हांकारण= आम्हांला. (१२५) पायिक=सेवक. (१२७) अंतरसाक्ष=जगांत कोठें काय चाललें आहे हें मनांतल्या मनांत ज्याला समजतें तो. (१२८) अरिष्ट=संकट. (१३१) जातिपरंपरा=संतांच्या जातीची परंपरा. दुसऱ्याचें दुःख पाहून स्वतः दुःखी होणें ही परंपरा. विक्षेप=अंतराय. (१३४) अश्वारूढ होऊन= घोड्यावर बसून. (१३६) नृपनाथ=शिवाजीमहाराज. (१३८) उठाउठी=त्वरेनें, लगबगीनें. माळवदीं=माळरानांत. (१४२) हडबड= धांदल, उतावीळ. (१५४) भ्याडां=भित्र्यांना. (१४५) कासया वागवितां हतियार=हातांत शस्त्र कशाला बाळगतां ? (१४८) आंतुडेना=सांपडेना, हातीं लागेना. (१५०) कंटकवन=काटेरी झाडांचें बन. (१५२) तरळली दृष्टी=दृष्टिभ्रम झाला. (१५३) निशापती=चंद्र. (१५६) हिंव सुटलें=थंडी पडली. (१५८) कांटवणीं=कांट्यांच्या झाडांस अडकून. १५९ ते १६६ या आठ ओव्या अगदीं सोप्या आहेत. (१६७) तुम्हां-ऐसाचि=तुमच्यासारखाच. (१६९) चमत्कारला=आश्चर्यचकित झाला. नामापासून क्रियापदें तयार करण्याची कांहीं जुन्या कवींची चाल आहे. मुक्तेश्वरी कवितेंत अशीं क्रियापदें बरींच सांपडतात. चक्रपाणी कृपाळें= दयाळू भगवंतानें. (१७१) दीनरूप=दरिद्र्याचा वेष. राजान्न=राजा या नात्यानें मी दिलेलें धनधान्य. (१७२) वृषभावरी=बैलाच्या पाठीवर. (१७३) यामिनी=रात्र. वृंदावनीं=तुलसीवृंदावनाजवळ. स्मरणी=जपमाळ. (१७६) परी=प्रकार. १७७ व्या ओवीचा अर्थ=तुम्ही शिवाजी राजे आहांत हें मी ओळखलें असें जर आपण त्यांना सांगितलें तर मजवरील त्यांच्या प्रेमांत अंतर पडेल, असा विचार करून तुकोबा कांहीं न बोलतां मनांतल्या मनांत नामस्मरण करीत राहिले. (१७८) खंडेल सुकृत आपुलें=आपलें पुण्य

कमी होईल. (१७९) त्यांजकारणें=त्यांना. (१८०) करंटी=कपाळफुटकी, दुर्दैवी. (१८१) अवचित=अकस्मात्. (१८१) द्विजवरां=ब्राह्मणांना. (१८२) संचित=नशीब, (सांठविलेलें.) (१८४) अंबर=आकाश. तटस्थ=तन्मय. हरिलीला=हरिकीर्तन. (१८५) व्यथा=व्याधि, रोग. (१८६) नायकोनी=न ऐकतां. (१८८) मायालोभासी सांडविलें=मायामयता नाहींशी करून टाकलीस. (१८९) नाहीं धारजिण हरिनाम=ईश्वराचें नामस्मरण आम्हाला मानवत नाहीं. (१९०) उद्धत=उद्धट, उर्मटपणाचें. (१९१) भणंग=भिकारी. रंग समस्त वितुळला=रंगाचा बेरंग झाला. (१९२) कुणप=प्रेत. मृतसंजीवनी=मेलेल्यास जिवंत करण्याची विद्या. (१९३) सुधारस=अमृत. (१९४) लाघव=चमत्कार. (१९६) ब्रह्म=परब्रह्म, परमेश्वराचें विश्वव्यापी निराकार स्वरूप. मुसावोनी= सोनार मुशींत सोनें टाकून त्याचा रस करतो, त्याप्रमाणें (हरिनामस्मरणाच्या ध्वनीमुळें) ब्रह्म गगन भरून कोंदलें. (२००) सावाचित्त=येथें सजीव असा अर्थ.

अध्याय २ रा.

(**ओवी १ ली**) सगुणस्वरूप=ईश्वर निराकार व निर्गुण आहे, परंतु आपल्या भक्तांसाठीं कधीं कधीं तो साकार व सगुण होतो, असें हिंदु धर्माचें एक तत्त्व आहे. (२) वक्षस्थळा=छातीवर. रत्नकळा=रत्नांची प्रभा. (३) कनकदीप्ती=सोन्याप्रमाणें देदीप्यमान्, कांतिमान्, तेजस्वी. तळपती=झगमगतात, शोभतात. मकराकृति=सुसरीच्या आकाराचीं सुढाळ=तेजस्वी. (४) कौस्तुभ=विष्णूच्या गळ्यांतला मणि. (५) वोळीनें=ओळीनें, रांगेनें. क्षुद्रघंटी= लहान घंटा. (६) तुजकारण=तुला. (८) दासांकारण=भक्तांना. (९) लौकिक स्थिति=सांसारिक उठाठेवी. (११) देहलोभ=देहाची ममता. चहूंमुक्ति= सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता या चार मुक्ति. (१३) बौद्धावतार= ज्या अवतारांत देवानें मौन धारण केलें असून तो कोणत्याही प्रकारची हालचाल करीत नाहीं तो अवतार. (१४) जैसी सांजवेळ न होतां पाहें=संध्याकाळ झाली नसतां म्हणजे वासरास दूध पाजण्याची वेळ झाली नसतां. वत्स= वासरूं. मोहें=वात्सल्यानें, अपत्यप्रेमानें. (१७) घेतली आळी=आळ घेतली, हट्ट धरला. (१९) श्रीकृष्ण बालपणीं गोकुळांत असतां, इंद्रानें एकदां खूप पर्जन्य पाडून गोकुळ बुडविण्याचा प्रयत्न केला त्या वेळीं श्रीकृष्णानें गोवर्धन पर्वत बोटावर उचलून गोकुळाचें रक्षण केलें अशी कथा आहे. बुझावण=

समजूत. (२१) अटक=अडचण, अडणें. येथें विस्मृति असाही अर्थ होईल. (२४) बुद्धिप्रकाशक=बुद्धीला प्रकाश देणारा, बुद्धिदाता. बडिवार=बडेजाव, मोठेपणा. (२५) दांभिक=ढोंगीपणाची. श्वानविष्ठा=कुत्र्याचा मल. सन्मानचेष्टा=मानसन्मानाच्या गोष्टी. (२६) जेणें लोक पिशाच म्हणती=ज्या प्रकारचें वर्तन केलें असतां लोक आपणास पिशाच म्हणतील. कुटिल=कुटाळ, टवाळखोर. विदेहस्थिति=देहाकडे दुर्लक्ष. 'देही असून विदेही' असे कांहीं लोक असतात ते बाह्यत: देहधर्माप्रमाणें सर्व प्रकारचीं कर्में करीत असतांही, आंतरत:, आपण देही नाहीं असें समजून वागत असतात. रामाचा सासरा राजा जनक हा 'विदेही जनक' म्हणून प्रसिद्ध आहे. (२८) विवेकें रसना आवरीत=विचारानें जीभ ताब्यांत ठेवी. जिव्हालौल्य सोडून दिलें होतें. (२९) देहनिर्वाहापुरतें=देहधारणास, जीवरक्षणास पुरेल इतकें. (३०) बल्लाळाच्या वनाआंत=देहूजवळ बल्लाळाचें वन या नांवाचें एक ठिकाण आहे त्यांत. (३१) निजमंदिरीं=आपल्या घरीं. (३२) साजणी=मैत्रिणींनो. मात=गोष्ट. परत=चौकशी, वास्तपुस्त. (३७) कुंभांत=मातीच्या घागरींत. जीवन=पाणी. (३७) लवलाहें=त्वरेनें. (४०) धायी मोकलितें=ढसढसा रडतें. ४१ व्या ओवीचा अर्थ=हे ऐकून तुकोबा आपल्या पत्नीस म्हणाले, तुझ्या आईबापांनीं माझ्याबरोबर तुझें लग्न लावून दिले त्यापूर्वी त्यांनीं, आपल्या मुलीला हा नवरा योग्य आहे कीं नाहीं, याचा विचार केला नाहीं. मग मी तुला अन्नवस्त्र कशासाठीं पुरवूं? (३२) येरू=(दुसरा) तुकोबा. निरविलें=स्वाधीन केलें, सोंपवून दिलें. (४४) विश्वजननी=विश्वाची माता, जगन्माता. ४५ व्या ओवीचा अर्थ–सृष्टि निर्माण झाली त्या वेळीं जन्म पावून तीं वाढलेलीं नाहींत (म्हणजे सृष्ट्युत्पत्तीपूर्वीच तीं होतीं) व या विश्वाचा जेव्हां नाश होईल तेव्हां तीं नष्ट होणार नाहींत. (४६) घटांत=मातीच्या भांड्यांत. त्यास नाहीं दुजेपण=घटांतलें आकाश आणि घराबाहेरचें आकाश हीं भिन्न नाहींत. घटाकारण=घटाचा. घट फुटला म्हणून घटांतलें आकाशही फुटलें असें म्हणूं नये. (४८) पिशुनासी होईल उजगरा=निंदा करणाऱ्या सोयऱ्याधायऱ्यांची खोड मोडेल, त्यांचीं तोंडें बंद होतील. (५०) भाक=वचन. (५२) वरपडा होऊन=स्वाधीन होऊन, आहारीं जाऊन. येथें हा शब्द महीपतींनीं चुकीनें उपयोजिला आहे. त्याचा खरा अर्थ जोरावर, विजयी, असा आहे. (५३) जाहलें यथास्थित=योग्यच

झालें. आपंगिलें=जवळ केलें, आपली म्हटलें. (५४) गिरिकपाटीं= पर्वताच्या गुहेंत. (५६) हरिदिनी=एकादशी. (५७) या ओवींत ज्या ११ अभंगांचा उल्लेख आहे ते अभंग जिज्ञासूंनीं तुकारामबुवांच्या गाथ्यांत पहावे. (५८) आर्षवाणी=आर्ष शब्दाचा मूळ अर्थ वैदिक, पवित्र असा आहे. परंतु महीपतींनीं तो शब्द येथें बालवाणी, बोबडे बोल, वेडेवांकडे शब्द या अर्थी योजिला आहे. जैसें देखावया वासरमणी। दीपक उजळोनी दाखविती= ज्याप्रमाणें सूर्य दाखविण्यासाठीं दिवा लावावा, त्याप्रमाणें. अमृतासिद्धि=ज्या सिद्धीच्या योगानें अमरत्व प्राप्त होतें ती सिद्धि. (६२) क्षेत्र=शेत. दारुण= पुष्कळ. निजभाग्यें=आपल्या दैवयोगानें. (६३) काबाड=ओझें, भार. (६४) देणें लागतो याचा सारा=या शेताचा कर द्यावा लागतो. काळोजी=यम. हुद्देदार= अधिकारी. (६५) ऐवज=तारण. वृंदावन=एक अतिशय कडू फळ. बकुळ- सुमन=बकुळीचें फूल. चौधरी=गांवकामगार. हृदयचोहटां=हृदयरूपी चावडींत. (७२) शेखीं=शेवटीं. निकी=दृढ, निश्चित. निष्कळंकी=कलंकरहित, कर्जमुक्त. (७४) याजभेणें=याच्या भयानें. (७५) गव्हाण=शेत. कुळवाडी केली नसती= शेत खंडानें केलें नसतें. (७६) बेबाक होऊन=सर्व बाकी चुकती करून. (७७) सूती=लागवडीची जबाबदारी. (७३) सोये=तजवीज. ६२ ते ८८ या ओव्यांचा सारांश:—मग बायकोला समोर बसवून तुकोबा तिला म्हणाले, "हा मनुष्यदेह म्हणजे एक शेत आहे. नरदेहीं येऊन जर प्रभूचें नामस्मरण केलें तर या शेतांत भरपूर पीक येईल. ज्यांनीं खरें परमार्थसाधन केलें नाहीं त्यांना या शेतीत तूट मात्र आली. प्रपंचाचें ओझें वाहून त्यांनीं आपला देह व्यर्थ झिजविला. या शेताचा जो मालक आहे त्याला ८० टक्के सारा द्यावा लागतो. तो जर दिला नाहीं तर (त्याचा) जप्तीदार यम हा मोठा दरारा दाखवितो. त्याच्या भयानें ८० पैकीं १० टक्के फेडून टाकले. बाकी ७० टक्के उरले त्याबद्दल तारण देण्यास कांहीं नाहीं. १० टक्के फेडले ते कोणते असें तूं विचारशील, तर देहरूप शेतांतली जीं दहा इंद्रियें त्यांची मी झाडणी केली. शिवीगाळ आणि स्तुतीचे गोड शब्द हीं दोन्ही माझ्या कानास सारखींच वाटतात. सोनें आणि माती हीं डोळ्यांस समान वाटतात. साखर आणि कडू वृंदावन यांच्या चवींतला फरक माझ्या जिभेस कळत नाही. घाणेरडी पुंगळवेल आणि सुवासिक बकुलपुष्प यांचा गंध माझ्या नाकास सारखाच वाटतो. सर्व इंद्रियांत चंचळ असें जें मन तें विठ्ठलाच्या पायांपाशीं स्थिर झालें

असून, हस्तपादादि कर्मेंद्रियांनीं आपल्या कर्तेपणाचा अहंकार सोडून दिला आहे. ज्या इंद्रियाचा जो विषय आहे तो जर त्याला कळत नाहीं तर तीं झडून गेलीं असेंच म्हटलें पाहिजे. बाकी जे सत्तर टक्के उरले त्यांना मजपाशीं काय तारण आहे हें सांगतों. पांडुरंग हा येथला चौधरी (पाटील) आहे. तो म्हणतो, सगळी बाकी फेडून टाका. हृदयरूपी चावडीवर (चोहटा=चव्हाटा) बसून काय बोलतो तें ऐक. तो म्हणतो, शेवटीं घरांतलीं भांडींकुंडीं व गुरेंढोरें देऊन आपली बाकी फेडून टाक; व तसा दृढनिश्चय करून ऋणमुक्त हो. ह्या वस्तु जर याला आम्ही दिल्या नाहींत तर आपणास लपावयास जागा कोठें आहे? कारण हा जेथें नाहीं असें एकही रिकामें स्थल नाहीं. विवेकपूर्ण मनानें याचा विचार कर. हा परमात्मा सर्व विश्व व्यापून उरला आहे, याच्या भयानें जर आपण पळून गेलों तर आपल्याला पाठीशीं घालील असा कोणी दिसत नाहीं. तें शेत तरी केवढें मोठें? हिंडावयाचें तरी किती? (येथें लक्षचौऱ्याशींचा फेरा ध्वनित आहे.) याच्या सेवकांनीं आमची अगदीं पाठ पुरविली आहे. मी जर याचें शेत खंडानें मुळीं केलेंच नसतें तर मला यानें कशाला गांजलें असतें? म्हणून, याची सर्व बाकी चुकती करून आपण येथेंच राहूं व तो आपखुषीनें जी काय मजुरी देईल तिच्यावर सर्वांचा निर्वाह चालवूं. यानें आजपर्यंत किती तरी लोकांची नागवण केली असून त्यांनीं कांहीं पुनः संसार पाहिला नाहीं (म्हणजे ते मुक्त झाले.) या भयानें लागवड करण्याची जबाबदारी कोणी घेत नाहीं. कोणाला सद्‌गुरु जामीन राहिला त्याचें निसंतान झालें (पक्षीं तो वैरागी झाला). त्यानें मानापमान गुंडाळून ठेवला त्यामुळें लोक त्याला हांसूं लागले. जवळ असलेले जे कोणी कसोटीस उतरले त्यांना हा वैकुंठांत नेऊन घालतो (मुक्ति देतो). माझीही त्यानें अशीच पाठ पुरविली आणि मला नकोनकोसें केलें. मला ही गोष्ट पूर्वींच ठाऊक असूनही मी नेणता झालों (आणि) ज्यानें निर्दयपणानें पुष्कळांचा छळ केला त्याच्या हातीं सांपडलों. तूं आतां मनांत विचार करून संसाराविषयीं उदासीन हो. माझ्या जीविताचा नाश होण्याचा प्रसंग आल्यावर आतां अनमान कशाला करावयाचें? ही गोष्ट आवश्यक आहे असें सहजासहजीं दिसून आल्यावर ती तुला कां आवडत नाहीं सांग बरें? मला उपास पडूं लागले, आतां लाज कशाला धरावयाची? देहाचा लोभ धरल्यावर तुझ्या जिवाचें काय

होईल ? माझी आणि तुझी ताटातूट कधींही होणार नाहीं अशी तजवीज तुला सांगतों. जेणेंकरून मुलांबाळांसह आपण एकत्र नांदूं, असा विचार मी तुला सांगतों तो जर निश्चयपूर्वक ऐकशील तर आपला वियोग होणार नाहीं. तूं म्हणशील, मुलेंबाळें काय खातील ? तर ही चिंता बिलकुल करूं नकोस. त्यांचें अन्नवस्त्र विधीनें त्यांच्या नशिबीं लिहिलें आहे. तूं आपला गळा सोडवून घे, लक्षचौऱ्यांशीं योनी चुकव, गर्भवासाचें दुःख टाळ. हें कसें करावयाचें तें मी तुला सांगतों, ऐक. मी तुला टाकून पळून जातों; कारण, जवळ ऐवज असला म्हणजे (चोर) गळा धरतात. तूं माझ्याजवळ असलीस म्हणजे (चोर) घाला घालतील. यमधर्माच्या दूतांचा मार फार भयंकर आहे. तो पाहून जीव थरथर कांपूं लागतो. आतां जर तुला माझी चाड असली तर तूं सर्वस्वी (जिवावर) उदार हो." (८७) मुजाईम=अडथळा, हरकत. (९०) मोकळा=उघडउघड. (९१) जेवाया देवें लाविलें पान=देवानें पानावर जेवणें भाग पाडलें. वाड=मोठें. (९३) बरग=गुरांचा एक रोग. कठिण अंतर करावें=मन कठोर करावें, मुलांबाळाचा मोह सोडावा. (९४) निरसोनियां आस=आशा सोडून. उपमा समान वज्र जैसें। धैर्य चित्तास करावें=वज्राप्रमाणें मन घट्ट करावें. (९५) परमानंदधणी= परम आनंदाची (ब्रह्मानंदाची) जोड. सनकादिक=सनक, सनंदन वगैरे मोठे विष्णुभक्त होऊन गेले ते. (९६) सोहळे=कौतुक, उत्सव. (९७) जडित=रत्नखचित. (९९) मायबाप=भगवान् विष्णु, परमात्मा. (१०२) पाचारीं=बोलाव. (१०३) विधियुक्तीं=शास्त्रोक्त विधीप्रमाणें. द्विजांहातीं= ब्राह्मणांकडून. (११०) मजकारण=माझ्याकडून. (११३) अतीत=अतिथि. (११५) अनुसंधान=संदर्भ. (११८) मिष=निमित्त. (११९) आर्ती= दुःख, पीडा. (१२०) अर्थ नाहीं कोणासी वंचिला=अर्थ कोणापासून चोरून ठेवला नाहीं. (१२५) जटिल=जटाधारी. (१२७) चवदा रत्नें वांटिते वेळ। शंकरासी लाधलें हलाहल=देव आणि दैत्य यांनीं मिळून समुद्रमंथन केलें तेव्हां त्यांतून चौदा रत्नें निघालीं. त्यांपैकीं हलाहल नामक भयंकर विष कोणीच घेईना, तें शंकरांनीं घेतलें अशी कथा आहे. (१३३) वाडियामागून=वाड्याच्या मागील बाजूस. (१३४) घातलें पाणी संसारा=संसारावर पाणी सोडलें. (१३८) त्रिविध=तीन प्रकारचे. (१४०) समयीं=वेळच्या वेळीं, योग्य वेळीं. (१४४) यापरी काळ कडे लागतां=या

प्रमाणें काळ कंठीत असतां. (१४७) पायांनीं=पांडुरंगाच्या पायांनीं, (त्याचें चरणस्मरण केलें म्हणून) १५०) महाद्वार=पंढरपुरांतील पांडुरंगाच्या मंदिराचा मुख्य दरवाजा. (१५२) मत्स्यरूप धरूनी=शंखासुर नामक दैत्यानें ब्रह्मदेवाचे वेद चोरून नेले म्हणून विष्णूनें मत्स्यावतार धारण करून शंखासुराचा वध केला व वेद ब्रह्मदेवास परत आणून दिले अशी कथा आहे. (१५३) कूर्म होऊनि=देवानें कासवाचें रूप धरून पृथ्वी पाठीवर घेतली अशी कथा आहे. (१५४) वराहावतारीं विष्णूनें वराहाचें रूप धारण करून हिरण्याक्ष नांवाचा दैत्य मारला व दाढेवर पृथ्वी धरली अशी कथा आहे. (१५५) हिरण्यकशिपु नामक दैत्यानें, प्रल्हाद नामक आपल्या विष्णुभक्त पुत्राचा छळ केला तेव्हां विष्णूनें नरसिंहरूप धारण करून त्या दैत्यास मारलें अशी कथा आहे. (१५६) दानाभिमानें=मी मोठा दाता या अभिमानानें. बळी=हा दैत्य मोठा हरिभक्त होता, पण त्याला आपल्या दातृत्वाचा फार गर्व झाला होता, म्हणून विष्णूनें वामनावतार घेऊन त्याच्या गर्वाचा परिहार केला व त्याला पाताळांत घातलें अशी कथा आहे. (१५७) रेणुकेच्या उदरासी येऊनी=रेणुका ही जमदग्नि ऋषीची पत्नी. तिच्या पोटीं जन्म पावलेल्या परशुरामानें एकवीस वेळ निःक्षत्रिय पृथ्वी केली अशी कथा आहे. (१५८) दशकंठ=दहा तोंडाचा रावण. रघुनंदनें=श्रीरामानें. (१९०) घर्में=घामानें. (१६१) जे=कीं. (१६४) आपुलें तें स्वाधीन नसे जाण=(तूं पळून जावें म्हणून सांगतेस पण) तें आपल्या स्वाधीन नाहीं (कारण मी भक्तांचा अंकित आहें). (१६५) थोकलाचि=थबकलेला. (१६६) मिलिंद=भुंगा. (१७१) मजकारण=मला. (१७५) विनीत=विनम्रपणाचें. या चरणांत नम्र आणि विनीत हे एकाच अर्थाचे दोन शब्द कवीनें वापरले आहेत. (१७७) पहिलें=पूर्वी, अगोदर. (१७८) आता आश्रय जाहला कोणता=आतां कशामुळें धीर आला ? (१८३) विरोधभक्ति=हा एक भक्तीचा प्रकार आहे. देवाला नेहमीं विरोध करावयाचा. रावण, शिशुपाल, वगैरे पुराणपुरुष देवाचे विरोधी भक्त होते व म्हणूनच देवानें त्यांना स्वहस्तें मारून मुक्ति दिली अशी समजूत आहे. (१८६) भास्कर=सूर्य. (१८८) पाषाण ठेविला मस्तकावरुता=डोक्यावर दगड घेऊन. (१८९) अंतरीं=देवालयांत. (१९४) उजगरा=जागरण. (१९५) अपंगी=आश्रय देई. (१९८) ठायें=वस्तु. संसारसोये मोडिली=संसाराची

वाताहत झाली. (२००) मात=गोष्ट. (२०४) मुद्रांकित=(त्याची) मुद्रा धारण करणारा, अंकित.

अध्याय २ रा.

(**ओवी १ ली**) भवभंजना=संसाराचें भय दूर करणाऱ्या. सायुज्यदानी= सायुज्यमुक्ति देणारा. कर्मापासूनी=कर्मबंधापासून. (२) निरपेक्ष=कशाचीही अपेक्षा नाहीं अशी वृत्ति. (५) लोकाचारी=लौकिकांत, जनांत. (६) अंतर=मन. (७) हस्त इच्छिती तुझें अर्चन=तुझें पूजन करावें असें हात इच्छितात. (८) समदृष्टीनें=समभावानें; एकाच भावनेनें. चराचरभूतीं=चर (चालणारें) आणि अचर (स्थिर) भूतांच्या ठायीं. (११) अघटित= विचित्र. निरूपण=प्रवचन, कथाभाग, ग्रंथरचना. (१४) परिधान करूनि दिव्यांबर=(रुक्मिणीनें दिलेलें) दिव्य वस्त्र नेसून. (१६) राशीस येतसे उणेंपणा=धान्याच्या राशींत उणेंपणा येतो, धान्य कमी मिळतें. नवनीत=लोणी. (१८) काचमणियाचा=कांचेच्या मण्याचा. मुक्ताफळ=मोतीं. (१९) खद्योत= काजवा. वासरमणी=सूर्य. थिल्लर=डबकें. पयोब्धि=क्षीरसागर. (२०) गुंजाहार= गुंजांची माळ. वाडेंकोडें=कौतुकानें, आवडीनें. अनर्घ्य=अमोलिक. सुधारस= अमृत. (२१) सिद्धि=योगाभ्यासादिकांमुळें मनुष्यास कांहीं सिद्धि प्राप्त होतात. अलौकिक गोष्टी करून दाखविण्याचें सामर्थ्य. कल्पतरु=ज्या वृक्षाखालीं बसलें असतां इच्छित वस्तु प्राप्त होतात असा एक काल्पनिक वृक्ष; कल्पवृक्ष. दुर्जन- त्यागें भेटती सद्गुरु । तरी कां न अव्हेरू करावा=दुर्जनांचा संग सोडला असतां जर सद्गुरु भेटतात तर दुर्जनांचा अव्हेर कां करूं नये ? (२२) सायुज्य- सदन=वैकुंठ, मुक्ति. (२३) दृष्टांतवचनें=निरानिराळे दृष्टांत देऊन केलेलें भाषण. (२६) देवांसी=देव आडनांवाच्या सत्पुरुषास. तुकोबांचे कालीं पुण्यानजीक चिंचवड येथें चिंतामणि देव या नांवाचे प्रसिद्ध गाणपत्य (गणपतीचे उपासक) रहात होते. त्यांचे वडील मोरया देव देही मोठे गाणपत्य व प्रसिद्ध पुरुष होते. हें घराणें अद्याप चिंचवड येथें असून, तेथें प्रतिवर्षी मोठी यात्रा भरते. देवस्थानचें उत्पन्नही मोठें आहे. गणपति प्रसन्न केला=गणपति प्रसन्न करून घेतला. (२७) शूद्रवाणी=तुकोबा जातीनें शूद्र असून वाण्याचा धंदा करीत असत. (२८) प्रचीत=अनुभव. (३०) मूषकवाहनाची=चिंचवड येथील गणेशमूर्तीची. निकटीं देवांचे=चिंता-

माणि देवांजवळ. (३३) वैष्णव भक्त=विष्णुभक्त तुकोबा. सांगाती=संवगडी, सोबती. (३४) गजवदनासी=गणपतीला. (३५) आमचे मंत्र आम्हांस फळले=आमच्यावर बाजू उलटली. आपल्या सिद्धीचा चमत्कार तुकोबांस दाखवून त्यांना लाजवावें, चकित करावें, म्हणून त्यांना आम्हीं बोलावणें पाठविलें, पण तेच आतां आम्हांस गणपतीचें आवाहन करून त्याला आणण्यास सांगत आहेत व त्याप्रमाणें आम्हीं केलें नाहीं म्हणजे आमच्यावर बाजू उलटणार. तयासी=गणेशमूर्तीला. (३६) शास्त्रयुक्ति=शास्त्रज्ञान. (३७) दुश्चित=शुद्ध नव्हे तें; एकाग्र नसलेलें. (३८) गजेंद्र=पुराणांत उल्लेखिलेला एक हत्ती. हा एकदां तलावांत जलक्रीडा करीत असतां त्याला एका मगरानें धरलें. त्याच्या हातून सुटण्याचा त्यानें पुष्कळ प्रयत्न केला परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां त्यानें विष्णूचा धांवा केला व विष्णूनें येऊन त्याला सोडविलें, अशी कथा आहे. हें ‘ गजेंद्रमोक्ष ’ आख्यान प्रसिद्ध आहे. गोपी=गोकुळांतील गवळ्यांच्या स्त्रिया. (३९) विधियुक्त याज्ञिक कर्मठपण=वेदांत सांगितलेल्या विधीप्रमाणें यज्ञकर्म, व कर्मठपणा. ऋषिपत्न्या=एकदां श्रीकृष्ण गोपालांसह गाई चारीत चारीत दूर अरण्यांत ऋषींच्या आश्रमाजवळ गेला असतां, सर्वांस भूक लागली म्हणून ऋषींकडे त्यानें अन्न मागण्यास गोपाळ पाठविले, पण त्यांनीं अन्न दिलें नाहीं. पण त्यांच्या स्त्रियांनीं मात्र श्रीकृष्ण व गोपाल यांस स्वतः अन्न नेऊन दिलें. (४०) हुंबली=शीळ, हुंकार. (४४) एकदंताचें=गणपतीचें. विनायक=गणपतीचें एक नांव. (४५) मुहूर्त=घटकाभर. ३।। घटका म्हणजे एक मुहूर्त, परंतु तो अर्थ येथें नाहीं. (४७) उदकें भरूनी निथळत=सगळें अंग पाण्यानें भिजल्यामुळें पाणी गळत आहे अशी. (४८) क्षार=खारट. समुद्रजीवन=समुद्राचें पाणी. (४९) किमर्थ=कोणत्या कारणानें, कसा. (५०) त्याकारण=त्याला. (५३) सकळ देवतांची गति। आलीसे हातीं यास्तव=(यानें पांडुरंगास वश करून घेतलें असल्यामुळें) सर्व देवता याच्या अंकित झाल्या आहेत. (५६) ओळंगती=वश होतात. रोहिणीपतीतें=चंद्राला. उडुगण=नक्षत्रें. (६१) तांडव=एक प्रकारचें नृत्य. उमावरा=शंकराला. न समाये=मावत नाहीं. (६२) दिठी=दृष्टीनें. फांसोटी=पाश, फांस. भवबंध=संसाराचें बंधन. (६६) तुजकारण=तुला. (६५) देवांसी=चिंतामणि देवांना. (६६) लंबोदर=गणपति. (६८) पयोब्धी=क्षीरसागर. सरितांचा=नद्यांचा. (७०) हटीं=हटयोगानें. (७५) ग्रामासमीप=(देहू गांवानजीक)

मळियांत=मळ्यांत. (७८) चवाळें=घोंगडीची चौघडी. (७९) इक्षुदंड= ऊस. मध्यकांडी=उसाचें मधलें कांडें. (८०) ब्रह्मरस चाखिला=ब्रह्मानंदाची गोडी घेतली. इतर=इतर रस. सर्वथा=अगदीं, बिलकुल. दीपक=दिवे. (८१) सिद्धांतज्ञानीं=वेदांताच्या अभ्यासांत, अध्यात्म=शास्त्रांत. पाखंड=नास्तिकपणाच्या गोष्टी.अजापालन=शेळीचें पाळण.(८२) नामसुधेची=हरिनामामृताची. अनावडी=अप्रियता, कंटाळा. (८३) उटोन=घांसून स्वच्छ करून. (८५) आकळून=आवळून. (८६) देहूस प्रवेशतां तुकयास=तुकोबा देहू गांवांत प्रवेशतांच. परावें=दुसऱ्याचें. आपुलें परावें=आपपर. (८७) तस्कर=चोर. (८८) चूतवृक्ष=आंब्याचें झाड. (८९) उर्वी=पृथ्वी. वारण=हत्ती. (९३) सम्यक=या शद्वाचा मूळ अर्थ खरें, बिनचूक, असा आहे, पण येथें 'समोर' असा अर्थ घ्यावा. (९७) नेटका=यथायोग्य, बरोबर. (१०२) एकादश स्कंध=अठरा पुराणांपैकीं भागवतनामक पुराणाचें अकरावें प्रकरण. उद्धव=एक यादव. हा श्रीकृष्णाचा मित्र आणि भक्त होता. कृष्णानें त्याला जो उपदेश केला तो भागवताच्या अकराव्या स्कंधांत सांगितला आहे. कदर्यु=लोकांनीं केलेला छळ शांतपणानें सोसणारा एक पुराणपुरुष. याची कथा भागवताच्या अकराव्या स्कंधांत दिली आहे. एकनाथाचे टीकेवरूनी=एकनाथांनीं एकादशस्कंधावर वितृत मराठी ओवीबद्ध टीका केली आहे ती वाचून. या ग्रंथास 'एकनाथी भागवत' असें म्हणतात. (१०४) जे=कीं. संन्यासग्रहण=कदर्यूनें संन्यास घेतल्यावर तो फार शांत झाला व लोकांनीं केलेला छळ त्यानें शांततापूर्वक निमूटपणें सोसला; पण तुकोबा संन्यासी नव्हते, गृहस्थ होते. म्हणून दोघांच्या शांततेची तुलना करणें बरोबर नाहीं असें महीपति म्हणतात. म्हणजे त्यांच्या मतें तुकोबांची मनःशांति कदर्यूच्या मनःशांतीहून श्रेष्ठ प्रीतीची. (१०६) रत्नाकर=समुद्र. (१०७) सायुज्यतेचे साम्यतेसी निश्चितीं। सलोकता समीपता न सरती=सायुज्य मुक्तीशीं सलोकता व समीपता यांची बरोबरी होणार नाहीं. कारण, सायुज्यता म्हणजे ईश्वराशीं एकरूपता पावणें; सलोकता म्हणजे वैकुंठलोकीं वास करणें व समीपता म्हणजे ईश्वराच्या सन्निध असणें. (८) ओवीचा अर्थ=ज्या तुकोबांनीं या कलियुगांत सदेह वैकुंठास जाऊन तेथें ध्वज उभारला ते प्रेमळ भक्त वैष्णव-श्रेष्ठ तुकोबा म्हणजे प्रत्यक्ष जगद्गुरूचाच अवतार होय. तुकोबा सदेह वैकुंठास गेले ही आख्याइका प्रसिद्धच आहे. ९ व्या ओवीचा अर्थ=त्याला (तुकोबाला)

पुनःपुनः थोर थोर म्हणण्यांत अर्थ काय ? म्हणून तुकोबा वरिष्ठ, तुकोबा वरिष्ठ असें म्हणूंच नये. समुद्राला गंभीर म्हटलें तरच तो गंभीर, येरवीं काय गंभीर नाहीं ? (१११) क्षमा=क्षमाशीलता, सहनशीलता. (पृथ्वी क्षमाशील आहे असें म्हटलें म्हणजेच ती क्षमाशील होते काय ? नाहीं; ती स्वभावत:च क्षमाशील आहे.) (११२) लेणें=अलंकार.(११३) कायिक वाचिक मानसिक= देहानें, वाणीनें व मनानें घडणारें तप. (११६) चरणचाली=पायांनीं चालून, कोणत्याही वाहनाचा उपयोग न करितां. (११९) शीतज्वर=थंडीताप. (१२२) अन्वय=अर्थ. (१२६) सत्कीर्तिवैभव=सत्कीर्तिरूप संपत्ति. (१२७) आपैसीं=आपोआप. (१२८) विठाबाई=विठ्ठलास संतांनीं लाडिकपणानें दिलेलें स्त्रीवाचक नांव. आंदण्या=आंदण दिल्याप्रमाणें. (१२९) छंदें=तन्मय-तेनें, आनंदभरानें. (१३०) मूळ=बोलावणें. (१३१) म्हणोनि उदास धरिलें मज=म्हणून माझ्याविषयीं उदासीन झालास, मजकडे दुर्लक्ष केलेंस, माझी उपेक्षा केलीस. मोकलिलें=त्याग केला,टाकून दिलें. (१३३) सांकडें=संकट. सांड=त्याग. (१३५) भागशीण=शीणभाग, श्रम. (१३७) वाडेंकोडें=अचूक. (१३९) डोळेभेट=दर्शन. वेंच=भार. (१४०) कडे लावूं आपुला काळ= आयुष्याचे दिवस घालवूं; कालक्रमणा करूं. (१४६) व्यवसायांत=व्यापार-उदीमांत. तुटी=तूट, तोटा. (१४७) ऋणकरी=येथें धनको असा अर्थ. (१४९) संचिली=सांठविली. आटाआटी=ओढाताण, उपद्याप. (१५०) कोणाकारण=कोणाला. (१५३) उरी=बाकी. (तुझी चांगली खरडपट्टी काढीन, कांहीं बाकी ठेवणार नाहीं.) (१५८) उद्विग्न=येथें उत्कंठित असा अर्थ. (१५९) आडाआडी=आडाआड (प्रपंचाच्या उठाठेवी). बराडी=अधाशी. तांतडी=त्वरित. (१६६) अर्थ=तेथें (पंढरपुरांत) तुझ्या मंदिराच्या मुख्य दरवाजाची दगडी पायरी जशी निश्चल पडली आहे, तसा माझा (पायरीप्रमाणें जमिनीवर निश्चल पडून घातलेला) दंडवत संत तुला सांगतील. (१६९) माझी तुम्ही करा विनवणी=माझ्या वतीनें पांडुरंगाची विनवणी करा. (१७१) विटेवरी न दिसती समचरणें=विटेवर उभा असलेल्या पांडुरंगाचे समचरण तुक्याच्या दृष्टीला कां पडत नाहींत ? त्याजकारणें=त्याला. (१७२) ठेवा=पढ-रीला. (१७३)त्रिविध ताप=तीन प्रकारचीं दुःखें. आधिदैविक,आधिभौतिक आणि आध्यात्मिक असे तीन प्रकारचे ताप आहेत. गुणचरित्रें=भगवंताच्या गुणांचें वर्णन, हरिगुणगायन. (१७५) उगाणा=फेड, बेबाक (पापाचें निर्मू-

लन करून). (१७८) वर्णावयास नाहीं रसना=वर्णन करण्यास माझी वाणी समर्थ नाहीं. (१८१) दांतकसाळी=शाप (माझा शब्द तुला बाधेल.) पोरवडें=पोरकेपण. (१८४) वटवटी=बडबड. (१८९) पत्रिकेचे अभंग=ज्या तुकोबांच्या अभंगांच्या आधारानें या ओंव्या महीपतींनीं लिहिल्या आहेत ते अभंग तुकोबांच्या गाथ्यांत " स्वामींनीं पंढरीनाथास वारकऱ्यांबरोबर पत्र पाठविलें " ह्या मथळ्याखालीं दिले आहेत, ते जिज्ञासूंनीं तेथें पहावे. (तुकारामाचा गाथा, निर्णयसागर प्रत, पृष्ठ ८६३) मूळ अभंग फार सुंदर आहेत, त्यांच्याशीं महीपतींच्या ओंव्याची तुलना करितां, त्या जरा नीरस वाटतात. संकलित=मिळविलेलें, बेरीज, जमा केलेलें. (१९०) गभस्ती=सूर्य. (१९५) तुकासी=बरोबरीस, तुलनेस. वैखरी=वाणी. (१९९) अवधान=लक्ष, एकाग्रता.

अध्याय ४ था.

ओवी १ ली. सप्रेम भक्तहृदयनिवासा=प्रेमळ भक्तांच्या हृदयांत वास करणाऱ्या. (२) गुणनिधाना=गुणभांडारा. यादवराया=यदूपासून झालेले ते यादव. यादवश्रेष्ठा. समुद्रतनया=लक्ष्मी. समुद्रमंथनाचे वेळीं समुद्रांतून जीं चौदा रत्नें निघालीं त्यांपैकीं लक्ष्मी हें एक रत्न होय. म्हणून तिला समुद्रतनया—समुद्राची मुलगी—म्हटलें आहे. (८) (३) अंतरसाक्ष=प्रत्येकाच्या मनांतलें जाणणारा. पुंडलीकवरदा=फार जुन्या काळीं दिंडीरवनांत पुंडलीक या नांवाचा एक मनुष्य रहात असे तो इतका स्त्रीलंपट होता कीं तिच्या नादानें तो आपल्या आईबापांचा अतिशय छळ करी. पुढें कांहीं कारणानें त्यास अनुताप होऊन तो मनोभावेंकरून आईबापांची सेवा करूं लागला. तेव्हां त्याला दर्शन देण्यासाठीं स्वतः देव त्याच्या आश्रमाच्या दारांत येऊन उभा राहिला. आईबापांच्या सेवेंत गुंतलेल्या पुंडलीकानें, तेथें एक वीट पडली होती ती भिरकाविली आणि देवास त्या विटेवर उभे राहण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्या विटेवर पांडुरंग अद्याप उभा आहे, अशी कथा आहे. 'विटेवरी उभा कटावरी हात' इत्यादि शेंकडों अभंगांत या विटेचा उल्लेख संतांनीं केला आहे. पुंडलिकास वर देणारा तो पुंडलीकवरद. पुंडलीकवरदा हरिविठ्ठल ही वारकऱ्यांची घोषणा प्रसिद्धच आहे. (४) विराटस्वरूप वामनमूर्ति=सर्व विश्व व्यापून उरणारा आणि एखाद्या लहान मुलाएवढा दिसणारा. येथें विरोधाभास अलंकार आहे.

विप्रांप्रती स्थापिलें=ब्राह्मणांची स्थापना--वसाहत-केली. (५) असुरदमना= राक्षसांना दमविणाऱ्या. धर्मस्थापका=धर्माची स्थापना करणाऱ्या. "धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे" या गीतावचनावर येथें कटाक्ष आहे. विधिजनका=ब्रह्मदेवाच्या पित्या. ब्रह्मदेव हा विष्णूचा पुत्र. (८) वंदोनी नमावीं सर्व भूतें। तरी गुणदोष आठवत अंतरीं=सर्व भूतांस समभावाने वंदन करावें, तर प्रत्येकाचे गुणदोष लक्षांत येतात (त्यामुळें समभाव टिकत नाहीं.) वंदोनी नमावीं हे एकाच अर्थाचे दोन शब्द योजल्यामुळें येथें पुनरुक्तिदोष झाला आहे. (९) संसारभ्रांति=संसाराचा भ्रम, संसाराची आवड. (१०) बुद्धीसी नावरे चंचल मन=चंचळ मन बुद्धीला आवरत नाहीं. बुद्धीच्या कह्यांत रहात नाही. स्वरूपानुसंधान=तुझ्या स्वरूपावरील लक्ष. (१५) स्वानंदलहरी=आत्मानंदाच्या लाटा, ब्रह्मानंदाचे कल्लोल. (१८) चंद्रभागेचे तीरीं=पंढरपुरास भीमा नदी आहे, तेथें तिला चंद्रभागा म्हणतात. (१९) क्षेत्रप्रदक्षिणा=पंढरपुर नगराभोंवतीं प्रदक्षिणा. (२०) गरुडपार= पंढरपुरांतील पांडुरंगाच्या देवालयांतलें एक स्थल. (२२) सावकाश=स्वास्थ्य. पारधीफांसीं=पारध्यानें लावलेल्या जाळयांत. (२४) जळदेवता=पाण्यांत वास करणाऱ्या देवता. अर्थात् त्या काल्पनिक. वनदेवता त्याच वर्गातल्या. शेषशायी= शेषाच्या पाठीवर शयन करणारा विष्णु. (२५) पाळती लावी=डोळा ठेवी, पाळत ठेवी. (२८) यासी विचार करावा कवण=या बाबतींत कोणता विचार करावा. तुजकारण=तुला. (२९) गरुडास मूळ पाठवावें. तुकोबांस आणण्यासाठीं गरुडास पाठवावें. (३०) विनतासुत=गरुड, वैनतेय. विनता ही गरुडाची आई. (३३) कैलास=शिवलोक, शंकराचें वास्तव्यस्थान. कैलास या नांवाचें हिमालयाचें एक शिखर आहे तेथें शंकर राहतो अशी समजूत आहे. (४१) अपांपती=समुद्र. ओत=ओहोळ, ओढे. (४२) मैलागिरीनें=चंदनानें. कांटवण= कांटेरी झाडें. (चंदनाच्या झाडाशेजारीं असलेले बोरीबाभळीसारखे कांटेतरूदेखील सुगंधित होतात) (४३) वाचस्पतीनें=देवांचा गुरु जो बृहस्पति त्यानें. (४५) खगपती=पक्ष्यांचा राजा गरुड. पवनचाली=वायुवेगानें. (४६) निढळावरी=ललाटावर. पाणी=हात. (४७) चातक=पक्षीविशेष. याला पृथ्वीवरील पाणी पितां येत नाहीं, म्हणून तो वरून पडणारें पावसाचें पाणी, तोंड वर करून, वरच्यावर पितो अशी समजूत आहे. "घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें" (केकावलि, मोरोपंत.) कांसव विलोकीत जननीसी=

कांसवी आपल्या पिलांना पाजीत नाहीं. तिनें प्रेमळ दृष्टीनें त्यांजकडे पाहिलें म्हणजे त्यांची भूक निवते, अशी समजूत आहे. येथें, आपली भूक भागविण्यासाठीं कांसवीचें पिल्लूं तिच्याकडे पाहतें असें महीपतींनीं म्हटलें आहे. (४८) मीनाचें=माशाचें. (५३) दुर्धर=भयंकर, आनिवार. निर्धार=खरोखर. (५४) विष्णुवाहन=विष्णूचें वाहन गरुड. (५५) तृषाक्रांत=तहानेनें व्याकुळ झालेला. (५८) सजल जाहले=पाण्यानें भरून आले. (५९) अंडराज+गरुड. वास्तविक येथें 'अंडजराज' असें पाहिजे. अंडज म्हणजे पक्षी; पक्ष्यांचा राजा गरुड. (६१) नंदिग्रामीं बैसला भरत=श्रीराम वनवासास जावयास निघाले त्या वेळीं त्यांचा बंधु भरत हा नंदिग्रामांत, आपल्या मामाच्या घरीं, होता. राम वनवासास निघून जातांच त्यांच्या वियोगानें त्यांचा पिता राजा दशरथ हा मृत्यु पावला. तेव्हां, कुलगुरु वसिष्ठांनीं भरतास नंदिग्रामाहून अयोध्येस आणविलें. रामास परत आणण्यासाठीं भरत गेला असतां, रामांनीं त्याची समजूत घालून व "मी वनवासाहून परत येईपेंत माझ्या नांवानें तूं राज्य चालव" असें सांगून त्यास परत पाठविलें. भरतानें रामाच्या पादुका सिंहासनावर स्थापून त्याच्या नांवानें राज्य चालविलें व स्वतः अयोध्येंत न राहतां, नंदिग्रामीं जाऊन वास्तव्य केलें व तेथें तो रामाच्या आगमनाची वाट पहात बसला. अंजनीसुत=अंजनीचा पुत्र मारुती. (६२) खगेश्वरें=गरुडानें. खग म्हणजे पक्षी, त्यांचा ईश्वर म्हणजे राजा गरुड. अंतर=मन. जाहलें स्थिर=समाधान पावलें. (६३) मधुरोत्तरीं=गोड शब्दांनीं. (३६) पूज्यमान= पूजनीय, वंद्य. सुजाण=सुज्ञ. विचक्षण=निपुण, कुशल, दूरदर्शी. (६७) वाळे नेपुरें बांधितां शिरीं=वाळे, नूपुर हे पायांत घालण्याचे दागिने जर डोक्यांत घातले तर तें हास्यास्पद दिसेल. (६८) प्रतिमास्थानीं=मूर्तीच्या ठिकाणीं. हडपी=वारा घालणारा. (७१) अजित=अजिंक्य. जितोनी=जिंकून. भक्तिबलानें वश करून घेऊन. (७७) हिंवसली=खट्टू झाली. (८४) आषाढी एकादशीस पंढरपुरांत मोठी यात्रा भरते त्या वेळीं तेथें जे अनेक उत्सव होतात त्यांपैकीं एक. ८६ व्या ओवींत ज्या पांच पुरुषांचीं नांवें आलीं आहेत ते त्या वेळचे प्रसिद्ध संत होत. त्यांपैकीं शेख महमद हे धर्मानें मुसलमान असून त्यांनीं 'चांग बोधला' ऊर्फ चंद्रभट नामक एका ब्राह्मणाचा उपदेश घेतला होता. या सर्वांच्या कथा महीपतिकृत संतचरित्रग्रंथांत दिल्या आहेत.(८७) गरुडटके=गरुडाचें चित्र काढलेला ध्वज. निंबराज=वरील पांच संतांपैकीं एक संत.

(८९) आशंकित=शंकाकुल, साशंक. (९०) वक्त्यार्चे=कवीचें, महीपतींचें. (९१) उदेला=उदय पावला. प्रारब्धगतीं=दैवयोगानें, सुदैवानें. (९२) लोहसंदुकेंत=लोखंडाच्या पेटींत. (९३) द्विगुण=दुप्पट. सभाग्य=भाग्यवान्. (९५) स्वदेशांत=महाराष्ट्रांत. वृत्ति पुरातन=जुन्या काळापासून परंपरेनें चालत आलेलें काम. (९८) बारा ज्योतिर्लिंगें=हिंदुस्थानांतील निरनिराळ्या बारा ठिकाणीं शंकराचीं १२ स्वयंभू लिंगें आहेत, त्यांना द्वादश ज्योतिर्लिंगें म्हणतात. त्यांचीं नांवें व स्थलें—रामेश्वर, हिंदुस्थानच्या दक्षिण टोंकास. मल्लिकार्जुन=मद्रास इलाख्यांत पूर्वघाटाच्या एका शिखरावर. भीमाशंकर= पुणें जिल्ह्यांत भीमानदीच्या उगमाजवळ. त्र्यंबकेश्वर=नासिक जिल्ह्यांत गोदावरीच्या उगमाजवळ त्र्यंबक येथें. घृष्णेश्वर=मोगलाईंत वेरुळाजवळ. नागनाथ=मोगलाईंत आवढ्या नागनाथ येथें. वैजनाथ=मोगलाईंत. सोमनाथ=काठेवाडांत. ॐकारेश्वर=नर्मदाकांठीं. महाकालेश्वर=उज्जनी येथें. विश्वेश्वर=काशी येथें. बद्रिकेश्वर=हिमालयांत. (९९) चोखडें=प्रेक्षणीय. येथें चोखडीं असें पाहिजे. सप्त पुऱ्या=अयोध्या, मथुरा, हरिद्वार, काशी, कांची (कांजीवरम), अवंती, द्वारका. (१००) संकलित=संक्षिप्त, थोडक्यांत. (१०१) भागीरथी=गंगा. भगीरथ राजानें हिला पृथ्वीवर आणली म्हणून हिला भागीरथी म्हणतात. (१०६) वापी=विहीर. (१०७) क्षेत्रीं=शेतांत. सघन=दाट. देसायांनीं=ग्रामाधिकाऱ्यांनीं; देसाई हा एक जुना हुद्दा आहे. (१०८) भद्रासनीं=सिंहासनावर. (१०९) घृत=तूप. (११०) गजवदनासी= गणपतीस. (११२) यामिनींत=रात्रीच्या वेळीं. पार्वतीसुत=गणपति. (११३) तांबूल=विडा. सुषुप्ति=स्वप्नावस्था, स्वप्नांत. (११५) रंगदेवता= गायनांत, भजनांत, कीर्तनांत किंवा व्याख्यानांत जो रंग भरतो तो. त्यालाच देवता म्हटलें आहे. (११८) आरक्त=तांबड्या रंगाचा (विड्याचा डाग). क्षाळिला=धुऊन टाकला. (११९) अवर्षणीं=अनावृष्टींत, पर्जन्याभावीं. उन्मनी=योगाचा अभ्यास करीत असतांना प्राप्त होणारी एक विशिष्ट अवस्था. या अवस्थेंत योगी गेला म्हणजे त्याला भूक लागत नाहीं असें म्हणतात. (१२१) विरिंचीनें=ब्रह्मदेवानें. (१२२) हिंवें फुटले=थंडीनें कुडकुडले. (१२७) आरक्त=लालबुंद. (१३२) राऊळाकडे=पांडरंगाच्या देवालयाकडे. (१३३) सुवर्णपांकळया=गांजराच्या फांकीच्या जागीं सोन्याच्या फांकी दिसल्या. (१३६) गलितकुष्टी=महारोगी, रक्तपित्या, कोड भरलेला. ती सुंदर=सुंदर स्त्री.

(१३७) चिळसलें मन=मनाला चिळस आली. (१४२) अंबरा=आकाशाला (१४३) समुद्राकारण=समुद्राला. (१४८) मेखळा=कमरपट्टा, करगोटा, मुंजींतील कटिसूत्र. (१४९) भीमरथींत=चंद्रभागेंत. (१५०) न लागतां पातया पातीं=डोळ्यांचीं पातीं लागतात न लागतात तोंच, तत्क्षणीं. (१५९) वाळुवंटीं=चंद्रभागेकांठच्या वाळवंटावर. केली दिवाळी भाविकां=भाविकांना जणूं काय आनंददायक प्रसंग आणला. (१६४) विबुध=देव. (१६५) साबडें=साळेंभोळें (१६८) घरचारी=गृहिणी. (१७२) मयूरपिच्छें= मोरपिसें. (१७७) विरूपाक्ष=श्रीशंकर. भक्तभूषण=भक्तांना भूषणांप्रमाणें वाटणारा किंवा भक्तांना जो भूषणें मानतो. (१८१) टाकूनि जाती वर्णसोये= जातिभेद विसरून. (१९०) पुढती=पुनः (१९४) सुकृत=पुण्य. (१९६) यात्रेचा समुदाय फुटला=यात्रेला आलेले लोक आपापल्या गांवी जाऊं लागले. यात्रा ओसरली. खंतावला=दुःखी झाला, त्याला खंती वाटली. (२००) अपर्णावर=शंकर. (२०५) ठावो=ठावठिकाण, पत्ता.

अध्याय ५ वा.

ओवी १ ली. आदिस्तंभा=सृष्टीच्या आधारस्तंभा, मूलस्तंभा. सायुज्य-उदारा=सायुज्यमुक्ति देण्याइतकें औदार्य आहे ज्याचें. (२) भवबंधफांसोटी= संसारबंधनाचा पाश. तुटी=तुटातूट. (३) सहस्रमुखानेंही=शेषालाही. लेखा=मोजमाप. (९) प्रभंजनास=वायूला. (१५) अंतरगुज=मनोगत. निजभक्तविजयकथा=आपल्या भक्तांच्या विजयाच्या कथा. (१९) निज-भक्त जे अंतरंग=तुझे अंतरंगांतले-विशेष सलगीचे-भक्त. (२०) पुढें करिसिल=देऊं करशील. (२९) उठाउठी=घाईघाईनें. (३०) निपजलें असेल=तयार केलें असेल. विस्तारून=वाढून. ओलेंकोरडें=जाडेंभरडें, गरि-बीचें. (३४) शाकेसी=तोंडीं लावण्यास, रुचीसाठीं. (३५) कदन्न=हलकें अन्न. (३७) श्रीकृष्ण शिष्टाईसाठीं दुर्योधनाकडे गेले असतां दुर्योधनानें त्यांच्यासाठीं नानाप्रकारचीं पक्वान्नें करून त्यांना जेवावयास बोलाविलें, परंतु त्याच्या आमंत्रणाचा स्वीकार न करितां भगवान्, आपला भक्त जो विदूर त्याच्या घरीं गेले आणि त्याच्या घरच्या कण्या त्यांनीं मोठ्या आवडीनें खाल्ल्या. (३८) पांडव वनवासांत असतां, दुष्ट दुर्योधनानें, त्यांचें सत्त्वहरण करण्यासाठीं, दुर्वासऋषींस, त्यांच्या शिष्यांसह, अपरात्रीं, पांडवांकडे पाठविलें.

तेव्हां द्रौपदीनें श्रीकृष्णांचा धांवा केला.त्या वेळीं भगवान् जेवावयास बसले होते. द्रौपदीची हाक कानीं पडतांच, समोरचें ताट दूर लोटून भगवान् द्रौपदीपाशीं गेले आणि " मला भूक लागली आहे, कांहीं तरी खावयास दे " असें म्हणाले. द्रौपदीपाशीं त्यांना देण्यासारखें कांहीं नव्हतें. तेव्हां, स्थालींत एक भाजीचें पान चुकून राहिलें होतें तेवढेंच खाऊन त्यांनीं ढेंकर दिला आणि ऋषींस पोटभर जेऊं घालून, पांडवांच्या सत्त्वाचें रक्षण केलें. (३९) भिल्लिणीचीं उच्छिष्ट फळें। भक्षी घननीळ निजप्रीती=श्रीराम वनवासांत असतां एका भाविक भिल्लिणीनें त्यांना कांहीं बोरें मोठ्या प्रेमानें अर्पण केलीं. तीं बोरें गोड आहेत कीं आंबट आहेत हें समजून घेण्यासाठीं तिनें तीं अगोदर आपल्या दांतांनीं चावून पाहिलीं होतीं व तीं उष्टीं बोरें भगवंतांनीं मोठ्या आवडीनें खाल्लीं (४३) वियोगहिंपुटी=वियोगदुःखी (माझ्या वियोगानें दुःखी होऊं नकोस.) (४६) कामना धरूनी=कांहीं तरी इच्छा मनांत धरून. पुराण-व्युत्पत्ति=अभ्यास करावा न लागतां पुराणाचा अर्थ सांगतां यावा. (४७) दृष्टांत दाविला=खुणेनें सांगितलें, स्वप्नांत येऊन सांगितलें. (४९) अलकावतीसी=आळंदी येथें. तेथें ज्ञानदेवांची समाधि आहे. (५४) विकल्पी=संशयी. प्राकृत=मराठी. (५५) प्राक्तनहीन=दुर्दैवी. (५६) निधान=पुरलेलें द्रव्य. (५७) भागीरथीची कुपी=गंगेच्या पाण्यानें भरलेली कुपी. उन्मत्तासी भासे मद्यपान=दारूबाजाला ती कुपी दारूनें भरलेली आहे असें वाटतें. डावलून=बाजूस टाकून. (५८) ज्ञानराजाला=ज्ञानदेवांना. (५९) उचित=योग्य ती वस्तु, इच्छित वस्तु. (६०) एकादश अभंग=त्या ब्राह्मणाला (तुकोबांनीं) दिलेले ११ अभंग. महाफळ=नारळ. सवेग=त्वरेनें. (६२) ब्राह्मणजन=आचारी, शागीर्द. (६९) साकल्यें=विस्तारेंकरून. (७०) गीर्वाण भाषा=संस्कृत भाषा. (७५) देवासी=चिंतामणि देवांना. (७६) मताभिमान करून=आपल्याच मताचा अभिमान धरून. हेळण=अवहेलना, कुचेष्टा. (७७) पाचारूनि=बोलावून. (७८) ब्राह्मणभक्त=ब्राह्मणांविषयीं आदर बाळगणारा. (८५) हिलाल=मशालीसारखी प्रकाश देणारी एक वस्तू. (८७) चांभारगोंदें=हें गांव अहमदनगर जिल्ह्यांत आहे. ज्ञानसागर=ज्ञानी. शेख महंमद=पूर्वी यांची थोडी माहिती दिली आहे. यांचा ' योगसंग्राम ' या नांवाचा एक ओवीबद्ध ग्रंथ व इतर कांहीं फुटकळ कविता आहे. (८९) आरोगिले मूग=मूग

गिळून बसले, तोंडें बंद झालीं. (९०) वक्तयानें=शेख महंमदांनीं. (१००) एक जाहले असती=एकरूप झाले होते, आपपर भाव हरपला होता. (१०३) एकवटें=एकवट, एकत्र. (१०४) प्रतिमा=मूर्ति. उपकरण=पूजापात्र. (१०५) घृत=तूप. नवनीत=लोणी. (१०९) सांडणी=सांडणीस्वार. (११४) मीन नीटचि धार चढती=उंचावरून खालीं पडणाऱ्या पाण्याच्या धारेंत खालचे मासे वर चढून जातात. (११६) पिपीलिका=मुंगी. अंतरिक्ष=आकाश. विहंगम=पक्षी. (१२०) सिंहावलोकनें=मागील संदर्भ लक्षांत घेऊन. सिंह चालतांना मध्येंच थांबून मागें पाहतो त्यावरून हा शब्द रूढ झाला आहे. (१२७) विदेही होऊनि=देहभान विसरून. (१२७) मकरंद=फुलांतला मध, केसर. महीपतींनीं येथें सुगंध या अर्थी हा शब्द वापरला आहे. (१३०) त्यांकारण=त्यांना. (१३२) तेथून=चिंचवडाहून. (१३३) कृपावलोकनीं= कृपेनें अवलोकन करून, कृपा करून. (१३६) सरितानाथ=समुद्र. नद्या समुद्रास मिळतात म्हणून त्याला सरितानाथ म्हणतात. (१३८) लोहरज=लोखंडाचे कण. (१३९) कडोविकडी=नानापरींनी आळवून. (१४१) धरामर= पृथ्वीवरील देव, भूदेव, ब्राह्मण. (१४६) निखळ=मूळ निखिल म्हणजे सर्व. (१४७) मनुष्यरहाटी=(याच्या सर्व शरीरांत कापूस भरलेला असतां) मनुष्याप्रमाणें याचे सर्व व्यापार कसे चालतात? (१४८) रुधिर=रक्त. चैतन्य=चिच्छक्ति, जीव. (१४०) पंचभूतांचें=पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश हीं पंचमहाभूतें. अडिंबर=अवडंबर. जीवासी लाविलें प्रपंच काबाडें= संसाराचे काबाडकष्ट. (१५०) याविरहित=ज्याच्यामागें ही उपाधि नाहीं असा. प्राकृत=सामान्य, इतर माणसांसारखा. (१५३) अंडजयातीमाजी=पक्ष्यांमध्यें. सुपर्ण=गरुड. गौण=अयोग्य, उणी. (१५५) प्रांजल=सरळ. (१५६) येरू=येर म्हणजे दुसरा, तुकाराम. (१५७) आमुचा स्वामी भृगूची लात०=भृगु ऋषीनें, कोणता देव श्रेष्ठ हें ठरविण्याकरितां देवांची परीक्षा पाहण्यासाठीं विष्णूच्या छातीवर लाथ मारली तेव्हां विष्णूंनीं न रागावतां उलट "माझ्या दगडासारख्या कठीण छातीवर आपण लाथ मारल्यामुळें आपला पाय दुखावला असेल" असें म्हणून ऋषींच्या पायांचें संवाहन केलें, व लाथेमुळें छातीवर जो वळ उठला तो भूषणाप्रमाणें मानिला. (१६१) जे=कीं, कारण कीं. (१६४) लोहोगांव=पुणें जिल्ह्यांत आहे. (१६५) धणीवरी=पोटभर, तृप्ति होईपर्यंत. प्रेमामृतलहरी=हरिप्रेमरूप अमृताचा चषक.

(१६६) विर्नीत=विनम्र. (१६७) ब्राह्मणसंतर्पण=ब्राह्मणभोजन. (१७०) व्यवसायी=व्यापारी. (१७१) येथें तुज निद्रा लागली कैसी ?=घोड्यावर बसून तूं झोंप कशी घेतोस ? घोड्यावर बसलेला असतांना तुला झोंप कशी येते ? (१७२) त्यांकारण=त्यांना. (१७४) अर्थ—ज्या ठिकाणीं (लोहगांवांत) तुकोबांसारख्या प्रेमळ भगवद्भक्ताचें कीर्तन होत असतें, तेथें आपलें कीर्तन-कौशल्य लोकांस रुचणार नाहीं. ज्याप्रमाणें एखाद्या रोग्याला दिव्य अमृत मिळाल्यावर तो औषध कधींही घेणार नाहीं. (१७५) कांचमणी=कांचेचे मणी. (१७६) धीटपाठ=सहजस्फूर्तीनें कीर्तन न करितां, विद्वत्तेच्या जोरावर व गायनादि मनोरंजक प्रकारांच्या साहाय्यानें धंदेवाईक कीर्तन करणें. (१७७) डावलोनियां=बाजूस टाकून, सोडून. (१८२) धांवणार=धावणेकरी, जासूद. (१८७) देशावर करूनी=वर्गणी जमवून. (१८९) वस्तीकर= राहणारे, नागरिक. (१९०) असाम्या मांडोन दीधल्या=कोणाकोणाकडून वर्गणी घ्यावयाची त्यांचीं नांवें लिहून दिलीं. (१९१) पत्रीं अंक घालावा= कोणी किती वर्गणी द्यावयाची तो आंकडा त्याच्या नांवापुढें घालावा. (१९२) तूळ=एक रुपया. टाळी=आठ आणे. पकार=पावली, चार आणे. (१९४) मुळु=पांच रुपये. उत्तमावरी=श्रीमंताच्या नांवापुढें. उदाणूकें=तीन रुपये. मध्यमावरी=साधारण श्रीमंत अशा मनुष्याच्या नावापुढें. कनिष्ठावरी=सामान्य मनुष्याच्या नांवापुढें. एक आंख=एक रुपयाचा आंकडा. (१९६) उकलोनि= वसूल करून. मुख्य जे म्हणवीत होते थोर=जे स्वतःस थोर म्हणवीत होते असे मुख्य मुख्य लोक, पुढारी. (१९८) दातियांच्या=दात्यांच्या. चित्तांतरीं= मनांत. (१९९) मक्षिका=माशी. लवणकणिका=मिठाचा खडा. प्रेमळांमाजी लटिका । कुटिळ येऊन बैसला=प्रेमळ लोकांच्या समुदायांत थापेबाज कपटी मनुष्य येऊन बसला. (२०१) पश्चिम धान्यावरी=उन्हाळी पिकावर. तांबारा= पिकाचा नाश करणारा एक प्रकारचा जंतुजन्य रोग. (२०२) वोळल्या पर्जन्यधारा=आकाशांत पाऊस भरून आला. दक्षिणवारा=दक्षिणदिशेकडून वाहणारा वारा. हा वारा पावसाचा जोर कमी करतो असें म्हणतात. राहु प्रगटला त्या-आड=राहूनें त्याला ग्रासलें, ग्रहण लागलें. (२०३) बोहरी=निरसन, नाश. परी= उपाय, प्रकार. (२०४) चुकलें वांकलें गांवांत । राहूं सर्वथा न द्यावें=ज्याच्या-कडून वर्गणी मिळाली नाहीं असा एकही मनुष्य गांवांत राहूं देऊं नका. (२०५) दुर्बळ=दरिद्री. साळी=कोष्टी. (२०६) भक्त प्रेमळ=तुकोबा. रुका

अधेला=पैसा अर्धापैसा. (२०९) पांजणी=विणलेल्या वस्त्रांस खळ लावीत होता. (११४) संसारा पाडूनि तुटी=संसाराचें वाटोळें करून. (२१९) उदकपात्र=पाणी पिण्याचें भांडें, तांब्या. (२२१) दावाग्नि=वणवा. शेरास= हुऱ्याचे झाडास. (२२२) घर्म दटला=घाम आला. (२२३) जे=कीं. उदारत्व धरी=औदार्य दाखवी. (२२७) उजळेनि=घांसून. कांचनाऐसें= सोन्याच्या भांड्यासारखें. (२२८) तांवूनि=तापवून. (२३२) उकळोनि= वसूल करून. (२३३) ग्रामवासी=या गांवांत राहणारा, नागरिक. परमशठ= महा लुच्चा. (२३५) तल्लीन=येथें आश्चर्यचकित किंवा लज्जित असा अर्थ घ्यावा. (२४२) घृत=तूप. (२४४) सिधासाहित्य=भोजनाची सामग्री. (२४७) स्वप्नसंभ्रम=स्वप्नांतला देखावा. (२४९) घरीं कलह मांडिला थोर=(तुपासाठीं) घरीं बायकोनें आपल्याशीं मोठें भांडण केलें. (२५०) केशव चैतन्य, राघव चैतन्य व बाबाजी चैतन्य या नांवाचे चैतन्य सांप्रदायी तीन सत्पुरुष तुकोबांपूर्वी महाराष्ट्रांत होऊन गेले. त्यांपैकीं बाबाजी चैतन्य हे तुकोबांचे गुरु. हे समाधिस्थ झाल्यावर यांनीं स्वप्नांत तुकोबांस उपदेश दिला. (२५१) त्रिपुरारी=श्रीशंकर (२५२) या ओवींत, ज्या दिवशीं स्वप्नांत गुरूपदेश झाला ती तिथि दिली आहे. (२५७) कर्ममार्ग=वेदप्रतिपादित स्नानसंध्या व यज्ञयागादि मार्ग. आन=अन्य, दुसरें. (२५८) गंडिकामूर्ति=गंडकी शिळेची मूर्ति, शाळिग्राम. (२५९) जळती=जळफळतात. (२६१) अंबऋषी=राजा अंबरीष, सूर्यवंशीय नाभागाचा पुत्र. हा मोठा भगवद्भक्त, दानशूर, व पराक्रमी होता. यानें सात दिवसांत सर्व पृथ्वी जिंकली. एकदां यास, नित्याप्रमाणें कार्तिकांतील त्रिदिनात्मक एकादशीचें व्रत असतां, द्वादशीचे दिवशीं दुर्वास ऋषि याचे घरीं आले. अंबरीषानें त्यांचें पूजन करून त्यांना भोजनास राहण्याची विनंति केली. 'ठीक आहे' असें म्हणून दुर्वास नदीवर स्नानास गेले. इकडे द्वादशी तिथि संपत आल्यानें, व्रतभंग होऊं नये म्हणून राजानें ब्राह्मणांच्या संमतीनें तीर्थप्राशन करून पारणें केलें. दुर्वासांस हें आवडलें नाहीं. ते संतापले व त्यांनीं आपल्या जटेंतील एक बट काढून जमिनीवर आपटली. तेव्हां तिच्यापासून एक राक्षसी उत्पन्न झाली ती त्यांनीं राजाच्या अंगावर सोडली. राजा भगवद्भक्त असल्यामुळें विष्णूंनीं त्याच्या संरक्षणार्थ सुदर्शन चक्र सोडलें. त्या चक्रानें राक्षसीचा वध केला व तें दुर्वासांच्या मागें लागलें.

तेव्हां ते त्रस्त होऊन पळत सुटले. शंकर, ब्रह्मदेव, विष्णु यांजकडे ते गेले व विष्णूच्या सांगण्यावरून परत अंबरीषाकडे आले. त्यानें चक्राची स्तुति करून त्याला शांत केलें व नंतर दुर्वासांना भोजन घालून स्वतः भोजन केलें. (२६६) विक्षेप फार वाढला=(तुकोबांस) फार खेद झाला. (२६७) कांचेची कुपी ओतिली=सांच्यांत कांचेचा रस ओतून कुपी बनविली. पट्टकूलाची=रेशमी वस्त्राची. पावकें=अग्नीनें. (२६८) अजापाळें=धनगरानें. बनकराला=माळ्याला. (२६९) वैष्णवभक्तां विक्षेप=वैष्णव म्हणजे वारकरी, त्यांना देवपूजेस तुलसीपत्रें लागतात. तुळशीचीं झाडें बोकडानें खाल्लीं तर त्यांना जसें दुःख होतें त्याप्रमाणें. (२७१) मुक्ताफळ=मोतीं. जोहरी=जवाहिऱ्या. (२७३) धरणें=हट्ट धरून बसणें; अमुक गोष्ट घडल्याशिवाय आपण येथून उठणार नाहीं असा हट्ट धरून बसणें. (२७४) अरिष्ट उठवोनियां=संकट उपस्थित करून. (२७५) मतिमूढासि=मतिमंदाला, निर्बुद्धाला. नामदेवाची बाकी राहिली=नामदेवांनीं शतकोटि अभंग रचण्याची प्रतिज्ञा केली होती, त्यांपैकीं त्यांच्याकडून जेवढे अभंग व्हावयाचे राहिले ते. (२८३) अक्षरांलागीं जीवन । आतळलें नाहीं सर्वथा=वह्यांतलि अक्षरांना पाण्याचा स्पर्श बिलकुल झाला नाहीं. (२८७) अपाय=विघ्न, उपद्रव. (२९२) पंढरीनिवास=पांडुरंग. (२९३) बद्धांजली=हात जोडून. सात अभंग=हे अभंग फार प्रेमळ आणि हृदय हालवून सोडणारे आहेत. जिज्ञासूंनीं गाथ्यांत पहावे. (२९४) लाविलीं नेत्रपातीं=डोळे झांकले. (२९६) यातिहीन=हलक्या जातीचा. (२९७) कोडें=संकट, सांकडें. (२९९) निगुतीं=मुद्दाम. (३००) तुजकारण=तुला. (३०१) एकदां चुकी पडली=एकदां हातून चूक झाली. (३०३) पुढती=पुनः, परत. (३०५) आघात=तडाखे.(३०६) स्वल्पासाठीं=अल्प लाभासाठीं.(३०८) शशीपरी=चंद्राहून. माउलीपरीस=आईपेक्षां. कल्लोळ=लहरी. (३०९) अनिर्वाच्य=वाचेनें वर्णितां येत नाहीं असा. (३१०) त्यापरता=त्याच्यापेक्षां, अमृतापेक्षां. (३११) संसर्ग=संबंध. (३१५) अंतर्गाभारांत=आंतल्या गाभाऱ्यांत, देहू येथील विठ्ठलमंदिरांतील विठ्ठलमूर्ति ज्या गाभाऱ्यांत आहे त्यांत. (३१६) पुढें देहासहित तुकाराम जाण । वैकुंठभुवना पातला=तुकाराममहाराज सदेह वैकुंठास गेले अशी आख्यायिका असल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. तुकोबांच्या समकालीन व उत्तरकालीन अनेक संतकवींनीं या गोष्टीचा उल्लेख

आपल्या कवितेंत केला आहे. (३१८) दत्तात्रेय अनसूयासुत=अत्री ऋषींची पत्नी अनसूया ही दत्तात्रेयाची माता. विचरत=हिंडत असतो. (३१९) निळोबाचे स्वप्नीं येऊनी। उपदेश केला निजकृपें=निळोबा हे तुकोबांच्या परंपरपले एक मोठे साधु तुकोबांचें निर्याण झाल्यावर निळोबांस त्यांनीं स्वप्नांत उपदेश दिला अशी कथा आहे.

—:०:—

शुद्धिपत्र

विद्यार्थ्यांनीं कृपा करून या शुद्धिपत्राप्रमाणें ओव्यांत दुरुस्ती करून मग पुस्तकाचा उपयोग करावा.

पृष्ठ	ओवी	अशुद्ध	शुद्ध
२३	८८	धृत	घृत
५३	७१	ऐका	ऐक
५४	८९	जीवितां	जीविता
५६	११७	घ्यानासी	ध्यानासी
६५	१९	खद्यौत	खद्योत
६६	३८	गर्जेंद्रांसी	गर्जेंद्रासी
७०	८७	दिपकासी	दीपकासी
७३	१२६	तू	तूं
७५	१४५	विष्ठुरता	निष्ठुरता
७५	१४८	कांरडें	कोरडें
८२	४४	तयार	तयावर
८३	५८	श्रवणी	श्रवणीं